म. ग्रं. सं. ठा
मुख्य
५८
२२६०
८४६



# व
# पूर्वेकडील
# श

EFBK-0018125

—ना. तु. ठाकूर

११९?
८०३०२
११।३।०९

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :— खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

23 MAR 1975

[कृ. मा. प.]

# जपान व अतिपूर्वेकडील देश

लेखक : श्री. ना. तु. ठाकूर, बी. ए. (ऑ.)
[ ना. तु. बाग, सुखाचा मूलमंत्र, भारतदर्शन इ. पुस्तकांचे कर्ते ]

क्र. क्र. ९८९२५


पॅरॅमाउंट प्रकाशन : ५५

REFBK-0018125

* मूल्य १२ रुपये *

प्रकाशक : ना. तु. ठाकूर, पॅरॅमाउंट प्रकाशन, ४८१ शनवार, पुणे ३०.
मुद्रक : य. गो. जोशी, आनंद मुद्रणालय, १५२३ सदाशिव, पुणे ३०.

# छोट्या आणि मोठ्या दोन्ही धंद्यांसाठी आमच्याकडे योजना आहेत



उद्योग-विकासाची तुमची योजना घेऊन
महाराष्ट्र बँकेच्या कोणत्याही शाखाधिकाऱ्याला भेटा

## बँक ऑफ महाराष्ट्र

रजिस्टर्ड ऑफीस: ११७७, बुधवार पेठ, पुणे-२.

6956

**Dedicated to the Sacred Memory of Ogamisama**

*The Prophet of Tabuse*

JAPAN



ताबूसे, जपानच्या प्रेषिता

**ओगामिसामा**

यांच्या पवित्र स्मृतीस

**समर्पण**

# वाताशीताची अरिगातो गोझाईमास

शिष्टाचाराबद्दल प्रख्यात असलेल्या जपानी भाषेतील वरील वाक्याचा अर्थ आहे, 'आम्ही आपले आभारी आहोत.' या ग्रंथाच्या उभारणीत ज्यांचे ज्यांचे साहाय्य झाले त्यांचेबद्दल वरील मथळ्यातून आम्ही कृतज्ञता व्यक्त करतो. डॉ. नानासाहेब परुळेकर यांनी कामाचा प्रचंड व्याप असतानाही प्रस्तावना लिहिण्याविषयी विनंती करताच होकार दिला व अल्पावधींत ही कामगिरी उरकली याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे. ग्रंथातील मजकुरासाठी स्वानुभवांखेरीज अनेक सरकारी पुस्तकांचा व ग्रंथांचा अभ्यास करावा लागला त्यांच्या लेखक प्रकाशकांचाही मी आभारी आहे. काही पुस्तके इंटर नॅशनल बुक सर्व्हिस व नुकतेच जपानला जाऊन आलेले माझे मित्र श्री. भाऊसाहेब पाध्ये यांचेकडून अवलोकनास मिळाली.

'जपानी भाषा' या प्रकरणासाठी उद्योगरत्न श्री. दादासाहेब वेलणकर यांच्या ३० वर्षांपूर्वी लिहिलेल्या पुस्तकाचाही काही उपयोग झाला. सौ. नाकायामा यांच्या 'Anata to Watashi' या पुस्तकांतील जपानी लिपी रोमन अक्षरांत दाखविणाऱ्या तक्त्याचा फोटो ब्लॉक या पुस्तकात मुद्दाम घातला आहे. नॅशनल केमिकल लॅबोरेटरींतील श्री. देशपांडे व त्यांच्या सुविद्य जपानी पत्नी यांनीही या विषयावर काही उपयुक्त सूचना केल्या. जपानी भाषेचा अभ्यास माझेपेक्षा माझी कन्या कु. लीना हिचा पद्धतशीर व दीर्घकाल असल्याने प्रकरण लिहिताना तिच्या ज्ञानाचाही उपयोग झाला. पुस्तकातील बरीच छायाचित्रे होन्ब तावूसे यांचेकडून मला मिळाली, तसेच मि. लँगॉफ यांनी काही फोटो भेट दिले. बाकी छायाचित्रे मी स्वतःच टिपलेली आहेत.

ग्रंथाचे संबंधात महाराष्ट्र बँकेचे कस्टोडिअन श्री. जोग, अर्थशास्त्रज्ञ श्री. ए. टी. अकोलकर व श्री. शंकरराव ठाकूर यांचे साहाय्य उपयुक्त ठरले. कव्हरची ऑफसेट छपाई किर्लोस्कर प्रेसने व आतील आनंद प्रेसने सुबक केल्याबद्दल त्यांचे तसेच फोटोचे ठसे श्री. के. सी. भिडे ब्लॉक मेकर्स यांनी तातडीने करून दिल्याबद्दल त्यांचे आभार.

या ग्रंथाने जपान व अतिपूर्वेकडील देशांबद्दल वाचकांची जिज्ञासा कांहीं अंशाने तृप्त झाली तरी लेखकास समाधान वाटेल.

शांतिः शांतिः शांतिः

अनंत चतुर्दशी,<br>शके १८९२

सर्वांचा नम्र<br>**ना. तु. ठाकूर**

# प्र स्ता व ना

'जपान व अतिपूर्वेकडील देश' या आपल्या पुस्तकाला प्रस्तावना मी लिहावी म्हणून श्री. ना. तु. ठाकूर मजकडे आले, तेव्हा साहजिकच मागची आठवण झाली आणि मी विचारले, "ठाकूर, तुम्ही 'सकाळ' मध्ये बऱ्याच वर्षांपूर्वी होता, 'सकाळ' चे भावंड 'तेज' नांवाचे दैनिकाचे तुम्ही संपादक होता आणि 'तेज' चा खप त्यावेळीं दहा हजारावर होता, त्या काळाच्या मानाने तो काही लहान नव्हता. तुमच्या लेखनाला 'सकाळ' मधून सुरुवात झाली आहे." त्यावर श्री. ठाकूर यांनी उत्तर दिले, "नुसता बऱ्याच वर्षांपूर्वी नसून एक जानेवारी, १९३२ रोजी 'सकाळ' सुरू झाला, त्या अगोदर एक महिना, म्हणजे डिसेंबरात, जी माणसे घेण्यात आली त्यांत मी होतो. प्रथम 'केसरी'साठी मी तात्यासाहेब केळकर यांच्याकडे गेलो; त्यांनी मला 'सकाळ'कडे धाडले." तेव्हा ठाकूर यांच्या पुस्तकाला प्रस्तावना लिहिताना कांहीसा आपलेपणा मला वाटला असल्यास नवल नाही.



डॉ. नानासाहेब परुळेकर

जवळ जवळ अडीच महिने श्री. ठाकूर यांचा दौरा झाला. त्यांत पावणेदोन महिने जपान आणि बाकी काळात परत येताना हाँगकाँग, फिलिपाईन्स, थायलँड, सिंगापूर व सिलोन हे देश त्यांनी पाहिले. या पुस्तकात नाना प्रकारचे निरीक्षण ठाकूर यांनी दिले आहे. स्वतःचे व्यक्तिमत्व बाजूस ठेवून सूक्ष्म दृष्टीच्या कॅमेऱ्याने पाहिले असता, जग कितीतरी निराळे, नवे आणि उद्बोधक दिसू लागते. काही थोडे अपवाद वगळल्यास हिंदुस्थानातून परदेशी जाणारा दारिद्र्यांत जात असतो. स्वतःचा पैसा असला तरी, परदेशी चलन देण्याच्या बाबतीत रिझर्व्ह बँकेकडून होणारी खळखळ, त्यामुळे कसाबसा प्रवास पुरा करण्याइतकाच खिशात पैसा. ते दारिद्र्य इतके कठोर असते की एखादे चांगले जेवण घ्यावयाचे, चार दोन स्नेह्यांना पाहुणचार द्यावयाचा किंवा दुकानांत दिसणारी दोन तीन पुस्तके घ्यावयाची म्हटली, तर ते जवळ जवळ अशक्य म्हणून सोडून द्यावे लागते. श्री. ठाकूर यांना ही अडचण पदोपदी भासली,

हात बांधून जावे आणि हात बांधून यावे अशी त्यांच्या चिकित्सक मनाची स्थिति झाली.

रुपयाचे अवमूल्यन आणि त्यात रिझर्व्ह बँकेची कात्री या दोन कारणांनी प्रवासात असताना परदेशांतील जिन्नस आणखी महाग वाटतो. तिकडच्या कित्येक पदार्थांच्या किंमती ठाकूर यांनी रुपयात दिल्या आहेत. एक दात काढण्याला पंचवीसशे येन, म्हणजे शंभर येनला सव्वा दोन रुपये या भावाने पंचावन्न रुपये पडले. परंतु त्याचबरोबर विमानाचा दर त्यांनी दिला तो पहा. तीन किलोमीटरला टूरिस्ट प्रवासास एक रुपया, आपल्याकडील मोटार व रिक्षावाल्यांनी गिऱ्हाइकाला आपण काय आकारतो, हे त्यावरून पाहावे. हिंदुस्थान सरकारने आठ वर्षे चर्चेनंतर छोट्या मोटारी तयार करण्याचा सरकारी कारखाना लवकर काढण्यात येणार असल्याचा संकल्प पुकारला आहे. या छोट्या मोटारीची किंमत सोळा ते अठरा हजार रुपयांपर्यंत जाऊन पोहोचेल. याउलट ठाकूर यांच्या माहितीप्रमाणे जपानमधील 'मझदा' गाडी आठ ते दहा हजार रुपयाना मिळते. चांगल्या स्थितीतील सेकंडहँड गाड्या तर हजार ते पंधराशे रुपयांपर्यंत मिळू शकतात.

अशी तुलना केली आणि त्याचबरोबर हिंदी माणसाची सरासरी प्राप्ति घेतली तर, जपान, इंग्लंड, अमेरिका यांच्यापेक्षा हिंदमधील जनता अधिक महागाईत दिवस काढते, खाद्यपेय पदार्थांसाठीही तिला अधिक पैसा काढून द्यावा लागतो, हे ध्यानात येईल. कारखानदारीची जपानमध्ये रेलचेल आहे. पोलाद, सिमेंट, शीट ग्लास, मोटार, जहाजे आणि टँकर्स, शिवणयंत्रे, मनगटावरची व टेबलावरची घड्याळे, कॅमेरे, रेडिओ, 'टेले' या शब्दाने सुरवात होणारी नाना प्रकारची यंत्रे आणि व्यवसायांतील साधने सुधारलेल्या राष्ट्रांच्या तोडीने आज जपान निर्माण करीत आहे. तेथील दैनिके मिळून रोजचा खप चार कोटि वीस लाखांवर, दोन व्यक्तींत एक पत्र, तर इकडे हिंदमधील हा आकडा तीस लाखांच्या आत आहे.

आंतरराष्ट्रीय प्रदर्शन 'एक्स्पो-१९७०' ची तयारी सुरू होती, त्यावेळी ठाकूरहि तेथे होते. निरनिराळ्या देशांचे विभागाशी हिंदच्या पॅव्हेलियनची त्यांनी केलेली तुलना पाहण्यासारखी आहे. प्रेक्षकांच्या झुंडीच्या झुडी हिंदच्या पॅव्हेलियनकडे वळत. 'दिलीप' हा पांढरा चित्ता आणि त्याचबरोबर तेथे योगशास्त्रातील माहिती सांगणारे हे त्यांचे कुतूहल होते.

ठाकूर लिहितात, "जपानच्या परराष्ट्रखात्याचे उपमंत्री श्री. ओशिबा यांनी भारतीय शामियान्यास भेट दिली तेव्हा त्यांनी पांढरा चित्ता पाहिला व योग्याशी चर्चा केली." ठाकूर यांना असे मत आढळून आले की, "भारताचा शामियाना पाहून भूतकाळात जमा झालेल्या म्युझियमचा एक तुकडा अशी सर्वसाधारण समजूत होते." जपानमध्ये बोटी बांधणाऱ्या गोद्या तीनशे ऐंशी आहेत. आपल्याकडे ही संख्या तीन आणि त्यांतील बोटी बांधकाम जुजबी. जपानचा हा चौफेर उत्कर्ष आर्थिक व उत्पादन

क्षेत्रात तेथील जनतेला असलेल्या भरपूर स्वातंत्र्याचा परिपाक होय. आपल्याकडे पिठाची गिरणी काढावयाची तरी, सरकारी परवाना लागतो; हिंदमधील कारखाने मोठे होऊ नयेत म्हणून समाजवादाखाली त्यांच्या छाटाछाटीचे कायदे करण्यात येतात. म्हणजे जपानच्या उलट दिशेने आपण चाललो आहोत.

तेथील कारखानदारीला अमर्याद वाव, परंतु त्याचबरोबर मोठ्या कारखान्यांच्या पोटात लहान लहान घरगुती विभाग पसरलेले असतात. छोट्या कुटुंबात लहान प्रमाणावर शेती करण्याची प्रवृत्ति आढळते. जपानी कामगार अत्यंत कष्टाळू. प्रथम प्रथम युरोपीय मालाची कशीबशी नक्कल, म्हणजे जपानी कारखानदारी कनिष्ठ प्रतीचा माल तयार करणारी, त्यात मोठ्या राष्ट्राशी स्पर्धा करण्याचे सामर्थ्य नाही; असे म्हणून युरोप, अमेरिकेतील शहाणे तिकडे उपेक्षा करीत. आज जपान पुढारलेल्या राष्ट्रांत आणखी पुढारलेले आहे. अशा या भरभराटीबरोबर गुंतागुंतीचे सामाजिक प्रश्न पुढे येतात. इंग्लंड-अमेरिकेत तरुण पिढी अतिरेकी मार्गावर चाललेली दिसते. तो कदाचित जुन्या पिढीचा निषेध असेल. परंतु हे प्रतिकाराचे वळण जपानमध्ये पण दिसू लागले आहे.

जाताना विमानाने, तर येतानाचा प्रवास श्री. ठाकूर यांनी बोटीने केला. त्यात हाँगकाँग, फिलिपाईन्स, थायलँड, सिंगापूर आणि सिलोन या देशांना त्यांनी भेट दिली. या एकंदर प्रवासवर्णनात सामान्य प्रवाशाला जुजबी जपानी भाषा अवगत व्हावी म्हणून एक प्रकरण जपानी भाषेवर दिले असून त्यात व्याकरण, शब्द आणि वाक्ये देऊन त्या भाषेचा परिचय करून दिला आहे. पुस्तकातील विवरण सोपे, मनोरंजक, बारकाव्याने केलेले. शाळेतील विद्यार्थ्यांपासून व्यापारउद्योग करणारांपर्यंत समाजातील सर्व थरांना उपयोगी आणि वाचनीय असे हे प्रवासवर्णनाचे पुस्तक श्री. ठाकूर यांनी लिहिले याबद्दल त्यांचे अभिनंदन केले पाहिजे.

**—ना. भि. परुळेकर**

# विषयानुक्रम


मुखपृष्ठ : श्री. सूर्यकांत दुधेडिया, श्रीरामपूर. पृष्ठें

**भाग पहिला : शांतिमंदिरांतील वासंतिक शिबिर.** १ ते ३२

जपानचा इतिहास व भूगोल. ओगामिसामांची आध्यात्मिक संघटना.
दुसरी इंग्रजी वासंतिक परिषद. उकाशिमा बेटावर सहल.
राखेंतून उभे राहिलेले नवे हिरो शिमा. अणुध्वम्‌चे जर्मन जनक.

**भाग दुसरा : प्रेक्षणीय स्थळे व प्रमुख शहरांतून भाषणे.** १ ते ४०

मियाजिमा—किंताबाशी—टोकायामा—नागोया—ओसाका—फुकुयामा—
क्योटो—टोकिओ—कोबे—योकोहामा—नागासाकी— निक्को—कामाकुरा.

**भाग तिसरा : राजकीय व शैक्षणिक समस्या : वृत्तपत्रांचे जग.** १ ते २२

जपानची संस्कृति. ओकिनावाची ग्यानबाची मेख. वाचकांचा देश.
अमेरिकन शिक्षणपद्धति शिक्षकांचेवर मार्क्सवादाचा परिणाम.
वृत्तपत्रांचा अफाट खप. असाही शिंबूनचे यश : अतिपूर्वेकडील
वृत्तपत्रसृष्टि.

**भाग चवथा : उद्यमशील जपान : निर्यात व्यापारात आघाडी.** १ ते ३०

हेवा वाटावा अशी कारखानदारी. अवजड उद्योगात घोडदौड.
डिपार्टमेंटल स्टोअर्स. मोटर उत्पादनांत दुसरा क्रमांक.
जहाजे बांधण्याचा उच्चांक. भारताशी २०० औद्योगिक करार.

**भाग पाचवा : सागरी सफर : हाँगकाँग, फिलिपिन्स, थायलँड,** १ ते ३६

सिंगापुरांतील भारतीय : जोहोर बारू : सीलोन पुढील समस्या.
नानाविध नमुन्यांचे चिमुकले जग. चीनच्या सरहद्दीवरील गोळीबार.
खुल्या व्यापाराने हाँगकाँग-सिंगापूरची भरभराट. पत्रकारांना बोट उत्तम.

**भाग सहावा : एक्स्पो ७० : जपानी भाषा : इंग्रजी परिशिष्ट :** १ ते ३४

जागतिक प्रदर्शनांचा इतिहास. मानवसमाजाची प्रगति
८४ देशांचे पॅव्हेलिअन्स. भारताची प्रतिमा कशी भासते ?
जपानी भाषेचे मराठीशी साम्य : नित्याचे वाक्प्रचार.
वासंतिक शिबिराचा इंग्रजींतून वृत्तांत.

# जपान व अतिपूर्वेकडील देश

## भाग पहिला

## शांतिमंदिरांतील वासंतिक शिबिर

### जपानबद्दल उत्सुकता :

जपान व अतिपूर्वेकडील देश यांचे संबंधी कुतूहल व प्रेम १९६२–६३ पासून मनांत विशेष जागृत झाले होते. दुसऱ्या महायुद्धानंतर या देशांत बरेच स्थित्यंतर झाल्याचे वाचकांना माहीत आहेच. इंडो-जॅपनीज असोसिएशनचा एक सदस्य म्हणून मुंबई–पुण्याकडे आलेल्या काही थोर जपानी व्यक्तींशीही माझा परिचय होऊन कांहींच्या बाबतींत त्या परिचयाचे स्नेहांत रूपांतरही झाले. याचा परिपाक म्हणजे जपानला जाण्याचा विचार, पण जीवनात नुसती इच्छा असून भागत नाहीं; अनुकूल वेळ यावी लागते तसें याबाबतींतही घडले.

१९६४ साली एका पंधरवडाभर चालणाऱ्या परिषदेत भाग घेण्यासाठी जपानमधील एका संघटनेचे मला आमंत्रण आले होते. प्रवासाचा खर्च मी करणार होतो व जपानमधील वास्तव्याची जिम्मेदारी सदर संघटनेने घेतली होती. पण २६ जुलै १९६४ पासून आठवडाभर पर्सनल प्रेस सर्व्हिसच्या रौप्यमहोत्सवाचे कार्यक्रमात गुंतलेलो असल्याने ऑगस्ट १२ तारखेपासून टोकिओत सुरू होणाऱ्या परिषदेस जाण्याची तयारी करण्यास फार थोडा अवधि होता. तरीही धावपळ करून दिल्लीस विमानाने जाऊन पासपोर्टसाठी खटपट वगैरे केली. परदेशप्रवासास नवखा असल्याने त्या त्या संबंधी खात्याशी संपर्क साधण्यास वेळ लागला; आणि त्या सर्वातून हाती एवढेच आले की परिषद संपल्यावर दुसरे दिवशी मला पासपोर्ट पुण्यांत रजिस्टर्ड पोस्टाने मिळाला ! इसापनीतींतील कोल्हा व करकोच्याच्या गोष्टीची आठवण झाली. करकोचा जसा जेवायचे आमंत्रण मिळून उपाशी राहिला तशीच झाली माझी गत ! पासपोर्ट हाताशी पण परिषद संपलेली तेव्हा कपाळावर हात मारून घेतला !

त्यानंतर दुसरी संधी १९६८चे मे महिन्यात अशीच निसटली. जपानहून वरील संघटनेतर्फेच १५-२० जणांना आमंत्रण आले होते. प्रमुख कौन्सिलच्या सभेसाठी भारतसरकारकडे संस्थेच्या येथील प्रमुखांनी जी क्रमवार यादी पाठविली तीत माझे नाव चवथे घातले आणि अर्थखात्याने रिझर्व्ह बँकेला सूचना दिली की फक्त तिघांनाच पी फॉर्म मिळू शकेल. या खेपेस पासपोर्टची ब्याद मिटली होती पण पी फॉर्म आडवा आला. वस्तुतः परदेशीय हुंडणावळीचा प्रश्न उपस्थित होत नसताना सरकारने परदेशगमनाला एवढी खळखळ का करावी समजत नाही.

पर्यटन वर्ष आपण साजरे केले पण या क्षेत्रांतही एकेरी मार्ग लाभप्रद ठरणार नाही. इतर देशांतले पाहुणे आपणांकडे यावेत पण आपण मात्र परदेशगमनावर अनेक बंधने घालावीत हे व्यवहारांत टिकण्यासारखे नाही. जपानसारखे राष्ट्र निर्यात व्यापारांत अत्यंत प्रगत असतानासुद्धा कित्येकदा देवाणघेवाणींत बाकी Balance of trade प्रतिकूल राहिल्याचे आढळते. तरीही परदेशांत जाणाऱ्या कोणाही जपानी व्यक्तीस ५०० अमेरिकन डॉलर बाहेर नेता येतात हे पाहिले म्हणजे आपल्या सरकारचे धोरण या संबंधांत किती मागासलेले आहे याची प्रचीती येते. लायक व्यक्तींना परदेशांना जाण्याची अधिकाधिक संधी मिळाली तर प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष रीतीने त्यांत देशाचा फायदाच होईल.


तीन चार वर्षांतील या हकीगतीमुळे माझा जपानविषयक काही साहित्याचा अभ्यास उपयुक्त ठरणार की नाही अशी शंका वाटू लागली. एक दोन पुस्तके लिहावयासही घेतली होती; पण ती पुरी करावयासाठी जपानला भेट देणे आवश्यक होते. तशी संधी अखेर मिळाली. पण 'पी' फॉर्म हाताशी येण्यास विलंब झाल्याने बोटीवर जागा निश्चित करण्यासाठी भरलेली अनामत रक्कम परत घ्यावी लागली व अखेर विमानाने टोकिओस निघावे लागले. (तातडीच्या कामासाठी विमान सोयीचे असले तरी ज्याला मुलुख व जीवन अभ्यासायचे असेल त्याला हवाई वाहतुकीपेक्षा सागरी प्रवासांचे साधन चांगले असे माझे मत आहे. त्यामुळे कित्येकदा लेखक, पत्रकार व पर्यटक स्टीमरचा उपयोग करताना आढळतात. शिवाय विचाराला व लेखनाला बोटींत वेळही चांगला मिळतो.)

**प्रार्थनेचा फायदा :**

भारतीयांना देवाधर्माचे व प्रार्थनेचे बाळकडूच मिळालेले. आणि त्यातून आयुष्याच्या विशेष कालखंडांत परमार्थाकडे लक्ष वेधणेही नैसर्गिक! अडचणीचे वेळी देवाची आठवण होणे हा गौण पक्ष असला तरी खुद्द कुंतीने भगवंताना 'आपदः सन्तु नः शश्वत्' म्हणून वर मागितला यांत मानवी स्वभावाचे सखोल ज्ञान प्रतीत होते. गेल्या आठ-दहा वर्षांत योगविद्या, संतधर्म यासंबंधी संस्थांशी घनिष्ठ संबंध आल्यामुळे प्रार्थनेवरची माझी श्रद्धा वाढत चालली आहे. 'न कळता पद अग्निवरी पडे' या न्यायाने सद्धेतुपूर्वक प्रार्थनेचा फायदा अनपेक्षित रीतीने होतो असा माझा अनुभव. जपानकडे प्रयाणाच्या संबंधात ही श्रद्धा दृढ झाली. परंतु इजा, बिजा निराशा झाल्याने या खेपेस तिजा होते काय अशी शंका डोकावत होती. त्यामुळे प्रयाणाचा बेत अकल्पित ठरला तरी विमानाचें तिकिट काढल्यानंतरच आप्तेष्टमंडळींना माझ्या निर्गमनाची सूचना मिळाली आणि परदेशगमनाचे बाबतीत अन्य स्नेह्यांना प्रसिद्धीस मदत करणारा मी स्वतःचे बाबतींत तिला विन्मुख राहिलो.

विमानाने दि. १७ जुलै १९६८ रोजी मी जपानच्या सफरीला निघालो. तेव्हा सांताक्रुझ, मुंबई विमानतळावर निरोप द्यायला निकटची आप्त मंडळीच येऊ शकली. तत्पूर्वी माझे पितृतुल्य ज्येष्ठ स्नेही श्री. काकासाहेब तांबे यांनी फोर्टमधील त्यांच्या विश्रांतिगृहात आम्हा मंडळींना श्रीखंडपुरीची मेजवानी दिली, तिची चव जपानमध्ये विशेष लक्षात आली. कारण भारतीय पद्धतीचे शाकाहारी जेवण तेथील दीर्घ मुक्कामात मला लाभू शकले नाही.

कॅरॅव्हेल सायंकाळी दिल्लीस पोहोचले. माझे टोकिओचे तिकिट जपान एअर लाइन्सचे दिल्लीपासून असल्याने व एअर इंडियाच्या सायंकाळी पोंचणाऱ्या विमानाला जोडून त्यांची सर्व्हिस नसल्याने रात्रीच्या निवासाची व्यवस्था जाल (JAL) नें ओबेरॉय इंटर कॉंटिनेंटल या अलीशान हॉटेलांत केली होती. दिल्लींतील हे पहिल्या प्रतीचे हॉटेल समजले जाते. अशोक हॉटेलमध्ये माजी कायदामंत्री श्री. सेन यांनी दिलेल्या खान्याला, तसेच अलीकडेच फेडरेशन ऑफ चेंबर ऑफ कॉमर्सच्या बैठकीच्या वेळी श्री. मोदी यांनी दिलेल्या पार्टीला मी गेलो होतो व हॉटेलचा थाटमाट पाहून घेतला. परंतु ते भारत सरकारचे हॉटेल असल्यामुळे तेथे काहींना ऑबेरॉय इंटर कॉंटिनेंटलइतका मोकळेपणा वाटत नसावा.



**याच जाल विमानाने श्री. ठाकूर यांचा प्रवास झाला**

रात्री दिल्लींतील आप्तेष्ट मंडळी मला भेटण्यास आली तेव्हा ऑटोमॅटिक लिफ्टच्या दारांची उघडझाप नावीन्यामुळे गमतीदार वाटली. खोलीत सर्व आराम असूनही दूरच्या प्रवासाची चिंता व पहाटे ४ वा. विमान तळावर जावयाचे यामुळे झोप बेताचीच आली. निघण्याच्या तयारीने लॉबींत आलो तो जपानला जावयाचे विमान विमानतळावर येण्यास दोन तास उशीर होईल असे कळले. त्यामुळे विमानतळावर ६ वा आलो. पोहोचवायला स्नेही आप्त उपस्थित होतेच. त्यांचा प्रेमाने निरोप घेतला. एक्स्चेंज कौंटरवर ६५ रु. ला साडेतीन पौंड भारत सरकारच्या औदार्याने घेऊन व अन्य औपचारिक उरकून दि. १८ जुलै रोजी सकाळी ८ चे सुमारास मी जालच्या जेट विमानांत एकदाचा स्थानापन्न झालो व ४६२ क्रमांकाची आमची सफर चालू झाली.


**जपानी वातावरणाची चुणूक :**

जपानी वातावरणाची चुणूक या विमानाच्या प्रवासांत सुरुवातीपासूनच येऊ लागली, आदबशीर जपानी एअर होस्टेसेसनी सुरुवातीलाच वाफेने गरम केलेल्या छोट्या मऊ टॉवेलच्या गुंडाळ्या प्रत्येक प्रवाशाला दिल्या. त्या रोलने हात व चेहरा पुसल्यावर तरतरी वाटली. प्रवासांत येणाऱ्या विविध स्थळांची माहिती एक एअर होस्टेस प्रथम जपानी भाषेत व मग इंग्रजीतून अधून मधून देई. चिमुकल्या ट्रेमध्ये खाद्यपदार्थ प्रत्येक प्रवाशास देतांना या विमान परींचे

होणारे पदन्यास गंमतीदार भासत. प्रत्येक प्रवाशाला आपुलकीने काही कमी जास्त हवे का असे विचारण्याला त्या चुकत नसत. सीटचे पुढील कप्प्यांत ज्या विमानाने प्रवास चालू जास्त त्याच्या रंगीत चित्रांची भेटकार्डे, विमान प्रवास करीत असलेल्या प्रदेशांचे नकाशे, उपयुक्त माहितीच्या पुस्तिका आणि जपानी पंखे आढळले.

आमच्या विमानांत जपानी प्रवासी बरेच होते. भारत सरकारचे नभोवाणी खात्यांतील एक तरुण इंजिनीअर टेलीव्हिजनचे शिक्षण घेण्यास निघाले होते त्यांच्याशी सहजच परिचय झाला. घानाची एक कन्यका तिच्या विटकरी रंगाच्या विचित्र पोशाखाने व काळ्या वर्णाने वेगळीच भासली. पुढे बँकॉकच्या विमानतळावर तिला इंग्रजी चांगले येत असल्याने माझा तिच्याशी परिचय झाला. तीही टोकिओला टेलिव्हिजन शिक्षणासाठी घाना सरकारतर्फे जात असल्याचे कळले. तेव्हा मी तिचा त्याच शिक्षणासाठी निघालेल्या हिंदी तरुणाशी परिचय करून दिला तेव्हा तिला बरे वाटले. वर्णभेद मानू नयेत असे म्हणणारे कित्येक हिंदी लोकही काळ्या आफ्रिकन माणसाशी जवळीक करण्यास बिचकतात असे माझ्या पाहण्यात आले आहे.

दुपारी दीडचे सुमारास आमचे विहंगयान बँकॉकला पोहोचले. विमान थायलंडवरून जाताना भाताची हिरवीगार शेते व टिनची छपरे असलेली



बँकॉक विमानतळावरील प्रेक्षागृह

घरे सर्रकन नजरेपुढे येतात. शेतीप्रधान देश असल्याने टोलेजंग हवेल्या मोठाल्या शहरातच दिसतात. या विमान तळानजीकच शिरस्त्राणधारी सैनिकांची तुकडी जमिनीवर सरपटून बंदुका सरसावून सुसज्ज स्थितीत आढळली. व्हिएटनाम युद्धात थायलंडच्या भूमीचा अमेरिका युद्धतळ म्हणून उपयोग करीत आहे, याची काहीशी कल्पना या देखाव्याने आली.

**बँकॉकला फळांची रेलचेल :**

बँकॉकचा विमानतळ विस्तीर्ण असून आमचे विमानांतील प्रवाशाकरितां दुपारच्या आहाराची व्यवस्था एरोड्रोमवरील वेटिंग हॉलमध्ये केली होती. सर्व तऱ्हेची चविष्ट फळे मेजावर पद्धतशीर रीत्या मांडलेली पाहून, प्रवासांत माझ्या शाकाहाराचे कसे निभेल असा प्रश्न उभा असलेल्या मला ही फळांची पर्वणी आनंददायक वाटली व असाही विचार येऊन गेला की शाकाहारापेक्षा फलाहारावरची भर देण्यास हरकत नाही.

आमचा फलाहार आटोपला तेवढ्यात विमानाचेही पेट्रोल वगैरे खाद्य त्याला मिळाले व दुपारीं २॥ चे सुमारास पुन्हा आमच्या विमानाने हवेत उंच भरारी मारली. खाली ढग व वर आकाश असा हवाई प्रवासांतील नेहमीचा देखावा दिसू लागला. बँकॉकला काही नवीन प्रवासी आल्यामुळे पुन्हा वाफाळलेल्या मऊ टॉवेलच्या गुंडाळ्या, फ्रूटड्रॉप्स, दुपारचा चहा वगैरे विमानपऱ्यांची सर्व्हिस चालू झाली. प्रसंगविशेषी उपयुक्त पडणाऱ्या प्राणवायूचे नळकांडे कसें धरायचे याचे प्रात्यक्षिकही प्रत्येक उतारूला दाखविण्यात आले. अधूनमधून माईकवर जपानी–इंग्रजी भाषांतून विविध प्रदेशांसंबंधी निवेदन चालूच होते. बेताची जागा असल्यामुळे ट्रेच्या आकारापासून तो त्यांतील खाद्यपदार्थासाठी पात्रे चिमुकली व शक्य तेवढी कागदाची आढळली. तयार पदार्थांच्या चित्र-विचित्र लेबले लाविलेल्या पुड्याही आमच्या पुढ्यात येत. जपानात उसाचे उत्पादन नसल्यामुळे भारत वगैरे देशांतून कच्ची साखर येते तिचे शुभ्र साखरेत रूपांतर या देशात केले जात असल्याने साखर काटकसरीने दिली जाते. आपल्याकडे लग्नसमारंभात वाटतात तशा छोट्या आकाराच्या प्लॅस्टिकच्या पिशव्यांतून साखर मिळते. लक्षात ठेवण्याचा विशेष म्हणजे या वस्तू शक्य तेवढ्या जपानमध्ये तयार झालेल्या होत्या. जपान स्वदेशीचा किती कटाक्षाने पुरस्कार करतो हे लहानसहान गोष्टींतूनही समजून येते.

**हाँगकाँगला मध्यांतर :**

जपानच्या प्रवासातील दुसरा टप्पा म्हणजे हाँगकाँग. तेथे पोहोचायला आम्हांला सायंकाळ झाली. कित्येक मैलांवरून दुरूनच विजेच्या झगमगाटाने व निऑने साइन्सच्या रंगीबेरंगी प्रकाशाने व्हिक्टोरिया व हाँगकाँग आल्याची सूचना प्रवाशांना मिळाली. पुन्हा आम्ही विमानतळावरील मध्यंतरासाठी राखून ठेवलेल्या विस्तृत हॉलमध्ये आलो. तासात विमान पुढे निघायचे पण यांत्रिक दुरुस्ती चालू असल्याने ते अर्धा तास उशीरा निघेल अशी सूचना मिळाली. उतारूंना विमान कंपनीतर्फे या विलंबासाठी कोकाकोला विनामूल्य देण्यात आला ! या ठिकाणी विविध प्रकारच्या विना जकात मालाची दुकाने उतारूंना आकर्षण करून घेत होती, व चिकित्सा करून विशेष स्वस्त वाटणाऱ्या वस्तू विकत घेतानाही काहीं लोक आढळले. दीड तासानी आमचे विमान एकदाचे निघाले पण वर चढताना ते हेलकावे खात होते. उंचावर गेल्यावरही विमानाच्या चालीचा रंग ठीक दिसेना; परत हाँगकाँगला जाऊन तेथे हॉटेलात रात्र काढावी लागेल, किंवा तेपेहला विमान थांबेल अशी भाषा चालू झाली. तेव्हा पोटात भीतीचा गोळा उभा राहिला. प्रार्थनेची कास धरली—थोड्याच वेळात आढळले की विमान नित्याच्या गतीने चालू असून संकट दूर झाले आहे. पण या सर्व प्रकारामुळे दिल्लीहून विमानाला जो दोन तास उशीर झाला तो त्याला कापता न येऊन टोकिओलाही ते रात्रौ ९॥। ऐवजी ११॥। वाजता पोहोचले. आपले घड्याळ साडेतीन तास मागे आहे असेही आढळले मग ध्यानांत आले की त्या त्या स्थानिक वेळेशीं ते जुळवून घ्यावयास हवे होते. म्हणजे नवी दिल्ली ते टोकियो या हवाई प्रवासास आम्हांस सुमारे १९॥ तास लागले. यांत बँकाक व हाँगकाँक येथील दोन तास विश्रांतीच्या कालाचा समावेश होतो. नवी दिल्ली ते बँकोंक अंतर २९४० किलोमीटर आहे. आणि बँकाँकहून हाँगकाँगला यायला १९०८ कि. मी. हवाई अंतर तोडावे लागते. तेथून टोकिओ सुमारे २६३५ कि. मीटर वर पडते. म्हणजे भारतातून जपानला यायला हवाई अंतर अंदाजे ७५०० किलोमीटर कापावे लागे. विमानाचे परतीचे तिकिटास ( टूरिस्ट क्लास ) सुमारे रु. ५००० पडतात. याचा अर्थ हवाई वहातुकींत तीन किलोमीटरला एक रुपया असा खर्च उतारूस येतो. विमानातील सर्व सुखसोयी व आरामशीर प्रवास हे लक्षात घेतले तर हा आकार योग्यच वाटतो. टोकिओजवळ येत चालले तसे उतारूंच्या कडून डिक्लेरेशन

फॉर्म भरून घेण्यात आले. त्यामुळे टोकिओ इंटरनॅशनल एअरपोर्टला पोहोचल्यावर हेल्थ सर्टिफिकेट, पासपोर्ट, व्हिसा वगैरे दाखवून 'ऑल वेल' करण्यात काही मिनिटेच गेली. कस्टम खात्यांतील मंडळीही सौजन्यपूर्ण होते ! त्यांनी फक्त पोर्ट मँटो उघडल्यावर पहाणी वगैरे न करता तपासल्याचा बारीक कागदाचा तुकडा डकवून खूण केली. माझे जवळ दोन बॅगज सामान फक्त होते. मुंबईस वीस किलो वजनाची मर्यादा ध्यानांत घेऊन काहीं कपडे व फायली तेथे काढून ठेवल्या. ज्याचे त्याला लगेज मिळण्याची विशेष यांत्रिक व्यवस्था टोकिओ विमान तळावर आढळली. एक मोठे पोलादी चक्र विजेनें एकसारखे फिरत असते. त्यावर उतारूंचे सामान खालून वर सारखे येत राहते व जे ते उतरू फिरत्या चक्रावरून आपापले सामान ओळखून उचलून घेतात. त्यामुळे कमी अवधीत ज्याला त्याला आपापले सामान विनबोभाट मिळते.

**टोकिओ इंटरनॅशनल पोर्ट ( हनेडा ) :**

हे जगांतील एक पहिल्या प्रतीचे हवाई बंदर असल्याने प्रमुख विमान कंपन्यांची विमाने येथे येतात. जॅपानीज एअर लाइन्सच्या विमानांकडे साहजिकच या विमानवहातुकीतील मोठा भाग येतो. सॅनफ्रॉन्सिस्को, लॉस अँजेल्स, जकार्ता, पॅरिस, लंडन, फ्रँकफूर्ट इत्यादी शहरांतून वाटेत व प्रमुख देशातील स्थानके घेत जाल विमाने टोकिओस येत असतात व परत नियमितपणे तिकडे रवाना होतात. मी जपानला आलो ते जाल विमान आदल्या दिवशी सकाळी १० वाजता लंडनहून निघून पॅरिस, रोम, कैरो, तेहरान, या मार्गाने दिल्लीस सकाळी ७॥ चे सुमारास पोहोचले होते. जाल खेरीज एअर इंडिया इंटरनॅशनल, एअर फ्रान्स, अल इटालिया, बी. ओ. ए. सी., लुफ्टहंसा, कांटास, इत्यादी १८-२० जागतिक दर्जाच्या विमान वहातूक कंपन्यांच्या विमानांची रहदारी टोकिओस होत असते. त्यामुळे हा विमानतळ रात्रंदिवस किती गजबजून जातो याची कल्पना येईल.

**निसर्गाची अवकृपा :**

जपानमध्ये आपण पाऊल तर ठेवले, तेव्हा या देशाचे स्थूल स्वरूप आपण प्रथम लक्षात घेऊ या. इंडिया म्हणजे जसा भारत तसे या देशाचे अधिकृत नांव निपॉन आहे. जपानी लोकांना अर्थात निपॉन हे नांव


जापान
होक्काइडो
सापोरो
जपानी समुद्र
निक्को
टोकिओ
याकोहमा
नागोया
क्योटो
कोबे
ओसाका
ओकायामा
हिरोशिमा
मियाजिमा
यामागुची
ताबुसे
फुकुओका
क्यूशू
नागासाकी
शिकोकू
N
पॅसिफिक महासागर

अधिक प्रिय वाटते हे सांगणे नकोच. आशिया खंडाच्या मुख्य भूमीचे लगतच्या उत्तर पॅसिफिक महासागरातील चार प्रमुख बेटांचा समूह म्हणजे जपान. उत्तरेहून दक्षिणेकडे होक्कइडो, (७८,५०९ चौ. कि. मी.) होन्शु जपानचा प्रमुख मोठा भूविभाग (२,३०,४४९ चौ. कि. मी.) शिकोकू (१८,७५८ चौ. कि. मी.) व क्यूशू (४१,९४७ चौ. कि. मी.) ही ती बेटे होत. याखेरीज सुमारे ३००० लहान लहान बेटांचा या राष्ट्रात समावेश होतो. या देशाचे क्षेत्रफळ १,४२,७२६ चौरस मैल एवढे भरते. म्हणजे क्षेत्रफळाच्या दृष्टीने भारत जपानपेक्षा साडेआठ पट मोठा आहे. जपानची लोकसंख्या सुमारे दहा कोट आहे. भारत लोकसंख्येने जपानच्या पाच पट मोठा आहे असे म्हणण्यास हरकत नाही.

जपानचा पुष्कळसा भाग पर्वत व डोंगर यांनी व्यापला असल्याने निसर्गशोभा असली तरी शेतीचे उत्पादन त्यामुळे कष्टसाध्य होते. जेथे शक्य होते तेथे अन्नधान्याची लागवड केली जाते. पण अशी शेतीखालील जमीन सोळा टक्क्यावर जाऊ शकलेली नाही. दर्यातील या बेटांना तुफाने व धरणीकंप यापायी फारच त्रास सोसावा लागतो. ज्वालामुखीही देशात भरपूर आहेत. १९२ ज्वालामुखीपैकी ५८ जिवंत आहेत.

**इतिहासाकडे दृष्टिक्षेप :**

भूगोलावरून आपण जपानच्या इतिहासाकडे दृष्टिक्षेप करू या. प्राचीनांची अशी समजूत होती की सूर्यदेवापासून त्यांचा पहिला सम्राट जिम्मू याची वंशावळ चालू होते. जिम्मूचे राज्य खिरस्ती सनापूर्वी ६६० वर्षे अस्तित्वात होते असे म्हणतात. खिस्ती शतकाच्या सुरुवातीला चिनी संस्कृतीचा पगडा जपानवर पडल्याचे आढळते, कारण त्या वेळी चीन पूर्वेकडील बराच पुढारलेला देश होता. जपानमधील वरच्या वर्गांत चिनी भाषा, लिपी तसेच तत्त्वज्ञान, इ० चा प्रसार मोठ्या प्रमाणावर झाला. खिरस्ताब्दाच्या सहाव्या शतकांत बौद्ध धर्मही जपानमध्ये आला.

पहिली जपानची स्थायी राजधानी, नारा या शहरी आठव्या शतकाच्या सुरुवातीला स्थापिली गेली. पण नंतर त्याच शतकाचे ७९४ या वर्षी चीनच्या राजधानीच्या धर्तीवर क्योटो या राजधानीची उभारणी करण्यात आली.

बाराव्या शतकापासून जपानमधले सरदार, लष्करी अधिकारी वर्गांत

यादवी युद्धे चालू झाली आणि सातशे वर्षांचा काल या अंतर्गत यादवींत जाऊन राज्यसत्ता जवळ जवळ मोडकळीस आली.

पहिली यूरोपांतली सत्ता जपानमध्ये पाऊल ठेवू शकली ती म्हणजे पोर्चुगीजांची. पाश्चात्त्य देशांतील पोर्चुगीजांचे पाय प्रथम हिंदुस्थानांतही लागल्याचे वाचकांना माहीत आहेच. सेंट फ्रान्सिस झेव्हिअर यांनी इ. स. १५४३ साली ख्रिश्चन धर्माचे या देशांत प्रथम लोण आणले. जपानमधील राजकीय सूत्रे वेगवेगळ्या लष्करी सूत्रधारांच्या हातीं जात होती. टोयोटोमी या वीराच्या हातीं सत्ता आल्यावर त्याने व त्याच्या वंशजाने जपानवर सुमारे अडीचशे वर्षे राज्य केले. ईडो ( सध्याचे टोकिओ ) येथे राज्यसत्ता आली १६३९ साली, पण जपान बाकी जगापासून वेगळा राहिला.

भारतातील शिपायांच्या बंडाच्या पूर्वी चार वर्षे अमेरिकेने जपानशी संपर्क साधला. व्यापारासाठी म्हणून गोरे लोक जपानमध्ये येऊ लागले. जपानांत बंडाळी व यादवी चालूच होती. जपानचे राजघराण्याच्या हाती पुन्हा राज्यसत्ता येऊन बादशहांचा कारभार १८६८ साली पुन्हा सुरू झाला. क्योटोहून टोकिओला राजधानी नेण्यांत आली. १८७१ साली सरंजामशाही नष्ट करण्यांत येऊन मेईजी राजांचा कारभार प्रजेला सुखकर ठरू लागला. जपानच्या सम्राटांनी प्रशियाच्या धर्तीवर जपानला राज्यघटनाही दिली. या काळांत औद्योगिक दृष्ट्याही जपानची भरभराट झाली.

## युद्धपिपासू कर्तृत्व :

या प्रगतीने जपानांतील वीरवृत्तीने व युद्धपिपासू कर्तृत्वाने पुन्हा उचल खाल्ली. १८९४–९५ सालांतील चीन-जपान युद्धामुळे जपानला फॉर्मोसा, पेस्कॅदोरेस व मांचुरियांतील लिओतुंग विभाग मिळाला. या यशाने उत्तेजन मिळाल्याने जपानने १९०२ साली इंग्लंडशी संधान साधून, जो रशिया महाप्रबळ समजला जात असे, त्याच्याशी दोन हात करून अखेर १९१० साली कोरिया सर केला. रूसो-जपानी युद्धातील जपानच्या विजयाने आशियांतील भारतासारख्या इंग्रजांच्या सत्तेखाली चिरडलेल्या राष्ट्रांतील जनतेलाही परकीय सत्तेचे जू झुगारून द्यावे असे स्फुरण चढल्याचे वाचकांना आठवत असेल.

परदेशीय राजकारणांत जपानचे धोरण काहीसे संधिसाधूपणाचे होते. पहिल्या जागतिक युद्धांत जपानने दोस्त राष्ट्रांशी हातमिळवणी केली आणि

युद्धांतील दोस्त राष्ट्रांच्या विजयामुळे जपानला पूर्वीच्या जर्मनीच्या ताब्यातील काही बेटांवर अधिकार प्राप्त झाला. या यशाने जपानमधील वीरवृत्तींच्या वर्गाने पुन्हा जोर केला. इकडे जपानची औद्योगिक क्रांतीही वाटचाल करीत होती; त्यामुळे उत्पादनांत जपानचे पाऊल पुढे पडत होते. धरणीकंपा-सारखी भयानक आपत्ती टोकिओ आणि योकोहामा या शहरांवर १९२३ साली येऊनही जपानची पीछेहाट झाली नाही. १९३१ साली जपानने मांचूरिया सर केला व राष्ट्रसंघांत त्याचेवर ठपका आल्याने १९३३ साली राष्ट्रसंघाचा त्याने राजीनामा दिला. चीनशी कुरापत काढण्यांत जपान व्यापृत होताच; आणि चीनच्या राजकारणांत त्याने ढवळाढवळ करण्यास सुरुवात केली.

राजकारणांत मित्र, शत्रू होतात याचा दाखला १९४१ मध्ये आला. जपानने शय्यापालट करून जर्मनी व फॅसिस्ट राष्ट्रांशी संगनमत केले व पर्ल हार्बरवर १९४१ च्या डिसेंबरमध्ये एकाएकी हल्ला चढवून अमेरिकेला चकित केले व तिला जपानविरुद्ध युद्ध पुकारण्यास भाग पाडले. दुसऱ्या महायुद्धाच्या पहिल्या पर्वकालांत जपानने जी सुरुवातीला मुसंडी मारली तीमुळे अलास्कापासून हिंदुस्थानपर्यंत विभिन्न भूप्रदेश जपानला सर करता आले. परंतु हिरोशिमा व नागासाकी यांचेवर अमेरिकेने ॲटमबॉंब म्हणजे अणु-बॉम्ब टाकून या शहरांचा संपूर्ण नाश केला आणि जपानला ऑगस्ट १९४५ मध्ये संपूर्ण शरणागति स्वीकारणें भाग पाडले.

## नवीन राज्यघटना :


जपानने नवीन राज्यघटना १९४९ मध्ये अंमलांत आणली. बादशहांची सत्ता संपुष्टांत आली आणि इंग्लंडप्रमाणे लोकशाही राज्यपद्धतीचे नामधारी प्रमुख ते बनले. शिंतो धर्म राष्ट्राचा अधिकृत धर्म राहिला नाही व राजा हा परमेश्वराचा अंश असल्याच्या कल्पनेला मूठमाती मिळाली. जपानमध्ये बौद्ध धर्मीयांची संख्या सर्वांत जास्त असून ५,५५ लक्ष अनुयायी या धर्माचे आहेत. पूर्वजांची पूजा करण्याचे तत्त्व शिंतो सांप्रदायांत प्रामुख्याने दिसते. जपानमध्ये शिंतोधर्मीयांची संख्याही मोठी आहे. ख्रिश्चन धर्माचे अनुयायी जेमतेम एक टक्का आहेत.

जपानच्या सध्याच्या राज्यघटनेप्रमाणे आपल्या संसदेच्या धर्तीवर डाएट नांवाचें पार्लमेंट अस्तित्वात आलेले आहे. या डाएटचे दोन भाग आहेत. एक

लोकप्रतिनिधींचीं सभा (हाउस ऑफ रेप्रेझेंटेटिव्हज) व दुसरी वरिष्ठ सभा (हाउस ऑफ कौंसिलर्स). लोकसभेच्या सदस्यांची मुदत ४ वर्षांची तर कौंसिलर्स मुदत सहा वर्षांची आहे. लिबरल डेमोक्रॅटिक पक्ष हा दीर्घकाल सत्ताधारी पक्ष राहिला असला तरी आता त्या पक्षास विरोधकही पुष्कळ आहेत हा साधारण अमेरिकेकडे झुकता पक्ष आहे; तर सोशॅलिस्ट पक्षाची विचारसरणी तिचे विरोधी आहे. एकूण ४६७ जागांपैकी कम्युनिस्टांना फक्त चारच मिळाल्या आहेत, त्या या पक्षाचे अस्तित्वच दर्शवितात. (१९६८) जपानचे साधारण स्वरूप कळण्यास एवढे विवेचन सध्या पुरे.

**जपानी आदरातिथ्य :**

टोकिओ विमानतळावर माझे स्वागतास मि. टोहिओ टी. योशिडा हे एक जपानी उद्योगपति उपस्थित होते. त्यांच्याकडून जपानी आदरातिथ्याचा मला प्रथम अनुभव मिळाला. टॅक्सी करून आम्ही योशिडांच्या घराचा रस्ता सुधारला. विमानतळापासून मध्य टोकिओ शहरापर्यंत खास हमरस्ता करण्यात आलेला असून वेगाने जाणाऱ्या टॅक्सीतून टोकिओचे दर्शन मला प्रथमच घडले. टोकिओ टॉवर ही सर्वात उंच वास्तू मी टॅक्सीतून प्रथमच पाहिली. विजेचे दिवे व



**टोकिओतील पहिला दिवस, उद्योगपति मि. योशिडा, मिसेस मियामोटो (हवाई), डॉ. मियामोटो व किमिताका नाकायामा**

निऑन साइन्स यांच्यामुळे सर्व टोकिओ शहर उजळून गेल्यासारखे भासले. विमानतळापासून मध्य टोकिओस जाण्यास टॅक्सी सुमारे हजार येन भाडे घेते.

रात्रौ एकचे सुमारास मी योशिडांचे फ्लॅटवर पोहोचलो. त्यांनी प्रथमच घराबाहेर माझे बूट काढण्यास सुचविले व त्यांचेकडील सँडलस् मला दिले. पादत्राणे बदलण्याच्या प्रथेचा पहिला अनुभव त्यावेळी मला आला. दोनतीन दिवसांच्या जागरणामुळे व प्रवासाच्या दगदगीने मी जो पहाटे दोन वाजता झोपलो, तो सकाळी दहा वाजता जागा झालो. योशिडा सान ( मिस्टर ) यांनी मला भरपूर झोपू दिले व सकाळी ताजातवाना झाल्यावर पुढील कार्यक्रमाबद्दल चर्चा केली. आन्हिक, स्नान वगैरे उरकल्यावर त्यांनी गव्हाची पॅनकेक तयार केली. ती आम्ही मधाबरोबर खाल्ली. गरमागरम केक चांगलीच रुचकर लागली. थिओडा कू, यारूकूचो या हमरस्त्यावरील शुशीन बिल्डिंगमधील योशिडासान यांच्या कचेरीत आम्ही गेलो. मि. योशिडा हे पेट्रोलियम प्रॉडक्टस लि. इ. तीन खाजगी लिमिटेड कंपन्यांचे अध्यक्ष असल्याने त्यांचा व्यापार धंदा मोठा आहे. १९ तारीख आमच्या स्नेह्यासह गिंझा, हिबिया पार्क वगैरे भागात फेरफटका करण्यात घालवली. तेथील काही डिपार्टमेंटल स्टोअर्स, एस्केलेटर्समधून वरच्या मजल्यापर्यंत जाऊन पाहिले. सोन्यो कंपनीची बिल्डिंग हे त्यांचे एक कायमचे प्रदर्शनच आहे. ट्रान्सिस्टर्स, टेलिव्हिजन, टेपरेकॉर्डर इत्यादि विविध वस्तू आकर्षक सजावटीत पाहण्यास मिळत होत्याच पण इलेक्ट्रॉनिकचे शास्त्रीय विभागहि सर्वांना समजतील असे नेत्रदीपक पद्धतीने पाहावयास मिळाले. हिबिया पार्क व इंपीरियल पॅलेस याचे धावते दर्शन घेऊन सायंकाळी विमानतळानजीकच्या हनेडा टोक्यू हॉटेलमध्ये मुक्काम केला.

हनेडा टोक्यु हॉटेल हे टोकिओ इंटर नॅशनल, एअरपोर्टपासून अवघ्या दोन फर्लांगात असल्यामुळे विमानाने येणाऱ्या मंडळींना एक दोन दिवस मुक्काम करण्यास सोयीचे आहे. पण टोकिओ शहराच्या मध्यवर्ती विभागापासून ते आठ दहा मैल तरी दूर असल्याने शहरात कामे असणाऱ्यांना वाहतुकीचे खर्चामुळे ते महागात पडते. हॉटेल आधुनिक सुखसोयींनी सज्ज असल्याने तेथे राहणे तितकेच महागही आहे. नुसते राहण्याचे एका रात्रीचे भाडे ३८८० येन पडते! आता येनचा रुपयाशी संबंध ताडून पाहूया. १०० येन म्हणजे आपले साधारण २-२० रुपये होतात. अधिकृत दर हा असला तरी प्रत्यक्षात ते प्रमाण सुमारे

वीस पैशांनी आणखी वाढते. भारतीय रुपया किती घसरला आहे व आपली आर्थिक बाजू भक्कम करणे किती आवश्यक आहे, याची या उदाहरणावरून कल्पना येईल.

उन्हाळ्याच्या सुटीमुळे आगगाडीत जागा मिळणे निश्चित नसल्याने दुसरे दिवशी सकाळचे निपॉन एअरवेजचे विमानाने हिरोशिमाला जाण्यासाठी तिकीट काढले पण तेही, ' स्टँडबाय ' प्रकारचे मिळाले. विमान सुटण्यास पांच मिनिटे अवधी राहिला, आणि जर क्वचित एखादा उतारू आला नाही तर या तिकिटावर विमानांत प्रवेश मिळू शकतो. बरोबर विशेषसे सामान नसल्यास या पद्धतीने अडचण पडत नाही पण माझेजवळ दोन बॅगज असल्याने व सामानाची सोय अगोदर करायची म्हणून थोडा पेच पडला. पण माझ्या नियोजित ठिकाणी निघालेल्या हवाई बेटांतील मियामोटो या दांपत्याने माझी अडचण ओळखून सामान त्यांचे बरोबर नेण्याची सोय केली. इतके करून तिकिटे चेक करण्याचे जागी जाऊन पाहतो तो स्टँड बाय उतारूकरता जागा नसल्याचे समजले. पुढचे विमान दुपारी बारा वाजता होते. या विमानाने अखेर टोकिओ विमानतळ आम्ही सोडला.

निपॉन एअरवेजचे हे व्हायकाउंट विमान कांहीसे लहान होते व थाटमाट आंतरराष्ट्रीय कंपनीच्या मानाने बेताचा होता. एअर हॉस्टेसचे पोषाख साधे होते व त्यांच्या सूचना जपानी भाषेतूनच दिल्या जात होत्या. माझे शेजारी टोकिओतील एक जपानी व्यापारी होते. त्यांना साधारण इंग्रजी येत होते. त्यांनी विमान ज्या प्रदेशावरून जाई त्याचे अधून मधून मला वर्णन दिले. सुरवातीलाच फूजी पर्वताचे बर्फाच्छादित शिखर दिसले. आपण हिमालयाला जसा पवित्र पर्वत मानतो तशीच भावना या पर्वताबद्दल जपानी जनतेची आहे; व वर्षाचे विशिष्ट पवित्र काळात हजारो जपानी या पर्वतावर आरोहण करून कृतकृत्यता मानतात. जपानचा आल्पस अशीही संज्ञा या पर्वताला मिळालेली आहे. विमानातून डोंगर व अरण्ये यांनी प्रदेश व्याप्त असल्यासारखे दिसत. अधून मधून कोबे वगैरे शहरे विमानांतून मजेशीर दिसली. ओकायामा शहराचे विमान स्थानकावर पाऊण तास मुक्काम करून दुपारी ४ वा. चे सुमारास आमचे विमान-हिरोशिमास पोहोंचले. तेथे आम्हांला ताबूसे येथे नेण्यास मोटार गाडी तयारच होती. मोटारचे सारथ्याखेरीज तीमध्ये पुण्यास येऊन गेलेली जून नांवाची हवाई-

यन मुलगी होती. त्यामुळे परिचयाचा प्रश्नच उरला नाही. सदर मोटारीने जपानचा हा भूप्रदेश प्रथमच पहात सायंकाळचे सुमारास आम्ही तान्नूसेत पोहोचलो.

**ओगामिसामा :**

शांतिमंदिर आणि त्याच्या संस्थापिका ओगामिसामा या जपानच्या प्रेषितेसंबंधी अल्पसा परिचय देणे या निमित्ताने योग्य होईल. १९६४ साली नोव्हेंबरच्या ११ तारखेस मी व माझे काही स्नेही मुंबईच्या सांताक्रूझ विमानतळावर रात्रौ या बाईंच्या स्वागतासाठी गेलो होतो. त्या शीतल रात्री ओगामिसामांचा माझेशी परिचय करून देण्यात आला आणि त्याच वेळी एक अननुभूत जवळीक त्यांच्यात आणि माझ्यात उत्पन्न झाली !

व्यतिषजति पदार्थान् आंतरः कोऽपि हेतुः ।
न खलु बहिरुपाधीन् प्रीतयः संश्रयन्ते ।।
विकसति हि पतंगस्योदये पुण्डरीकम् ।
द्रवतिच हिमरश्मावुद्गते चंद्रकांतः ।।



पुणे विद्यार्थीगृह राममंदिरात ओगामिसामांच्या सामोरे;
मेयर श्री. परदेशी, महर्षि विनोद व श्री. ना. तु. ठाकूर दिसत आहेत.

या भवभूतीचा उक्तीचा या वेळी मला अनुभव आला. बाईची दृष्टि हृदयाचा ठाव घेणारी होती आणि दुभाषामार्फत माझे त्यांचेशी जे संभाषण झाले, त्यावरून त्यांना बऱ्याच गोष्टी अंतर्ज्ञानाने कळत अशी माझी समजूत झाली. त्यांना मी पुण्यास येण्याबद्दल आमंत्रण केले व ते त्यांनी स्वीकारलेही.

१४ नोव्हेंबर १९६४ रोजी सकाळच्या गाडीने ओगामिसामा त्यांचे बरोबरच्या मंडळीसह पुण्यास आल्या. त्यांचेबरोबर बेन जेरोम, अ‍ॅलेक्स लॅंगॉफ हे अमेरिकन सज्जन, जून व मिदोरी या हवाईयन मुली व साकायामा हे जपानी व्यापारी एवढी मंडळी होती. आमचे पर्सनल प्रेस सर्व्हिसच्या सभागृहात दुपारी त्यांची पत्रकार परिषद झाली व सायंकाळी न्यायरत्न विनोदांचे शांतिमंदिरात मि. जेरोम यांचे ओगामिसामांच्या शिकवणीसंबंधी भाषण झाले. न्यायरत्न विनोद, डॉ. परुळेकर व माझे भाषणही या सभेत झाले. रात्री अ. वि. गृहाचे राम मंदिरात ओगामिसामांचे प्रवचन झाले.

ओगामिसामांना निरोप देण्यासाठी मुंबईस मी पुन्हा गेलो होतो व त्यांच्या काही प्रवचनांनाही उपस्थित होतो. पुण्याचे डॉ. कोल्हा यांच्या डॉक्टर चिरंजीवांचा विवाह ओगामिसामांच्या हस्ते एका स्कॉटिश परिचारिकेशी झाला, त्या साध्या सुध्या पद्धतीचे मंगल कार्यासही मी उपस्थित होतो. उभय दांपत्यास ओगामिसामांनी छोटेसे भाषण करून मंगल आशीर्वाद दिले.

ओगामिसामांची शिकवण तसेच त्यांचे कुटुंबीय यांचेशी माझे संबंध उत्तरोत्तर वाढतच गेले.

### नमुनेदार गाव ताबूसे :

ताबूसे हे शहर तालुक्याचे गावासारखे असून ते सदर नावाच्या लहानशा नदीकाठी यामागुची जिल्ह्यात (प्रिफेक्चर) वसले आहे. जपानमधील साधी गावेही स्वच्छता, टापटीप व रम्य वातावरण यासाठी प्रसिद्ध आहेत. लोकांच्यात नागरिकत्वाची जाणीव व सौंदर्यदृष्टि असेल तर विशेष पैसा न खर्च करताही नमुनेदार गावे तयार होतात याचे ताबूसे हे उत्कृष्ट उदाहरण आहे. दहा पंधरा हजार वस्तीच्या या शेतीवाडीचे गावातही मनाला आल्हाद वाटेल असे सर्वत्र आढळते. भाताची हिरवीगार शेते, कलिंगडे, टरबुजे, भोपळा, पावटा इत्यादीचे वेल आणि सफरचंद, पेअर, पीच इत्यादी फळझाडे यांनी या विभागाची शोभा हृद्य केली आहे. रेल्वे लाइन गावामधूनच

गेली असल्यामुळे दर पाच दहा मिनिटांनी जाणाऱ्या येणाऱ्या विजेच्या गाड्यांनी या वातावरणात आधुनिकताही निर्माण झाली आहे.


कचेरीचे व्यवस्थापक नाकायामांची भेट होताच पूर्वपरिचय उजळून निघाला व त्यांनी मला वाकागामिसामांचे भेटीस नेले. प्रवासासंबंधी व अन्य कुशल प्रश्नोत्तरे झाली आणि मग शांतिमंदिराचे वासंतिक शिबिरातील माझे जीवनास सुरुवात झाली.

पहाटे ५॥ पासून रात्रौ १० वाजेपर्यंत संस्थेत वास्तव्य करणाऱ्या साधकांचे जीवन घड्याळाच्या काट्यानुसार आखले गेले आहे. शेकडो लोक ताब्रूसेत अधून मधून वास्तव्यासाठी येत असल्यामुळे निवासस्थानासंबंधी निर-निराळे नियम केले असून पाहुण्यांना सोयीसाठी त्याची प्रत दिली जाते. ताब्रूसेतील सर्व कामे ओगामिसामांची भक्तमंडळी (त्यांना दोशी म्हणतात) अहमहमिकेने हूं का चू न करता करतात हा विशेष जाणवला. ज्या त्या खोलीत कुंचा, डस्टर, केर टिपण्यासाठी प्लॅस्टिकचे फावडे इ. वस्तू ठेवलेल्या असून ज्याने त्याने आपापल्या खोलीची स्वच्छता ठेवायची असते. स्नानगृह, टॉयलेट इत्यादींची स्वच्छताही वयस्कर दोशी स्त्रिया आनंदाने करतात, किंबहुना संस्थेची सेवा करण्यात दोशींत अहमहमिकाच लागलेली आढळते. ६। वाजता संघटनेची नित्याची प्रार्थना असते ती सर्वांनी उभे राहून म्हटल्यावर सदर मंडळींचा म्होरक्या मोजक्या शब्दात साधकांसाठी प्रासंगिक सूचना देतो.

**आहाराचे वैशिष्ट्य :**

प्रार्थना आटोपताच मोठ्या भोजनालयात न्याहारीची तयारी झालेली असते, तिचा मंडळी आस्वाद घेतात. परदेशात माझा शाकाहार कसा जमेल याची चिंता होती, कधी कधी अडचण भासली तरी एकंदरीत मला हवा तसा आहार मिळू शकला. न्याहारीला टोस्ट, लोणी किंवा जाम, दूध, चहा व एखादे फळ एवढे मला पुरत असे. जपानी लोक हिरव्या फिक्या चहाचे विशेष भोक्ते असून तो इच्छेप्रमाणे उष्ण किंवा थंड घेतला जातो. लोक पाणी कमी पितात, त्या ऐवजी उठल्या सुटल्या कोचा (चहा) सर्वत्र दिसतो. पाणी कमी व चहा जास्त पिण्यामुळे जपान्यांचे दात बिघडतात असे समजले.

दुपारच्या जेवणांत भात, करी म्हणजे आमटी-मासे वगैरेही असत. अन्य मांसाहारी पदार्थ मिळत. पण सकाळची न्याहारीच माझ्या प्रकृतीला इतकी



**डायनिंग हॉलमधील भोजनाचे दृश्य**

भरपूर वाटे की जेवणास मी फाटा देई. फक्त कॉफी व बन केक्स इत्यादी वर माझे भागे. सायंकाळी ६ ते ७ जेवणाची वेळ असे. त्या वेळी भात, आमलेट, भाज्या व फळे मी घेत असे. खांकेन नावाचा पदार्थ दूध, मध, खोबरे इत्यादी-पासून गोठवून करतात तो मला विशेष आवडला. सायंकाळी एवढा आहार मला पुरे. कधी कधी चवळीची गोड उसळ मिळे तीही बरी वाटे. ताबूसेतील सुमारे दीड महिन्याच्या मुक्कामांत माझा आहार मी वरीलप्रमाणे ठेवला. त्यात रुचिवैचित्र्य नव्हते पण मांसाहार मीच टाळल्यामुळे त्याला नाइलाज होता. जपानमधील ब्रेडमध्ये मैद्यापेक्षा तांदुळाचे पीठ जास्त असल्यामुळे तो स्पंजा-प्रमाणे वातड लागतो आणि टोस्ट केला तरी त्यास कुरकुरितपणा येत नाही. –बन व केक मात्र आपल्याकडच्याप्रमाणे वाटले. प्लॅस्टिकच्या बंद पिशव्यां-तून निरनिराळ्या तऱ्हेचे बन मिळतात. त्यांना व बनवलेल्या तयार कॉफीला प्रत्येकी वीस येन पडतात.

ओगासिसामांच्या प्रवचनांच्या वेळा पूर्वीपासून दुपारी ३ व रात्रौ ८ अशा ठेवण्यांत आलेल्या आहेत. ओगासिसामांचे महानिर्याण १९६७ साली डिसेंबरच्या अखेरीस झाले असले तरी दुपारी ३ ते ४ व रात्रौ ८ ते ९ त्यांच्या पूर्वीच्या प्रवचनांच्या टेप्स लावण्यांत येतात व त्यांस सर्वांनी वेळेवर उपस्थित रहावे अशी अपेक्षा असते. परदेशांतील पाच सात मंडळी या

वासंतिक शिबिरास हजर असल्यामुळे मूळ जपानी प्रवचनांचे त्या त्या वेळी इंग्रजीतून भाषांतर करण्यांत येई व आम्हांस हेड फोनवरून ते ऐकावयास मिळे. दर महिन्याच्या २, ६, १२, १६, २२ व २६ या तारखांना ओगामिसामांच्या प्रवचनाला सुट्टी असते व ते अन्य कामकाजांतही सुट्टीचे दिवस म्हणून गणले जातात.

साधकाश्रमांतील शिबिरांत भाग घेणाऱ्या व्यक्तींनी निवासस्थानांचा उपयोग गिओ म्हणजे आध्यात्मिक प्रगतीसाठी करावा अशी ओगामिसामांची शिकवण असून त्या मार्गाने शिंको म्हणजे ईश्वराकडे जाणे सुलभ होईल असे त्यांचे सांगणे आहे.

**आध्यात्मिक संघटना :**

ओगामिसामा यांची शिकवण ' तेन्शोकोताई जिंगू क्यो ' या आध्यात्मिक संघटनेत ग्रथित केली असून त्यांच्या प्रमुख केंद्राला होन्बू अशी संज्ञा आहे. होन्बूंतील नियम नवीनांना जरी कडक वाटण्याचा संभव असला तरी शेकडो अनुयायी अधूनमधून चित्तशांतीसाठी येथे राहावयास येत असल्याने अशा प्रकारच्या काही नियमांची आवश्यकता अपरिहार्य होते. साधकांनी आपापसांत पैशाची किंवा भेटीची देवाण घेवाण करू नये असाही एक नियम असून तो व्यवहाराला धरून आहे.




वाकागामिसामांचे भाषण

दि. २२ जुलै हा दिवस ओगामिसामांच्या पहिल्या प्रवचनाचा २३ वा वाढदिवस म्हणून पाळण्यांत आला. त्या निमित्ताने हजारो दोशी जपानमधून व हवाई वगैरे भागांतून उपस्थित होते. शांतिमंदिरांचे प्रमुख प्रवचनगृह साधकांनी फुलून गेले होते. ओगामिसामांच्या अवसानानंतर

असा त्यांच्या पहिल्या प्रवचनाचा वाढदिवस प्रथमच येत असल्याने त्या प्रवचने करीत ती खुर्ची रिकामी पाहून सर्वांचे हृदय हेलावून गेले. सुरुवातीला प्रार्थना वगैरे झाल्यावर वाकागामिसामा यांनी ओगामिसामांच्या आत्मशुद्धि करण्याच्या शिकवणीचे मर्म काय आहे व त्यांच्या निर्याणानंतर त्यांच्या अनुयायांवर कोणती जबाबदारी पडते याचे विवेचन केले. एका जपानी शाखाप्रमुखाचे भाषण झाल्यावर पुढील परदेशी पाहुण्यांची वर्णानुक्रमे सदिच्छादर्शक भाषणे झाली. सर्वस्वी जोसे द ॲलंकार ( ब्राझील ), बेन जेरोम ( अमेरिका ), ॲलेक्स लँगॉफ ( अमेरिका ), नानगेरिया ( कानपूर–हिंदुस्थान ), मी स्वतः ( पुणे–भारत ) आणि मिसेस वोर्सेस्टर ( ग्रेट ब्रिटन ) असे वक्ते होते.

**पाच हजार श्रोत्यांपुढे भाषण**

मी आपल्या भाषणांत म्हटले –"दक्षिण भारताच्या वतीने आजच्या पवित्र दिनानिमित्त मी आपणास धन्यवाद देत आहे. व्यासपीठावरील रिकामी खुर्ची मला शांतिनिकेतनात पाहिलेल्या रवींद्रनाथ ठाकूरांच्या अशाच रिकाम्या खुर्चीची आठवण करून देते. शांतिनिकेतनाच्या धर्तीवर आपल्या या जागेचे नाव 'शांतिमंदिर' आहे हा योगायोग चमत्कारिक तर खराच. रवीन्द्रनाथ ठाकूर,



भारताच्या वतीने श्री. ठाकूर यांचा संदेश

म. गांधी, पं. नेहरू हे सर्व जागतिक शांतीचे थोर पुरस्कर्ते होते, आणि त्यामुळे भारतीयांना ओगामिसामांचा विश्वशांतीचा संदेश सहज कळू शकेल.

यामागुची जिल्हा आणि हिरोशिमा या विभागांनी अणुध्वम् किंवा ॲटम बॉंब यांनी केलेला राक्षसी विनाश प्रत्यक्ष अनुभवला असल्यामुळे त्यांना जागतिक शांतीचा उपदेश करण्याचा अग्रहक्क आहे. राजकारणी पुढारी आणि जनता चुकीच्या मार्गाने गेल्यामुळे युद्धे उद्‌भवतात आणि ओगामिसामांनी त्यांचा खरपूस समाचार घेतला आहे. कारण त्यांच्या हृदयांत मनुष्यजातीचे कल्याण वसत होते. साहजिकच भिकारी जंतूंना त्यांचे म्हणणे झोंबले आणि ओगामिसामांचा त्यांनी छळ केला, तरीही अखेरीस सत्याचा विजय झाला. सर्व आध्यात्मिक विचारप्रवाहांचा उगम पूर्वेकडील देशातून झाला असून ओगामिसामांची मिओशिए ही शिकवण असाच एक मूलभूत विचारप्रवाह आहे. उपदेशापेक्षा प्रत्यक्षात कृतीवर त्यांचा भर होता, आणि परोपदेशे पांडित्य करण्यापेक्षा आपल्या वागणुकीत सत्याचा आविष्कार व्हावा अशी त्यांना तळमळ होती. बाहेरच्या उपाधीपेक्षा आपल्या आत्म्याला उजळा द्या, असा त्यांनी वारंवार उपदेश केला. आपला आत्मा उजळून टाका हे ओगामिसामांचे शब्द पर्वतराजीतून आणि दऱ्याखोऱ्यातून, मोठाल्या शहरांच्या सभागृहातून आणि खेडेगावातील खोल्यांतून दुमदुमून राहिले असून ओगामिसामांनी ईश्वराचे राज्य या अवनितलावर आणण्यासाठी प्राणाची पराकाष्ठा केली.

१९६४ साली भारताला ओगामिसामांनी भेट दिली ते प्रसंग सर्वांच्या लक्षात आहेत.

मूळ जपानी भाषेत त्यांची अनेक प्रवचने तुम्ही ऐकली हे तुमचे सुदैव होय. आम्हांला त्यांच्या इंग्रजीतून अनुवाद केलेल्या थोड्या प्रवचनांवर समाधान मानून घ्यावे लागते; आणि अधिक प्रवचने तशी उपलब्ध व्हावीत म्हणून आम्ही तहानेलो आहोत. ओगामिसामा हेकेखोर वृत्तीच्या नव्हत्या. धर्मातून उपदेश केला जातो पण प्रत्यक्षात लोक तो आचारीत नाहीत, ही त्यांची मुख्य तक्रार होती : त्यानी एका प्रवचनांत सांगितले :—

मी काही अनन्य साधारण सिद्धांत मांडीत नाही.
प्रत्येक धर्म जे सांगत आला त्यापेक्षा माझी शिकवण
वेगळी नाही. परंतु एका सत्याची पोट विभागणी
करून हजारो पंथ अस्तित्वात आले आहेत.

' ईशावास्यमिदं सर्वं जगत् ', हीच आमच्या उपनिषदांची शिकवण असून आपल्या ' तेन्शो कोताई जिंगू क्यो ' याचा अर्थहि विश्वाच्या सर्व शक्तिमान परमेश्वराची शिकवण असाच आहे. "

माझा मूळ इंग्रजी भाषणाचा जपानी भाषेत अनुवाद करण्यात आला.

समारंभाचे शेवटी होन्बूच्या प्रमुख हिमेगामिसामांनी सर्वत्रांचे आभार मानल्यावर प्रार्थना वगैरे होऊन हा कार्यक्रम संपला.

**जागतिक मुलुखगिरी :**

२३ जुलैच्या मुख्य समारंभानंतर पुढे महिना अखेरपर्यंत दुसऱ्या इंग्रजीतील वासंतिक बैठकीचे कार्यक्रम व्यवस्थेशीर आखण्यात आले होते. प्रथम या चर्चेसाठी जपानमधून व परदेशातून जे शाखाप्रमुख आले होते अशा सुमारे ५० प्रतिनिधींचा परस्पर परिचयाचा कार्यक्रम झाला. दुपारी वाकागामिसामांची खास मुलाखत झाली. तीमध्ये त्यांनी ताबूसेत निदान १२ ऑगस्टपर्यंत निश्चितपणे रहावे असा मला आग्रह केला. दुपारी चर्चा बैठकीत वाकागामिसामानी प्रास्ताविक स्वागतपर भाषण केले. ॲलेक्स लँगॉफ यांनी आपले जागतिक दौऱ्यांतील अनुभव सांगितले. नाकायामा यांनी ओगामिसामा यांच्या महानिर्याणासंबंधीची हकीगत सांगितली, ती हृदयस्पर्शी होती. आपले ईप्सित सिद्धीस गेल्यावर अवतारी व्यक्तींना देहाच्या आवरणाचा कंटाळा येतो, तसेच अखेरीअखेरीस ओगामिसामांचे झाले होते. कित्येक दिवस आहारही वर्ज्य केल्यामुळे त्यांची प्रकृती क्षीण झाली होती. पण अखेरपर्यंत त्यांच्या प्रवचन वगैरे कार्यक्रमात खंड पडला नाही. दि.२५जुलै ६८ रोजी ओगामिसामांच्या शिकवणीसंबंधी अनुभव सांगण्याची पाळी माझ्यावर आली. भारतातील ओगामिसामा यांच्या दौऱ्याचे यश ज्युलियस सीझरच्या मुलुखगिरीप्रमाणे She came, She saw, She conquered या शब्दात करावे लागेल असे मी सांगितले. किटामुरा दांपत्य, हिमेगामिसामा इ. मंडळी या भाषणाच्या वेळी उपस्थित होती. शिबिरातील बहुतेक भाषणे टेपवर मुद्रित करण्यात येत होती.

**उकाशिमा बेटावर सहल :**

दि. २६ जुलै–मागे नमूद केल्याप्रमाणे होन्बूत ( केंद्रात ) सुटीचा दिवस होता. त्या दिवशी निवासातील सर्व मंडळींची उकाशिमा बेटावर सहल निघाली. ओगामिसामांचे अनुयायांना या बेटाबद्दल विशेष आपुलकी वाटते.

## उकाशिमा बेटाकडे सहल



**नांगेरिया, हिमेगामिसामा लेखक : साकायामा**

ओगामिसामा यांच्या जीवनात एक रोमहर्षक प्रसंग त्या बेटावर आपल्या अनुयायांसह सहलीस जाताना घडला, त्याची आठवण सर्वांना यावेळी झाली. १९४९ सालातील १५ ऑगस्टचा तो प्रसंग. उकाशिमा बेटावर त्या दिवशी सुमारे दोनशे अनुयायांना सहलीसाठी आपण नेणार असल्याचे ओगामिसामांनी सांगितले. या सहलीची सर्वसिद्धता झाली. परंतु सेटो बेटाकडच्या या समुद्रावर तुफान होईल असा इशारा दि. १४ व १५ ऑगस्ट रोजी रेडिओवर देण्यात आला. त्यामुळे ही सहल कशी होईल अशी चिंता वाटली. तरीही ओगामिसामा यांच्या निमंत्रणाप्रमाणे ताबूसे स्टेशनावर वेळीच सर्व मंडळी उपस्थित होती. रेल्वेचा प्रवास संपल्यावर सर्वजण कुका धक्क्याकडे निघाले. आकाश ढगांनी व्यापले होते व दुपारी तुफान येणार अशी सूचना होती त्यामुळे बोटी निवाऱ्याला गेल्या होत्या. ओगामिसामा यांनी प्रार्थनेस सुरुवात केली, इतर तीमध्ये सामील झाले. प्रार्थना आटोपल्यावर ओगामिसामा यांनी वर्तविले की, ४७ मिनिटांनंतर बोटीत बसा, कारण त्यावेळी वाऱ्याची दिशा बदलेल. बहुतेक बोटींचे कर्णधार खवळलेल्या दर्यात बोटी चालविण्यास तयार होईनात. पण त्याला अपवाद ओगामिसा यांच्या शब्दावर दृढ विश्वास असणारांचा निघाला. कुका बंदरातून निघालेल्या पहिल्या बोटीत वाकागामिसामा व बरेचसे अनुयायी होते; व उरलेले अनुयायी कोळ्यांच्या लहान मोठ्या मच्छीमारी बोटीतून उका-

शिमा बेटाकडे निघाले. तासाभरात दर्या पार करून बोटी उकाशिमास पोचल्या; तो समुद्र निवळला व ऊनही पडले. सर्व दिवस मंडळींनी मजेत घालवून समुद्रातले बरेच मासेही पकडले.

या प्रसंगाची स्मृती सांगणारी काही मंडळी आमचेबरोबर होती व त्यामुळे आमचे सहलीलाही एक प्रकारची पवित्रता आली होती. बेटावर समुद्राच्या सान्निध्यात या प्रकारच्या सहलीला गेल्याचा माझा हा पहिलाच प्रसंग. आमची मंडळी बेटावर उतरल्यावर त्यांचे स्थानिक मंडळींनी प्रेमाने स्वागत करून सर्वांना कोचा ( म्हणजे चहा ) दिला. मग मंडळी पांगून आपल्या मनोविनोदास लागली.

**मच्छीमारीचा अनुभव :**

वाकागामिसा सपत्नीक बोटीत बसले, तीमध्ये कोळी मंडळींनी सर्व सिद्धता ठेवली होती. मासे पकडणे हा जपानी लोकांचा एक आवडता छंद आहे त्याचा मला प्रथमच अनुभव या बोटीवर आला. गळाला आमिष कसे लावायाचे व माशाला सापडल्याच्या क्षणाला झटकन कसे खेचायचे इ. माहिती घेऊन मीही प्रयत्न करून पाहिला. पण मासेही नवशिक्याला ओळखतात म्हणायचे. कारण बराच वेळ झाला तरी मासा घावला नाही ! एका कोळ्याने



माझ्या गळास घावला मासा


मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

मग मला थोडीशी मदत केली. तास दीड तासाने दोन मासे माझ्या गळात लागले पण ते काटेरी होते म्हणून कोळ्याने त्यांना हातोड्याने ठेचून समुद्रात सोडून दिले. जिवंत ऑक्टॉपस याप्रसंगी मी प्रथमच पाहिला. आमच्या मच्छी-मारी बोटीत एक पाण्याचा छोटासा हौद केलेला होता व त्यात दोन ऑक्टॉपस सोडलेले होते. मासा आसपास आल्याची चाहूल लागताच हा आठ पायाचा प्राणी त्याला कसा आवळून घेऊन त्याचा फन्ना उडवतो ते दृश्य भीतीदायक वाटते. कोळी लोक समुद्रात दोरखंडाच्या सहाय्याने अंतराअंतरावर मडकी लावून ठेवतात व ठराविक काळानंतर समुद्रातून ती काढून पाहून सोडून देतात. तो देखावा मला तरी नावीन्यपूर्ण होता. इकडे बोट झपाट्याने जात होती तर तिकडे कोळ्याचे गाडग्याचे निरीक्षण तितक्याच वेगाने चालले होते. पंचवीस तीस मडकी तपासली तेव्हा एकात त्यांना ऑक्टॉपस मिळाला त्यावरून ही शिकार किती जिकीरीची असते याची कल्पना आली.

दर्यांत मोटार बोट वेगानं हाकारणे हीही गमतीदार क्रीडा आहे. आम्ही चौघेजण अशा बोटीतूनच तुफान वेगाने समुद्रात थडाडत होतो. अर्थात सारथ्य करण्याचे धाडस मला झाले नाही. पण लाटांच्या आघातांना तोंड देऊन खालीवर वेगाने धावणाऱ्या या बोटीतून क्षणाक्षणात धाबे दणाणून जाते.

समुद्र जरी शांत होता तरी कित्येक वर्षांत पोहोणे सोडले असल्याने पोहण्यास उद्युक्त होणे धोक्याचे वाटले. परंतु आदलेच दिवशी ८५० येन देऊन स्विमिंग ट्रंक खरेदी केला होता म्हणून त्यासाठी, समुद्रात पोहणे जमले नाही तरी उथळ पाण्यात डुंबून मात्र भरपूर घेतले. या प्रकारे पुरेपूर व्यायाम झाल्याने बरोबरच्या फराळाचा लाकडी पेट्यांचा सर्वांनी फन्ना उडवल्यास नवल नाही. सर्व दिवस आनंदात घालविल्यावर सायंकाळचे सुमारास स्थानिक मंडळींचा निरोप घेऊन बोटीने आम्ही निघालेल्या धक्क्यावर आलो व तेथून रेल्वेने ताबूसेस परतलो.

ओगामिसामांची शिकवण म्हणजेच मियोशिए यावर प्रकाश टाकणारी भाषणें; नाकायामा सान ( म्हणजे मिस्टर किंवा श्रीयुत ) यांची, अधून मधून ठेवण्यात आली होती. त्यानंतर प्रश्नोत्तरेही होत. कानपूरचे श्री. नानगेरिया यांनी उत्तर भारतातील परिस्थितीची कल्पना दिली. दि. २९ जुलै रोजी माझे भाषण सुमारे पाऊण तास झाले. त्यात दक्षिण भारतातील भाषा, बोली भाषा, महाराष्ट्राचे वैशिष्ट्य, इत्यादी माहिती मी सांगितली. तसेच भारतीय जनता



**वासंतिक शिबिरासाठी होन्बूस आलेले परदेशी पाहुणे.**

मूलतःच धार्मिक प्रवृत्तीची असल्याने आध्यात्मिक विचार ती आस्थेने ग्रहण करीत असल्याचे मत व्यक्त केले. भाषणे, चर्चा, याखेरीज चित्रपट, स्लाइड दाखविणे वगैरे कार्यक्रमही भरपूर होते.

दि. ३१ जुलै रोजी सर्व मंडळी सामुदायिक रीत्या ओगामिसामा यांच्या जुन्या प्रार्थनागृहात गेली. तेथे बेन जेरोम यांनी ओगामिसामा यांच्या सान्निध्यातील काहि गमतीदार प्रसंग निवेदन केले. त्यानंतर आम्ही होन्बूतील एका टेकडीचे माथ्यावर, जेथे ओगामिसामा यांची शवपेटिका पुरली आहे ते ठिकाण पाहावयास गेलो. पांढऱ्या मातीच्या पिरॅमिडच्या आकाराचे दिसणारे हे स्थान पाहून सर्वांची मस्तके विनम्र झाली. ब्राझिलचे मि. ॲलंकार यांनी ताबूसेच्या या प्रेषितेच्या अंत्ययात्रेचे हृदयस्पर्शी वर्णन केले.

दुपारी सर्व उपस्थित मंडळींचा सामुदायिक फोटो घेण्यात आला व याप्रमाणे हे वासंतिक शिबिर यशस्वीरीत्या पार पडले. दि. १ ऑगस्ट रोजी होन्बूस सुट्टी होती.

**वसमधील करमणूक :**

दि. २ ऑगस्ट रोजी हिरोशिमास भेट देण्याचा कार्यक्रम होता. जपानमध्ये आपल्याकडच्या आरामगाड्यांप्रमाणे विशिष्ट प्रवासासाठी खास गाड्या


भाड्याने घेता येतात, अशा सहलीकरता. विमानांतील होस्टेसच्या धर्तीवर एक चुणचुणीत जपानी मुलगी बसमधील आम्हां मंडळीना वाटेतील प्रदेशाचे जपानी भाषेत वर्णन करीत देत बोलण्यात लाडिकपणा होता तिच्या व अधूनमधून गाणीही म्हणून मंडळीना रंजवीत होती ती. गाडीतील स्त्रीपुरुषांनाही गाणी म्हणण्यासाठी माईक दिल्याने वातावरणात घरगुतीपणा उत्पन्न होत होता. कोणी हवाई, कोणी जपानी, कोणी हिंदी, तर कोणी इंग्रजी, भाषेतून गाणी किंवा कविता म्हणून हास्याचे कल्लोळ उठवीत होते. माझेवर पाळी आली तेव्हा सायमन कमिशनचे आगमनाचे वेळी इंग्रजी साप्ताहिकांत पुढील लिमरिक प्रसिद्ध झाले होते; ते म्हणून वेळ निभावली.

When I went on a trip to Lahore
To meet the Jane I adore
She said 'Simon Go Back'
I have married Jack
And I want you to love me no more.

दुसऱ्या महायुद्धात ॲटमबॉंबने विनाश झालेले पहिले शहर म्हणून हिरोशिमा प्रसिद्ध आहे. त्यामुळे विध्वंस झालेले शहर दिसेल अशी माझी साधारण कल्पना. पण जपानी कर्तृत्वाला बेचिराख झालेले हिरोशिमा हे आव्हान होते आणि एवढ्या वर्षांत हिरोशिमा पूर्वीपेक्षा अधिक आकर्षक रीतीने उभारून जपानने आपत्तीला तोंड दिले. पानशेत प्रलयाने पुणे शहरात आलेली ती अवकळा अजून बव्हंशी कायम आहे हे लक्षात घेतले म्हणजे हिरोशिमाचे आकर्षक परिवर्तनाबद्दल प्रवाशास कौतुक वाटते.

**नवे हिरोशिमा :**

हिरोशिमाची आधुनिक बांधणी, विस्तृत रस्ते, गगनचुंबी इमारती यामुळे शहराबद्दल चांगला ठसा प्रवाशांच्या मनावर बिंबतो. हे शहर मूलतः पाच गांवांचा गट होते. १५८९ मध्ये लॉर्ड टेरूआटो मोरी याने ओटा नदीच्या मुखातील पाच प्रमुख गावांत आपला किल्ला बांधला व त्याला हिरोशिमा म्हणजे रुंद बेट असे नांव दिले. हिरोशिमा किल्ल्यात प्रेक्षणीय प्रदर्शन असल्यामुळे बेटाचे इतिहासावर प्रकाश पडतो. १७५८ सालांतील प्रचंड आगीने हे शहर निमेउध्वस्त झाले. परंतु पुढे १८८६ साली जपानच्या पाचव्या



हिरोशिमा स्मरणाचा चबुतरा

सैन्याचा ते मुख्य तळ झाले आणि याच सैन्याला पुढे अमेरिकेच्या अणु-युद्धाचा पहिला तडाखा बसला. चिनी–जपानी युद्धांत बादशाहा मेइजी यांनी हिरोशिमा सम्राटांचे निवासस्थान जपानच्या केले. जपानचे सम्राट वर्षातून सात महिने येथेच रहात असत. त्यामुळे हिरोशिमास नॅशनल डाएटची बैठकही घ्यावी लागे. प्रस्तुत घटनेमुळेहि हिरोशिमाला जपानच्या दुसऱ्या राजधानीचा दर्जा प्राप्त झाला.

६ ऑगस्ट १९४५ रोजी अमेरिकेने पहिला ॲटमबॉंब या शहरावर टाकून जगास भयंकर धक्का दिला. सत्तावीस वर्षे लोटली त्याला पण हिरोशिमाच्या जनतेतच तर नव्हे तर सर्व जपानी देशाला तो प्रसंग अजून ताजाच आठवतो. हिरोशिमातील शांतता उद्यान पाहतांना अजूनहि बॉंब पडल्यानंतर जनतेत उडालेल्या हळकल्लोळाचे ध्वनी तेथे येणाऱ्या सहृदय मानवाना ऐकू आल्याखेरीज रहात नाहीत. बॉंब टाकला गेला त्या वेळी म्हणजे सकाळी ८। वाजता चर्चेसमध्ये घंटा वाजवून शांततेचा झंकार ऐकवला जातो. या अत्याचाराने हिरोशिमाची बहुतेक जनता मृत्युमुखी तर पडलीच, पण सर्वत्र इमारती उद्ध्वस्त झाल्या. नाही म्हणायला आता तेथे एक इमारत या विध्वंसाची आठवण म्हणून छिन्नभिन्न अवस्थेत उभी आहे. बाकी भंगलेल्या इमारती व ठिकाणे पाडून नव्या हिरोशिमा शहराची उभारणी करण्यात आली आहे.

अणुबाँबने झालेल्या आपत्तीची कल्पना यावी म्हणून पीस मेमोरियल पार्कजवळ एक वस्तुसंग्रहालय उभारण्यात आले असून ते पाहतांना हृदय पिळवटून निघते. प्रदर्शनातील प्रवेशद्वारावर ठिकठिकाणच्या दालनांतील वस्तूंचे इंग्रजीतून व जपानीतून वर्णन ऐकण्यासाठी इअरपीस मिळतो १०० येन भाड्यात. मला त्यांनी हिरव्या रेषेने जाण्यास सांगितले. पण अर्थ नीटसा समजला नाही त्यामुळे आवाज नीटसा ऐकू येत नव्हता. शेवटच्या दालनात गेल्यावर लक्षात आले की, हिरवे पट्टे असलेल्या बाजूने गेले तर इंग्रजीतून त्या त्या दालनावर वस्तूची यथार्थ कल्पना सदर इअरपीसमध्ये ऐकू येते. ही योजना स्तुत्य आहे, पण सेवकांनी सुरुवातीला यथार्थ कल्पना प्रेक्षकांना द्यावयास हवी. आमच्यापैकी एकास तर १०० येनमध्ये इअर पीस मिळण्याचा आनंद झाला, पण बाहेर जाण्याचे कौंटरवर तो परत मागण्यात आला तेव्हा त्याची निराशा झाली!

परवापरवापर्यंत ॲटमबाँबने होणाऱ्या रेडिएशनचे परिणाम भासमान होत होते. बाँबचा प्रताप प्रत्यक्ष पाहिलेल्या जपानी महिला मिसेस मियोको तात्यूची यांनी आपल्या जीवनात आलेले खडतर प्रसंग लिहून ठेवले आहेत. वयाच्या तेराव्या वर्षी ओढवलेल्या या आपत्तीमुळे त्यांना केवढी संकटे भोगावी लागली याचा हा हृदयद्रावक वृत्तांत वाचनीय वाटतो. डोळ्यांत आसवे आणत त्या म्हणाल्या की, शांततेशिवाय जगातील जनतेला सुख मिळणार नाही. ॲटम बाँबच्या धडाक्याने हिरोशिमातील सुमारे अडीच लक्ष जनता गारद झाली तेथील स्मारकाच्या जागी त्या मंडळींना अखेरची वंदना करताना अणुअस्त्रांचा निःपात करणे किती अगत्याचे आहे याची यथार्थ कल्पना आली.

### अणुध्वमचे जनक ऑटो हान :

अणुबाँबचे जनक समजले जाणारे डॉ ऑटो हान अलीकडेच ख्रिस्त-वासी झाले, त्यासंबंधी विचारही या वेळी मनात येऊन गेला. नोबेल पारितोषिक मिळविलेल्या या विख्यात जर्मन फिजिसिस्टला स्वतःस अणुबाँबचे जनक म्हणवून घेणे आवडत नव्हते. वस्तुतः अणुशक्तीचे भयंकर प्रतापाची डॉ. हान यांना यथार्थ कल्पना होती, पण हिटलरच्या हाती हे कोलीत जाऊ नये म्हणून या अस्त्राच्या शक्यतेबद्दल त्यांनी व त्यांचा सहकाऱ्यांनी नाझी पुढाऱ्यांना कांहीसे अंधारात ठेवले. १९३८ च्या सुमारासच डॉ. हान व त्यांचे

सहकारी डॉ. फिझ स्ट्रासमन यांना दीर्घ संशोधनानंतर न्यूट्रॉन बंबार्डमेंटची यथार्थ कल्पना आली व त्यानतर अणुबाँब तयार करण्याचा रस्ता सुलभ झाला. परंतु या संशोधनांतील पुढील पायऱ्या त्यांनी गुलदस्तात ठेवल्या. नाही म्हणायला त्यांनी, पूर्वीच्या एक सहकारी डॉ. लिसे या जर्मनीहून स्वीडनला पळून गेलेल्या ज्यू महिलेस, अणुबाँबच्या शक्यतेबद्दल सूचना दिली. अमेरिकेस पळून गेलेल्या डॉ. आल्बर्ट ऐनस्टीन यांनाही या संशोधनाचा अंदाज देण्यात आला. त्यानंतर कोलंबिया विद्यापीठांत सुमारे दोनशे अव्वल दर्जाचे फिजिसिस्ट याच संशोधनाचे पुढील टप्प्यात व्यापृत झाले—आणि सहा वर्षांचे काळात ॲटम बाँब जन्माला येऊन त्याने पहिला बळी हिरोशिमाचा घेतला. या बाँबची कल्पना प्रथम डॉ. हान यांच्या डोक्यात आली तरी पुढे अखेरपर्यंत त्यांनी युद्धांसाठी अण्वस्त्रे तयार करण्याच्या कल्पनेस सर्वस्वी विरोध केला. परंतु बंद केलेल्या भांडयांतील राक्षसाची सुटका केल्यानंतर तो आपले प्रताप दाखविण्याचे थोडाच राहील.

पीस मेमोरिअलचे वैशिष्ट्यपूर्ण शिल्पातून ॲटॉमिक डोम एखाद्या फ्रेम केलेल्या चित्राप्रमाणे दिसतो. प्रसिद्ध शिल्पकार टँजी यांनी या स्मारकाचे सेनेटाफची रचना तयार केली असून त्यावर पुढील वाक्य कोरण्यात आले आहे.

‘ Rest here in peace for never again we repeat rhe error. ’

याजवळच अणुबाँबमध्ये नष्ट झालेल्या बालकांच्या करतां वेगळे स्मारक आहे. जगातील देशोदेशीच्या बालकांनी पाठविलेली नाणी वितळवून विभिन्न धातूची तयार केलेली घंटा हे या स्मारकाचे वैशिष्ट्य होय.

पीस मेमोरियल व वस्तुसंग्रहालय पाहिल्यानंतर मनास आलेली उदासीनता घालविण्यास लॉर्ड आसानो यांच्यासाठी तयार केलेले शुकेरीन उद्यान चांगलेच उपयुक्त ठरते. या बागेस फुतावा नांवाचे टेकडीची पार्श्वभूमि लाभल्यामुळे तसेच शेजारी नदी वाहत असल्यामुळे ते आहे त्यापेक्षाहि विस्तृत दिसते.

डिपार्टमेंटल स्टोअर्स हिरोशिमात बरेच असून सातआठ मजली इमारतीच्या व्यापक दालनातून विविध प्रकारच्या वस्तूंची आकर्षक मांडणी करण्यांत आलेली दिसते. एस्केलेटर्समुळे ग्राहक कोणत्याही मजल्यावर न दमता जाऊन खरेदी करू शकतो. वस्तूवर किंमतीचे लेबल असल्याने पसंत पडताच तेथेच ती विकत घेऊन पैसे मोजता येतात. त्यामुळे एकदोन व्यक्तीही काही

दालनांची विक्री पाहू शकतात. जवळजवळ सर्वच ठिकाणी व्यवस्थेशीर पोषाख केलेल्या जपानी तरुण मुलीच विक्रीची व्यवस्था पाहतात.

यानंतर हिरोशिमास आमचा पुन्हा एकदा पाचसहा मंडळीसह होन्शूचे गाडीतून प्रवास झाला. त्या दिवशी सायंकाळी ओगामिसामांच्या अनुयायांनी एका मोठ्या हॉलमध्ये सभा आयोजित केली होती. तीत परदेशीय पाहुण्यांची भाषणे झाली.

हिरोशिमांतील मझदा मोटारीचा कारखाना पहिल्या भेटीतच आम्ही पाहिला. जपानमधील मोटार कारखान्याचा विक्रीमध्ये मझदाचा तिसरा क्रमांक लागतो.

# जपान व अतिपूर्वेंकडील देश

## भाग दुसरा

## प्रेक्षणीय स्थळे, व प्रमुख शहरांतून भाषणें

**मियाजीमाचे स्वर्गीय सौंदर्य :**

हिरोशिमाहून परततांना आम्ही मियाजीमा बेटास भेट दिली. हिरोशिमा उपसागरात हे बेट असून सृष्टिसौंदर्याचे दृष्टीने जपानमध्ये त्याचा तिसरा क्रमांक लागतो. अंतःसागरांतील या बेटावर इत्सुकशिमा शिंतो श्राइन मोठ्या डौलांत उभारण्यांत आले असून दूरवरूनच या पूजागृहाची शेंदरी रंगाची तोरी प्रवाशांना आकर्षून घेते. या तोरीचे स्वरूप वर्णन करण्यापेक्षा खालील फोटोवरून चागले कळेल. शिंतो श्राइन आहे म्हणून चटकन् उमजण्यास ही तोरी प्रमुख निशाणी आहे. मुख्य प्रवेशद्वाराचे महिरपीचे दोन्ही बाजूस वैशिष्ट्यपूर्ण रचनांचे सिंह व सिंहीण आढळतात. काहींच्या मते ती कुत्री असावीत. दुष्ट



मियाजीमा बेटावर

पिशाच्चापासून संरक्षण करण्यासाठी त्यांना तेथे बसविण्यांत आले आहे असे म्हणतात. शिंतोंचे पवित्र नगाधिराजास व त्याच्या तीन मुलींना हे पूजास्थान अर्पण करण्यांत आले असून ख्रिस्ती शताब्दाचे ८११ व्या सालांत त्याची स्थापना झाली. परंतु ते मोडकळीस आल्यामुळे बाराव्या शतकांत त्याची पुनर्रचना करण्यांत आली. मधल्या विस्तीर्ण पूजा स्थानास पोहोचण्यास लाकडी वाटा केल्या असून भरतीचे वेळी भक्कम खांबावर उभारलेले हे ठिकाण जणू पाण्यांत तरंगत आहे असा भास होतो.

मुख्य श्राइनच्या डाव्या बाजूस सेंजोकाकू हे भव्य दालन असून प्रार्थनेसाठी हजार लोकांना चटया अंथरून बसण्याइतके ते मोठे असल्याने त्यास सदर नाभामिधान मिळाले आहे. एकाच कापराच्या झाडाचे लाकडापासून हा हॉल बांधला आहे. देवाला तांदळाच्या आहुती हजारो भक्तगण येथे वाहतात. चिनी-जपानी युद्धाचे वेळी कित्येक जपानी सैनिक येथे येत व तांदळाचा नैवेद्य पुढील स्वास्थासाठी देवाला अर्पण करीत. तेव्हापासून या आहुती देण्याची प्रथा पडली असावी.


बेटास इत्सुकुशिमा नाव पडले त्याचा अर्थ ' पूजेचे पवित्र बेट ' असाच आहे. बेटाचा सोवळेपणा कायम राहावा म्हणून तेथे झाडे तोडण्यास प्रतिबंध आहे. त्याचप्रमाणे प्रेतदहनच नव्हे तर बाळंतपणही रूढीने या बेटात अशक्य केले. गरोदरपणाच्या अखेरच्या अवस्थेत स्त्रियांची या बेटावरून अन्य ठिकाणी रवानगी केली जाते.

शिंतोश्राइनच्या नजीकच बौद्ध धर्मीयांचे देवालय आहे. शिंतो व बुद्ध धर्मीयांची पूजास्थाने जपानमध्ये कित्येक ठिकाणी जवळजवळ आढळतात.

याच बेटांत केबलकारने मौंट मिसेन या डोंगराचे शिखरावर तेरा मिनिटांत जाता येते. तेथून हिरोशिमा शहर, आसपासचे पर्वत व लगतचा समुद्र यांचा देखावा सुंदर दिसतो.

**किंताबाशी लाकडी पूल :**

मियाजीमा श्राइन पाहून आम्ही इवाकुनीच्या दिशेने परत निघालो. वाटेत नदीचे पात्रालगत बस खाली नेऊन आम्ही प्राचीन किंताबाशी हा प्रसिद्ध लाकडी पूल पाहिला. पुलाला पाच कमानी असून त्याचे बांधणीत पोलादी खिळे व बोल्ट यांचा मुळीच उपयोग केला नाही हे बांधणीचे वैशिष्ट्य समजले



किंताबाशी–लाकडी पूल


पाहिजे. पुलाच्या पलीकडे एका जपानी ऐतिहासिक सरदाराची गढी असून पुलाच्या मध्यावरून आसपासचा देखावा मनोहर दिसतो. कित्येक लोक येथे नदीकाठचे वाळवंटांत पिकनिकसाठी येत असल्यामुळे चहा, आईस्क्रीम व चिल्लर खाद्य-पदार्थ यांची तात्पुरती दुकानेही उभारलेली दिसतात.

सायंकाळी आमची बस ताबूसेत परतताना जपानी गाइड मुलीने उतारूंना काही कोडी घालून व उत्तरे घेऊन त्यांची करमणूक केली त्यामुळे सहलीच्या आनंदात आणखी भर पडली. सर्व दिवस कसा गेला तो समजला नाही या सहलीत.

ऑगस्टच्या पहिले पंधरवड्यांत होन्चूमध्ये तरुण मुलांमुलींसाठी, तसेच बालकांचे व आयांचेकरता शुरंकाइ म्हणजे शिकवणीची शिबिरे भरविण्यात येतात. मुलांचे पुढे झालेल्या माझ्या भाषणात प्रार्थनेचे महत्त्व मी प्रतिपादले, आणि नवससायास न करतां निर्हेतुक प्रार्थना करावी कारण ओगामिसामा यांनी सांगितल्या-प्रमाणे ईश्वराला तुम्हास काय हवे ते माहीत असते, त्यासाठी वेगळी मागणी करण्याचे कारण नाही असे सांगितले.

**दाढेबरोबर २५०० येनही गेले :**

याच सुमारास एकादशी आल्याने केलेल्या उपासात जपानमधील कठीण



**नाकायामासान, लहान मुलामुलींना श्री. ठाकूर यांचा परिचय करून देत आहेत. मि. लँगॉफ फोटो घेत आहेत.**

---

शेंगदाण्याने मला दाढदुखीचा चांगलाच त्रास झाला. कोडोपायरीनसारख्या नेहमीच्या उपचाराने दाढ काही थांबेना. अखेरीस तान्नूसेंतील जपानी डॉक्टरकडे जावे लागले. डेंटल क्लिनिकमध्ये नर्सेस प्राथमिक उपचार करतात. कदाचित तेवढ्यानेच दुखणे थोडे कमी व्हावे ! शेवटी दाढ एकदाची काढली पण ती बरोबर माझे २५०० येन गेल्यामुळे हे दुखणे काही महागांतच पडले.

याच आठवड्यात डायरी चाळताना माझी जन्मतिथी येऊन गेल्याचे आढळले. आपल्या पंचांगाप्रमाणे सदर डायरीत त्या तिथीचा लोप होता. ओगामिसामा यांच्या शिकवणीत ego किंवा अहंकार नाहीसा करावा असा आदेश आहे. रोजनिशीत माझे जन्मतिथीचा लोप हा या आदेशाच्या दृष्टीने चांगलाच पडताळा आहे असाही विचार या संबंधात मनात येऊन गेला.

बालकांच्या शुरंकायमध्ये शांतिमंदिरात मुलांनी आपापल्या लहान-सहान चुकांची दिलेली प्रगट कबुली मजेशीर तितकीच उद्बोधक वाटली. एकाने सांगितले, मी खोडया करून भावंडांना भंडावून सोडतो, दुसऱ्याने कबुली दिली, मी खेळांत रमतो व आईने सांगितलेली कामे करीत नाही, तिसरीने प्रगट केले की अभ्यास न करता टेलिव्हिजनवरचे चित्रपट पहात

बसते, चवथीने सांगितले की चोरून चॉकोलेट खाल्लं, भावंडांना ठेवले नाही. यासारख्या या चिमुकल्या जीवांच्या कहाण्या त्यांच्या पुढील निष्पाप जीवनाच्या पायऱ्या ठरू शकतील. प्रत्येक बालकाच्या कबुली जबाबानंतर आपण अशी गोष्ट पुन्हा करणार नाही असे पश्चात्तापाचे आश्वासनही असते. या कार्यक्रमास बहुतेक बालकांच्या माता उपस्थित होत्या. त्यांची हृदये मुलांचे बोल ऐकून साहजिकच भरून येत.

१० ऑगस्ट रोजी मला टोकिओहून अकल्पित फोन आला, तो म्हणजे माझे ज्येष्ठमित्र व प्रसिद्ध कारखानदार श्री. म. स. पारखे यांचा. मी त्यांना पुण्याचे पत्त्यावर एक पत्र टाकले होते, पण त्यांचा मुक्काम या सुमारास टोकिओत होईल याची कल्पनाही नव्हती. त्यांनी तत्परतेने ताबूसेस फोन केला हा योगायोग असाधारण वाटला. उभयतांना कुशल बोलता आले याचे समाधान वाटले, पण श्री. पारखे यांना दुसरेच दिवशी अमेरिकेस निघण्याचे असल्याने त्यांची माझी प्रत्यक्ष भेट होऊ शकली नाही.


**पूनित टेकडीवरील चमत्कार :**

दि. ११ ऑगस्ट, रविवारी आम्ही सर्व मंडळी बसमधून होन्बू पासून अडीच मैलावर असलेल्या एका टेकडीकडे गेलो. या टेकडीला ओगामिसामा यांच्या आयुष्यात महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले होते. ओगामिसामा १९४४ सालच्या पावसाळ्यांत नित्याप्रमाणे भल्या पहाटे दोन वाजता उठून प्रार्थनेसाठी हीचमान श्नाइनकडे निघाल्या असता त्यांच्यातील अंतस्थ देवाने त्यांना आता या टेकडीकडे जाण्याचा आदेश दिला. ताबूसे व शेजारचे गांव यांच्या सरहद्दीवर ही टेकडी असून किटामुरा कुटुंबाच्या मालकीची आहे ती. ओगामिसामा यांनी या टेकडीच्या पायथ्याशी आपली सायकल ठेवली व मग एकट्याच ती टेकडी चढून गेल्या. मध्यरात्रीची वेळ होती, तरी टेकडी चढतांना त्यांना त्रास झाला तर नाहीच, पण आश्चर्याची गोष्ट की काळ्याकभिन्न अंधारात त्यांना झाडपाल्याच्या व गवतांच्या रंगाच्या छटाही स्पष्ट दिसत होत्या. टेकडीच्या माथ्याचे सपाटीवर पूर्वेकडे वळून त्यांनी 'नाम्योहोरेंगेक्योचा' गजर चालविला. खाली पडून त्यांनी आकाशाकडे डोळे लावले तो काय आश्चर्य, स्वर्गीय नृत्य त्यांना दिसू लागले. पऱ्यांचा तर हा नाच नव्हे ना असा ओगा-मिसामांच्या मनांत विचार आला. तो त्यांच्या शरीरांतील परमेश्वराने त्यांना

सांगितले ' मूर्ख तर नाहींस, हे देवदूतांचे नृत्य आहे.' ओगामिसामा त्या दृश्यात इतक्या तल्लीन झाल्या की, आपणही त्या देवदूतांच्या नृत्यांत सामील झालो आहोत असे क्षणभर त्यांना वाटले. इतक्यांत तांबडे फुटले व अरुणाने भगवान सहस्ररश्मीच्या आगमनाची चाहूल दिली. ओगामिसामांचा नाम्यो-होरेंगेक्योचा गजर चालूच होता. सूर्यदर्शन होताच त्यांच्या प्रार्थनेचा ध्वनि आसमंतात दुमदुमून राहिला आणि त्यांच्या मुखांतून शब्दार्थ निघाले, 'उत्तिष्ठत, जाग्रत, प्राप्य वरान्निबोधत च'. १९४५ सालातील जुलैपर्यंत ओगामिसामांचा या डोंगरावर प्रार्थनेला येण्याचा क्रम चालूच होता. त्यांना तो इतका आवडला की तेथेच एखादी बंगली बांधून वास्तव्य करावेसे वाटले त्यांना. पण त्यांच्या हृदयस्थ परमेश्वराने त्यांना सांगितले की इतक्या दूरवर येऊन राहिल्यावर ताबुसे स्टेशनवरून येणाऱ्या मंडळींना प्रवचनांना येणे गैरसोयीचे होईल तेव्हा त्यांनी तो विचार सोडून दिला.

साडेपाचशे फुटाची चढण चढून आम्ही डोंगरमाथ्याच्या उघडीकीवर आलो. तो सभोवारचा देखावा मोठा मनोहर दिसला. ओगामिसामांच्या एक शिष्या मिदोरी यांनी त्यांच्याजवळील जपानी चरित्रांतून प्रस्तुत डोगरांशी ओगामिसामांचा आलेला संबंध वाचून दाखविला व मला त्यांनी प्रोफेट ऑफ ताबूसेमधील तद्विषयक २९–३० ही इंग्रजीतील पाने प्रकट वाचण्यास सुचविले माझेजवळ चष्मा नव्हता तेव्हा मी थोडासा अनमान केला पण काय चमत्कार मी तसाच चष्म्याविना सदर पाने वाचू लागलो व धडाधड सदर परिच्छेद प्रगट वाचला. हा अनुभव मला अभूतपूर्व वाटला. डोंगराचे पाऊल-वाटा आम्ही उतरावयास लागलो. नुकत्याच पडलेल्या पावसाने पालापाचोळा भिजून गेल्यामुळे पावलाना मऊमऊ पायघड्या आंथरल्याचा भास झाला. रस्ता निसरडा झाल्याने एके ठिकाणी मी घसरलो पण मध्येच रानटी झाडांच्या एका शाखेला घट्ट धरल्याने माझी घसरण थांबली.

हा डोंगर उतरल्यावर बसने आम्ही तेथून सात मैलावर असलेल्या दुसऱ्या पर्वत शिखरावर गेलो. तेथे टेलीव्हिजन व रेडिओची रिले स्टेशन्स आहेत. तसेच शिंतो सांप्रदायाचे इ. स. ५५० व्या वर्षी बांधलेले प्राचीन पूजास्थान आहे. आठराव्या शतकात येथे सामुराई व बादशहांचे सैन्य यांचे युद्ध होऊन बादशहांच्या सैन्याचा विजय झाला, त्यासंबंधी शिलालेखही तेथे पहावयास मिळाला. हा पर्वत माथा सहलीला उत्तम असून शाळेतून आलेली



**इवाकी पर्वतावरील शिलालेखाजवळ सहलीसाठी आलेले साधक.**

कित्येक मुले ठिकठिकाणी बसून देखाव्यांची चित्रे काढण्यात दंग झालेली दिसली. जवळच चिमुकले हॉटेल असून तेथे पेये, आइस्क्रीम, निरनिराळ्या धान्याच्या लाह्या इ. पदार्थ मिळतात.

१२ ऑगस्ट या दिवशी ओगामिसामांच्या शरीरात ईश्वराने प्रवेश केला, त्याचा वर्षदिन टेंपल ऑफ पीसमध्ये म्हणून पाळण्यात येतो. हजारो दोशींनी या निमित्ताने सकाळीच शांतिमंदिर गजबजून गेले. यावेळी वाकागामिसामांचे भाषण भावपूर्ण झाले.

दुपारी योशिटो किटामुरासान यांच्या नेतृत्वाखाली स्थापन झालेल्या शिंको इंडस्ट्रीजचे कारखान्याची नवीन इमारत पाहिली. खाद्यपदार्थांत वापरावयाची अलगीत वगैरे पौष्टिक औषधी या कारखान्यात तयार होतात. ही इमारत पाहून झाल्यावर तेथून जवळच असलेल्या कुमारा या जपानी कारखानदाराच्या तुई को किकाई हा कारखाना पाहिला. तेथे आधुनिक पद्धतीचे गिअर पंप तयार करतात. नागासाकी गोदीत भारतासाठी जी बोट बांधण्यात येत होती तीसाठी गिअरपंप याच कारखान्यातून गेले आहेत.


**माजी महामंत्रि किशी यांचेशी परिचय :**

१४ ऑगस्ट रोजी जपानचे माजी महामंत्री मि. किशी यांनी ताबूसेचे शांतिमंदिरास भेट दिली. किशी हे ओगामिसामांचे मोठे चहाते होते व त्यांना

या प्रेषितेने भवितव्याबद्दल ज्या सूचना दिल्या होत्या त्यांचे पडताळे आले. वाकागामिसामांनी किशी यांचा आम्हा परदेशी पांहुण्यांशी परिचय करून दिला. ओगामिसामांच्या निर्याणानंतर किशींची ताबूसेला पहिलीच भेट असल्याने त्यांनी भाषणांत वाहिलेली श्रद्धांजलि भावपूर्ण वाटली.

दुपारी भोजनोत्तर मुगानमाय या ओगामिसामाप्रणीत भक्तिनृत्याचा कार्यक्रम झाला. डोळे मिटून प्रार्थना संगीतात तल्लीन होऊन नृत्यात ठेक्या-बरोबर स्त्रीपुरुषांनी नाचावयाचे असते. आलटून पालटून भक्त मंडळी ठराविक ठेक्यात स्फुरतील तशी भक्तिगीते म्हणतात व त्यांत विसर्जित होऊन मंडळी नाचत असतात. काही पत्रकारांनी ओगामिसामांच्या सांप्रदायास ' डान्सिंग रिलिजन ' अशी संज्ञाही देऊन टाकली, पण त्यांच्या शिकवणीचा अभ्यास करणारांना हे अभिधान उथळ वाटते.

१५ ऑगस्ट उजाडला. भारताचा स्वातंत्र्यदिन जपानमधील वकिलातीचे कचेरीत उत्साहाने साजरा झाला. कोबेतील कॉन्सलेटमध्ये झालेल्या कार्यक्रमाची हकीगत ' मैनीची ' डेलीमध्ये दुसऱ्या दिवशी वाचावयास मिळाली, त्यामुळे मनाला समाधान वाटले. तरुण मुलामुलींचे शुरेंकायपुढे या दिवशी माझे भाषण झाले त्यावेळी जपानी व अन्य भाषा, विद्यार्थ्यांची कर्तव्ये इ. विषयांवरही बोललो..



मुलामुलींच्या शुरेंकायपुढे श्री. ठाकूर यांचे भाषण

१६ ऑगस्टला ताबुसेस सार्वत्रिक सुट्टी होती. त्यामुळे इकारी नावाच्या मनोवेधक बीचकडे समुद्रस्नानासाठी गेलो आम्ही. स्नान व पोहणे हा जपान्यांचा आवडता छंद असल्याने निरनिराळ्या बीचेसवर स्त्री पुरुष व मुलांचा उत्साही जनसंमर्द आढळतो. इकारी बीच जुहूपेक्षा बऱ्याच पटीने लांब तितकाच चेतोहर आहे.

प्रथम आम्ही कपडे बदलून स्विमिंग ट्रंक चढविले व सकाळच्या उन्हात मऊ मऊ रेतीवर समुद्राच्या किनाऱ्याने चांगलीच पायपीट केली. समुद्र शांत होता व लाटांबरोबर येणाऱ्या सागरी शेवाळ्याने किनाऱ्यावर हिरवागार गालीचा पसरल्यासारखा दिसत होता. या शेवाळ्याचा उपयोग काही प्रक्रिया करून खताकडे चांगला केला जातो.

जपानी तरुण मुलगे खेळाचे मोठे शोकी. त्यांचे पोहोण्याच्या शर्यतीवर फार प्रेम ! किनाऱ्यापासून दोन फर्लांगांवर एक नाव उभी करण्यात येऊन तिच्यात एक निशाण उभे ठेवण्यात आले होते. पाण्यापासून २०–२५ यार्ड अंतरावर १५–२० तरुण उभे होते व सूचना मिळताच धावत पोहत जाऊन निशाणाला कोण प्रथम हात लावून येतो यात चढाओढ लागली होती. तीन फेऱ्या ठरल्या होत्या. या शर्यतीच्या शेवटी सर्वप्रथम येणाऱ्या तरुण मुलाचे इतरांनी उचलून अभिनंदन केले. नाकायामांचे चिरंजीवांनी ही शर्यत जिंकली. टोकिओस ते माझे स्वागतास आल्याने माझा त्यांचा विशेष परिचय झाला होता. तेव्हा मीहि त्याची पाठ थोपटून अभिनंदन केले. शर्यतीच्या झटापटीत त्यांना थोडे लागलेही पण त्यांनी ते मनावर घेतले नाही.

पाण्यात शिरले म्हणजे पोहता येते याचा अनुभव येथे पोहताना मला आला. गेल्या पस्तीस चाळीस वर्षांत माझे पोहणे बंद झाले होते त्यामुळे समुद्रात शिरताना आत्मविश्वास नव्हता. पण माझे स्नेही श्री. अॅलंकार यांनी मला उत्तेजन देऊन काही फेऱ्या मारून घेतल्या, त्यामुळे चांगलाच धीर आला. इतके दिवस त्यांच्याबरोबर रोज पोहायला गेलो असतो तर चांगले झाले असते असा विचारही मनात येऊन गेला.

बीचवर शेकडो स्त्रीपुरुष व गोंडस मुलेमुली सुट्टीचा आनंद मनसोक्त लुटण्यास आलेली होती. कॅमेरे पुष्कळांच्या जवळ दिसले. फोटोग्राफीचा छंद इतक्या व्यापक प्रमाणावर जपानमध्ये प्रचलित आहे की सुटीच्या दिवसांत फोटोग्राफीचा आनंद न लुटणारा तरुण विरळा. सहलीस आलेली मंडळी इतकी बेहोष आढळतात की कित्येकदा महत्त्वाच्या वस्तूहि काही बीचवर विसरून

जातात तर कधी कधी त्या समुद्राच्या लाटांबरोबर किनाऱ्यावर येऊन पडतात माझ्या एका मित्रास फेरफटका मारताना सहज एक लिफाफा दिसला. लिफाफा त्याने उघडून पाहिला तो त्यात पाण्याने भिजलेली चोळामोळा झालेली हजार येनची नोट आढळली !

समुद्रात पोहताना चावऱ्या माशांपासून जपावे लागते. माझ्या हाताला एक पांढरा सफेत बुळबुळीत पदार्थ लागला, तेव्हा मला वाटले समद्रात टाकून दिलेला खाद्य पदार्थ असावा. पण माझे मित्रांनी सांगितले की तो जिवंत जेली फिश—असून अंगास चिकटल्यास कातडीचा दाह होतो. भर समुद्रात तर आणखी धोकादायक माशांपासून सावध राहावे लागते. मनसोक्त व्यायामाने आम्हाला भूकही भरपूर लागली होती, त्यामुळे बरोबरच्या लंचबॅगेचा सर्वांनी फन्ना केला. शिवाय शेजारीच टुमदार हॉटेल होते त्यातही हवे ते खाद्यपदार्थ मिळाले. अशा प्रकारे दिवस मजेत घालविल्यावर समुद्र खवळण्याची लक्षणे दिसू लागताच सायंकाळी पाच वाजण्याचे सुमारास उल्हसित वृत्तीने आम्ही सर्व होन्बूकडे परतलो.

इकारी बीचवरील कार्यक्रमाचे दिवशी रात्री वाकागामिसामांनी आम्हा पाच सात परदेशस्थ मंडळींना घरी भोजनास बोलाविले. बसक्या टेबलाभोंवती आसने मांडली होती व जपानी पद्धतीने बसून जेवण्याचा अनुभव मिळाला. गप्पा चांगल्याच रंगल्या. काय हवे, काय नको अशी सर्वांची आपुलकीने चौकशी मिसेस काटेमुरा करीत होत्या. नाकायामा आमच्या इंग्रजी बोलण्याचा मथितार्थ वाकागामिसांना जपानीमधून सांगत व त्यांचे म्हणणे आम्हांस इंग्रजीतून पुन्हा कळवत, त्यामुळे एकमेकांचे विचार कळण्यास अडचण होत नव्हती. भोजनात शाकाहारी तसेच मांसाहारी पदार्थांचा समावेश असल्याने आपणास हवे ते पदार्थ निवडण्यात अडचण पडली नाही. नाही म्हणायला चॉपस्टिकसची आम्हांस सवय नसल्याने कांटेचमचे मिळाल्याने ठीक जमले.

होनबूमधील माझे जीवन स्थिरावले होते. ओगामिसामांची काही प्रवचने मराठीत भाषांतरित केली. ती सर्व टेपवर मुद्रित करण्यात आली आहेत. मराठी जाणणारांना ती ऐकण्याची त्यामुळे सोय झाली आहे. इतक्यात माझा स्वदेशी परतण्याचा कार्यक्रम निश्चित झाला व ७ सप्टेंबरला निघणाऱ्या बोटीतील रिझर्व्हेशन नक्की झाल्याचे मला कळल्याने हायसे वाटले.

**टोकायामास भेट :**

दि. १२ ऑगस्ट रोजी होन्बूला सुट्टी होती. त्यामुळे सकाळीच श्री. अलॅंकार यांच्या मोटारीतून आम्ही नाकायामा यांचे घरी गेलो. डोंगराच्या पायथ्याशीच त्यांची छोटीशी बंगली असून सभोवतालची बाग लहानशीच पण मनोवेधक आहे. द्राक्षांचे व कलिंगडांचे वेलांनी तिच्या उपयुक्ततेत भर पडली आहे. नाकायामांच्या पत्नी सुविद्य शिक्षिका आहेत व त्यांनी लिहिलेले जपानी–इंग्रजी शिक्षक हे पुस्तक शाळांच्या अभ्यासक्रमात क्रमिक पुस्तक म्हणून नेमलेले आहे. त्यांची प्रौढ कन्याही शिक्षिकाच आहे. त्यामुळे मध्यमवर्गीय शिक्षकांचे कुटुंबातील सौजन्यपूर्ण व सुसंस्कृत वातावरण येथेही पाहावयास मिळाले. तेथून आम्ही सर्व मंडळी टोकायामा या मध्यम विस्ताराच्या समुद्रकाठच्या शहरास भेट देण्यास गेलो. राष्ट्रीय हमरस्त्यावरून आमची मोटार जात असताना दोन्ही बाजूंची वनश्री मोठी हृद्य दिसली. या शहरास दुसऱ्या महायुद्धात बॉंबहल्ल्यांनी मोठाच उपसर्ग पोहोचला. त्याचे अवशेष अजूनही काही ठिकाणी आढळतात. दुपारचे भोजन आम्ही चिनी विश्रांतिगृहात घेतले.

भोजनोत्तर टोकायामा शहरातील डिपार्टमेंट स्टोअर्सला आम्ही भेट दिली व काही वस्तू खरेदी केल्या. टोकिओ, ओसाका अशा शहरांपेक्षा दोन–अडीच लाख लोकवस्तीच्या या शहरातील दुकानातून माल स्वस्त मिळतो, कारण त्यांचा खर्च बेताचाच असतो. या दुकानातून परदेशी बनावटीचा माल क्वचितच आढळेल. परदेशी नामांकित ब्रँडच्या वस्तू चौकशी करूनही या स्टोअर्समध्ये मिळू शकत नाहीत हे जपानच्या स्वदेशीच्या पुरस्काराचे द्योतक समजावे लागेल.

**सहा लाखावरील खपाचे साप्ताहिक :**

दि. २३ ऑगस्ट रोजी दुपारी येनाई येथील ' शुनान शिंपो ' या जपानी दैनिकाचे प्रतिनिधी एम. कुमिशिगे यांनी आमची मुलाखत घेतली. त्यांना इंग्रजी येत नसल्याने नाकायामासान यांना दुभाषाची कामगिरी करावी लागली. हे पत्र आपणाकडील तालुका पत्रासारखे असले तरी त्याचा खप सुमारे तीन हजार आहे. कुमिशिगे हे टोकिओतील सुप्रसिद्ध साप्ताहिक ' शुकॉन बुनशॉन ' याचे प्रतिनिधी म्हणून काम करीत असतात. जपानमध्ये मासिकाच्या आकाराची रविवारची सचित्र साप्ताहिके पुष्कळ असून त्यांचा फार मोठा प्रसार आहे. प्रस्तुत



**कोनो गावांतील शिंतोंचे प्राचीन पूजास्थान**


शुकॉन बुनशॉनचा खपही सहा लाखांवर असून त्याकरिता तयार करावयाच्या लेखासाठी कुमिशिगेसान यांनी माझे विचार समजावून घेतले.

दि. २४ रोजीं दुपारी आम्ही खास मोटारीतून कोनो या गावाकडे निघालो. घाटमाथ्यावरून वळणावळणाने आमचा रस्ता जात होता त्यामुळे भारतातील एखाद्या थंड हवेच्या ठिकाणाकडील सफरीप्रमाणे प्रवास वाटला. दोन्ही बाजूच्या वृक्षांच्या गर्द झाडीमुळे भर दुपार असूनही उष्मा भासत नव्हता. वाटेत आम्हाला तीन धरणेही लागली. लहान लहान नद्यांनाही योग्य

ठिकाणी धरणे बांधून त्यांच्या पाण्याचा जास्तीत जास्त लाभ मिळविण्यास जपानचे सरकार उत्सुक असते.

प्रथम कोडो डॅम ( लहान धरण ) व पुढें सुगानो डॅम हे मोठे धरण पाहिले. सहलीसाठीही ही धरणाची स्थाने आकर्षक आहेत. निशेको नदीच्या पात्रावर सुगानो धरण बांधण्यात आले असून ती नदी पुढे इवाकुनीकडे जाते. धरणावरील मोटारच्या रस्त्याने जाऊन दुसऱ्या टोकापासून सुमारे दोनशे पायऱ्या भिंतीतील बोगद्यातून आम्ही उतरलो–साहजिकच आत थोडासा अंधार होता, पण गारवा मजेदार वाटला. धरणाचे खालील पॉवर हाऊसही आम्ही पाहिले. तेथे दोन जेनरेटर काम करीत होते.

धरणे पाहून आम्ही कोनो गावात आलो. तेथे शिंतोंचे प्राचीन पूजास्थान पाहावयास मिळाले. १३७४ साली हे लाकडी श्राईन बांधण्यात आले असले तरी ते अजून चांगल्या स्थितीत आहे. प्रवेशद्वारातून आत गेल्यावर झाडांची नीटनेटकी बाग लागते. मधल्या पट्टिकातून वाळूमध्ये वर्तुळे व अन्य आकृति काढलेल्या आढळल्या. रांगोळीचा खर्चही न करता वाळूमधेच चित्रकलेची प्रचीती देण्याचे कसब कौतुकास्पद तर खरेच. श्राइनच्या मोठ्या सभागृहात



कोनो येथे साधकांपुढे निर्हेतुक प्रार्थनेवर श्री. ठाकूर यांचे भाषण

शाळेतील मुले व मुली सुट्टीत सहल म्हणून मुक्काम करून होत्या. त्यांचे बँड-वादन व अन्य मनोविनोद चालू होते, आणि पलीकडेच खाद्यपदार्थ तयार करण्याचे ठिकाण असल्याने हसून खेळून मंडळी वेळ घालवीत होती.

**निर्हेतुक प्रार्थनेचे फल**

सायंकाळचे सभेतील माझे भाषणात प्रार्थना करताना ती निर्हेतुक असावी असे प्रतिपादिले. सिद्ध किंवा दैवी संपत्तीने विभूषित असलेल्या व्यक्तींचा संपर्क अनायास कसा फलप्रद होतो हे सांगताना मी दाखला दिला.—

उदेति पूर्वं कुसुमस्ततः फलम् ।
घनोदयं प्राक् तदनंतरं पयः ॥
निमित्तनैमित्तिकयोरयं क्रमः।
तव प्रसादस्य पुरस्तु संपदा ॥

इंग्रजी व पुढे जपानी भाषेतून या श्लोकाचा अर्थ कळताच श्रोत्यांना आनंद वाटला.

**स्त्रियांचे हेअर कटिंग सलून :**

जपानी दंतवैद्याच्या उपचाराचा अनुभव या वर्णनात पूर्वी दिला आहे. आता तेथील हेअर कटिंग सलूनबद्दल थोडेसे लिहितो. आमच्या डॉमिर्टरीचे तळमजल्यावरील एका विभागात ग्राऊंड ग्लासच्या दारातून नर्सेस सारख्या दिसणाऱ्या गणवेषांत दोन जपानी स्त्रिया जाता येताना मी पाहिल्या होत्या. मला वाटले रुग्णाइतांकरता ते लहानसे इस्पितळ असावे. पण पुढे आमच्या स्नेह्याने आपण तेथे हेअर कटिंग केल्याचा अनुभव सांगितला व साडेतीनशे येन मोजल्याची माहिती दिली तेव्हा मी चाटच झालो. मुंबईत हेअर कटिंग केल्याला दीड महिना लोटला होता, आणि माझे केसास वाढ बेताचीच असल्याने केस कापून घेण्याचा खर्च करण्याचे मी टाळत होतो. पण जपानमधील माझा मुक्काम लांबल्याने केस कापून घेतल्याखेरीज गत्यंतर नसल्याची जाणीव झाली. एरव्ही भारतात केस कापल्यावर सलूनमध्येच दाढी करण्याची माझी पद्धत. पण साडेतीनशे येनमध्ये कटिंग व दाढी जमत नाही हे समजल्यावर खोलीतच नित्याप्रमाणे दाढी केली व कुतूहल विषय झालेल्या सलूनमध्ये प्रवेश केला. तेथील प्रौढेने माझे हसून स्वागत केल्यावर खुर्चीत

बसण्यास सांगितले. तोच दुसरी तरुण मुलगी येऊन तिने हळुवार हांतांनी ब्रशने केस स्वच्छ करून घेतले. नंतर सलूनच्या प्रमुख प्रौढेने विजेवर चालणाऱ्या मशिनने एखादे ऑपरेशन करावे अशा काळजीने कटिंगचे आन्हिक उरकले. तोच पहिल्या परिचारिकेने कानाखालचे मागील बाजूंनी साबणाचा फेस लावून पुढील सिद्धता केली. त्यावर प्रौढ प्रमुखेने वस्तऱ्याने कट मारून डोक्याचे मागील दक्षिण भाग, कानाच्या कडा इत्यादी साफसूफ केल्या. इतके झाल्यावर शांपू लावून तरुण मुलीने गरम शॉवरखाली डोके स्वच्छ धुतले व पांढऱ्या स्वच्छ टॉवेलने पुसून काढले. प्रौढेचे कटिंग चालू असताना एखाद्या विनम्र शिष्येचे मुद्रेने तिची तरुण सहाय्यिका सर्व तंत्र पाहात होती. तो सर्वच प्रकार गंमतीदार वाटला. साडेतीनशे येन गेले खरे; पण मला ताजातवाना झाल्याप्रमाणे वाटले !

जपानमधले हेअर कटिंग व ब्यूटी सलून यांना शास्त्राचा दर्जा प्राप्त झाल्याचे आढळते. मलायाहून एक मुलगी जपानमधून ही कला शिकण्यासाठी मुद्दाम आलेली मला भेटली. ते ऐकल्यावर मी स्तंभितच झालो !

बोटीचे तिकिटही आले व दि. २९ ऑगस्ट रोजी ताबूसे सोडावयाचे ठरले. चर्चा झाली व प्रकाशनांची योजनाही मुक्रर होऊ शकली. दि. २८ ऑगस्ट रोजी नित्याप्रमाणे प्रवचन व प्रार्थना झाल्या. वाकागामिसामा यांनी आपल्या भाषणात जेरोम व माझा यांचा दुसऱ्या दिवशी जाण्याच्या बेताचा उल्लेख केला व उभयतांनी ताबूसेत केलेल्या वास्तव्याबद्दल संतोष प्रगट केला. जेरोमनी आणि मी या उत्तरादाखल केलेल्या भाषणात होन्बूचे आदरातिथ्याबद्दल आभार मानले. जड अंतःकरणाने आपण निरोप घेत आहोत, असे सांगून मी Adieu Au Revoir म्हणजे पुन्हा भेट होईपर्यंत सायोनारा असे म्हटले व ताबूसेतील मुक्कामाचे भरतवाक्य झाले.

**होन्बूला सायोनारा**

दि. २९ ऑगस्ट रोजी सकाळी होन्बूतील मंडळी, जेरोम व मला निरोप देण्यासाठी जमली होती. पाऊस पडत होता त्यामुळे थोडा विरस वाटला. सुमारे दीड महिन्याच्या वास्तव्याने परिचयाचे रूपांतर जिव्हाळ्यात झाले होते. त्यामुळे सर्वांचीच हृदये जड झाली होती. वाकागामिसामा, हिमेगामिसामा, मिसेस किटा-मुरा ताबूसे स्टेशनावर निरोप देण्यासाठी आली होती. मिसेस नाकायामाही

निरोप देणाऱ्या मंडळीत आढळल्या. आर्द्र सौहार्दाचा आविष्कार या निरोपाच्या वेळी दिसला. सकाळी ९ वाजता एक्स्प्रेस ट्रेनने ताबूसे स्टेशन सोडले व होन्बूला रामराम केला.

**आदर्श रेल्वे सिस्टिम :**

दुपारी २॥ चे सुमारास आमची गाडी फुकुयामा स्टेशनचे प्लॅटफॉर्मला लागली. रिझर्व्हेशनचे तिकीटावर बोगीनंबर असतो व गाडी उभी अशा तऱ्हेने करतात की तेथील क्रमांकापाशी बोगीचे नंबर जुळावेत. त्यामुळे



**ओगामिसामांच्या आध्यात्मिक वारस हिसेगामिसामा**

गाडी स्टेशनवर थोडा वेळ थांबली तरी उतारू क्रमांकावर उभे असल्याने त्यांना ताबडतोब आपापल्या डब्यांत प्रवेश करता येतो. फास्ट गाड्यांचा वेग तर ताशी २०० किलोमीटर पर्यंत जात असल्याने या एअरकंडिशन गाड्यांचे दरवाजे-खिडक्या गाडी निघताच आपोआप लागले जातात. त्यामुळे अपघातांची शक्यता कमी होते. स्टेशनचे ठळक नावाचे पाटीवर मागील व पुढील स्टेशनचे नाव लहान अक्षरांत रंगविलेले असल्याने गाडी आली कोठून व जाते कोठे याचा स्पष्ट खुलासा होतो. जपानी रेल्वे सिस्टिम जगात अत्युत्कृष्ट समजली जाते व तिच्या यशाला उतारूंची टापटीप व पद्धतशीरपणा हाही कारणीभूत आहे. या गाड्यांतील आसने ताठ बसण्यासाठी व कळीने रेलण्यासाठी मऊ-मऊ फोम रबराची केलेली असल्याने उतारूंना जास्तीतजास्त आराम मिळतो. उतारू हातात नेता येईल एवढेच सामान बाळगत असल्याने हमाल ही चीज स्टेशनवर क्वचितच आढळेल. तसेच प्रत्येक डब्याचे टोकाशी डस्टबिन, टॉयलेटमध्यें टॉवेल इ. वस्तू सज्ज असतात घरातून व रेल्वेतून संडास पाश्चात्य किंवा जपानी पद्धतीचे असल्याने सर्वत्र टिशू पेपर वापरण्याचा प्रघात दिसतो.

फुकुयामा स्टेशनवर तेन्शोकोटाई जिंगू क्यो संघटनेच्या स्थानिक शाखेतील स्त्रीपुरुष मंडळी आमचे स्वागतास सिद्ध होती. एका तरुण मुलीने माझे हांतांतील बॅग वहाण्यासाठी घेतली तर दुसऱ्या प्रौढेने माझे खांद्यावरचा टेपरेकॉर्ड आपले हातात घेतला. या त्यांच्या कर्तव्यतत्परतेची छाप माझे मनावर चांगलीच पडली.

भोजनोत्तर विश्रांति झाल्यावर आम्ही फुकुयामा शहर पाहण्यास बाहेर पडलो. सुमारे २,३०,००० लोकवस्तीचे बंदरी शहर आहे हे. बऱ्याचशा रशियन माळवाहू बोटी या बंदरात लागतात. रबरी मालाचे तसेच पोलादी भाग तयार करण्याचे बरेच कारखाने या शहरात असून बोटी बांधण्याच्या गोद्याही येथे आहेत. जपानमधील ऐतिहासिक सरंजामशाहीचे प्रतीक असलेले लाकडी किल्ले बऱ्याचशा शहराप्रमाणे येथेही आढळतात.



**फुकुयामा येथील हॉटेलच्या उद्यानांत**

दुपारी ३॥ चे सुमारास आम्हा पाहुण्यांना समुद्रालगतच्या एका डोंगर माथ्यावर मोठ्या बंगल्यात नेण्यात आले.

एक नामंकित जपानी पद्धतीचे हॉटेल होते ते. प्रवेश द्वारातून आत येताच नैसर्गिक वाटणारे चिमुकलेसे उद्यान पाहून मन प्रसन्न होते. शिलाखंडाच्या विशिष्ट रचनेने व सुरूसारख्या दिसणाऱ्या लहानशा झाडांच्या रचनेने

एक नैसर्गिक देखावा डोळ्यांपुढे उभा केलेला आढळला. दुसऱ्या मजल्यावर सुबक जाड चटयांनी आच्छादित दालनात आमची सोय करण्यात आली होती. जवळचे उद्यान व तेथील पुष्करणी मन उल्हसित करीत होती. उद्यानाचे टोकाहून समोरच्या बंदराची शोभा व समुद्राचे स्वरूप मोठे मनोहर वाटले. मध्येच एक बेट दिसले. तेथे आंतरराष्ट्रीय पाहुण्यांसाठी खास हॉटेल उभारण्यात आलेले असून तेवढ्यासाठी बाहेरून सर्व आवश्यक पदार्थ वगैरे आणून मंडळीची सोय केली जाते. एरव्ही निर्जन असलेल्या बेटावर एकच हॉटेल उभे करून शांतता प्रिय व्यक्तींसाठी सुविधा करणाऱ्या जपानच्या कल्पकतेचे कौतुक वाटले.

## सामुदायिक स्नानाचे दिव्य :

हॉटेलातील बसक्या मेजावर सर्वत्रांनी चहापान केल्यानंतर गप्पा व विश्रांती यात काही काळ गेला, तो स्नानाची वेळ झाली. स्नानाचे झगेवजा गाऊन्स आले. जपानी पद्धतीच्या स्नानगृहाकडे निघण्यासाठी मंडळी उठली–मी रेंगाळतच होतो. कारण ताब्रूसेला जपानी स्नानगृहात पाऊल ठेवताच माझी तारांबळ उडून मी माघार घेतली होती. तेथे स्नानासाठी मी प्रवेश करताच दोन नंगधडंग पुरुष स्नानाची तयारी करत असताना दिसले. चारी भिंतीला आरसे, तैलमर्दन करण्यासाठी वाट्या, बसायला पाट, व शेजारी पाण्याचे लाकडी पोहोरे आणि कोपऱ्यात गरम पाण्याचा छोटासा जलाशय असा थाट होता तेथे. तेव्हापासून त्या जपानी स्नानगृहात मी पाऊल टाकले नाही व शेजारच्या पाश्चात्य पद्धतीच्या स्नानगृहाचा उपयोग केला. त्या स्नानगृहातही दारे वगैरे बंद करण्याची सोय नव्हती.

फुकुयामातील हॉटेलाचे स्नानगृहाकडे निघण्याचे टाळू लागल्याचे इतरांच्या निदर्शनात आल्यावर त्यांनी एकदा जपानी पद्धतीने स्नान करून तर पहा. चांगले हलके वाटेल असा आग्रह केला.शेवटी नाही म्हणणे शिष्टाचाराला धरून दिसणार नाही असा विचार करून गाऊन पेहरले व स्नानगृहाशी आलो. बाहेरच्या खोलीत सर्व कपडे काढून ठेवावे लागतात व फक्त छोटासा टॉवेल घेऊन त्यातल्यात्यात बाजूचे शिलाखंडावर बसून साबण वगैरे लावून स्नान उरकून घेतले. तीन-चार जण निर्विकारपणे स्नानात मग्न होते, तेव्हा माझीही भीड चेपली. स्नानगृहाचे एका बाजूला दगड–गोटे झाडे यांच्या साहाय्याने कृत्रिम जलाशय पोहण्यासाठी केलेला होता व खालून बॉयलरचे गरम झालेले



फुकुयामा हॉटेलांत जपानी पद्धतीचे जेवण

पाणी वर फेकले जात होते. जणू नैसर्गिक गरम पाण्याच्या झऱ्याने आपण मज्जन करीत असल्यासारखे वाटले. गरमागरम पाण्यात डुंबणे व इतरांशी थोडेसे बोलणे झाल्यावर पुन्हा आंघोळ केली व बाहेर येऊन गाऊन चढवला; आणि अशा प्रकारे स्नान दिव्यांतून एकदाचा बाहेर पडलो. यानंतर पुन्हा एकदा सामुदायिक स्नानाचा प्रसंग माझ्यावर आला होता, पण त्यावेळी पहिल्यासारखी लज्जा वाटली नाही. लाजलज्जा वस्तुनिष्ठ नसून विचारांत तिचे स्थान आहे; या सत्याची प्रचीति मला आली. पंचामृतस्नानानंतर शुद्धोदक स्नान झाल्याने शरीराला चांगलीच तरतरी आली आणि आम्ही पूर्वीचे दालनांत गाऊन, कमरपट्टे बांधून जपानी पद्धतीच्या जेवणाचा आस्वाद घेतला. भोजनोत्तर थोडी वामकुक्षीही झाली व याप्रमाणे शरीराला व मनाला पूर्ण विश्रांती देऊन सायंकाळी आम्ही सभास्थानी पोहोचलो.

फुकुयामा शाखेतील मंडळी श्रद्धाळू व सन्मार्गाने जाणारी दिसली. त्यामुळे तेथील भाषणात मी प्रार्थनेवर आणि नामाच्या महिम्यावर भर दिला. कधी कधी देवाचे नाव नकळत घेतल्याने ईश्वराचा साक्षात्कार कसा होऊ शकतो ते वाल्या कोळ्याचे उदाहरण देऊन मी श्रोत्यांना ऐकविले. 'मरा, मरा' म्हणणाऱ्या

लुटारू वाल्याने नकळत ' राम राम ' उच्चार केला त्याचाही उपयोग त्याला ईश्वराचे दर्शन होण्यात झाला. मग अनन्यभावाने भगवच्चिंतन करणारांना तो का पावणार नाही असा मी श्रोत्यांना सवाल केला. ही सभा रात्रौ १०॥ पर्यंत चालली होती

**जपानची औद्योगिक राजधानी ओसाका :**

टोकायामा शहराकडे दुसरे दिवशी म्हणजे दि. ३० ऑगस्ट रोजी सकाळी ८ वा. आम्ही खाजगी मोटारीने प्रयाण केले. रस्ता चांगला रुंद होता तरी वाहतूकही तेवढीच जोराची होती. शहरातील बाग व ऐतिहासिक किल्ला प्रेक्षणीय आहेत. किल्ल्याची देखभाल पुराणवस्तु संशोधनखाते करते. बांधणुकीत लाकडाचा वापर सामान्यतः केलेला आढळला. टोकोयामा स्टेशनवरून आम्ही फास्ट एक्सप्रेसने दुपारी ३ वाजण्याचे सुमारास ओसाका शहरात पोहोचलो.

ओसाका जपानची औद्योगिक राजधानी समजली जाते. अनेक कारखान्यांची व गिरण्यांची धुराडी शहराचे कारखानदारी स्वरूप प्रगट करते. ओसाकाच्या या वैशिष्ट्यामुळे त्याच्या लोकसंख्येत प्रत्यही भर पडत असून ती ४०,००,००० वर गेली आहे. जपानमधील लोकसंख्येच्या दृष्टीने हे दुसऱ्या क्रमांकाचे शहर होते. पैसा हा या शहराचा देव आहे जणू. साधारण परिचितातही ' काय पैसा चांगला मिळतो ना ' अशा प्रश्नाने प्राथमिक विचारपूस केली जाते. किंबहुना जपानी भाषेत अशी म्हण प्रचलित आहे की पैसा मिळवावा ओसाकात, कपडेलत्ते घ्यावे क्योटोमध्ये आणि पैसे उडवून जीवाची मौज करावी टोकिओत

ओसाका किल्ल्याच्या चतुःसीमांवर या शहराची वाढ होत गेली. ओसाका स्टेशनचे उत्तरेकडील भागास उमेडा अशी संज्ञा असून दक्षिण भागास 'मिनामी' म्हणतात आणि त्याच्या दक्षिणेकडील भागाचे नाव अबेनो असे आहे. डोटोन. बरी कालव्याच्या दोन्ही बाजूंना मिनामी भाग वसला असून शहरातील करमणुकींचे केंद्रस्थान हा भाग आहे. थिएटरे, चित्रपटगहे, नृत्यगृहे इत्यादींच्या निऑन पाट्यांनी रात्रौ हा भाग झगमगून जातो. जपानी स्त्रीपुरुष ' पांचिको ' या जुगार प्रकाराचे मोठे भोक्ते असून लहानमोठ्या सर्व शहरातून ' पांचिको ' कडे पुष्कळच लोक आकर्षिले जातात.

शिन्सेबाशी ही मोठी बाजारपेठ असून तेथील डिपार्टमेंटल स्टोअर्स हे प्रवाशांना मोठे आकर्षण आहे. ओसाका किल्ल्यावर लिफ्टने अगदी वरच्या

मजल्यावर जाता येते व तेथून सर्व शहराचे विहंगमालोकन करता येते. ओसाका किल्ला पाचशे वर्षापूर्वी सरंजामशाहीच्या काळात हिडियोशो टोयोटोमी या सरदाराने बांधलेला असून पन्नास वर्षापूर्वी त्याचा पुनरुद्धार करण्यात आला. ऐतिहासिक वास्तू म्हणून तिचे जतन करण्यात आले आहे.

सोळाव्या शतकामध्ये सेंट फ्रान्सिस झेव्हिअर, मिशनरी म्हणून सकाई ( ओसाकाचे जुने नाव ) येथे आला व परदेशी व्यापाऱ्यांना जपानची ही खिडकी डोकावयास मिळाली. परदेशांशी व्यापार करण्यास तेव्हापासून ओसाका पुढे येऊ लागला व ओसाकाची औद्योगिक वाढही झपाट्याने होऊ लागली. चवथ्या शतकापासून कित्येक शतके ओसाकाने, जपानची राजकीय स्थित्यंतरे अनुभविली आहेत. ओसाकाच्या कारखान्यातून व्यापारी पेठातून काम करण्यासाठी कामगार व खरेदी करण्यासाठी लोक आसपासच्या भागातून येतात. शिंतोंचे तेन्मागु श्राइन सुप्रसिद्ध असून जुलैमधील तेजनि उत्सवात शेकडो नावा सुशोभित करून त्यांची मोठी मिरवणूक निघते, ती पाहण्यासारखी असते. उपनगरातून लक्षावधी लोक दिवसा येत असतात व कामे आटोपून सायंकाळी घरचा रस्ता सुधारतात. त्यामुळे या शहराची दुपारची लोकसंख्या रात्रीच्या मानाने सात लक्षाहून जास्त भरते.

करमणुकीत बुरनाकी कळसूत्री बाहुल्यांचा खेळ हा ओसाकाचे एक वैशिष्ट्य समजावे लागेल. टोकिओप्रमाणे ओसाकामध्ये रंगील्या रात्रीच्या करमणुकींची रेलचेल आढळते.

**जागतिक प्रदर्शन :**

मध्य ओसाकापासून १४ किलो मीटरवर सेंद्री टेकड्यांच्या विभागात इ. स. १९७० साली जपानचे पहिले जागतिक एक्स्पो–प्रदर्शन भरत असून त्याची तयारी केव्हापासूनच सुरू झाली आहे. जपानी जनतेचे त्याचप्रमाणे जागतिक उद्योगपतींचे आणि व्यापाऱ्यांचे या प्रदर्शनाकडे डोळे लागून राहिले होते. अखिल जपानमध्ये रस्त्यारस्त्यातून एक्स्पोचे जाहिरातींचे बोर्ड लागले. कारखानदार व व्यापारी यांची एक्स्पोत समावेश व्हावा म्हणून अहमहमिका लागली होती. ३३,००,००० चौरस मीटर एवढ्या विस्तृत भूभागात एक्स्पोची उभारणी झाली असून त्याचा पायाभरणी समारंभ थाटानं करण्यात आला. एकस्पोच्या बांधकामासाठी सुमारे ५५ अब्ज येन एवढी रक्म खर्ची पडली. शिवाय २३५०

अब्ज येन ओसाका व आसपासचे जिल्हे रस्ते व अन्य वाहतुकीच्या साधनासाठी खर्च झाले आहेत. थोड्याशा सवलतीचे दरात प्रेक्षकांसाठी तिकिटविक्रीही १९६८ सालापासून सुरू झाली होती. 'Progress and Harmony for Mankind' हे प्रदर्शनाचे ब्रीदवाक्य आहे. सहा महिने प्रदर्शन खुले राहणार असल्याने सुमारे तीनशे लक्ष लोक ते पाहून जातील असा अंदाज आहे. प्रदर्शनाकडे पाहता जपानच्या नियोजन कौशल्याचे कौतुक वाटल्याखेरीज रहात नाही. प्रदर्शनामुळे ओसाकाचे भवितव्य आणखी उज्ज्वल झाले आहे.

जपानचे मँचेस्टर ओसाका पाहिल्यावर आम्ही जपानी भोजनाचा आस्वाद घेतला. रात्री स्थानिक शाखेतील मोठ्या सभेत परदेशी पाहुणा म्हणून माझेही भाषण झाले.

ओसाकात रात्री मुक्काम करून दुसरे दिवशी सकाळी नऊ वाजता आम्ही क्योटोला जाण्यासाठी एक्स्प्रेसमध्ये बसलो.

जपानमधील तिथिगणनेची पद्धत वेगळ्या तऱ्हेची आढळली. माझ्या तिकिटावर ४३–८–२८ अशी तारीख पाहून मी आचंब्यात पडलो. चौकशी करता समजले की अगोदर वर्ष मग महिना व शेवटी दिनांक अशा क्रमाने ती छापली आहे. त्रेचाळिसावे वर्ष जपानचे बादशहांच्या शोवा संवत्सराचे द्योतक असल्याचे समजले.

## जुनी राजधानी क्योटो :

जपानची जुनी राजधानी क्योटो हे त्याच्या संस्कृतीचे माहेरघर मानले जाते. क्योटोमध्ये आमचा मुक्काम मियाको हॉटेल या नामांकित निवासस्थानी होता. सोळा एकरांच्या जपानी बागेश्रीत या हॉटेलची उभारणी करून शेकडो एअर कंडिशन्ड खोल्यातून उतारूंची रहाण्याची सोय केली आहे. आमच्या खोल्यांकडे जाण्याचा मार्ग इतका वळणावळणाचा होता की खोल्या मिळण्यास भुलभुलवणीतून गेल्यासारखे वाटले. खोलीतील सामानसुमानाची जपानी पद्धतीने रचना होती व सायंकाळी हॉटेलातील सेविका दोनतीन मऊमऊ गाद्या एकमेकांवर चढवून बिछाना तयार करीत. दालनातून दूरवर पसरलेल्या समुद्राचा देखावाही मोठा हृद्य दिसतो.

जपानचा भूतकाल क्योटोमध्ये प्रतीत होत असला तरी आधुनिक सुखसोयीत व करमणुकीत ते माघार घेत नाही. दुसऱ्या महायुद्धाचे कालात मुख्यतः

अमेरिकन प्राच्यविद्याकोविदांच्या आग्रहाने या शहराचा बॉंब वर्षावापासून बचाव झाला, त्यामुळे जपानी संस्कृतीचा अमोल ठेवा या शहरांत जसाच्या तसा जतन करून ठेवला गेला आहे. इ. स. ७९४ पासून इ. स. १८६८ पर्यंत एवढा दीर्घकाल ही जपानची राजधानी होती. त्यामुळे चिनी कला, भाषा, व साहित्य यांचा क्योटो शहराच्या जीवनावर प्रभावी परिणाम झाला.

क्योटो शहरात दोनशेवर शिंतो पूजास्थाने नी सोळाशेवर बुद्ध देवालये आहेत. सरकारने ऐतिहासिक दृष्ट्या सुरक्षित ठरविलेल्या स्थानांची संख्या या शहरात २१० म्हणजे एकूण अशा स्थानांच्या २१·७ टक्के इतकी भरते, यावरून जपानचे सरकार ऐतिहासिक व सांस्कृतिक दृष्ट्या या शहरास केवढे महत्त्व देते याची कल्पना येईल. शहराची लोकसंख्याही १३,८१,००० पर्यंत गेली असून जपानमधील लोकसंख्येच्या दृष्टीने चवथ्या क्रमाकांचे शहर क्योटो ठरले आहे. पुणे जसे महाराष्ट्राचे विद्येचे माहेरघर तसेच क्योटो जपानात. बत्तीस विद्यापीठे व कॉलेजे विद्यादानाचे काम करीत आहेत.


## निजो किल्ल्यातील कलावैभव :

निजो या ऐतिहासिक किल्ल्यास आम्ही प्रथम भेट दिली. आपल्याकडील दगडी किल्ल्यात व येथील लाकडी किल्ल्यात मोठीच तफावत आहे. इकडील किल्ला लाकडी राजवाड्यासारखा दिसतो. जपानमधील सोळाशे शतकाच्या ऐतिहासिक परंपरेचा प्रस्तुत किल्ला साक्ष आहे. कगावा इयासो याने या किल्ल्याची उभारणी केली. आतील दालनाचे लाकडी भिंतीवर कानोताय आणि कानो नाओब्बू या विख्यात चित्रकारांनी काढलेली वैशिष्ट्यपूर्ण चित्रे पाहून मन हरपून जाते. १६०३ मध्ये हा किल्ला बांधला गेला असला तरी आजही त्याचे दर्शनीयतेत व वैभवात कमतरता वाटत नाही.

सायप्रस लाकडाने बांधलेल्या या किल्ल्यातील ध्वनिवैशिष्ट्य इतके परिणामकारक साधले आहे की कोणत्याही दालनाचे प्रवेशद्वारात पाऊल ठेवताना त्या चाहुलीचा ध्वनी अंतःपुरापर्यंत पोहोचू शकतो. नको असलेल्या पाहुण्यापासून सावध रहाण्यास ही ध्वनिव्यवस्था उत्तम.

## किनकौजी बुद्ध मंदिर :

किनकौजी (किन–सुवर्ण) हे बुद्ध मंदिर १३९४ मध्ये बांधण्यात आले



**किनकौजी बुद्ध मंदिर–क्योटो**

असून त्याचा सोनेरी दिवाणखाना शोभिवंत वाटतो. मध्यंतरी १९५० साली आगीने विध्वंस झाला होता तरी देवळाची पुन्हा उभारणी करण्यात आली आहे. शेजारच्या जलाशयात या सोनेरी देवालयाचे प्रतिबिंब सुवर्णाची शोभा आणते – किनकौजी देवालय शहराच्या पश्चिम बाजूस तर गिनकौजी (रजत मंदिर) पूर्वेकडे बांधण्यात आले असून ती दोन्ही एकमेकांना पूरक समजली जातात. या देवालयालगत वाळूचे बेटाभोवती उभारलेले वैशिष्ट्यपूर्ण उद्यान प्रेक्षणीय आहे. या बेटाचे जागी कधी चिनी जलाशय होता असे म्हणतात.

हेहिआन श्राइन त्याचे जवळच्या लंबवर्तुळाकार तळ्यासाठी सुप्रसिद्ध आहे. या तळ्याच्या मध्यावर दोन्ही बाजूंना सांधणारा कमनीय शिल्पाचा लाकडी पूल असून तेथून जलाशयातील माशाकडे भेंडासारख्या दिसणाऱ्या खाद्याचे तुकडे फेकल्यास ते जेव्हा उसळ्या मारतात तेव्हा मोठी गंमत वाटते. या खाद्याचीही नळकांडी प्रवाशांकरिता विकत मिळण्याची सोय पुलाजवळ आहे. क्योटो शहराच्या उभारणीला अकराशे वर्षे झाली. त्या प्रसंगाच्या संस्मरणासाठी इ. स. १८९५ साली पूजास्थानाची स्थापना करण्यात आली.

आणखीही काही देवळे व श्राइन्स पाहण्यासारखी आहेत, पण आम्हांला जास्त वेळ नसल्यामुळे व काहीमध्ये तोचतोपणा आढळल्याने आम्ही आमचा संचार आखडता घेतला.

क्योटोतील आमचे मुक्कामाची व्यवस्था मिसेस इमानो या वयस्कर साधिकेने केली होती. सायंकाळी भोजनाची व्यवस्था नदीकाठच्या रमणीय हॉटेलचे प्रांगणात होती. त्या प्रांगणाचा दोनतृतीयांश भाग एका कारखानदाराच्या टोलेजंग पार्टीसाठी राखून ठेवण्यात आला होता. त्यामुळे बैठ्या टेबलावरील भोजनवस्तूंचा परामर्श घेतांना समोरच्या पार्टीतील गमतीजमतीकडेही आमचे लक्ष होते.

**कारखानदाराची गैशापार्टी :**

या पार्टीला शोभा आणण्यासाठी सात-आठ गैशा स्त्रियांनाही बोलाविण्यात आले होते. गैशा ही जपानची वैशिष्ट्यपूर्ण देन आहे. रंगीबेरंगी किमोनो, वैशिष्ट्यपूर्ण चमकदार काळीभोर उभी कमानदार केशरचना, पावडर व लालीचे उत्तान मेकअप आणि या सर्वांवर ताण करणारे आकर्षक हास्य व हावभाव यामुळे या स्त्रिया पार्टीचे मोठे आकर्षण ठरतात. मादक सौंदर्याबरोबर मादक मदिरेची खैरात चालूच होती व हलकल्लोळाने समोरचा विभाग व्यापून गेल्याने आम्हासच चोरट्यासारखे झाले. पाहुण्यांच्या रांगेसमोर एक एक गैशा त्यांचा मनोविनोद करीत होत्या. या स्त्रियांचे आपणाकडील गोव्याच्या कलावंतिणीशी बरेचसे साम्य दिसते. शिकाऊ गैशांच्या आयुष्याचा दीर्घकाल वादन, गायन,



क्योटो येथील हेइयान श्राइन

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. [illegible]

नृत्य, संभाषणचातुर्य व भाषा शिक्षण यामध्ये अनुभवी गैशेच्या हाताखाली जातो. साधारण वयस्कर श्रीमंत कारखानदार त्यांचे पोशिंदे असतात आणि त्यांच्याकडील प्रसन्न व शांत वातावरणात ते आपल्या काळज्या विसरून जातात. गैशा मोठ्या व्यवहारचतुर असल्याने कधी कधी धंद्यातील करारमदार त्यांच्या घरीही करण्याचा उपक्रम होतो. क्योटो हे गैशांचे आगर असून एक रस्ता खास त्यांच्या वस्तीचा आहे.

प्रस्तुत पार्टीचे शेवटी कारखान्यातर्फे यशस्वी प्रचारकांना बक्षिसे वाटण्यात आली. आमचेही जेवण संपुष्टात आले पण हॉटेलाचे द्वारात तर्र झालेल्या पार्टीतील समुदायातून बाहेर पडण्यास आम्हांस नाकी नऊ आले. अशा प्रकारे गैशा पार्टीसंबंधी औत्सुक्य तीत प्रत्यक्ष भाग न घेताही शमले. असो.

क्योटोतील आनंदमय सुट्टी अनुभवून आम्ही दुसरे दिवशी सकाळी क्योटो स्टेशन गाठले. क्योटोचा ग्रेटर ओसाकामध्ये समावेश करण्याची योजना असून क्योटो, नारा व कोबे तीमध्ये सामील झाल्यास त्याची वस्ती ६९,००,०० पर्यंत जाईल व न्यूयॉर्क किंवा टोकिओ यासारखा हा समूह विस्तृत होईल. क्योटो स्टेशनात माझे हाताखांद्यावर सामान बरेच होते. एस्केलेटरने वर जाताना खांद्यावरील टेपरेकॉर्डरच्या वजनाने माझा तोल गेला व तीनचार पायऱ्या खाली घसरलो, पण थोडक्यात सावरलो; नाहीतर तळ गाठायची वेळ आली असती, आणि काय झाले असते कोणास ठाऊक.


## हिकारी बुलेट ट्रेन :

ओसाका-टोकिओमधील बुलेट ट्रेनमध्ये बसण्याची इच्छा होती ती या वेळी पार पाडली. जगातली सर्वोत्कृष्ट वेगवान 'हिकारी' नामाभिधान असलेली ही गाडी न्यू टोकाइडा लाइनवर धावते, ओसाका ते टोकिओ हे ५१५ किलोमीटर अंतर अवघ्या ३ तास १० मिनिटांत ती तोडते आणि तिचा वेग दोनशे किलोमीटरपर्यंत वाढतो. गाडीच्या या वेगामुळे आपण जमिनीवर विमानाने चालल्या सारखे वाटते. गाडी चालू होताच दारे खिडक्या आपोआप बंद होतात व ही एअरकंडिशंड गाडी तीरासारखी अंतर कापीत जाते.

## पुढाऱ्यांना सूर्याची पिल्ले दाखवा :

टोकिओत आम्ही दुपारी १॥ च्या सुमारास आलो. भोजनोत्तर सभास्थानी हजर झालो तो ते तरुण स्त्रीपुरुषांनी फुललेले दिसले. श्रोत्यात तरुण मंडळी पाहून मलाही उत्साह वाटला; आणि त्यांना आवडेल अशी भाषणाची पट्टी लावली. अध्यात्माचा विचार करताना जीवन सर्वंकष असल्याने राजकारण, समाजकार्य, साहित्य इत्यादींचा विचार अपरिहार्य होतो. आंतरराष्ट्रीय शांततेसाठी आपण प्रार्थना करीत बसलो तरी तिकडे डायेट, क्रेमलीन किंवा व्हाईटहाउस येथे घडणाऱ्या राजकारण्यांच्या मसलतीकडे दुर्लक्ष करून चालायचे नाही. राजकारणाचे उदात्तीकरण व्हावे असा महात्माजींचा आग्रह असे. जोपर्यंत निरनिराळ्या देशांचे पुढारी सत्य मार्गाचा अवलंब करीत नाहीत तोपर्यंत देवाचे राज्य येणे अवघड होते. त्याकरिता पुढाऱ्यांना सूर्याची पिल्ले दाखविण्याची वेळ आली आहे आता.

उत्कृष्ट साहित्य आत्मानुभवांतून निर्माण होते; म्हणून तत्त्ववेत्त्यांनी त्याची हेटाळणी करू नये. तुकाराम विद्वान थोडाच होता पण त्याचे अभंग



टोकिओंतील विद्यापीठ विद्यार्थी वर्गापुढे श्री. ठाकूर बोलत आहेत

त्यातील जिव्हाळ्यामुळे चिरंतन वाङ्मयात मोडतात. ओगामिसामा प्रवचन करताना मध्येच इतक्या तद्रूप होत की त्यांच्या मुखातून काव्य प्रसवे. ती पद्ये उत्कृष्ट काव्य आहेत. रसिकता हे माणसाचे एक वैशिष्ट्य आहे आणि म्हणूनच म्हटले आहे की,

सुवाङ्मयेन, गीतेन, युवतीनां च लीलया ।
यस्य न द्रवते चित्तम् स वै मुक्तोऽथवा पशुः ॥

भाषणाचे उत्तरार्धात ' रोक्कोन शोजो ' अर्थात ' पापाची सहा मूलस्थाने ' या ओगामिसामांनी सांगितलेल्या विचारांकडे वळलो. आपणाकडील षड्रिपूत व त्यामधे कोणते साम्य आहे, हे सांगून भगवान पतंजलीने ' योगश्चित्तवृत्तिनिरोधः ' म्हणून प्रवर्तिलेल्या सूत्राचेही मर्म विशद केले. प्रेम करणे ही भावना माणसात सहज असली तरी तीवर नियंत्रण ठेवणे योग्य आहे. भर्तृहरीने प्रेमातून निराशा कशी पदरी येते हे पुढील श्लोकांत स्पष्ट केले आहे,

यां चिंतयामि सततं मयि सा विरक्ता ।
साप्यन्यमिच्छति जनं स जनोन्यसक्तः ॥
अस्मत्कृते च परिशुष्यति काचिदन्या ।
धिक् तां च तं च मदनं च इमां च मां च ॥

या काव्याचा इंग्रजी–जपानीतून अनुवाद श्रोत्यांना चांगलाच आवडलेला दिसला. व्याख्यानाचा शेवट श्रोत्यांना आणखी ऐकावेसे वाटते तेवढ्यात ते थांबविणे योग्य असे सांगून मी केला तेव्हा श्रोत्यांना गुदगुल्या झाल्या.

सायंकाळी योकोहामाच्या रस्त्यावरील वाकासाकी या उपनगरात सभेचा उपक्रम होता. श्रोतृसमुदाय विशेष श्रद्धाळू असल्याने ' प्रार्थना ' हा भाषणाचा मुख्य विषय ठेवला. जपानमधले हे माझे अकरावे व अखेरचे भाषण. त्यातून गेल्या काही दिवसातील घटनांनी माझे मन व्याकुळ झाले होते. त्याचाही परिणाम भाषणात विशेष आवेश येण्यात झाला.

ज्वलति चलितेन्धनोऽग्निः, ।
विप्रकृतः पन्नगः फणां कुरुते ॥
प्रायः स्वं महिमानम् ।
क्षोभात् प्रतिपद्यते जन्तुः ॥

या सुभाषिताचा दाखला वाकासाकी येथे भाषण करताना आला. ' नाम्यो हो रेंगे क्यो ' हा एक मंत्र असल्याने तो संश्रद्ध अंतःकरणाने, निवांत वातावरणात, व पवित्र पार्श्वभूमीवर म्हटला तर प्रभावी ठरेल असे सांगताना थट्टाविनोद करताना प्रार्थना म्हणू नये हा ओगामिसामांचा आदेश मी स्पष्ट केला.

**अहंभाव आणि स्वाभिमान :**

' अहंभाव ' आणि ' स्वाभिमान ' या भिन्न गोष्टी असून त्यातील भेद आपण ध्यानात घेतला पाहिजे. एखाद्या सभेत आपला अपमान झालासा वाटला तर ओगामिसामा तडक निघून जात. आपल्या आत्म्याला पॉलीश करा असे त्या सांगत, उलट वैयक्तिक लाभासाठी श्रीमंताचे बूट पुसणाऱ्यांच्या वृत्तीचा त्यांनी निषेध केला आहे.

भाषणाच्या ओघात माझे मित्र योशिडा सान वाक्यांचा अनुवाद करण्यास उभे आहेत याचेहि एकदा मला भान राहिले नाही.

दिलेली वेळ संपत आल्याचे लक्षात येऊन मी घड्याळाकडे पाहिले तो वेळेविषयी काटेखोर असणारे नियोजक नाकायामा यांनी आणखी वेळ घेण्यास हरकत नाही असे सांगितले. तेव्हा योग्य शब्दात मी माझ्या भाषणाचा उपसंहार केला.

माझ्यानंतर सत्तरी उलटलेले आंतरराष्ट्रीय कीर्तीचे वक्ते व दार्शनिक मि. बेन जेरोम यांचे भाषण झाले. ओगामिसामांच्या सान्निध्यात आलेले खास अनुभव त्यांनी सांगितले. अंतःस्फूर्तीने केलेले भाषण केवढे प्रभावी होऊ शकते यासंबंधी नुकत्याच माझ्या झालेल्या भाषणाचा दाखला त्यांनी दिला. ओगामिसामांच्या विचार प्रणालीचा परिणामकारक वाणीने जगभर प्रसार झाला पाहिजे असेही शेवटी त्यांनी प्रतिपादले.

जेरोमसारख्या भीष्माचार्यांनी ( तेही ब्रह्मचारी आहेत ) माझी पाठ थोपटली त्यामुळे बरे वाटले. कारण

आपरितोषात् विदुषां ।
न साधु मन्ये प्रयोगविज्ञानम् ॥
बलवदपि शिक्षितानाम् ।
आत्मन्यप्रत्ययं चेतः ॥

याचा दाखला मला मिळाला.

प्रस्तुत भागात माझे काही भाषणांचा आशय विस्ताराने दिला त्यामागील हेतु परदेशात जाणारी व्यक्ति ही आपल्या देशाची अनधिकृत वकील असल्याने ती तेथे काय बोलते हे जाणून घेण्याचा जनतेला हक्क आहे आणि प्रस्तुत भाषणे निमंत्रित समुदायासाठी असल्याने मी त्यासंबंधी लिहिल्याखेरीज इतरांना त्याविषयी कसे कळणार ?

## ' सा रम्या नगरी ' :


जपानमधील माझ्या मुक्कामातील दीर्घकाळ ग्रामीण भागांत गेला असला तरी दौऱ्यांत प्रमुख शहरांनाही भेटी दिल्यामुळे जपानचे सत्यदर्शन बरेचसे घडले. कोणाहि प्रवाशास चिरंतन स्मृति राहावी अशीच जपानची राजधानी टोकिओ असून, ' सा रम्या नगरी ' त्याचे मनांत घोळत रहाते. टोकिओची वाढ इतकी झपाट्याने झाली की समाजशास्त्रज्ञांत तो आता एक टीकेचा विषय झाला आहे. मध्यवर्ती टोकिओ व उपनगरे यांची संयुक्त लोकसंख्या १० कोटीचे वर गेल्याने हे शहर म्हणजे छोटेसे जपानच असल्याचा भास होतो. शहराच्या वाढत्या संसाराची व्यवस्था लागावी म्हणून टोकिओ–टो नावाचा एक स्वतंत्र शासन विभागच तयार करण्यात आला आहे. जपानच्या राजकीय व आर्थिक घडामोडीचे मुख्य केंद्र टोकिओच समजले जाते. टोकिओचे वाढलेले प्रचंड स्वरूप आटो-क्यात यावे यासाठी देशाची राजधानी माउंट फूजीच्या पायथ्याशी न्यावी असे म्हणणारा एक विचारप्रवाह, तर त्या उलट टोकिओ, ओसाका, इत्यादि प्रदेशांचे एक महानगर वसवावे, असे प्रतिपादणारा दुसरा वर्ग. इकारी सारख्या न्युटोका-यडो लाईनवरून तीन तास दहा मिनिटात तीनशे पंधरा मैल अंतर कापणाऱ्या बुलेट ट्रेन पाहिल्या म्हणजे दुसरी योजनाच बहुतेक कार्यान्वित होईल; आणि १९७० चे एक्स्पो संगताच त्या दिशेने पावले टाकली जातील असा रंग दिसतो. टोकिओत पौर्वात्य आणि पाश्चात्य दोन्हीही संस्कृतीचा मिलाप झाल्याने कोणत्याही देशातील प्रवाशांस शहरांत चुकल्या चुकल्यासारखे वाटत नाही. जपान टाइम्ससारखे एखादे स्थानिक दैनिक उघडून पाहीले तर त्यात अमेरिका, इंग्लंड, फ्रान्स, स्पेन, इटली, ब्राझिल, जर्मनी फार कशाला भारत इत्यादि देशांचे वैशिष्ट्य दाखवतील अशी हॉटेल्स व विश्रांतिगृहे प्रवाशांना आवाहन करताना दिसतील.

प्रवाशाच्या सुखसोयीसाठी जपानचे सरकार व अन्य संस्था तत्पर असतात आणि त्यांना रुचतील, पचतील अशा वेगवेगळ्या तऱ्हेच्या सहली काढण्यात त्यांच्यात अहमहमिका आढळते. विशेषतः जपान नॅशनल टूरिस्ट असोशिएशन ही संघटना आलेल्या पाहुण्यांचे स्वागत करण्यास सिद्ध असते. अमेरिकन ग्रे लाईन या टूरिस्ट कंपनीची शाखाही येथे मोठ्या उत्साहाने काम करताना आढळते. या कंपन्या शहरात थोडेच दिवस मुक्काम करणाऱ्या प्रवाशांना विशेष सोयीच्या वाटतात. कारण योग्य किंमतीत निरनिराळी प्रेक्षणीय नावीन्यपूर्ण स्थळे दाखविण्याचा त्यांना चांगला अनुभव असतो. आम्ही जपान ट्रॅव्हल ब्यूरोच्या टोकिओचे दुपारच्या एका सहलीत सामिल झालो होतो. साधारणतः या ३॥ तासाच्या सहलीला सुमारे १२०० येन खर्च येतो. त्यात ३।४ गट केले आहेत. व आपल्याला आवडेल तो योग्य गट निवडता येतो. आम्ही प्रथम बादशहांचा राजवाडा, व त्याचे सभोवतालचा खंदक, इत्यादि ऐतिहासिक वास्तू पाहील्या. तेथे बसमधील सर्व प्रवाशांचा व्यवस्थापकांनी ग्रुप फोटो घेतला, एवढेच नव्हे तर संध्याकाळी आम्ही परत फिरलो तेव्हां प्रत्येकाला त्या फोटोची प्रत सप्रेम ट म्हणून देण्यांत आली. मेइजी श्राईन हेही आम्हास दाखविण्यात आले. असाकसा, कॅनन् टेंपल येथील बुद्धाची मूर्ति भव्य व दिव्य वाटते. हजारो लोक देवद्वारांतील अग्निकुंडांत धूप वगैरे जाळतात. या देवळाकडे जाण्याच्या रस्त्यास दुतर्फा विविध वस्तूंचा एक बाजारच कायमचा भरलेला असतो आणि लोक लहान मोठ्या वस्तु तेथील दुकानांतून खरेदी करतात. रोज एखाद्या जत्रेला जमावी अशी गर्दी या रस्त्याला होते व विक्रीही मोठया प्रमाणावर जाते. जपानी भाषेत या रस्त्याचे नाव 'अहसोक्या' असे उच्चारले जाते. एका दृष्टीने सामान्य जपानी जनता या भागातच पाहावयास मिळते.

ज्युडो ही जपानची खास व्यक्तिगत डावपेचांची विद्या असून स्वसंरक्षणाचे कामात ती बिनजोड आहे. कोडोकॉन ज्युडो-हॉल पाहावयास गेलो होतो आम्ही. शेकडो विद्यार्थी कोडोकॉन येथे शिक्षण घेताना आम्हास आढळले. तसेच ज्युडोची काही प्रात्यक्षिके पाहावयास मिळाली. स्त्रियाही ज्युडो शिकण्यास हिरीरीने पुढे येतात.

**पूर्वेकडील राजधानी :**

सन १८६८ पासून टोकिओ ही जपानची अव्याहत राजधानी असल्या



टोकिओतील बादशहांच्या राजवाड्याचे पार्श्वभूमीवर
परदेशी प्रवाशांसह ग्रुप फोटो

मुळे तिचा व्याप आता चांगलाच वाढून २,०१३ चौ. मीटर एवढे क्षेत्र या राजधानीने व्यापले आहे. टोकिओस ( पूर्वीचा इडो ) बादशहाची गादी येण्या-पूर्वी सुमारे २५० वर्षे शोगुन लष्करी नेत्यांच्या ताब्यात हे शहर होते. हा इतिहास इ. स. १६०३ पासून आढळतो. टोकिओ या शब्दाचा अर्थ ' पूर्वेकडील राजधानी ' असा असून गेली शंभर वर्षे हे नाव प्रचलित आहे. साहजिकच टोकिओचा इतिहास क्योटो किंवा नारा या शहरासारखा प्राचीन नाही.

टोकिओ हॅनिडा विमानतळापासून शहरात येण्यास ' मोनोरेल ' हे सगळ्यात स्वस्त असे वाहतुकीचे साधन. सुमारे १५० येन मध्ये हा प्रवास होतो. एका रुंद रुळावरून ही गाडी वेगाने जात असते आणि टोकिओच्या मध्यवर्ती स्टेशनला येताना दोन तीन स्टेशने तरी ती मध्ये घेते. गाडी १३ कि. मी. अंतर बरोबर १५ मिनिटांत संपवते. हीच लाइन योकोहामा पर्यंत नेण्याची योजना आहे. नुकत्याच ओसाका येथे भरलेल्या जागतिक प्रदर्शनातही मोनो-रेल सभोवती घेऊन प्रदर्शन पाहणाऱ्यांची मोठी सोय केल्याचे आढळले.


शहरात टॅक्सी भरपूर असून भाड्याचे दरही बेताचे आहेत. मी जपानला गेलो त्यावेळी ( १९६८ ) किमान भाडे १०० येन पडे, व दोन किलोमीटर पर्यंत त्या भाड्यात जाता येई. त्यापुढे दर ४५० मीटरला २० येन असे भाड्याचे प्रमाण बसत असे. बहुतेक टॅक्सीचे दरवाजे स्वयंचलित असल्याने आपण आत प्रवेश करताच अंगाचा काही भाग अडकला जाणार नाही, याची काळजी घ्यावी लागते. टॅक्सी लहानमोठ्या आकाराच्या असल्या तरी प्रत्येकीत ट्रॅन्झिस्टर रेडिओ आढळे आणि गाडी चालू होताच ड्रायव्हर रेडिओच्या नादात मश्गूल होई. टॅक्सी ड्रायव्हरना सामान्यतः इंग्रजी येत नसल्याने आपल्यास जावयाच्या ठिकाणचे नाव आणि परत यावयाच्या हॉटेलचे नाव जपानीत लिहि-लेले कार्ड जवळ बाळगणे चांगले.

**टोकिओतील ब्रॉडवे गिंझा :**

टोकिओतील ब्रॉडवेसारखा समजला जाणारा भाग म्हणजे गिंझा. शहराची जशी ही एक मोठी बाजारपेठ तसेच जगातील निरनिराळ्या देशांतील नाग-रिकांना आकर्षून घेईल असे गिंझाचे वैशिष्ट्य आहे. ५।७ मजली भव्य डिपार्ट-मेंटल स्टोअर गिंझा भागात गिऱ्हाईकांना खेचून आणतात. रस्त्यातून नेहमीच

इतकी गर्दी भासते की खास काही जत्रा वगैरे तर नाही ना असे वाटावे. गिंझात डिपार्टमेंटल स्टोअर्स सहा-सात आहेत.

या भागातील दुकाने साधारणतः १० वाजता उघडतात आणि मग दुपारी उत्तरोत्तर गर्दी वाढत जाते. मोठमोठ्या इमारतीतून एखादे दुसरे हॉटेल असतेच आणि खरेदी व करमणूक असा दोन्हीही कार्यभाग साधला जातो. गप्पागोष्टी, भटकंती, खाणे-पिणे, प्रसंगी जेवणे आणि जिवाची करमणूक करणे हे सरसहा चालू असते. सायंकाळ झाली व निऑन लाईटस झगमगू लागले म्हणजे या सर्व विभागाला आगळीच शोभा येऊन पाहुणे त्या वातावरणात रममाण होतात.



**टोकिओतील गिंझा भागाचे एक-दृश्य**

गिंझाचे साधारणतः दोन भाग पडतात. गिंझा मेनस्ट्रीमध्ये वर उल्लेखिलेले स्टोअर्स, पेढ्या व अन्य प्रतिष्ठित दुकाने यांचा अंतर्भाव होतो. उलट गिंझाच्या पश्चिमेला आणखी एक रस्ता समांतर निघतो आणि पुन्हा त्याचे पोटविभाग पडतात.

ह्याच विभागात सुमारे २००० बार व नाईटक्लब्स, १५०० विश्रांतीगृहे आणि अन्य शेकडो छोटी छोटी दुकाने विखुरलेली आहेत. जपानी भाषेतील व कधी रोमन अक्षरातील निऑनच्या पाट्या हजारो लोकांना आकर्षून रहातात.

**जिवाचा टोकिओ करणारे पाहुणे :**

जिवाचा टोकिओ करण्याकरता किती तरी जपानी तसे परदेशी लोक आसुसलेले आढळतात. मह्शूर प्रवास कंपन्या टोकिओचे रात्रीचे जीवन दाखविण्यासाठी रुपेरी आणि सोनेरी अशा दोन प्रकारच्या सहली आखतात. तरुण स्त्रीपुरुष या सहलीत कुतुहलाने भाग घेतात. साधारणतः या सहलीना सायंकाळी ७ ते रात्रौ ११ पर्यंतच्या फेरफटक्यासाठी ४५०० ते ५५०० येन कार्यक्रमानुसार मोजावे लागतात. जगप्रसिद्ध मिकाडो नावाचा चित्ताकर्षक कॅबेरे कित्येकांना उल्हसित करताना दिसतो; तर कायुकाझा थिएटर मध्ये उच्चप्रतीचे काबुकी नाट्य पाहावयास मिळते. जपानचा एखादा नामांकित नाईट क्लबही या सहलीत दाखवतात.

गैशा संबंधी काही माहिती क्योटोच्या वर्णनात आली आहे. प्रस्तुत रात्रीच्या सफरीतही गैशांचा एखादा कार्यक्रम आयोजिलेला असतो. जपानमधील वृत्तपत्रातून निरनिराळ्या नाईट क्लबस् संबंधी येणाऱ्या उत्तान जाहिराती व तेथे प्रत्यही होणारे कार्यक्रम यामुळे काहींचे बोलण्यातून तेथील नीतिमत्तेबद्दल क्वचित



एका बड्या कारखानदाराने ग्राहकांना दिलेल्या खान्याचे प्रसंगी निमंत्रित गैशांची उपस्थिति

टीका ऐकू येते. जपानहून परतताना एका सुशिक्षित जपानी महिलेबरोबर या विषयावर मोकळेपणाने चर्चा झाली असताना तिने असा अभिप्राय व्यक्त केला की जपानी लोक ढोंग मानत नाहीत. खुले शारीरिक सौंदर्य किंवहुना नग्नता त्यांना अश्लील भासत नाही. त्यामुळे नृत्यातून टॉपलेसचा प्रचार नर्तिकांच्या इतका अंगवळणी पडला आहे की अलीकडील आपल्या वृत्तपत्रातून कॅबेरे विरुद्ध जशी मोहीम चाललेली दिसते, तशी तेथील वृत्तपत्रातून आढळली नाही. वर उल्लेखिलेल्या जपानी महिलेने मला अशीही माहिती दिली की हाँगकाँग, सिंगापूर, इत्यादि शहरांच्या बाजारातून अश्लील साहित्य सरसकट विकले जाते, व इतरही काही प्रकार दाखवितात; पण टोकिओने करमणुकीचे बाबतीत उत्तान गोष्टी सामावून घेतल्या असल्या तरी अश्लील प्रकारातून तो अलिप्त आहे. स्त्रीपुरुषसंबंध, नग्नता इ. बाबतीत जपान्यांचा दृष्टिकोण वस्तुनिष्ठ व व्यावहारिक असल्याचा अभिप्राय बाईनी व्यक्त केला.

जपानचे पार्लमेंट–डायेट–राजवाड्यापासून नजीकच्या एका टेकडीवर उभारण्यात आले आहे. पार्लमेंटची दोन गृहे असून ब्रिटिश सरकारच्या धर्तीवर लोकशाही कारभार चालतो. मुख्यमंत्र्यांच्या निवासासमोर जी लॉबी आहे तीमधून प्रेक्षकांना पार्लमेंटमध्ये प्रवेश मिळतो.

टोकिओतील सर्वोत्कृष्ट बाग पहायची असेल तर कोमागोम रेल्वे स्टेशननजिकच्या ‘ रिकुगेन गार्डन ’ ला आपण भेट द्यावी. युद्धामध्ये ज्या जपानी वीरांनी शिरकमले अर्पण केली त्यांच्या स्मरणार्थ हे स्थान उभारण्यात आले असून त्यांचे पावित्र्य अनन्यसाधारण समजले जाते.

सर्व टोकिओ शहर एका दृष्टिक्षेपात पहावयाचे असेल तर टोकिओ टॉवरला भेट द्यावी. अवघ्या एका मिनिटात लिफ्टने १२० मीटर उंच अशा या टॉवरवर जाता येते. त्यासाठी दोनशे येन फी द्यावी लागते, आणि तेथून नवीन ऑब्झरवेटरीजच्या आणखी २२० मीटर उंच टॉवरवर जाण्यास आणखी तीनशे येन भाडे पडते.

टोकिओतील हॉटेले पाश्चात्य त्याचप्रमाणे जपानी पद्धतीच्या प्रवाशांकरता वेगवेगळ्या थाटाची आढळतात. जागतिक कीर्तीच्या हिल्टन गटाचे हॉटेल टोकिओत आहे. पॅलेस, इंपिरिअल, डाइइचि, ओकुरा, न्यू ओटोनी इत्यादि काही हॉटेले विशेष लोकप्रिय आहेत.

फुरसत मिळाल्यास पुढील तीन म्युझिअम्सना भेट देण्यासारखी आहे.

उएनो पार्कमधील टोकिओ नॅशनल म्युझिअम, गिंझाजवळील आधुनिक चित्रकलेचे राष्ट्रीय म्युझिअम व कोमाबा येथील जपानचे ग्रामोद्योग म्युझिअम.

**निसर्गसुंदर निक्को :**

टोकिओच्या उत्तरेस १५० किलोमिटर निक्को हे निसर्गरमणीय शहर जपानच्या प्राचीन संस्कृतीचे वैशिष्ट्य दर्शविते. १९३६ साली बांधलेले तोशोगु श्राईन अथवा पूजास्थान, प्राचीन ऐतिहासिक शिल्पाचा उत्कृष्ट नमुना आहे. टोकुगावा शोगुनेट या घराण्याचा मूळ पुरुष इएयासु येथेच निवर्तले. त्याचे स्मारकही भव्य झाले आहे. मुख्य पूजास्थानाकडे जाण्यासाठी जो योनिमान नावाचा दरवाजा लागतो, त्याचे शिल्पास जागतिक कीर्ति मिळाली आहे. निक्को शहरास उन्हाळ्यात व हिवाळ्यात सुट्टी घालविण्यास बरीच मंडळी येतात आणि निरनिराळ्या खेळांत व क्रीडांत आनंदाने भाग घेतात. निक्को नॅशनल पार्क ह्या उद्यानातही निसर्गाचे नवल पाहुण्यांचे मनावर ठसते. टोकिओहून निक्कोला येण्यास रेल्वेने अवघे दोन तास लागत असल्यामुळे टोकिओतील प्रवाशाला निक्कोचे विशेष आकर्षण वाटण्यास नवल नाही. येथून पश्चिमेला सोळा किलोमीटरचा सिमेंट कॉँक्रीटचा सुंदर रस्ता आपल्याला चुझेंनजी नांवाच्या सरोवराकडे नेतो. लंबवर्तुळाकार असे हे सरोवर असून, त्याचा परिध २१ किलोमीटर भरतो. सभोवतालच्या टेकड्यांनी या प्रदेशास आणखी शोभा आली आहे व या सरोवरातून खाली शंभर मीटर खोल उडी टाकणाऱ्या पाण्याच्या प्रवाहाचा मोठा धबधबा प्रवाशांना आकर्षून घेतो.

**हवा खाण्याचे ठिकाण कामाकुरा :**

टोकिओच्या नैऋत्येस ५१ किलोमीटरवर समुद्रकाठी कामाकुरा हे हवा खाण्याचे ठिकाण आहे. हवा समशीतोष्ण असल्याने व समुद्रस्नानासाठी सोयीस्कर किनारा असल्यामुळे बाराही महिने या बीचवर लोकांची गर्दी होते. एकेकाळी सरंजामी सरकारची सन ११९२ ते १३३३ पर्यंत हे गाव राजधानी होतं. टोकिओहून ट्रेनने हजारो लोक कामाकुराला डाईबुत्सु म्हणजे मोठ्या बुद्धाच्या दर्शनासाठी येतात. बुद्धाची मूर्ती ७०० वर्षापूर्वीची प्राचीन असून ती १२·८ मीटर एवढी उंच आहे. ब्रान्झ धातूची ही मूर्ती १२५२ मध्ये ओतली गेली.

टीका ऐकू येते. जपानहून परतताना एका सुशिक्षित जपानी महिलेबरोबर या विषयावर मोकळेपणाने चर्चा झाली असताना तिने असा अभिप्राय व्यक्त केला की जपानी लोक ढोंग मानत नाहीत. खुले शारीरिक सौंदर्य किंवहुना नग्नता त्यांना अश्लील भासत नाही. त्यामुळे नृत्यातून टॉपलेसचा प्रचार नर्तिकांच्या इतका अंगवळणी पडला आहे की अलीकडील आपल्या वृत्तपत्रातून कॅबेरे विरुद्ध जशी मोहीम चाललेली दिसते, तशी तेथील वृत्तपत्रातून आढळली नाही. वर उल्लेखिलेल्या जपानी महिलेने मला अशीही माहिती दिली की हँगकाँग, सिंगापूर, इत्यादि शहरांच्या बाजारातून अश्लील साहित्य सरसकट विकले जाते, व इतरही काही प्रकार दाखवितात; पण टोकिओने करमणुकीचे बाबतीत उत्तान गोष्टी सामावून घेतल्या असल्या तरी अश्लील प्रकारातून तो अलिप्त आहे. स्त्रीपुरुषसंबंध, नग्नता इ. बाबतीत जपान्यांचा दृष्टिकोण वस्तुनिष्ठ व व्यावहारिक असल्याचा अभिप्राय बाईंनी व्यक्त केला.

जपानचे पार्लमेंट–डायेट–राजवाड्यापासून नजीकच्या एका टेकडीवर उभारण्यात आले आहे. पार्लमेंटची दोन गृहे असून ब्रिटिश सरकारच्या धर्तीवर लोकशाही कारभार चालतो. मुख्यमंत्र्यांच्या निवासासमोर जी लॉबी आहे तीमधून प्रेक्षकांना पार्लमेंटमध्ये प्रवेश मिळतो.

टोकिओतील सर्वोत्कृष्ट बाग पहायची असेल तर कोमागोम रेल्वे स्टेशननजिकच्या ' रिकुगेन गार्डन ' ला आपण भेट द्यावी. युद्धामध्ये ज्या जपानी वीरांनी शिरकमले अर्पण केली त्यांच्या स्मरणार्थ हे स्थान उभारण्यात आले असून त्यांचे पावित्र्य अनन्यसाधारण समजले जाते.

सर्व टोकिओ शहर एका दृष्टिक्षेपात पहावयाचे असेल तर टोकिओ टॉवरला भेट द्यावी. अवघ्या एका मिनिटात लिफ्टने १२० मीटर उंच अशा या टॉवरवर जाता येते. त्यासाठी दोनशे येन फी द्यावी लागते, आणि तेथून नवीन ऑब्झरवेटरीजच्या आणखी २२० मीटर उंच टॉवरवर जाण्यास आणखी तीनशे येन भाडे पडते.

टोकिओतील हॉटेले पाश्चात्य त्याचप्रमाणे जपानी पद्धतीच्या प्रवाशांकरता वेगवेगळ्या थाटाची आढळतात. जागतिक कीर्तीच्या हिल्टन गटाचे हॉटेल टोकिओत आहे. पॅलेस, इंपिरिअल, डाइइचि, ओकुरा, न्यू ओटोनी इत्यादि काही हॉटेले विशेष लोकप्रिय आहेत.

फुरसत मिळाल्यास पुढील तीन म्युझिअम्सना भेट देण्यासारखी आहे.

उएनो पार्कमधील टोकिओ नॅशनल म्युझिअम, गिंझाजवळील आधुनिक चित्रकलेचे राष्ट्रीय म्युझिअम व कोमाबा येथील जपानचे ग्रामोद्योग म्युझिअम.

**निसर्गसुंदर निक्को :**

टोकिओच्या उत्तरेस १५० किलोमिटर निक्को हे निसर्गरमणीय शहर जपानच्या प्राचीन संस्कृतीचे वैशिष्ट्य दर्शविते. १९३६ साली बांधलेले तोशोगु श्राईन अथवा पूजास्थान, प्राचीन ऐतिहासिक शिल्पाचा उत्कृष्ट नमुना आहे. टोकुगावा शोगुनेट या घराण्याचा मूळ पुरुष इएयासु येथेच निवर्तले. त्याचे स्मारकही भव्य झाले आहे. मुख्य पूजास्थानाकडे जाण्यासाठी जो योनिमान नावाचा दरवाजा लागतो, त्याचे शिल्पास जागतिक कीर्ति मिळाली आहे. निक्को शहरास उन्हाळ्यात व हिवाळ्यात सुट्टी घालविण्यास बरीच मंडळी येतात आणि निरनिराळ्या खेळांत व क्रीडांत आनंदाने भाग घेतात. निक्को नॅशनल पार्क ह्या उद्यानातही निसर्गाचे नवल पाहुण्यांचे मनावर ठसते. टोकिओहून निक्कोला येण्यास रेल्वेने अवघे दोन तास लागत असल्यामुळे टोकिओतील प्रवाशाला निक्कोचे विशेष आकर्षण वाटण्यास नवल नाही. येथून पश्चिमेला सोळा किलोमीटरचा सिमेंट कॉंक्रीटचा सुंदर रस्ता आपल्याला चुझेंनजी नांवाच्या सरोवराकडे नेतो. लंबवर्तुळाकार असे हे सरोवर असून, त्याचा परिध २१ किलोमीटर भरतो. सभोवतालच्या टेकड्यांनी या प्रदेशास आणखी शोभा आली आहे व या सरोवरातून खाली शंभर मीटर खोल उडी टाकणाऱ्या पाण्याच्या प्रवाहाचा मोठा धबधबा प्रवाशांना आकर्षून घेतो.

**हवा खाण्याचे ठिकाण कामाकुरा :**

टोकिओच्या नैऋत्येस ५१ किलोमीटरवर समुद्रकाठी कामाकुरा हे हवा खाण्याचे ठिकाण आहे. हवा समशीतोष्ण असल्याने व समुद्रस्नानासाठी सोयीस्कर किनारा असल्यामुळे बाराही महिने या बीचवर लोकांची गर्दी होते. एकेकाळी सरंजामी सरकारची सन ११९२ ते १३३३ पर्यंत हे गाव राजधानी होतं. टोकिओहून ट्रेनने हजारो लोक कामाकुराला डाईबुत्सु म्हणजे मोठ्या बुद्धाच्या दर्शनासाठी येतात. बुद्धाची मूर्ती ७०० वर्षापूर्वीची प्राचीन असून ती १२·८ मीटर एवढी उंच आहे. ब्रान्झ धातूची ही मूर्ति १२५२ मध्ये ओतली गेली.

**हाकोने येथील ऊष्ण झरे :**

हाकोने हे गाव तेथील ऊष्ण झऱ्यासाठी प्रसिद्ध आहे. येथे आढळणाऱ्या बारा उष्ण झऱ्यापैकी मियानोशिटा येथील झरा मध्यवर्ती असून तो समुद्र-सपाटीपासून ४१७ मीटर उंचीवर आहे. हाकोने येथील पूजास्थान बरेच प्राचीन म्हणजे सन ७५७ मध्ये उभारण्यात आलेले आहे. जवळच ओवाकिडानी व कोवाकिडानी ह्या खोल दऱ्यातून गंधकाचा धूर वातावरण पिवळे करून टाकतो. आशी नावाचे सरोवर याच भागात असून त्यात प्रतिबिंबित होणारा फूजि पर्वत शोभिवंत वाटतो. फूजि पर्वताच्या उत्तरेकडील तळाशी पाच सरोवरांचा प्रदेश आल्हाददायक दिसतो. यामानका सरोवरात बर्फावर स्केटिंग करण्याची छान सोय आहे. कावागुची सरोवर कुनाट्सु आणि फुजि–योशिडा, या दोन शहरांना लागून असल्यामुळे तेथून साधारणतः फूजि पर्वत चढण्यास लोक प्रारंभ करतात. फूजि पर्वत बराच उंच असला तरी तो चढण्यास तसा अवघड नाही आणि जुलै व ऑगस्टमध्ये बरेच लोक तो पर्वत चढतात.

योकोहामापासून जवळच इझु द्वीपकल्पाच्या मानेशीच वसलेले आटामी हे शहर टोकिओपासून १०५ किलोमीटरवर आहे. ट्रेनने १॥ तासात माणूस आटामीला पोहोचतो.

येथील उन्हाळी झऱ्यांना पाणी भरपूर असून इझु द्वीपकल्पांत उन्हाळी झऱ्यांची संख्या बरीच आहे.

**नागोया बंदर :**

मध्य जपानच्या औद्योगिक कारखानदारीचे केंद्र म्हणून नागोया बंदराचा उल्लेख करणे जरूर भासते. टोकिओपासून २६६ मैलांवर नागोया आहे. शहराची लोकसंख्या सोळा लाखावर गेली असून तेथे उद्योगधंदे झपाट्याने वाढत आहेत. कापडाच्या बाबतीत नागोया शहराने मँचेस्टरची कीर्ति मिळविली तर लहानमोठ्या घड्याळांचे निर्मितीतही नागोया आघाडीवर आहे. कापडाबरोबरच चिनी मातीची भांडी, शिवणयंत्रे, बायसिकलस, विजेची उपकरणे, प्लायवुड इत्यादींच्या उत्पादनांत नागोया अग्रेसर ठरतो. त्याशिवाय बोटींची बांधणूक, मोटारी, रसायने, इत्यादी बाबतीतही नागोया उल्लेखनीय आहे.

प्रवाशाला प्रेक्षणीय ठिकाणे म्हणजे नागोया किल्ला, अटसुटा पूजास्थान, हिगाशियामा पार्क, टी. व्ही. टॉवर इत्यादी होत. नागोयाहून इनुयामा किल्ल्यावर

जाता येते. तसेच गिफूकडे जाण्यास नागोया सोयीचे शहर ठरते. इसेशिमा राष्ट्रीय उद्यान नागोयापासून थोड्याच अंतरावर असल्याने प्रवाशांना तो प्रवास सोयीचा पडतो. अटसुटा श्राईन प्रेक्षणीय आहे. नजीकच्या इसे सागराजवळ सुझुका सरकीट हे नामांकित रेसकोर्स त्या विषयांत लक्ष घालणाऱ्यांना महत्त्वाचे वाटते. कल्चर्ड मोत्यांचा प्रणेता मिकिमोटो यांचे कृत्रिम रीतीने मोती तयार करण्याचा जलाशय अगो सागरांत एका रम्य बागेनजीक आहे. कल्चर्ड मोत्याचे बाबत जपानची आघाडी सुप्रसिद्ध. देशाच्या निर्यातीत त्यांना महत्त्वाने स्थान मिळाले आहे. नैसर्गिक मोती मागे पडून त्यांचे स्थान कल्चर्ड मोत्याने घेतल्याचे जनतेला विदित आहेच.

**कोबे बंदर :**

ओसाकाच्या पश्चिमेला वीस मैलांवर असलेले कोबे बंदर योकोहामाच्या नंतर सर्वांत मोठे बंदर समजले जाते. बंदराचे उत्तरेस रोक्को पर्वत राजी असल्याने कोबेला अवर्णनीय शोभा प्राप्त झाली.

हाँगकाँग, चीन, भारत इत्यादी देशाकडून येणाऱ्या सर्व बोटी कोबे बंदरास प्रथम लागतात व पुढे वळसा घेऊन योकोहामाहून त्यांचा परतीचा प्रवास सुरू होतो. या शहराचे स्वरूप खरेखुरे आंतरराष्ट्रीय! तेथील रहिवाशांत ५० प्रदेशांतील लोकांचा भरणा झालेला आढळतो. त्यामुळे विविध धर्मीयांची प्रार्थनास्थानेही कोबेमध्ये दिसतात. उदा. खिश्चनांची चर्चेस, मुसलमानांच्या मशिदी, तसेच चिनी देवालये येथे पहावयास मिळतात. कोबे शहरापासून ५५ किलोमीटरवर इमेट कॅसल नावाचा प्राचीन सरंजामशाही किल्ला प्रेक्षणीय आहे.

१९६५ च्या शिरगणतीनुसार कोबे शहराची लोकसंख्या १२ लक्ष १७ हजार एवढी झाली आहे. यायीशीन एक्सप्रेस हायवे ११८ मैल लांबीचा असून, तो कोबे व नागोया शहराना जोडतो. भारताची कॉन्सलर कचेरी कोबे येथे असल्यामुळे हिन्दी व्यापारी व कारखानदारांना सदर कचेरीकडे संबंध जोडावा लागतो.

**अद्ययावत् बंदर योकोहामा :**

जगातील अद्ययावत् बंदरात योकोहामाचा क्रमांक बराच वर लागतो. टोकिओच्या नैऋत्येस १७ मैलावर हे बंदर असल्याने अमेरिकेकडून येणाऱ्या बोटींना ते अधिक जवळचे आहे. किहिन राष्ट्रीय हमरस्त्याने योकोहामा टोकिओशी जोडला असल्याने भल्या रुंद रस्त्यावर वाहतूक अप्रतिहत चालू असते.

योकोहामाची उत्तरोत्तर भरभराटच झाल्याचे दिसते. शहराची मुख्य वस्ती दर्यावर्दी वाहतुकीशी संबंध असलेल्या लोकांची आढळते. शहराची लोकसंख्या सुमारे १८ लाखांवर गेली आहे, आणि त्या दृष्टीने जपानमधील ४ थ्या क्रमाकांचे शहर हे झाले आहे. शहरात सांकिन उद्यान हे प्रेक्षणीय असल्याने प्रवासी हमखास त्याला भेट देतात. शहरातील इसेझाकिचो हा मुख्य हमरस्ता. तेथील बाजारात ह्या त्या वस्तू हमखास मिळतात. योकोहामा बंदराची प्रगती गेल्या ११० वर्षातील आहे.

**बेप्पू येथील उन्हाळी झरे :**

क्युश्यु बेटाच्या पूर्व किनाऱ्यावरील बेप्पू हे शहर उन्हाळी झऱ्यासाठी सुप्रसिद्ध आहे. शहराच्या उपनगरातूनही शेकडो उन्हाळी झरे पाहावयास मिळतात, त्यामुळे औषधी पाण्याचा उपचार करणाऱ्यांची गर्दी या ठिकाणी विशेष.

**ॲटमबाँब विध्वंसाने प्रसिद्ध नागासाकी :**

नागासाकी हे बंदर त्यावर गेल्या महायुद्धाच्या अखेरीस पडलेल्या ॲटमबॉम्बमुळे सर्वांच्या लक्षात राहिले आहे.

क्युश्यू बेटाच्या पश्चिम टोकाला हे बंदर वसले आहे. परदेशी व्यापाराचा इतिहास नागासाकीचे बाबतीत ४०० वर्षांचा जुना. पाश्चात्य संस्कृतीचा ओघ जपानमध्ये नागासकीच्या द्वारे वळला हे सुप्रसिद्धच आहे. नागासाकीच्या नजिकच उंझेन नावाचे हवा खाण्याचे ठिकाण प्रवाशांना आकर्षिते. डोंगराळ भागात वसलेल्या उंझेन येथे उन्हाळी आढळतात. उत्तर होन्शुमधील सेंदाई या एका प्रमुख शहराची निसर्गशोभा अवर्णनीय भासते. ते एक सांस्कृतिक केंद्र समजले जाते व टोकिओपासून ३५२ किलोमीटरवर ते वसले आहे. त्याची लोकसंख्या सुमारे ५ लाखांवर गेली आहे.

जपानच्या उत्तरेकडील महत्त्वाचा भूभाग म्हणजे होक्काईडो बेट. त्याची राजधानी सॅपोरो ही शिक्षणाचे तसेच व्यापाराचे केंद्र समजले जाते.

जपानमधील महत्त्वाच्या शहरांचे विहंगमावलोकन केले. प्रवाशांना एवढ्या मोठ्या देशांत संचार करावयास पुरेसा वेळ मिळणे अशक्यप्राय असल्यामुळे त्या त्या स्थळांच्या महत्त्वाचे दिग्दर्शन त्यांना उपयुक्त व्हावे ह्यासाठी एवढा प्रपंच.

❁ ❁ ❁

# जपान व अतिपूर्वेकडील देश

## भाग तिसरा

## राजकीय व शैक्षणिक समस्या : वृत्तपत्रांचे जग

**जपानी लोक व संस्कृति :**

दौऱ्यात तेथील लोक आणि संस्कृति यांचा अभ्यास महत्त्वाचा. साहजिकच प्रवासी ज्या भूमिकेवरून अनुभव घेत असतो, त्यानुसार त्याच्या ज्ञानात भर पडत असते व दृष्टिकोनही सुधारत असतो.

दुसऱ्या महायुद्धानंतर अल्पावधीत जपानने निरनिराळ्या क्षेत्रात जी प्रगती केली, ती अनन्यसाधारण. त्याची कारणे अनेक आहेत. प्राप्त परिस्थितीशी टक्कर देण्याची जिद्द, बदलणाऱ्या वातावरणाशी मेळ बसविण्याची मानसिक तयारी, आणि गाजावाजा न करता आपल्या समाजाचे व राष्ट्राचे हित कशात आहे, ते हेरून त्यासाठी शेंडी तुटो वा पारंबी तुटो या निश्चयाने झुंज देण्याची वृत्ती ही या प्रगतीच्या मुळाशी आहेत.

जगातील अन्य देशाप्रमाणे निरनिराळ्या राजकीय वादांचे पडसाद जपानमध्येही न उमटले तर आश्चर्य. कम्युनिस्टासारख्या ऐकांतिक विचार सरणीचे लोक किंवा पक्ष तेथेही आहेत. परंतु पोथीला आप्तवाक्य न समजता जी जी आर्थिक, राजकीय वा सामाजिक आव्हाने येतील, त्यांना तोंड देण्यास जपानी नागरिक बद्धपरिकर असतो.

वरील मानसिक बैठकीमुळे एकेकाळी सम्राटांच्या राजेशाहीखाली वावरणारा जपान तितक्याच समरसतेने अमेरिकाप्रणीत लोकशाही राज्यकारभाराला रूळून गेला आहे. जपाननेही इंग्लंडच्या धर्तीवर कार्यवाहीत आणलेली लोकशाही-राज्यपद्धती गेल्या २५ वर्षात चांगल्या प्रकारे राबवली आहे.

**महापुरे झाडे जाती, तेथे लव्हाळे वाचती :**

अमेरिकेशी मिळतेजुळते घेऊन जास्तीत जास्त आर्थिक लाभ व राजकारणात नाही तर नाही, पण अन्य क्षेत्रात वर्चस्व प्रस्थापित करण्याची जपानी

जनतेची ओढ लक्षणीय वाटते. जपानच्या प्रतिनिधिगृहांत ४८६ सभासदांमध्ये लिबरल डेमोक्रॅटिक पार्टीचे २७० सदस्य असल्याने विशिष्ट नियोजित कार्यक्रम पार पाडणे ह्या पक्षाला शक्य होते. तसे म्हटले तर या पक्षाचे नाव प्रागतिक लोकशाही पक्ष असले तरी तो विचाराने इंग्लंडमधील पुराण मतवादी पक्षाशी पुष्कळसा जुळतो. या पक्षाच्या नेत्यांचेंकडे जपानच्या राजकारणाचे नेतृत्व असल्यामुळे विवेकी विचारसरणीचा शासनाला दीर्घकाल लाभ झाला. अधून मधून या धोरणाविरुद्ध असंतोषाचें उद्रेक होतात. विशेषतः तरुण विद्यार्थ्यांवर सोव्हिएट व क्वचित माओ विचारसरणीचा पगडा पडलेला दिसतो. पण इमारतीची तावदाने फोडणे, मिरवणुकी व निदर्शने या पलीकडे या अल्पसंख्यांचा जोर वाढत नाही. अमेरिकेनेही जपानला जित राष्ट्र म्हणून थोडा काल वागविले, पण लवकरच हे धोरण बदलून जपानला एक जवळचा मित्र करावा असे अमेरिकेच्या परराष्ट्र-धोरणाचे सूत्र झाले. यामुळे अमेरिकेची मोठी बाजारपेठ जशी जपानला खुली झाली, त्याचप्रमाणे अमेरिकन भांडवलाचा ओघही अव्याहतपणे जपानची अर्थरचना सुधारू शकला.

जपाननेही कारखानदारीमध्ये किरकोळ मालाच्या उत्पादनाकडे व किंमती भरमसाट कमी करण्याच्या धोरणात बदल करून अवजड उद्योग, तसेच रासायनिक व अन्य प्रचंड भांडवल लागणारी कारखानदारी जोमात चालवून अमेरिकेच्या पावलावर पाऊले टाकली. जपानी वृत्तपत्राचे व्यापारी पान उघडले तर आपणास असे आढळून येते की देशात भांडवलाची निर्मिती होण्यात जपानने यश मिळविले, एवढेच नव्हे तर परदेशांतूनही जपानमधील कारखान्यांच्या शेअर्सना मोठ्या प्रमाणावर मागणी येते. भांडवलदार हा अखेरपक्षी आपल्या गुंतवणुकीवर जास्तीत जास्त नफा कसा मिळेल यासाठी उत्सुक असल्यामुळे जपानमधील मोठा नफा देऊ शकणाऱ्या उद्योगांत तो पैसे गुंतवू लागला.

अमेरिकेचे मोठ्या भांडवलदारी उद्योगाचे मंत्र व तंत्र जपानने कार्यवाहीत आणले; एवढेच नव्हे तर काही क्षेत्रात जपानने आपल्या गुरूवरही ताण केल्याचे दिसते.

एक काळ असा होता की, जपानच्या प्रगतीचे एक कारण तेथील कामगारांना अमेरिका वगैरे देशांपेक्षा वेतन बेताचे दिले जात होते. परंतु ते युग आता पालटले. देशाची अंतर्गत बाजारपेठ उंचावण्यासाठी एकंदर कामगार, शेतकरी, इत्यादींची प्राप्ती व राहणीचे मान सुधारणे महत्त्वाचे आहे, हे जपानला

पटले. त्यामुळे सध्या जपानी कामगारास मिळणारे वेतन त्याच्या फ्रान्समधील कामगारबंधुचे वेतनाबरोबर गेले आहे, ही स्थिती स्पृहणीय होय. जपानी कामगारांचे सर्वसाधारण दरमाणशी उत्पन्न सुमारे आता ८५० डॉलरपर्यंत वाढले आहे, ही गोष्ट नजरेआड करून चालणार नाही.

**संरक्षणाची जबाबदारी :**

जपानच्या आर्थिक सुस्थितीचे महत्त्वाचे कारण युद्धानंतर दीर्घकाल



**एक्स्प्रेस ट्रेन बोगींतील दृश्य**

जपानच्या अंतर्गत व बाह्य सुरक्षिततेची सर्व जबाबदारी अमेरिकेने मुख्यतः आपल्या शिरावर घेतली ही होय. आता यापुढे संरक्षणावर जपानला जास्त खर्च करावा लागणार आहे. अर्थात स्वतंत्र राष्ट्र म्हणून जपानला आपले सामर्थ्य वाढविणे–त्यासाठी खर्चात वाढ झाली तरी–इष्ट होईल.

१९५१ मध्ये जपान व अमेरिका यांच्यात सॅनफ्रॅन्सिस्को येथे जो शांतता-करार झाला, त्यामध्ये जपानचे बाह्य-आक्रमणापासून संरक्षण करण्यासाठी जपानने अमेरिकन सैन्य ठेवण्याची तरतूद आहे. १९६६ च्या मार्च मध्ये जपानच्या अंतर्गत संरक्षण दलाचे संख्याबल २,७३,१२३ इतके होते. युद्धाचा मार्ग त्याज्य ठरविणारे कलम, जपान व अमेरिका यांच्यामध्ये झालेल्या संरक्षण विषयक करारात महत्त्वाचे आहे. यामुळे अंतर्गत संरक्षण दलाजवळ फक्त संरक्षणाचीच शस्त्रे आहेत. बॉंबफेकी विमाने हवाईदलामध्ये नाहीत, तसेच विनाशिकेपेक्षा मोठे जहाज जपानच्या संरक्षक आरमाराजवळ नाही.

**ओकिनावाबाबत ग्यानवाची मेख :**

अलीकडेच अमेरिकेचे अध्यक्ष निक्सन व जपानचे पंतप्रधान साटो यांचेमध्ये ज्या वाटाघाटी झाल्या त्यामध्ये सध्या अमेरिकेचा लष्करी तळ असलेले ओकिनावा हे बेट १९७२ पर्यंत जपानला परत मिळावे असे ठरले. अमेरिका व जपान यांच्यामध्ये जो ताजा संरक्षक करार झाला त्यामुळे जपानला अमेरिकेच्या अतिपूर्वेकडील संरक्षणव्यूहामध्ये निश्चित स्थान प्राप्त झाले. अमेरिका व जपान यांच्या संरक्षणसंबंधी हिताबद्दल उभय राष्ट्रे एकमेकांच्या सहकार्याने वागतील असेही या करारात म्हटले आहे. अतिपूर्वेकडील देश किंबहुना जपान यांच्या संरक्षण व्यवस्थेला बाध येणार नसेल तर ओकिनावा परत करावयाचा अशी ग्यानबाची मेखही या योजनेत घातली आहे. ओकिनावा जपानला परत द्यायचा म्हणजे तेथील न्यूक्लिअर क्षेपणास्त्रांचा संभारही अमेरिकेने काढून घ्यावयाचा.

तात्पर्य, नव्या कराराप्रमाणे ओकिनावाच्या तळाची व्यवस्था अमेरिका व जपान यांच्या संयुक्त वाटाघाटीने व्हावयाची आहे. मि. साटो यांनी प्रस्तुत कराराने ओकिनावाचे बाबतीत बहुसंख्य जपानी जनतेच्या आकांक्षांची पूर्ती केल्यासारखे दिसते. परंतु जपानमधील डाव्या राजकीय पक्षांच्या मते प्रस्तुत कराराने जपान अमेरिकेच्या अतिपूर्वेकडील लष्करी धोरणाचे प्यादे झाले आहे.

दुसऱ्या युद्धापासून जपानची जनतेने लष्करी संघर्षाची हाय खाल्ली तरी निक्सन–साटो करारामुळे भावी महायुद्धात जपान ओढला जाण्याचा संभव निर्माण झाला आहे.

जपान सोशॅलिस्ट पक्षाने तटस्थतेच्या धोरणाला जोराचा पाठिंबा दिला आहे. त्यामुळे अलीकडे काही पोटनिवडणुकी या पक्षाने जिंकल्याही आहेत. म्हणून ओकिनावा परत मिळण्याच्या आश्वासनाचे भांडवल करून नव्या निवडणुकी लढविण्याचा साटो यांचा डाव दिसतो. दक्षिण कोरिया व तैवान यांच्या संरक्षणाची अमेरिका स्वतःची जबाबदारी समजतो. त्याच पावलावर जपानने पावले टाकावीत अशी अमेरिकेची इच्छा. अशा या विभिन्न राजकीय विचारप्रणालींचा शेवट काय होईल ते आज सांगणे कठीण असले तरी एक गोष्ट निश्चित की, स्वतंत्र राष्ट्र म्हणून जपानने लष्करी सामर्थ्य वाढवावे, या ईर्षेला पुन्हा चालना मिळाली. लष्करी सामर्थ्य वाढविण्याचा एकदा जोर झाला तर जपान व्यापार उद्योगाकडे केंद्रित झालेले लक्ष कायम टिकवू शकेल काय ही चिंतनाची बाब होईल.



जपानचे पंतप्रधान मि. साटो व त्यांची पत्नी.

## जपानची राजकीय प्रतिमा :

युनायटेड स्टेट्स व जपान यांच्यातील परस्पर संरक्षणाच्या तहनाम्याची मुदत जून १९७० नंतर पुढे वाढविण्यात आली असली तरी तेवढ्याने जपान-पुढील समस्या कमी झाल्या नाहीत. आर्थिक सुबत्ता प्रस्थापित करण्यात जपानने आपली प्रतिमा जेवढी उंचावली तितकीच राजकीय क्षेत्रात ती खालावली, असे म्हणणारेही टीकाकार आहेत. आंतरराष्ट्रीय राजकारणात जपानने मोठे स्थान मिळवावे, असाही कित्येकांचा आग्रह दिसतो. उलट एकंदर घडामोडीकडे यापुढे जपान तटस्थपणे पाहू शकणार नाही आणि त्याला परिणामकारक भूमिका घ्यावी लागेल, असेहि काहींना वाटते. अमेरिकेची इच्छा अशी दिसते की, नैऋत्य आशियातून आपण चंबूगबाळे आटोपते घेतले तर जपानने सदर भार आपल्या शिरावर घ्यावा. अमेरिकेच्या ह्या खोड्यात जपान पडण्याचे टाळेल असा काही इशारा देतात.

## स्पष्ट राजकीय तत्त्वज्ञान हवे :

जपानचे चीनविषयक धोरण हाही एक गुंतागुंतीचा प्रश्न आहे. तसे म्हटले तर चीन आणि जपान यांचे ऐतिहासिक व सांस्कृतिक संबंध अतूट आहेत आणि चीनने लाल वस्त्रे पेहेनली तरी जपानी जनतेला चिनी लोकांचेबद्दल तसा परकेपणा वाटत नाही. चीनची करोडो लोकांची बाजारपेठ ही जपानच्या तोंडाला पाणी सुटावे अशीच आहे. साहजिकच जपानचे राज-कारण संभ्रमावस्थेत असून विशिष्ट तत्त्वांचा आविष्कार करणारी राजकीय मतप्रणाली मांडणारे नेते आज तरी जपानमध्ये दिसत नाहीत. तात्पर्य ,थातुर-मातुर योजना व संधीसाधु राजकारण या पलीकडे जाऊन जपानला नवे राजकीय दिव्य करावे लागेल.

साटो-निक्सन करारासंबंधी कम्युनिस्ट चीनची प्रतिक्रिया तीव्र विरोधी झाली. चीनचे मुख्यमंत्री चौ एन लाय यांनी स्पष्टच विधान केले की, प्रस्तुत करारामुळे जपान अमेरिकेच्या जगन्नाथाचे रथाला घट्ट आवळून बांधला गेला आहे. चीन, कोरिआ, व्हिएटनाम, लाओस, कांबोडिया इ. देशातील जनतेविरुद्ध जपान-अमेरिका लष्करी सहकार्याने आघाडी निर्माण झाली. ओकिनावा परत करण्याचे आश्वासन ही शुद्ध राजकीय भामटेगिरी म्हणावयाची किंबहुना सर्व जपानचेच ओकिनावा करण्याचा अमेरिकेचा उद्देश स्पष्ट दिसतो. चौ एन

लाय यांनी सोव्हिएट रशियालाही या राजकारणात ओढून असा आरोप केला आहे की युनायटेड स्टेट्स व जपान यांच्यात नव्याने झालेल्या तहनाम्याचा उपयोग चीनविरुद्ध करण्याचे रशियाचे कारस्थान आहे.

जपानमधील राजकीय परिस्थितीचा परिणाम तेथील युवकवर्गावर मोठ्या प्रमाणावर झाला. जुनी पिढी व सळसळत्या रक्ताची नवीन पिढी यात अंतर आढळून येत असून, वयस्कर जपानी लोक ज्या विचारांना उराशी बाळगून होते, ते तरुणवर्गात नामशेष होऊ लागल्याचे दृश्य लक्षात भरते. दोन पिढ्यांतील ही दरी कित्येकदा न ओलांडण्यासारखी झाल्यामुळे संघर्ष टाळण्याकरिता आई-बापांपासून कमावती मुले व सुना वेगळ्या राहू लागल्या आहेत. शिक्षण वा नोकरीच्या निमित्तानेही आई-बाप राहातात त्यापासून दूरच्या शहरात तरुण-मंडळी राहताना आढळतात. त्याचाही परिणाम कौटुंबिक एकात्मता नाहीशी होण्याकडे झाला.

**अमेरिकन शिक्षणपद्धती :**

जपानच्या प्रचलित शिक्षणपद्धतीचा परिणामही विद्यार्थीवर्गावर होऊन तो पुराणप्रियता सोडून आधुनिक राजकीय वादांचा अनुयायी होऊ लागल्यासारखे दिसते. आज साक्षरतेत स्वीडननंतर जपानचाच क्रमांक लागतो. ९८ टक्के लोकांना लिहिता–वाचता येत असल्यामुळे जपानी जनतेला स्वतंत्रपणे अभ्यास व विचार करण्यास लावणारी परिस्थिती खरोखर आहे. तसे म्हटले तर युद्धपूर्व कालातही जपानी जनतेचे साक्षरतेचे प्रमाण आजच्यापेक्षा कमी नव्हते. परंतु त्यावेळची सदर देशाची शिक्षणपद्धती युरोपिअन धर्तीवर होती. महायुद्धानंतर जित-राष्ट्र म्हणून जपानवर अमेरिकेची हुकमत सुरू झाल्यामुळे अमेरिकन शिक्षणपद्धतीचे पर्याय जपानमध्येही चालू झाले. अमेरिकन तज्ज्ञांनी शैक्षणिक संस्थांचा ढाचा बदलून कित्येक तांत्रिक व अन्य कॉलेजांचे विद्यापीठात रूपांतर केले.

युनिव्हर्सिटीजची संख्या जपानमध्ये ३०० चे वर गेल्याचे दृश्य आढळून आले तरी राष्ट्रीय युनिव्हर्सिटीवर जपानमधील व्यापारीसंस्था व कारखानदार किंबहुना शासन यांचा जास्त विश्वास आढळतो. टोकिओ आणि क्योटो या राष्ट्रीय विद्यापीठांना जे महत्त्व व मान आहे, तसा अन्य विद्यापीठांना नसल्यामुळे याच विश्वविद्यालयातून जागा मिळविण्यासाठी विद्यार्थ्यांची अहमहमिका लागते. या

विद्यापीठातून शिक्षणाचा खर्च बेताचाच असतो, तर अन्य विद्यापीठातून खर्चाचे प्रमाण भरमसाट दिसते. विद्यापीठाची संख्या वाढविल्याने शिक्षणाचा दर्जा तर वाढला नाहीच, परंतु राष्ट्रीय विद्यापीठाखेरीज अन्य ठिकाणच्या पदवीधरांचा भाव घसरला. नाही म्हणायला 'वसेडा' व 'केईओ' या खाजगी विद्यापीठांचा दर्जा अजूनही उत्तम आहे. राष्ट्रीय विद्यापीठात प्रवेशासाठी अर्ज करणाऱ्यांत चारामध्ये जेमतेम एकालाच प्रवेश मिळतो. ही परिस्थिती अनुकंपनीय खरीच ! प्रतिवर्षी पुनः पुनः राष्ट्रीय विद्यापीठाच्या प्रवेश परीक्षेस बसणाऱ्या विद्यार्थ्यांना 'रोनिन' किंवा विद्यापीठाच्या बाहेरील विद्यार्थी अशी संज्ञा प्राप्त झाली आहे. तात्पर्य जपानमधील विद्यापीठांच्या फुगलेल्या संख्येमुळे विद्यापीठासंबंधी लोकांची आस्था कमी झाली आहे.

नवीन शिक्षणपद्धतीत जुन्या घोकंपट्टीच्या प्रकारांना रजा देण्यात आलेली असून जॉन ड्यूई या अमेरिकन तज्ज्ञाने शिफारस केलेल्या नवीन शिक्षणपद्धतीचा स्वीकार करण्यात आला. जगात वावरताना व्यक्तीला ज्या विविध



चित्रांच्या पुस्तकांतून जपानी बालकांचे उद्बोधन

आव्हानांना तोंड द्यावे लागते त्यासाठी मानसिक तयारी करणे हे शिक्षणाचे ध्येय असावे. उगाच ज्ञानाचे डबोले वाहाण्यात अर्थ नाही असे ड्यूई यांचे म्हणणे होते. स्वतंत्रपणे विचार करावयास लावणे, व्यक्तिमत्वाचा विकास करणे आणि लोकशाहीतील नागरिकत्वाचा जबाबदारीची जाणीव उत्पन्न करणे या प्रकारच्या शिक्षणप्रणालीचा ड्यूई यांनी आग्रह धरला आणि त्या पद्धतीवर जपानमधील शिक्षणक्रमाची पुनर्रचना करण्यात आली.

पूर्वीच्या शिक्षणपद्धतीत राष्ट्रवादाची जोपासना करणाऱ्या नीति–नियमांचा जो आग्रह असे त्याला तिलांजली मिळाली आणि ' शकेईका ' म्हणजे सामाजिक अभ्यास या नवीन विषयाला अभ्यासक्रमात स्थान मिळाले. अनुभवाने मिळणाऱ्या ज्ञानावर ' सोशल–स्टडीज ' मध्ये भर दिला गेला.

या विचारसरणीत आपाततः तसे चुकीचे काही नव्हते परंतु बालकाच्या बुद्धीची पोच स्वतंत्रपणे विचार करून अनुमाने बांधण्याइतकी सामान्यतः प्रगल्भ नसल्यामुळे स्वतःच्या विचाराची वाढ होण्याऐवजी त्याच्या शिक्षकांचे विचार त्याचेवर खरे परिणाम करू शकले. यामुळे पुस्तकांपेक्षाही शिक्षकांचे आचारविचारांची छाप विद्यार्थ्यांचे मनावर खोलवर पडू लागली.

**जपान टीचर्स युनियन :**

जपानमधील शिक्षकवर्ग व त्याचे सर्वसाधारण विचार यांचा अभ्यास करणे या दृष्टीने उपयुक्त ठरते. हा वर्ग दुसऱ्या महायुद्धानंतरच्या तरुण पिढीतील सामान्यतः असल्यामुळे त्याचे विचार नवीन राजकीय वादाशी निगडीत झालेले आढळतात. ' जपान टीचर्स युनियन ' नावाची सुमारे सहा लाख शिक्षकांची एक प्रभावी संघटना असून तीमध्ये विद्यापीठाबाहेरील शिक्षकांपैकी ४/५ शिक्षक सामील झाले आहेत. या शिक्षकांचेवर मार्क्सवादाचा मोठाच परिणाम झाला आहे असे अमेरिकन लेखक मानतात. शिक्षक हा कामकरी वर्गापैकी आहे, असे ही युनियन मानते आणि त्यामुळे वर्गसंघर्ष वाढविणे आवश्यक असल्याचा तिचा आग्रह आहे. भांडवलशाही आणि विश्वकुटुंबवाद यांचा अंतिम-लढा होईल असेही या युनियनला वाटते. या सर्व परिस्थितीमुळे जपानमधील तरुण–पिढी साम्यवादाच्या आहारी जात चालल्याचे दिसते. १९६० साली जपानमध्ये अमेरिका-विरोधी जे प्रचंड आंदोलन झाले, त्यामागेही हा तरुण विद्यार्थीवर्ग होता. साहाजिकच जपानवर विशिष्ट शिक्षणपद्धती लाद-



डॉ. एस. टोमोनागा



डॉ. एच. युवाका

णाऱ्या अमेरिकन अधिकारीवर्गाला " हे फळ काय मम तपाला " असे म्हणण्याची वेळ येऊन ठेपली.

जपानमधील शिक्षणसंस्थात-शिशुवर्ग, प्राथमिक शाळा, हायस्कूल्स, ज्युनिअर कॉलेजेस आणि युनिव्हर्सिटीज; अशा क्रमाने शिक्षण देत आहेत. प्राथमिक व दुय्यम शाळेपर्यंतचे शिक्षण सर्व मुलांना वयाच्या ६ पासून १५ वर्षेपर्यंत एकूण ९ वर्षे सक्तीचे व मोफत आहे. एकंदर अभ्यासक्रमात शास्त्रीय, तांत्रिक शिक्षण महत्त्वाचा भाग. तसेच विद्यापीठातील विद्यार्थ्यांत सुमारे ३०टक्के विद्यार्थी शास्त्राच्या कोठल्या तरी शाखेत वैशिष्ट्य मिळविण्याचा प्रयत्न करतात.

**शास्त्रीय संशोधनात प्रगति :**

शुद्ध शास्त्रीय संशोधनाचे क्षेत्रात जपान मागे नाही. १९४९ चे नोबेल पारितोषिक गणितज्ञ डॉ. हिडेकी युकावा यांना तसेच Physics मधील संशोधनासाठी '१९६५ चे नोबेल-पारितोषिक डॉ. शिनी चिरो टोमोनागा यांना मिळालेले आहे. ' अणुशक्ति आयोग ' जपानमध्ये १९५६ मध्ये स्थापन झाला. परमाणु-शक्ति विकास केंद्र टोकिओच्या आग्नेयेस ७० मैलांवर टोकाईमुरा येथे आहे. अवकाश संशोधनाच्या कार्यालाही १९५५ मध्ये प्रारंभ झाला. पेन्सिल आणि बेबी या अग्निबाणापासून सुरुवात करून ' काप्पा ' जातीचे

सौंउडिंग रॉकेट आणि अवकाश निरीक्षणाचे मोठे लॅम्डा रॉकेटचे उत्पादन करण्यापर्यंत जपानने प्रगती केली आहे. ' क्युशू ' बेटाच्या दक्षिण टोकाला ५ लक्ष १० हजार चौरस मीटर क्षेत्रात कागोशिमा हे जपानचे अग्निबाण सोडण्याचे केंद्र आहे.

अनुभवाने शहाणे होऊन जपानमधील शिक्षणसंस्थातून नीति-शिक्षणाचा कार्यक्रम अल्प प्रमाणावर चालू करण्यात आला. एवढेच नव्हे तर शिक्षकांना मुलांची वैयक्तिक नीतिमत्ता चांगली रहावी यासंबंधी निश्चित सूचना १९६४ साली देण्यात आली. जपानमधील शैक्षणिक पद्धती कामचलाऊ असली तरी तिला आदर्श असे म्हणता येणार नाही. कारखानदारवर्ग आपणास पाहिजे असलेले तांत्रिक शिक्षण पुष्कळदा शिकाऊ उमेदवारांना देऊन आपल्यापुरता प्रश्न सोडवीत असतो.

शिक्षणपद्धती, सभोवतालचे वातावरण व राजकीय वातावरण यांचा परिणाम तरुण पिढीवर मोठ्या प्रमाणावर झाला. नीतिमूल्येही ढासळू लागली व असंतोषामुळे ' कशाला उद्याची बात ' ही प्रवृत्ति बळावली.

**वाचकांचा देश जपान :**

आतापर्यंत विवेचन केलेल्या लोकजीवनाचे पडसाद जपानमधील नियतकालिकांच्यात न पडले तर आश्चर्यच ! जपानी माणूस वाचनाचा फार षोकी ! ' वाचकांचा देश ' असेही जपानचे काहींनी वर्णन केले आहे. १ एप्रिल १९६४ रोजी जपानमध्ये एकंदर १२३ दैनिके निघत होती. गेल्या ४ वर्षात त्यांचे संख्येत आणखीही वाढ झाली. काही दैनिके ' सकाळ ' व ' संध्याकाळ ' अशा दोन्ही आवृत्त्या काढतात. वृत्तपत्रांचा दैनिक खप ४ कोटी २० लाखांचे घरात सध्या गेला आहे म्हणजे सरासरी २ व्यक्तीत १ वृत्तपत्र असे प्रमाण पडते. कुटुंबाचा हिशेब लक्षात घेतला तर त्यात सरासरी २ वृत्तपत्र तरी येतात असे दिसते. पुढारलेल्या देशांतील दैनिकांचा एकूण खप पुढीलप्रमाणे आहे: अमेरिका ५,९०,०००,००, सोविएत युनिअन ३,९०,०००,००, ग्रेट ब्रिटन २,७०,००,०००, प. जर्मनी १,७०,००,००० फ्रान्स १,१०,००,००० हे आकडे लक्षात घेतले तर अमेरिकेच्या खालोखाल जपानचा क्रम लागतो. परंतु अमेरिकेचा विस्तार लक्षात घेतला तर जपानसारख्या आकाराने चिमुकल्या राष्ट्रातील वृत्तपत्रांचा हा खप डोळ्यात भरण्यासारखाच म्हटला पाहिजे. इतर

देशांप्रमाणे दैनिकांचे स्थानिक व राष्ट्रीय असे प्रकार जपानमध्येही आढळतात. राष्ट्रीय वृत्तपत्रांत 'असाही-शिंबुन' या दैनिकाचा खप सर्वात जास्त आहे. त्याचे खालोखाल 'माईनिची शिंबुन' व 'योमोरी शिंबुन' ही जपानी भाषेतील पत्रे खपाचे दृष्टीने दिसतात.

या प्रमुख दैनिकाच्या सकाळ व सायंकाळचे आवृत्त्यांखेरीज त्यांची साप्ताहिके व मासिके आहेत ती वेगळीच. जपानी दैनिके वाचता न आल्यामुळे त्यांचे स्थूल स्वरूप मी पाहू शकलो परंतु या अग्रेसर वृत्तपत्रसंस्थांची असाही इव्हनिंग न्यूज, माइनीची डेली न्यूज व योमोरी ही इंग्रजी पत्रे माझ्या वाचनात आल्यामुळे त्यांच्या जपानी आवृत्तीसंबंधीही काही कल्पना आली. इंग्रजी दैनिकात 'जपान टाइम्स' विशेष लोकप्रिय दिसले. वाचकांचे लक्ष खेचणाऱ्या बातम्या आकर्षक स्वरूपात छापण्यात 'जपान टाइम्स' चा हातखंडा असून परदेशी वाचकात ते विशेष लोकप्रिय दिसते. जाहिरातीही या पत्रात भरपूर आढळल्या. परदेशी राजकारणावर व्यासंगपूर्वक लिखाण, तशीच खास फीचर्स यामुळे माइनीची डेली न्यूज वाचनीय वाटली. योमोरी व असाही यांचा भर अंतर्गत घडामोडीवर विशेष दिसून आला. जपानमध्ये वृत्तपत्र प्रकाशक व संपादक यांचा समर्थ संघ असून त्यांचे सदस्यांत १०२ वृत्तपत्रे, ९ वृत्तसंस्था आणि २८ आकाशवाणी व दूरचित्रवाणी कंपन्या आढळल्या. दैनिकाची संपूर्ण पाने फॅसिमिल ट्रॅन्समीशन पद्धतीने प्रमुख प्रकाशन केंद्राकडे पाठवून त्याच्या प्रिंटिंग प्लेटसवर छपाई करण्यात जपानने आघाडी मारली आणि असाही, माईनीची व योमोरी या तिन्ही पत्रांनी १९५९ साली या प्रकारच्या छपाईला जगात प्रथमच प्रारंभ केला. अलीकडे भारतात 'हिंदु' या इंग्रजी दैनिकाने असा प्रयोग चालू केल्याचे वाचकांना कळले असेलच.

दैनिके एकंदरीत स्वतंत्र असल्याने त्यांनी जनतेचा विश्वास चांगल्या प्रकारे संपादन केला आहे. विशिष्ट पक्षांचा किंवा गटांच्या आहारी वृत्तपत्र गेल्यास त्याचे स्वातंत्र्य बऱ्याचशा प्रमाणात कमी होते असा अनुभव. बाहेरच्या भांडवलदारांचे वर्चस्व दैनिकावर पडू नये म्हणून असाही या जगप्रसिद्ध दैनिकाच्या चालकांनी वृत्तपत्रसृष्टीत एक आगळाच प्रयोग केला आहे. 'असाही' चे मूळ मालक जसे या पत्राचे मोठे भागीदार तसेच स्टाफही 'असाही' चा भागीदार असल्यामुळे एक प्रकारच्या सहकारी पद्धतीने हे दैनिक चालविल्यासारखे दिसते. जपानमधील दैनिके मुख्यतः त्यांच्या प्रचंड खपावरच चालतात. अलीकडे

त्यांचे जाहिरातीचे उत्पन्न वाढत आहे. सरकारी जाहिरातीचे प्रमाण त्या मानाने वृत्तपत्रांतून बेताचेच दिसले. असाहीसारख्या वृत्तपत्राचा खप सुमारे ५० लाखांचे वर गेला असल्यामुळे जाहिराती मिळविण्यासाठी त्यांना तशी वेगळी खटपट करावी लागत नाही. लहान प्रमाणावर सुरुवात करून संपादकीय व संघटना कौशल्याने पुढे क्रमाने प्रचंड खपामध्ये रूपांतर झालेल्या दैनिकात असाहीचा अंतर्भाव होतो. कित्येक वर्षे दोन कुटुंबातच असाहीची मालकी विभागली होती. सन १९६२ मध्ये युनायटेड नेशन्सतर्फे 'माहिती स्वातंत्र्यावर' नवी दिल्ली येथे एक उद्‌बोधक जागतिक परिसंवाद झाला त्यामध्ये इंटरनॅशनल चेंबर ऑफ कॉमर्सच्या वतीने भाग घेण्याची मला संधी मिळाली होती. त्यावेळी 'असाही शिंबुन' चे अध्यक्ष मि. नागाटाका मुरोआमा आणि 'जपान टाईम्स'चे अध्यक्ष मि. शिंतारो फुकुशिमा यांचा परिचय झाला आणि टोकिओत या प्रचंड दैनिकांची कार्यपद्धति जवळून पाहण्याचा योग आला. 'असाही शिम्बून' च्या संचालकाचे म्हणणे असे आहे की लोकशाही राज्यपद्धतीत वृत्तपत्रांना खरे स्वातंत्र्य लाभू शकते. गेली ९० वर्षे 'असाही' जपानी जनतेची उत्कृष्ट सेवा बजावीत आहे. सुरुवातीला जरी वैयक्तिक मालकीतून या दैनिकाची उभारणी झाली असली तरी आधुनिक दैनिकांना लागणारे मोठे भांडवल गोळा करण्यासाठी त्याचे जॉईन्ट–स्टॉक कंपनीत रूपांतर करणे अपरिहार्य होते. सामान्यत: कंपन्यांची शेअर्सची खरेदी विक्री व ट्रॅन्स्फर खुली असली तरी जपानमध्ये वृत्तपत्रांना त्यांच्या पोटनियमाखाली शेअर्स कोणाला बदली करू नयेत हे ठरविण्याच अधिकार आहे. असाहीची स्थापना सन १८७९ मध्ये मि. नागाटाका यांचे सासरे मि. ओहेही मुरायामा यानी केली. कालांतराने जेव्हा जॉईन्ट – स्टॉक कंपनी स्थापन झाली तेव्हा असे धोरण स्वीकारण्यात आले की कंपनीचे चालक व सेवकवर्ग यामध्येच शेअर्स वाटावेत. सेवकांना शेअर्स विकत घेणे आर्थिक दृष्ट्या परवडणारे नसल्यामुळे चालकांनी त्यातील कित्येकांची एकनिष्ठ व कार्यक्षम सेवा लक्षात घेऊन ते त्यांना विनामूल्य दिले. कंपनीतील मंडळीतीतच शेअर्स राखून ठेवण्याचे धोरण आजतागायत चालू आहे. सन १९३३ मध्ये य दैनिकाचे संस्थापक निवर्तले. आणि सध्या मि. नागाटाका व मि. सिची उ एनो ह्या दोघांत कंपनीचे ६० % वर शेअर्स आहेत आणि इतर शेअर्स असाहीच्य सेवकवर्गात विभागले आहेत. मि. नागाटाका यांच्या मते दैनिकाच्या वाढत्य गरजासाठी बँकांकडून कर्जे काढणे अधिक श्रेयस्कर ! अनिष्ट व्यक्तींमधे शेअर्स

खपविल्यास वृत्तपत्र-स्वातंत्र्यावर त्यांचे दडपण येण्याचा संभव जास्त. उलट बँका आपला पैसा सुरक्षित आहे का एवढेच पाहतील. जपानमध्ये वृत्तपत्रांचे स्वातंत्र्य, त्याचेवर नियंत्रण इ. साठी खास कायदा वगैरे नाही. पत्राचे नोंदणीकरता नामधारी प्रकाशकाचीही जरूरी नाही. असाही शिंबूनची सर्व पाने जपानमधील पाच प्रमुख शहरात वायरलेसने क्षेपित केली जातात. असाही शिंबूनला विक्री आणि जाहिराती याखेरीज अन्य कोठून पैसा मिळत नसल्यामुळे ते पूर्णपणे स्वतंत्र आहे आणि त्यामुळे जनताही या दैनिकावर पूर्ण विश्वास ठेवते. एक काळ असा होता की खप ही महत्त्वाची उत्पन्नाची बाब होती; आता जाहिरातीचे उत्पन्नावर तितकाच किंवा त्यापेक्षा अधिक भर दिला जातो. वृत्तपत्राच्या नफ्यावरही ती सेवेची महत्त्वाची माध्यमें असल्यामुळे नियंत्रण हवे. १० %वर नफा भागीदारांना वाटू नये, असेही मत मि. नागाटाका यांनी व्यक्त केले आहे.

जपान टाईम्सचे मि. शिन्तोरो फुकुशिमा यांनी असा अभिप्राय व्यक्त केला की, वृत्तपत्रासारखी लोकशिक्षणाची माध्यमे स्वतन्त्र राहावयाची असतील तर आर्थिकदृष्ट्या ती मजबूत पायावर उभी हवीत. जपानच्या नवीन राज्यघटने-मध्ये एकवीस (२१) कलमान्वये विचारस्वातंत्र्याला अग्रहक्क दिला असून सेन्सॉरशिपसारख्या नियंत्रणांना विरोध केला आहे. अलीकडे जपनमध्येही पीत-पत्रांचा ( Yellow Newspapers ) सुळसुळाट झाला आहे आणि त्यातून कित्येकदा असभ्य छायाचित्रे व लेख प्रसिद्ध होतात. तरीही कायद्याने त्यांचेवर बंधन घालू नये असे वृत्तपत्रांच्या संघटनांचे मत आहे. वृत्तपत्र स्वातंत्र्य हा जनतेचा मूलभूत हक्क आहे व तो फक्त पत्रकारांनी उपभोगण्याचा नाही.

**जपानी वृत्तपत्रांतील विसंगती :**

जपानी वृत्तपत्रांचे बाबत एक आक्षेप घेतला जातो की त्यातील बातम्या, संपादकीय, खास लेख व अन्य माहिती यांचेमध्ये तितकीशी सुसंगतता दिसत नाही. उपसंपादक, वार्ताहर इ. श्रमिक पत्रकार आपापल्या रकान्यांचे राजे तर नाहीत ना आणि त्यावर मुख्य संपादकांचे साकल्ये करून नियंत्रण नसावे असा भास होतो. वृत्त सत्यदर्शक असावे हे खरे असले तरी ह्या सत्याचा आविष्कार विशेषतः निवडणुकांचे वेळी कसा वेगवेगळ्या तऱ्हांनी होतो हे आपल्याकडील वृत्तपत्रांचे वाचकांना सांगायला नको. जपानी वृत्तपत्रातील या सर्वसाधारण

संपादकीय पद्धतीमुळे राष्ट्र जेव्हा विशिष्ट आणीबाणीच्या परिस्थितीतून जाते तेव्हा कित्येकदा प्रतिकूल परिणाम प्रगट होतात.

वृत्तपत्रांतील कर्मचारी सामान्यतः ‘ शिंबून रोरेन ’ म्हणजे न्यूजपेपर्स वर्कर्स फेडरेशनचे सदस्य आहेत आणि ही संघटना मार्क्सवादी ‘ सोह्यो ’ या ट्रेड युनिअन फेडरेशनला जोडलेली असल्याने श्रमिक पत्रकारांचा दृष्टिकोन सामान्यतः मार्क्सवादी दिसून येतो. १९६० मध्ये जपानमध्ये अमेरिका विरोधी आन्दोलन व दंगली झाल्या त्यांना शिंबून रोरेनचा सामान्यतः पाठिंबा दिसून आला. सोह्यो फेडरेशनने या कालात कामगारांच्या हिताचे जपणुकीपेक्षा राजकारणावर जास्त भर दिला, आणि अमेरिकेशी पूर्वी झालेल्या शांतता करारांत दुरुस्त्या करण्यास या ट्रेड युनिअन फेडरेशनने विरोध केला त्यामुळे या आणीबाणीचे परिस्थितीत वृत्तपत्राचे संपादकीय धोरण कसेही असले तरी श्रमिक पत्रकारांच्या ताब्यांत वार्ता देणे व त्यांची सजावट करणे मुख्यतः असल्यामुळे जपानी वृत्त-पत्रांचा एकंदर बनाव स्पष्ट अमेरिका–विरोधी दिसला. त्यामुळे साहाजीकच अमेरिकेचा जळफळाट झाला.

**जाहिरात उत्पादनात सालिना १७ टक्के वाढ :**

जपानी नियतकालिकांनी खपाचे बाबतीत जवळ जवळ परमोच्च बिंदू गाठल्यामुळे उत्पन्नाची ती बाजू वाढण्यास विशेषसा वाव राहिला नाही. परंतु गेल्या वीस वर्षांमध्ये देशाचे कारखानदारीत जी क्रांति झाली तीमुळे जाहिरातीचे परिमाणात प्रचंड वाढ होऊ शकली. इ. स. १९५० पासून प्रतिवर्षी जाहिरातीचे उत्पन्नात जी सुमारे १७ टक्के वाढ झालेली दिसते, ते प्रमाण उद्योगधंद्याच्या वाढीच्या प्रमाणाशी साधारणतः जुळते असल्याचे सहज लक्षात येईल.

जाहिरातींचा भर दैनिकापेक्षाही मासिकांच्या आकाराच्या सचित्र अंका-तून विशेष आढळतो. वृत्तपत्रीय जाहिरातींना टेलिव्हिजनवरील जाहिरातींची मोठी स्पर्धा आता भासू लागली आहे. एकंदर जाहिरात-खर्चापैकी ३५ टक्केचे वर खर्च दूरचित्रवाणीवर केला जातो. नभोवाणी व दूरचित्रवाणी या माध्यमांद्वारे जाहिराती करण्याची प्रवृत्ती सर्व सुधारलेल्या देशांत वाढत असून वृत्तपत्रांचे–विशेषतः मध्यम खपांच्या–जाहिरातींची आवक उत्तरोत्तर कमी होणार अशी चिन्हे दिसू लागली आहेत.

**दरमहा २००० नवी पुस्तके :**

जपानमधील प्रकाशनाचा व्यवसायही जोमात आढळतो. दरमहा निदान २,००० नवीन पुस्तके बाजारात येतात; आणि मासिकांच्या प्रती सुमारे २,००,००,००० पर्यंत दर आठवड्यात प्रसारित होतात. 'बुंगेई शिंजू' या उच्च श्रेणीतील मासिकाचा खप ५,००,००० चे वर गेला आहे. मासिके व



**जपानी नियतकालिके व पुस्तके यांच्या ग्राहकांनी गजबजलेला स्टॉल**

पुस्तके यांच्या खपात मनस्वी वाढ झाल्यामुळे लोकप्रिय लेखकांना भलताच भाव चढला आहे; आणि कित्येक लेखकांचे उत्पन्न चित्रपट कलावंतापेक्षाही जास्त आढळते. 'इवानामी पब्लिशिंग कंपनी' ही जपानमधील अग्रेसर प्रकाशन संस्था असून आपल्या हातात या कंपनीचे पुस्तक असणे हे एक मोठेपणाचे लक्षण समजले जाते.

जपानमध्ये नामांकित परदेशी पुस्तकांची भाषांतरेही फार मोठ्या प्रमाणावर छापली जातात! पुस्तके विकत घेण्याची सवय सामान्यातही प्रचलित असल्याने चांगल्या खपामुळे प्रकाशनाचा उद्योग तेजीत आढळतो. शेक्सपीअर, डिकन्स, गाईटे, मोलिएर, डास्टेव्हेस्की, टॉलस्टॉय इ० नामांकित पाश्चात्य लेखकांच्या वाङ्मयाच्या लक्षावधी प्रती जपानमध्ये खपू शकतात.

गेल्या शतकाचे अखेरीचे अंगाई मारू व सोसेकी नात्सुमे या श्रेष्ठ लेखकांच्या कादंबऱ्या सध्याही लोकप्रिय आहेत. जागतिक कीर्ति मिळालेल्या अर्वाचीन लेखकांची पुढील पुस्तके उल्लेखनीय वाटतात. जीरो ओसारागी यांचे "होम कमिंग", युकिओ मिशिमा यांची "द साउंड ऑफ वेव्हज्", यासुनारी कावाबाता यांची "स्नो-कन्ट्री" आणि जुनीचिरी तानीजाकी यांनी लिहिलेली "सम् प्रिफर नेटल्स" यांनी लोकप्रियतेचा उच्चांक गाठला आहे. "टेल ऑफ गेंजी" या विदग्ध साहित्य कृतीचे ऑर्थर वाले यांनी केलेले भाषांतर सर्वमुखी झाले आहे.

### हाँगकाँगमधील पत्रांचे वैशिष्ट्य :

जपानमधील नियतकालिकांच्या या विवेचनाबरोबर अतिपूर्वेकडील अन्य काही देशातील वृत्तपत्रसृष्टीसंबंधी धावता उल्लेख या ठिकाणी समर्पक होईल. हाँगकाँग, फिलिपाइन्स, थायलंड, मलाया, सीलोन इ. मी प्रवास केलेल्या देशांतून लोकशाही अस्तित्वात असल्याने वृत्तपत्रस्वातंत्र्याची जोपासनाही साधारणतः चांगल्या प्रकारे झालेली आढळली. आमची बोट हाँगकाँगला लागली, तेव्हा डेकवरच सर्व उतारूंना 'हाँगकाँग स्टँडर्ड' ची 'कॉम्प्लिमेंटरी एडिशन' वाटण्यात आली. दुरंगी रोटरी छपाई असलेले हे दैनिक ऑडिट ब्युरो ऑफ सर्क्युलेशन्सचे सभासद आहे. 'सिन मोह अमालगमेटेड (एच. के.) लि.' या कंपनीतर्फे गेली वीस वर्षे प्रस्तुत दैनिक चालू असून मजकुराची ठेवण लोकाभिरुचीनुसार आढळली. जाहिरातींची रेलचेल दिसली या दैनिकात.

१६ आकारांची डेमी आकाराची पाने 'स्टँडर्ड' वाचकांना देते. स्टँडर्डपेक्षाही 'साउथ चायना मॉर्निंग पोस्ट' अधिक प्रतिष्ठित वाटले. २४ पानांच्या डेमी आकाराच्या या दैनिकाची किंमत ३० सेंट्स योग्य दिसते. वृत्तपत्राच्या नावाच्या लिमिटेड कंपनीच्या मालकीच्या या दैनिकाने नुकताच आपला रौप्यमहोत्सव साजरा केला. हाँगकाँगच्या या दोन्ही दैनिकांवर संपादकांच्या नावांचा उल्लेखही नसतो. इतकेच नव्हे तर 'साउथ चायना पोस्टच्या' संपादकीयात वर अशी सूचना छापलेली आढळली की ज्या सभासमारंभांना वृत्तप्रसिद्धीसाठी कोणास आमंत्रणे धाडावयाची असतील तर त्यांनी कोणाही व्यक्तीच्या नांवांनी न पाठवता 'संपादक, साउथ चायना पोस्ट' एवढयाच निर्देशाने धाडावीत. येथे प्रकाशन-संस्थाच सर्व समर्थ असल्याचे वरील माहितीवरून उघड दिसते.

फिलिपिन्समधील 'मॅनिला टाइम्स' या दैनिकाला लोकप्रियतेच्या दृष्टीने पहिला क्रमांक द्यावा लागेल. ४४ पानांच्या या दैनिकाची किंमत २० सेंट्हो आढळली. पण त्यात ८ पानांची पुरवणी होती एका मोठ्या जाहिरात-दारासंबंधी. पंचविशी उलटलेल्या 'मॅनिला टाइम्स' मध्ये आधुनिक दैनिकाचा सर्व मालमसाला आढळतो. याही वृत्तपत्रावर संपादकाचे नांव घालण्याची प्रथा नाही.



फिलिपिन्स उद्यानातं रममाण झालेली बालिका

**पत्रकारांना परवाना हवा :**

फिलिपिन्स युनिव्हर्सिटीच्या मि. आर्मोलो मॅन्ले यांचेशी माझी भेट वर उल्लेखिलेल्या युनायटेड नेशन्सच्या परिसंवादात झाली होती. अलीकडे पत्रकारांमध्ये व्यावसायिकता विशेष शिरल्यामुळे त्याचा ध्येयवाद कमी झाला; इतकेच नव्हे तर वृत्तपत्रस्वातंत्र्याचीही त्यांचेकडून हानी होऊ लागली असे



**थायलंडमधील ऑर्किड उद्यान.**

मत मि. मॅले यांनी प्रकट केले. यामुळे कित्येकदा धंद्याबाहेरचे स्तंभलेखक अधिक स्वातंत्र्य व बाणेदारपणा दाखवू शकतात. वृत्तपत्रातून कित्येकदा पुष्कळदा उथळ व कधी कधी अप्रामाणिकही मजकूर येतो. याकरिता डॉक्टर, वकील इत्यादी व्यावसायिकांप्रमाणे पत्रकारांना परवाना देण्याची पद्धत चालू करणे हितावह होईल असाही अभिप्राय मि. आर्मोंडो मॅले यांनी व्यक्त केला.



**सिंगापूर येथील मि. चौन चिन लिन याचे कुटुंबांतील मंडळी**



सिंगापूर हौपार व्हिलांतील काँक्रीटमधील शिल्प

बँकॉकमध्ये थाई भाषातील वृत्तपत्रांचा खप साहजिकच जास्त आहे. तेथील 'चौ थाई डेली न्यूज'चे परदेशीय वृत्तसंपादक मि. सथीरा बार्थ-रंगसी यांनी थायलंडमध्ये लेखन-भाषण स्वातंत्र्य भरपूर असल्याचा निर्वाळा दिला. पहिले थायी साप्ताहिक सन १८४३ साली 'बँकॉक रेकॉर्डर' नावाचे



मलायी मळ्यांतील बालकांचा फोटो

निघाले. राजे वाजीरउध हे इंग्लंडमध्ये शिकून आलेले आधुनिक विचारसरणीचे प्रशासक असल्यामुळे त्यांनी थायलंडमध्ये वृत्तपत्र स्वातंत्र्याची मुहूर्तमेढ रोवली.

याच राजांचे कारकीर्दीत थाई भाषेतील दोन नामांकित दैनिके उदयास पावली; ती म्हणजे ‘ डेली मेल ’ व ‘ पिन् थाई ’ ही होत. वृत्तपत्रस्वातंत्र्याचा कधी कधी दुरुपयोगही होऊ लागल्याचे पाहून थायलंडमध्ये १९२२ साली पहिला प्रेस ॲक्ट जारी झाला. वृत्तपत्रीय शिक्षणाची सोयही थायलँडमध्ये क्रमाने सुरू झाली. चुलाब्रिकॉम विद्यापीठात पत्रविद्येचा शिक्षणक्रम चालू करण्यात आला आणि त्यानंतर काही वर्षांनी थमुरसरात विद्यापीठातही पत्रविद्येला स्थान मिळाले. या उपक्रमात अमेरिकेच्या इंडिआना विद्यापीठाचे सहकार्य मिळाले होते. १९३८ साली थायलँडमध्ये पहिली प्रेस असोसिएशन स्थापन झाली; तिचे सभासद तीनशेचे वर असले तरी वृत्तपत्राशी दूरचा संबंध असलेली मंडळी तीत प्रामुख्याने आढळतात. १९५५ मध्ये ‘प्रेस क्लब’ निघाला व त्याच वर्षी वार्ताहरांनीही आपला क्लब स्थापन केला. थायलँडमधील परदेशीय वार्ताहरांचाही एक क्लब असून त्याचे सुमारे पंचवीस सभासद आहेत. थायलँडमध्ये दैनिके, साप्ताहिके वगैरे भरपूर असली तरी वृत्तपत्रांचे वाचक या २,५०,०००,०० लोकसंख्येच्या देशात जेमतेम १ टक्का भरतात, हा दैवदुर्विलासच म्हणावयाचा !



जोहोर बारू येथील प्राचीन मशीद

## मलेशियातील वृत्तपत्रे

मलाया, सिंगापूर या देशातूनही वृत्तपत्रांची वाढ चांगल्या प्रकारे झालेली दिसते. मलायातील सर्वात लोकप्रिय जुने इंग्रजी दैनिक 'दि स्ट्रेट्स् टाइम्स' याचा खप आता दोन लाखाचे घरात गेलेला दिसतो. प्रस्तुत दैनिक कुआलालंपूर; तसेच सिंगापूर अशा दोन ठिकाणी प्रसिद्ध होत असून त्याचे कार्यकारी संचालक मि. ए. सी. सिमोन्स हे आहेत. ११५ वर्षे या दैनिकाला झाली आणि तिरंगी छपाईतही हे दैनिक आधुनिकतेत अन्य पत्रास हार जाणार नाही. दि नॅशनल न्यूज पेपरची अभिधा आपल्या नावाशेजारी हे पत्र लावत असून २२ पृष्ठांच्या पत्राची किंमत १५ सेंट आहे.

**नवीन राष्ट्रीय उत्थापन :**

सिंगापूर हे शहर इंग्रजी, चायनीज् व तमीळ आणि मलायी या मातृभाषा असलेल्यांचे आगर. त्यामुळे विविध भाषेतील वृत्तपत्रे या चिमुकल्या प्रदेशात पहावयास मिळतात. अलीकडेच चार वर्षांपूर्वी 'ईस्टर्न सन' या नावाचे दैनिक कुआलालंपूर व सिंगापूर येथून प्रसिद्ध होऊ लागले. त्याचे कार्यकारी संचालक श्री. दातो औ कौ हे चिनी गृहस्थ आहेत. 'स्वतंत्र राष्ट्रीय दैनिक' असल्याचा निर्वाळा हे पत्र नावाशेजारी देत असते. १६ पानांच्या या पत्राची किंमत १५ सेंटस् असून मलाया व सिंगापूर येथे जे नवीन राष्ट्रीय उत्थापन चालू आहे त्याला या दैनिकाचा पाठिंबा आढळतो.

माझ्या सागरी सफरीतील सीलोनमधील पत्रातील काही अनुभव ह्या ग्रंथातील पाचव्या भागात विस्ताराने दिले असल्यामुळे तत्संबंधी येथे काही लिहीत नाही. एकंदरीत अति-पूर्वेकडील देशांतही वृत्तपत्रांची प्रगति चांगल्या प्रकारे होत असल्याचे आढळले. साक्षरता तसेच जीवनमान यांचेमध्ये जशी सुधारणा होत जाईल त्या प्रमाणात वृत्तपत्रेही जास्त भारदस्त पण डौलदार निघू शकतील ही अपेक्षा !

## उद्‌बोधक व मनोरंजक

# पॅ रॅ मा उं ट प्र का श ने

### कादंबऱ्या

| | | |
|---|---|---|
| स्थित्यंतर | नामांकित लेखक सप्तक | किं. रु. ३–०० |
| पुनर्जीवन | सौ. कुमुदिनी रांगणेकर | ,, २–५० |
| वैजयंती | श्री. सुरेश शर्मा | ,, २–५० |
| बालयोगी | कै. चिं. वि. जोशी | ,, ३–०० |
| माणुसकीचे मोल | श्री. दत्ता जी. कुलकर्णी | ,, २–५० |
| रोगी डॉक्टर | श्री. दत्ता जी. कुलकर्णी | ,, ३–०० |
| संम्मीलन | श्री. दत्ता जी. कुलकर्णी | ,, ४–०० |
| सूडाची पूर्ति | श्री. रतनलाल डी. शहा | ,, ३–५० |
| उघडें सत्य | श्री. श्रीपाद काळे | ,, ४–०० |
| परिवर्तन | श्री. श्रीपाद काळे | ,, ३–०० |
| कळी उमलते आहे | श्री. मनोहर देखणे | ,, ३–०० |
| अंकूर | सौ. शैलजा राजे | ,, ४–५० |
| आभास | सौ. शैलजा राजे | ,, ५–०० |

### काव्य-नाटिका-प्रवासवर्णन

| | | |
|---|---|---|
| गीत कुणाल | प्रा. योगेश्वर अभ्यंकर. | |
| माझे स्वप्न होते एक | श्री. मनोहर देखणे | ,, २–०० |
| चारमिनार | सौ. वसुंधरा पटवर्धन | ,, २–५० |
| स्पर्धेचा निकाल | सौ. कुमुदिनी रांगणेकर | ,, ०–७५ |
| रेशमी पाश | सौ. कुमुदिनी रांगणेकर | ,, ०–७५ |
| त्रिसुपर्ण | कै. प्रा. चिं. वि. जोशी | ,, १–५० |
| ना. तु. बाग (विनोदी लेखसंग्रह) | श्री. ना. तु. ठाकूर | ,, ५–०० |
| श्री मोरया गोसावी यांचें चरित्र | श्री. ग. वा. देव | ,, १–७५ |
| जपान व अतिपूर्वेकडील देश | श्री. ना. तु. ठाकूर | |


'उद्योग व्यापार' ( खंड १ ते १२ )

व्यापार, उद्योग इत्यादि विषयांवर माहितीपूर्ण लेख व संदर्भ यांचा ज्ञानकोश. पृष्ठें प्रत्येकी २५६ : किं. रु. ३ (९ ते ११ रु.४)

खंड १२ रु. ५

**पॅरॅमाउंट प्रकाशन : ४८१ शनिवार, पुणे ३०.**

फोन नं. ५६३६७




लंगर बिडी

सर्व जनतेची प्रिय

ठाकूर सावडेकर अँड कं. प्रा. लि.

* ३७७ गुरुवार पेठ, पूणे २. *

# जपान व अतिपूर्वेकडील देश

## भाग चवथा

## उद्यमशील जपान

**उद्योगधंद्यातील आघाडी :** आशिया खंडात जपान हा आघाडीवर आहे; एवढेच नव्हे तर आज अमेरिका, पश्चिम जर्मनी सारख्या अग्रेसर देशाबरोबर कारखानदारीमध्यें जपानचा क्रमांक येऊ लागला आहे. साहजिकच जपानचा दौरा करताना त्याचे या क्षेत्रांतील यशाचे मर्म कोणते, हा विचार विशेष बळावतो.

एक काळ असा होता की खेळणी वगैरे जपानी वस्तू अत्यल्प दरांत जगभर विकल्या जायच्या. किंमतीत माफक व दिसायला आकर्षक हे दोन गुण जपानी मालांत प्रकर्षानें आढळत. जगांतील निरनिराळ्या बाजारपेठांचा व स्थानिक गरजांचा अभ्यास करून त्या त्या ठिकाणच्या जनतेला स्वस्त किंमतीत दिखाऊपणानें भूल पाडतील असा माल जपान, त्या त्या बाजारांत आणायचा व ती स्पर्धा बहुतेक देशांना जाणवायची. परंतु या स्पर्धेत मालाचा दर्जा बेताचा म्हणून जपानी मालाबद्दल त्याच्या तकलुपीपणामुळें एक प्रकारचें हलकें मत विद्यमान होते.

दुसऱ्या महायुद्धात दोस्त राष्ट्रांच्या विजयामुळे अमेरिकेचे वर्चस्व जपानवर आल्याने जपानमधील कारखानदारीनें नवे स्वरूप धारण केले आणि मालाचा दर्जा ही आंतरराष्ट्रीय व्यापारांत सर्वांत महत्त्वाची बाब असल्याचें या देशाला कळून आले. या गेल्या दोन तपांत विविध प्रकारच्या मालामध्यें उच्चगुण व योग्य किंमत यात जपाननें आघाडी मारली असून अमेरिकेलाही ‘ शिष्यात् इच्छेत् पराजयम् ’ असे म्हणण्याची पाळी आली.

**प्रमुख शहरांची पाहणी :** जपानमध्यें उद्योगवृद्धीची पाहणी करण्यास तसे म्हटले तर मला बेताचाच काळ मिळाला. तरीपण टोकिओ, ओसाका,

हिरोशिमा, टोकोयामा, फुकुयामा, क्योटो, योकोहामा इ. शहरांतून माझा जो संचार झाला त्यामुळे पुष्कळशी सामग्री मिळवू शकलो.

नैसर्गिक दृष्ट्या कारखानदारी व विविध उत्पादनास आवश्यक अशा कच्च्या मालाच्या निपजीच्या दृष्टीने अत्यंत प्रतिकूल परिस्थिती असतानाही जपाननें तीव्र दीर्घोद्योगानें आणि कल्पकतेनें मात केली. तसेच भूकंप, तुफानी प्रलय इत्यादींनी नेहमी उपसर्ग होत असतानाही जपानी जनतेचा धीर डळमळत नाही ही सुद्धा उल्लेखनीय गोष्ट होय.

जपानचा परदेशाशी निर्यात व्यवहार उत्तरोत्तर वाढतच आहे. १९६६ सालीं जपानी मालाची निर्यात ९७,८०० लक्ष डॉलर्स होती तर त्यापुढील वर्षांत ती १,००,००० लक्ष डॉलर्स पर्यंत गेली. आयातीचे बाबतीत १९६६ सालचा आकडा ९५,२०० लक्ष डॉलर्स इतका होता. एकंदर जगांतील व्यापाराचे निरीक्षण करता असे आढळते की निर्यात सरासरीनें ९ टक्के वाढत आलेली आहे. त्या मानाने जपानची निर्यात १५ टक्के या वेगानें वाढल्याची आढळते त्यावरून प्रगतीचा आलेख कसा चढत आहे हे समजेल.



टोकिओ स्टेशनवर श्री. ना. तु. ठाकूर प्रभृतींचे करण्यात आलेले स्वागत
( १-९-१९६८ )

**आयातीपेक्षा निर्यात वाढली :** १९६५ मध्ये प्रथमच जपानची निर्यात आयातीपेक्षा जास्त झाल्याने आंतरराष्ट्रीय व्यापारांत देशाची परिस्थिती मजबूत झाली.


जपानच्या परदेशाशी निर्यातींत अलीकडे अवजड उत्पादन तसेच रासायनिक विविध तऱ्हेचा माल प्रामुख्याने आढळतो. १९६६ साली अवजड मशिनरींची निर्यात एकंदर निर्यातीच्या ३० % पर्यंत गेली, तरी तींत जपान परदेशाकरता जहाजे बांधतो त्यांचा समावेश केलेला नाही. मशिनरीची निर्यात १९६५ साली २८% होती ती पुढे ५३ % पर्यंत गेली आहे. नवीन यंत्र-सामग्रीत, ऑफीससाठी लागणारी यंत्रे, तसेच धातु शुद्ध करण्याकरता लागणारी मशिनरी यांचाही समावेश झाला आहे. आयात करीत असलेल्या मालाचें ७० % स्वरूप कच्च्या सामग्रीचें आहे, हे पाहिले म्हणजे जपानच्या व्यापारी धोरणावर प्रकाश पडतो.

जपानच्या मालाकरिता परदेशीय बाजार पेठांत पहिला क्रमांक साहजिकच अमेरिकेचा येतो. युनायटेड स्टेटसला १९६९ साली जपानने २९,६९० लक्ष डॉलर्स किंमतीचा माल पाठविला. जपानच्या एकंदर निर्यातीत या मालाची किंमत सुमारे ३० % भरते हे लक्षांत ठेवण्यासारखे आहे.

शिवणाची यंत्रे, कॅमेरे व मोटार सायकल्स यांनाही अमेरिकेत मोठे गिऱ्हाईक आहे. अमेरिकेनंतर ज्या परदेशांना जपानचा माल विशेष जातो ते देश येणेप्रमाणे—हाँगकाँग, कोरिया, लायबेरिया, चीन, थायलंड, ऑस्ट्रेलिया व फिलिपाईन्स. दक्षिण पूर्व आशियातील देशांना १९६५ नंतर जपानचे निर्यातीमध्यें ४१% वाढ झाली. व्हिएटनाम युद्धामुळें जी सार्वत्रिक तेजी आली तिचाही तो परिणाम असावा.

**सार्वत्रिक महागाई :** जपानमधील परदेशी प्रवाशांना पदोपदी जाणवणारी गोष्ट म्हणजे महागाई. शिवाय भारतातून जपानसारख्या देशांना जाणाऱ्या प्रवाशांचा खिसा जवळजवळ मोकळाच असल्यानें बाजारांत फेरफटका मारताना खरेदीचा उद्देश न ठेवलेला बरा. परदेशी प्रवाशांसाठी 'कस्टम ड्यूटी माफ' अशा जाहिराती सर्वत्र आढळल्या तरी तशा 'करमाफ' वस्तूच्या किंमतीही भरपूर !

आपल्या रुपयांत तेथील येनच्या हिशेबानें मालाच्या किंमतींचा जेव्हां जेव्हां मी कयास केला तेव्हा तेव्हा भारतापेक्षां सदर चीज महाग वाटली.



वाकासाकी या टोकिओचे उपनगरात
भाषणाचे ऐन रंगात आलेले श्री. ठाकूर ( दि १–९–६८ )

शिवाय सुमारे २। रुपयांना १०० येन असा हुंडणावळीचा भाव असल्यानें ३।४ आकड्यातील किंमत मानसिक दृष्ट्याही एकदम मोठी वाटायची. नापित, धोबी, चर्मकार, टॅक्सीवाले इत्यादी नित्याचा संबंध येणाऱ्या मंडळींची मजूरी इकडच्या मानाने नेहमीच जास्ती वाटे. या महर्गतेचें एक कारण जपानी जनतेचें

वाढलेले उत्पन्न हे असल्यानें लंकेत सोन्याच्या वीटा असाच दाखला येतो.

**मुख्य अन्न–तांदूळ व मासे :** जपानी लोकांचें मुख्य अन्न तांदूळ व मासे हे असल्यानें त्यांच्या किंमती हे अन्न खर्चातील महत्त्वाचें अंग ठरते. त्यामुळे तांदुळाच्या भावावर सरकारचे नियंत्रण असते, व राईस कौन्सिल सदर किंमती ठरवून देते. तांदळाचा उत्पादक शेतकरी वर्ग हा धान्य व अन्य मालाचा मोठा ग्राहक असल्यानें त्याच्या मालाला येणाऱ्या किंमतीवर त्याची सुबत्ता अवलंबून असते आणि हा वर्गच देशांतील ग्राहकोपयोगी वस्तूंचे प्रमुख गिऱ्हाईक असल्यामुळें त्याच्या भरभराटीवर अंतर्गत बाजारपेठेची तेजी अवलंबून रहाते. साधारण शेतकरी कुटुंबाचें दरमहा उत्पन्न रुपये २ हजाराच्या घरांत जपानमध्यें जात असल्याने अद्ययावत शेतीच्या उपकरणे व यंत्रे याखेरीज त्याचें जवळ आधुनिक गरजा भागविण्यासाठी मोटार, रेडियो, टेलिव्हिजन सेट, रेफ्रिजरेटर इत्यादींची सज्जता असते. जपानच्या उद्योग धंद्यांना ही घरची बाजारपेठ यामुळें महत्त्वाची ठरते. पाश्चात्यांच्या मानानें जपान्यांचें अन्न पुष्कळसे साधे असते. जपानी आहारांत ६५% कॅलरिज तांदुळासारख्या पिष्टमय पदार्थांतून मिळतात. प्राणिज पदार्थांचे प्रमाण जेमतेम १०% भरते. अलिकडे या बाबतीत जास्त सुधारणा होऊ लागली आहे. गेल्या पंधरा वर्षांत १४ वर्षांपर्यंतच्या मुलांची उंची ११ सें. मी. ने वाढली असून मुलींच्या बाबतीत ते प्रमाण ७ सें. मी. इतके झाले आहे. पाश्चात्यांच्या संसर्गानें अनावश्यक खाद्य पेयांचा खपही वाढलेला दिसतो. १९६० च्या मानानें ४ वर्षांनी जपानमध्यें व्हिस्कीचा खप दुप्पट झाला तर १९६४ सालीं बीअर २॥ पट खपली. अल्कोहोल युक्त पेयांच्या प्रचंड ब्रूअरिज, तीन चार तरी जगप्रसिद्ध कीर्तिच्या अशा जपानमध्ये आहेत. आणि त्यातून निर्माण झालेली पेये अमेरिका, आणि अतिपूर्वेकडील देश या मध्यें प्रचंड प्रमाणांत खपतात. वस्त्र प्रावरणांच्या बाबतीतही वाढत्या प्रमाणावर जनतेच्या गरजा पुरविल्या जात आहेत. गेल्या दहा वर्षांत कापड व कपड्यांचा पुरवठा जवळ जवळ दुप्पट झाल्याचे आढळते. तयार कपड्यांचा खपही चांगल्या प्रकारे वाढत असून मोठमोठ्या शहरांतील डिपार्टमेंटल स्टोअर या बाबतीत आघाडीवर आहे.

**डिपार्टमेंटल स्टोअर्स :** जपानच्या शहरी जीवनांत डिपार्टमेंटल स्टोअर्स यांना महत्त्वाचें स्थान आहे. ७–८ मजली इमारतींत प्रशस्त हॉलस मधून आपणाला हवी ती चीज मिळण्याची व्यवस्था पद्धतशीर रीतीनें केलेली आढळते.

हिरोशिमा, फुकुयामा, ओसाका, टोकिओ इत्यादि शहरातील कितीतरी बाजारांना मी भेटी दिल्या. या उंच उंच इमारतीतून सर्वत्र एस्केलेटर्सची सोय असल्यामुळें न दमता हव्या त्या मजल्यावर खरेदी करता येते. त्यातून गिऱ्हाइक दमल्या भागल्यास विश्रांती गृहाचीही सोय असल्यामुळें तेथेच त्याला खाद्यपदार्थांवरही ताव मारता येतो. प्रत्येक दालनांत दोनतीन चलाख मुली त्या त्या वस्तूंचा विभाग सांभाळतात. सर्वच वस्तूवर किंमतीचे इंग्रजी व जपानी तून लेबल असते व किंमती ठराविक असल्यानें घासाघीस होऊं शकत नाही. शिवाय आपणाला हवी असलेली वस्तू त्या विभागांत प्रदर्शित केलेली नसेल तर ती नाही असे समजावयाचे, त्यामुळें विचारपूस करण्याचे कारणच रहात नाही. निवड झाली की दोन मिनिटात कॅश मेमो तयार आणि तेथल्या तेथेच वस्तू पॅक करून हातात दिली जाते. आपल्याकडे साध्या स्टोअर्स मध्येही टोकन, व्हाउचर व शेवटच्या ठिकाणी पार्सल असा आढळणारा त्रिस्थळी प्रकार या प्रचंड बाजारातून आढळत नाही. याला एक कारण जपानमध्ये सामान्यतः आढळणारा प्रामाणिकपणा व दानत. आपल्याला येथे दुकानदाराला अमुक वस्तू असल्यास दाखव असे विचारण्याची सवय ! जपानमधील स्टोअर्समध्येही मी या सवयीप्रमाणे विचारणा करी तेव्हा माझे मित्र सांगत कीं येथे तुला त्या दिसत नाहीत, तर त्या नाहीत असे समजून चालावे. जपानमध्यें अशा स्टोअर्सच्या साखळ्या सुप्रसिद्ध आहेत, व एकेका साखळीचें ८–१० शहरांतून स्टोअर्स समाधानकारक रीत्या चाललेले आढळतात. त्यातील मालाच्या किंमती माफक म्हणता आल्या नाहीत तरी वाजवीपेक्षा जास्त नसतात हेहि तितकेच खरे.

गेल्या दहा वर्षांत जपानमध्यें कृत्रिम धाग्याच्या कापडाचा खप ५ पट वाढला आहे आणि त्या मानानें कापसाचा उपयोग कमी झाला आहे. अन्न व वस्त्र या बाबतीत जपानी जनता समाधानी दिसत असली तरी निवासाचे बाबतीत शहरांतून घरटंचाईचा प्रश्न आ वासून उभा असल्यानें लोकांची मोठी कुचंबणा चाललेली दिसते. सरकारनें आपल्याकडच्या धर्तीवर हाउसिंग बोर्ड्स स्थापन केलेले आहेत परंतु त्यांचे कडून उभारली जाणारी घरे म्हणजे दर्यामें खसखस म्हटली पाहिजेत. जमिनीच्या किंमती भरमसाठ वाढल्या असून इतर वस्तंच्या किंमतवाढीचे मानानें त्यांचा वाढवा ६० पटीपेक्षा जास्त झालेला दिसतो. यामुळें "कुटुंबागणिक घर" अशी निवडणुकीतील

घोषणा लोकप्रिय पक्ष करीत असला तरी ती सिद्धीस जाण्याची शक्यता अल्प.

**दरडोई राष्ट्रीय उत्पन्न :** गेल्या काहीं वर्षांत जपानची आर्थिक भरभराट झपाट्याने झाली असून दरडोई राष्ट्रीय उत्पन्न सालिना ४६५ डॉलर्सच्या वर गेले आहे हे समाधानकारक समजले पाहिजे. भाराचें दर माणशी याच कालांतील उत्पन्न ६२ डॉलर पर्यंत जेमतेम जातें हा विकासातील विरोध लक्षात येण्यासारखा आहे. आशिया खंडांत जरी सुबत्तेच्या बाबतीत जपानचा पहिला क्रमांक लागत असला तरी अमेरिका व युरोपमधील सुधारलेली राष्ट्रे पहाता त्या मानानें जपान मागेच येतो. राष्ट्रीय दरडोई उत्पन्नाचे पुढील ताजे आकडे वाचकांना उद्‌बोधक वाटतील :—

( आकडे डॉलरमध्ये )

| | | | |
|---|---|---|---|
| भारत – | ६२ | बेल्जिअम – | १११७ |
| पाकिस्तान – | ७१ | फ्रान्स – | ११७५ |
| इजिप्त – | १३० | ब्रिटन – | ११८६ |
| पोर्तुगाल – | २६१ | प. जर्मनी – | १२४८ |
| ग्रीस – | ३८५ | डेन्मार्क – | १२७० |
| जपान – | ४६५ | कॅनडा – | १५२२ |
| इटली – | ६२३ | स्वित्झर्लंड – | १५८३ |
| ऑस्ट्रिया – | ७७४ | स्वीडन – | १७०३ |
| नेदरलँड्स – | ९११ | युनायटेड स्टेटस – | २४१३ |
| नॉर्वे – | ११०१ | | |

वरील माहितीवरून भारताला अजून केवढी मजल गाठायची आहे, याची कल्पना येईल.

**शेतीवर भार कमी :** आज जपानमध्यें सुमारें ५५,००,००० शेतकरी कुटुंबें सुमारे ६० लक्ष हेक्टर्स जमिनीत लागवड करीत असतात. गेल्या ७-८ वर्षांच्या आढावा घेतला तर शेतकरी कुटुंबांची संख्या उत्तरोत्तर कमी होत असून शेतीकडून निवृत्त होणारी मंडळी औद्योगिक क्षेत्रांत गुंततांना दिसतात. भारताप्रमाणें या देशातही कांही काळ उद्योगधंद्यांत व कांहीं वेळ शेतीकडे काम करणारे लोक आढळतात. उत्तरोत्तर शेतीकडेच सर्व वेळ घालणाऱ्यांची संख्या कमी होत चालली आहे. एक वेळ अशी येईल की शेतकऱ्यांची लोकसंख्या एकूण जनसंख्येच्या ३० टक्क्यापेक्षां खाली जावी. त्याचा दृश्य परिणाम

लागवडीखालील जमिनीवरही दिसू लागला असून देशांतील एकंदर भूभागाची १६·२ टक्के एवढीच जमीन सध्या शेतीखाली असल्याचें दिसून येतें.

परंतु शेत जमीन कमी होत असली तरी आधुनिक पाणी पुरविण्याचें तंत्र, भरपूर खतें, यामुळें जपानचे शेतीच्या मालाचें उत्पादन वाढत आहे व ते आता ५५५५० लक्ष डॉलर्स पर्यंत गेलें आहे.

जपान अन्नधान्याच्या बाबतीत कांही प्रमाणांत परदेशावर अवलंबून आहे, आणि त्यामुळे उत्तरोत्तर अन्नधान्याच्या किंमती वाढतच राहिल्या आहेत. आठदहा वर्षांपूर्वी सुमारे ९००० लक्ष डॉलर्स इतक्या किंमतीच्या शेतीच्या मालाची जपान आयात करीत असे. आता तो आकडा २०००० लक्ष डॉलर पर्यंत गेला असून जपानच्या एकूण आयातीच्या २५% एवढी ही रक्कम होते. विशेषतः गहू, तांदूळ, सोयाबीन, मका, कॉफी, केळी इत्यादि आयातीत मोडतात. त्यामुळे ५ वर्षांत खाद्य पदार्थांचे किंमतीत ४० ते ५० टक्के वाढ झाल्याचें आढळतें.

शेतकऱ्याचे उत्पन्नात एकंदरीत वाढ झाली असली तरीही उद्योग-धंद्यांत गुंतलेल्याच्या मानानें त्याचें उत्पन्न ३१% वर जात नाही. अजूनही जपानमध्ये छोट्या कुटुंबांची लहान प्रमाणावर शेती करण्याची प्रवृत्ती आढळते.



शिंको इंडस्ट्रीज कामगाराना निरोप देताना ( दि. २–९–६८ )

शेतीचे आधुनिकीकरण करणे व उद्योगधंद्यात शेतीला स्थान मिळवून देणे असा कार्यक्रम नियोजकांच्या डोळ्यापुढे आहे.

**हेवा वाटणारी परिस्थिति :** जपानच्या आर्थिक परिस्थितीचें साधारण विवेचनानंतर कांहीं विशिष्ट कारखानदारीबद्दल व एकंदर औद्योगिक सृष्टी बद्दल विवेचन करणे अस्थानी होणार नाही. जपानची औद्योगिक वाढ अत्यंत झपाट्याने होत आहे. दुसऱ्या महायुद्धानंतर शांततेचा काल या देशाला लाभला आणि संरक्षणखर्चांची हमी व जबाबदारी अमेरिकेने घेतल्यामुळे जपानची आर्थिक क्षेत्रांत हेवा वाटण्यासारखी स्थिती प्राप्त झाली.

जपानचे औद्योगीकरण विविध क्षेत्रांत प्रगत झाल्याचें आढळून येईल. १९६० पासून गेल्या ७–८ वर्षांत खाणीच्या उद्योगांत जपाननें उत्पादन दुप्पट वाढविल्याचें आढळून येते. वार्षिक वाढ ११·७% इतकी दिसते. याउलट युरोप, व अमेरिका यामध्यें ती ३ ते ७ टक्क्यांपर्यंत झालेली आहे.

**अवजड यंत्रें व रसायनें :** युद्धानंतर जे नवीन तंत्रज्ञान उपयोगात आले, त्यामुळें अवजड उद्योग तसेच रासायनिक उत्पादन यामध्ये मोठीच वाढ झाली. १९५७ सालीं अवजड मशिनरी व रसायनें यांची निर्यात ४०·५ टक्के एवढी होती. तर १९६५ सालीं ती ६० टक्क्यांवर येऊन ठेपली. ह्या विभागांत फार मोठी स्पर्धा असूनही जपाननें युनायटेड स्टेट्स वगळल्यास इतर देशांच्या पुढे पाऊल टाकले आहे.

जपानमध्यें परदेशी भांडवलाला फार मोठ्या प्रमाणावर वाव देण्यांत आला. १९६४ अखेर परदेशी व जपानी भांडवल अशा संयुक्त सहकार्याने चालविलेले सुमारे ५७५ कारखाने अस्तित्वात होते व ती प्रवृत्ती उत्तरोत्तर वाढतच आहे. साहजिकच अशा भरपूर भांडवलाच्या कारखान्यांची स्पर्धा पूर्ण स्वदेशी कारखान्यांना जाणवते. वाढत्या स्पर्धेला तोंड देण्यासाठी बड्या कारखानदारांचे गट अस्तित्वात येणे साहजिकच झाले. मित्सुई, मित्सुबिशी, सुमिटोमो, फुरुकावा व कावासाकी हे कांहीं गट उदाहरणार्थ देता येतील.

जपाननें औद्योगिक मशिनरीच्या उत्पादनात आघाडी मारली असून सुमारें २३० कारखाने याप्रकारच्या उत्पादनांत गुंतलेले आढळतात. १९५७ ते ६४ या कालांत असें उत्पादन २६% नें वाढलेले आढळते. १९६७ सालासाठी जपानला एकूण ३०३९० लक्ष डॉलर्स किंमतीच्या मालाच्या उत्पादनाच्या


ऑर्डरी मिळाल्या होत्या.१९६७ साली या क्षेत्रांतील उत्पादन सुमारें २३६४० लक्ष डॉलर्स इतके झाले.

आधुनिक सुधारलेले परदेशी तज्ञांचें तंत्र हस्तगत करून घेण्यास जपान सदैव तयार असतो. परदेशी सहकार्यानें या क्षेत्रांतही संयुक्त कंपन्या २० वर स्थापन झालेल्या आढळतात. कॅटरपिलर मित्सुबिशि लि; कोमात्सु इंटर नॅशनल मॅन्यु. कं., आणि हिताची–बॅब्रकॉक कं. ही तीन उदाहरणें वानगी-दाखल देता येतील. औद्योगिक यंत्र सामग्रीच्या नंतर अवजड वीज मशिनरीचा क्रमांक लागतो. हायड्रो इलेक्ट्रिक जनरेटर्स हे जपानी उत्पादन सर्वोत्कृष्ट ठरलेले आहे. हिताची, टोकिओ शिबाउरा इलेक्ट्रिक, मित्सुबिशी इलेक्ट्रिक, फूजि इलेक्ट्रिक, मैदेशा इलेक्ट्रिक, शिंको इलेक्ट्रिक व ओसाका ट्रान्सफॉर्मर ह्या काहीं पुढारलेल्या कंपन्यांची नांवे या क्षेत्रांत देण्यासारखी आहेत.

ह्या क्षेत्रांत कारखाना उभारणीसाठी भांडवल पुष्कळच लागत असल्या-मुळें नवीन कुणाला आणखी कारखाना उभारणें अशक्यप्राय होते.

न्यूक्लिअर क्षेत्रात जपानी कारखान्यांनी कांहीं प्रगती केली असली तरी युद्धाच्या उपयोगासाठी या शक्तीचा वापर होण्याचा संभव असल्यामुळें अमेरिका जपानला त्या क्षेत्रांतील गूढविद्या सहजासहजी देत नाही. त्यामुळें जपान सरकारनेच १९६७ साली पॉवर रिॲक्टर व न्यूक्लिअर डेव्हलेपमेंट कॉर्पोरेशन स्थापन केली.

**गृहोपयोगी वीज उपकरणे :** १९६६ सालांत गृहोपयोगी विजेच्या उपकरणांचें उपादन जपानमध्यें १९९४० लक्ष डॉलर्स इतके झाले. एकंदर वीज उपकरणांच्या मालाचें उत्पादनाच्या ३६% इतके हे उत्पादन भरते. गृहोपयोगी वीजउपकरणांचा धंदा किफायतशीर आढळतो. त्या क्षेत्रांतील बहुतेक कंपन्या मंदीच्या काळांत सुद्धा १०% वर नफा वाटीत आल्या आहेत. सोनी या कंपनीचा नफा तर यापेक्षाही जास्त सातत्यानें दिला जातो. टोकिओ येथे गिंझा विभागांत सोनी बिल्डिंग्ज हे या कंपनीचें कायमचें आकर्षक प्रदर्शन झाले आहे. टोकियोला आलो त्याच दिवशी आमचे मित्रांनी हे सात आठ मजली मनोवेधक प्रदर्शन पाहण्याची संधी दिली. टेपरेकॉर्डर्स, ट्रॅन्झीस्टर्स, टेलिव्हिजन सेट्स, इलेक्ट्रिक अप्लायन्सेस; एक ना दोन कितीतरी मनोवेधक उपकरणें येथे पहावयास मिळतात. परंतु त्यांची बनावट कोणत्या



**ओसाका येथे भाषण करताना श्री. ठाकूर. त्यांच्या शेजारचे श्री. नाकायामा जपानीतून भाषणाचा अनुवाद करीत आहेत.**

तत्त्वावर केली जाते, याचे ज्ञानही प्रेक्षकांना सहजासहजी होते. सर्व दालने पाहताना वेळ कसा निघून गेला हेच समजत नाही. गृहोपयोगी विजेच्या उपकरणांची निर्यात १९६६ साली ६५३० लक्ष डॉलर्स एवढी झाली. या उपकरणांच्या उत्पादनांत फार काळजीपूर्वक लक्ष कामगारांस घालावे लागत असल्यामुळें कित्येकदा कामगार त्याची बनावट घरी करताना आढळतात. रेडिओ व ट्रॅन्झिस्टर्स या बाबतीत जपानचा हात धरणें अवघड. युनायटेड स्टेटस व इतर पाश्चात्य देशांच्या मानानें जपानमधील कामगारांचें वेतन बेताचे असल्यामुळें या क्षेत्रांत हा देश चांगलीच स्पर्धा करू शकतो. रंगीत टेलिव्हिजन सेट्स देशात व परदेशांत मोठ्या प्रमाणावर खपतात. १९६५ साली अशा लक्ष सेट्सची निर्मिती झाली. तर त्या पुढच्याच वर्षात त्यांची निपज ५ लक्ष १० हजार सेट्स वर गेली. निर्यातीपैकी निम्म्यावर सेट्स युनायटेड स्टेट्स कडे गेले हेहि लक्षात घेण्यासारखे आहे. ६७ सालीं ११ लाखांच्या वर सेट्स तयार झाले हा या उत्पादनांतील उच्चांक समजायला हवा. भारत सरकार

प्रस्तुत क्षेत्रांत ज्ञान मिळविण्यासाठी जपानला मुद्दाम कांहीं विद्यार्थी पाठविते ते योग्यच होय. मला या देशांतील प्रवासात असे २–३ विद्यार्थी तरी भेटले. दळणवळणाची उपकरणे, उदाहरणार्थ वायरलेस सामग्री, टेलिफोन सामग्री-इत्यादींचे क्षेत्रांतही जपान मागे नाही. हा अत्याधुनिक असा उद्योग असल्यानें मंदीचाही त्यावर परिणाम होत नाही. १९६२ सालीं या क्षेत्रांतील मालाचे उत्पादन सुमारे ८८१० लक्ष डॉलर्स इतके होते. तर चार वर्षांनी ते सुमारे १६८४० लक्ष डॉलर्सपर्यंत गेले. ह्या वाढीचें एक कारण म्हणजे ' निपॉन टेलिग्राफ ॲन्ड टेलिफोन पब्लिक कार्पोरेशनची ' प्रत्यही वाढणारी सामग्री साठी मागणी. जपानमध्यें तालुक्याच्या गावीसुद्धा जवळजवळ प्रत्येक दुकानांत व घरांत टेलिफोन आढळतो. दुकानाचे पाटीवर नांवाप्रमाणें फोननंबर ही कायम दिसणारी बाब होय. डायरेक्ट डायलिंग दूरदूरच्या शहरांमधून सुलभ केले असल्याने दळणवळण सोयीचें झाले आहे, व कनेक्शनही ताबडतोब मिळते असा अनुभव आला. सुप्रसिद्ध उद्योगपती श्री म स. पारखे यांना टोकियोहून ९०० मैलांवर लांब असलेल्या ताबूसे येथे माझ्याशी अगदी अल्पावधीत टेलिफोनवरून संपर्क साधता आला यामुळे मी थक्कच झालो.

तात्पर्य या दळणवळणाच्या सामग्रीत सरकारी मागणी ७० % इतकी रहाते त्यामुळें उत्पादन झपाट्याने वाढले आहे. १९६६ सालीं सुमारें २७३० लक्ष डॉलर्स या किंमतीची दळणवळणाची सामग्री जपानहून परदेशांना निर्यात झाली.

कॉंप्युटरच्या क्षेत्रांतही जपाननें प्रवेश केला असून सहा मोठाल्या कंपन्या परदेशी कंपन्यांशी स्पर्धा करीत आहेत. जपानची आता इलेक्ट्रॉनिक कॉंप्यूटरच्या उत्पादनांत प्रगती झपाट्यानें होत असून, लवकरच जपान ते निर्यात करू शकेल असा अंदाज आहे.

**जहाजे बांधण्याचा उच्चांक** : जहाजे बांधण्याच्या क्षेत्रात जपानचा पहिला क्रमांक जागतिक दृष्ट्या अजून कायम आहे. १९६६ साली जपाननें ७६७ जहाजे समुद्रांत सोडली. त्यांचे ६६,८५,००० टनेज झाले. १९५६ सालीं जपाननें १७,५०,३०० टन वजनांची जहाजे तयार केली आणि त्यानंतर ११ वर्षे ही प्रगति पद्धतशीरपणें होतच राहिली.

वरील ७६७ जहाजांपैकी २९,९०,००० टनांची १८२ जहाजे परदेशांतील मागणीवरून तयार करण्यांत आली. जपानमध्यें सुमारें ३८०

शिपयार्ड्स असून तेथे जहाजे बांधण्याचें काम करण्यात येते. यापैकी ३० यार्ड्स विस्तृत आहेत व तेथे रोजी हजारांवर कामगार काम करतात. ही शिपयार्ड्स मोठमोठ्या कारखानदारांच्या मालकीची आहेत. याच वर्षी पश्चिम जर्मनीनें ११,८४,००० टन, व इंग्लंडनें १०,८४,००० टन इतक्या वजनांची जहाजे निर्माण केली. हे पाहिले म्हणजे ह्या दोन्हीही देशांना जपानच्या बरोबरीला येणे अशक्यप्राय होईल हे स्पष्ट होते.

प्रचंड भांडवलावर मोठ्या सामग्रीनें मोठाली जहाजे बांधण्याचा कार्यक्रम व त्यातील धोका पत्करल्यानें जपाननें या क्षेत्रांत भलतीच आघाडी मारून ठेवली आहे. अलिकडील या संबंधातील प्रगतीचें सूत्र टोलेजंग जहाजे बांधणे या शब्दांत सामावले आहे. जहाजे बांधण्याच्या उद्योगात मित्सुबिशी हेवी इंडस्ट्रीज, इवशिकाजिमा-हरिमा हेवी इंडस्ट्रीज, हिताची शिप बिल्डिंग, मित्सुई शिप बिल्डिंग इ. प्रचंड कंपन्या अग्रेसर आहेत. १९६६ च्या डिसेंबरमध्यें जपाननें जगातली सगळ्यांत मोठी टँकर बोट इडेनूमित्सु मारु ही २ लक्ष १० हजार टन वजनांची बांधून विक्रम प्रस्थापित केला आणि तेव्हांपासून तेलकंपन्या व अन्य बोट कंपन्यांकडून मोठमोठ्या टँकरकरता जपानकडे मागण्या येऊन थडकल्या. सध्या जपानच्या जहाज बांधणाऱ्या कंपन्यांना बेसुमार ऑर्डरी येत असतात. भारताच्याही जपानकडे कांही आर्डरी नोंदल्या असल्याचे वाचकांना माहीत असेलच. अशा प्रकारची मोठाली जहाजे बांधण्यास ज्या प्रचंड गोद्या लागतात तशा जपानमध्ये मुख्यतः आढळतात. बोटी बांधण्याच्या उद्योगांत जपान अग्रेसर असला तरी तीव्र स्पर्धेमुळे त्या कारखानदारीतील नफ्याचें प्रमाण बेताचेच पडत आहे. जहाजबांधणीच्या कार्यांत नवीन नवीन तंत्र जपान उपयोगात आणीत असल्यानें त्याचा हात धरणे अवघड होते. दुसऱ्या महायुद्धापूर्वी जपाननें जे प्रचंड आरमार तयार केले होते त्याच्या उभारणीतील अनुभवाचा जपानला पुढे व्यापार उद्योगासाठी जहाज बांधणी करताना मोठ्या प्रमाणावर उपयोग झाला; व जपानने या क्षेत्रांत आपले अद्वितीय स्थान टिकवले आहे.

**मोटार उत्पादनांत दुसरा क्रमांक** : जहाज बांधणीच्या उद्योगानंतर दुसरी डोळ्यांत भरण्याजोगी कारखानदारी म्हणजे मोटारींचे उत्पादन. १९६७ सालींच जपाननें जगात दुसऱ्या नंबराचें स्थान या क्षेत्रांत मिळवून सर्वांना

थक्क केले आहे. १९६६ साली २२,८६,३९९ एवढया मोटारगाड्या जपानमध्यें निर्माण झाल्या आणि हा आकडा १० वर्षाच्या उत्पादनाच्या मानानें १० पट मोठा आढळतो. पॅसेंजर गाड्यामध्यें उत्पादनांत सुमारे २७ टक्के वाढ झाली आहे. आज अमेरिकेनंतर मोटारचे उत्पादनांत जपानचें नांव घ्यावें लागतें. सुरवातीला जपानी कारखानदारांना ट्रक्स व मालाची वहातूक करणाऱ्या गाड्यांचे उत्पादनांत विशेष रस होता. परंतु दुसऱ्या महायुद्धानंतर पुढे जेव्हां देशाची आर्थिक भरभराट होऊ लागली, तेव्हां पॅसेंजर गाड्यांना मागणी वाढली व जपानी कारखानदारांनी युरोपांतील कांहीं कारखानदारांशी संगनमत करून ऑस्टिन, रेनॉल्ट, यासारख्या गाड्यांची पैदास सुरू केली.

१९५८-५९ मध्यें टोयोटा मोटार कंपनी, निसान मोटार कंपनी, इसुझु मोटर्स इत्यादी कंपन्यांनी कारखाने उभारले. टोयोकोगो कंपनीनें हिरोशिमा जिल्हयांत १९६६ सालापर्यंत आपल्या कारखान्याची बांधणी पुरी केली. प्रस्तुत कारखान्यास भेट देण्याची संधी मला मिळाली. या कारखान्यांत तयार होणाऱ्या ‘ मझदा ’ नांवाच्या चपळ गाड्या जगप्रसिद्ध आहेत, आणि आटोमॅटिक प्लँटमधून या गाडीचे बरेचसे भाग इतक्या झटपट तयार होतात कीं विस्मय वाटावा. कारखाना पहावयास आमची पंचवीस जणांची तुकडी गेली होती. सुरवातीला कारखान्याच्या प्रमुखांनी कारखान्याच्या विस्ताराची नकाशाच्या



योकोहामा बंदराचे प्रेक्षागृह

सहाय्यानें कल्पना आणून दिली. कांहीं मालाची वाहतूक नदीच्या प्रवाहानें कशी केली जाते, हे पाहिल्यावर काटकसरीची कल्पना येऊन कौतुक वाटलें.

**वेताच्या किंमतींत मोटारी :** दुपारची वेळ असल्यानें आमचेकरतां फराळाच्या पेट्या चालकांनी मागविल्या होत्या, आणि त्यांचा समाचार घेऊन आमच्या तुकडीचे दोन विभाग करून आम्ही मोटार उत्पादनाच्या सर्व क्रिया पाहिल्या. मझदा गाडीची किंमत सुमारे ८-१० हजार रुपयांपर्यंत असूनही ती अत्यंत टिकाऊ आणि कोणत्याही तऱ्हेच्या रस्त्यावर जलद व निर्धोकपणें जाणारी अशी वाटली. कारखान्याच्या जनसंपर्क अधिकाऱ्यांनी आम्हांला दिलेलें मझदाचें मॉडेल अजूनही माझ्या संग्रहीं आहे.

सध्या जपानमध्यें १२ मोटार कारखानदार प्रमुख असून त्यांपैकी १०, पॅसेंजर गाड्या तयार करतात.

आम्ही पाहिलेल्या टोयोकोगोच्या कारखान्यात सहा महिन्यांत १ लक्ष ८२ हजार ८३५ मोटारगाड्या तयार झाल्याचें समजलें आणि उत्तरोत्तर ही संख्या वाढतच आहे. एकेकाळीं फॅमिलिया आणि ल्यूस या नांवाच्या प्रस्तुत कारखान्याच्या गाड्या लोकप्रिय होत्या. तीनचाकी गाड्या करण्यांत हा कारखाना अग्रेसर आहे. तसेच रोटरी मोटारकार इंजिन्सची प्रगती करण्यांत या कारखान्यानें चांगलें यश मिळविलें. टोयोटो आणि निस्सान या कारखान्याप्रमाणें टोकोयोगोनेही मोटार उत्पादनांत विशेष प्रगती केली आहे. होंडा मोटार-कंपनी मोटारगाड्याचे बाबत तितकी पुढारलेली नसली तरी मोटार सायकलच्या बाबतीत या कारखान्याची जागतिक लोकप्रियता असल्यानें त्या नांवाचा उपयोग मोटारींची छोटीं मॉडेल्स लोकप्रिय करण्यांत या कारखान्याला होत असतो.


जपानमध्यें दोनतीन वर्षें वापरलेल्या गाड्यांच्या किंमती फारच कमी आढळल्या. १००० ते १५०० रुपयांत चांगल्या चालू स्थितीतील सेकंडहँड कार मिळू शकते. कांहीं वेळा तर कोऱ्या सायकलीची आणि जुन्या मोटारींची सारखी किंमत पाहून आश्चर्य वाटलें.

**पोलादाचें उत्पादन :** पोलादाचें उत्पादन हा कारखानदारीचा कणा असल्याचें भारतातील नियोजनकर्त्यांनीही मान्य केले होते. जपानचीही पोलादाच्या निर्मितीचे महत्त्वावर निष्ठा आहे. मार्च १९६८ अखेरच्या वर्षात

जपाननें सुमारे ६५० लक्ष टन पोलादाची निर्मिती केली. त्या मागील वर्षी पेक्षा २५ टक्क्याने हें उत्पादन जास्त आहे.

१९६६ साली जगांतील कच्च्या पोलादाचें उत्पादन ४७१० लक्ष टन इतके होते. जपानने यापैकी ४७,७००,००० टन इतक्या निर्मितीचा वाटा उचलला हें त्याला भूषणावह आहे. युरोपीय राष्ट्रांत पश्चिम जर्मनीने १,०२,६५००० टन इतकें पोलाद निर्यात केले. त्याखालोखाल जपानचा नंबर ९८,९५,००० टन या निर्मितीनें लागतो. खुद्द जपानमध्यें कारखानदारी-साठी पोलादाची जरुरी वाढत्या प्रमाणावर भासत आहे. यामुळे परदेशांतून मोठ्या प्रमाणावर मागणी असूनही जपानला पुरेसें पोलाद निर्यात करता येत नाही. वाढत्या प्रमाणावर पोलादाच्या उत्पादनासाठी जपानला अशुद्ध लोखंड, सलोह माती, बीड, इ. सामग्री साहजिकच मोठ्या प्रमाणावर आयात करावी लागतात. १९६७ मध्ये सुमारे १७,००० लक्ष डॉलर किंमतीचा कच्चा माल जपानला ह्या कारखान्यासाठी विकत घ्यावा लागला. भारतही जपानला कच्चें लोखंड मोठ्या प्रमाणावर पाठवितो हें सर्वश्रुत आहे. सुमिटोमो, सकाई, यवाटा इत्यादी पोलादनिर्मितीचे कारखाने अग्रेसर समजले जातात. भारताखेरीज ऑस्ट्रेलिया, दक्षिण अमेरिका इत्यादी देशातूनही जपान कच्चें लोखंड मोठ्या प्रमाणावर विकत घेतो. फक्त धातुमिश्रित माती आणण्याकरता प्रचंड जहाजे जपानने बांधली असून आयातींत खर्च कमी करण्याकडे त्याचे लक्ष आहे. ह्या क्षेत्रातहि स्पर्धा तीव्र असल्यामुळें काही कारखान्यांतून एकीकरणाची प्रवृत्ती सुरू झाली आहे.

**बासष्ट सीमेंट कारखाने :** सिमेंटच्या उत्पादनातही जपान पुढारलेला आहे. बावीस सिमेंट कंपन्यांचे बासष्ट कारखाने अहर्निश सिमेंट उत्पादन करीत असतात. चुनखडी, या देशात विपुल असल्यामुळे सिमेंटसाठी लागणाऱ्या मुख्य कच्च्या मालाकरता जपानला परदेशाकडे पहावे लागत नाही. १९६६ साली ३,७२,७०,००० टन इतके सिमेंटउत्पादन जपानने केले. त्याच वर्षात सोविएट रशियाचें सिमेंट उत्पादन ८,०५,००,००० टन एवढे झाले. युनायटेड स्टेट्सचा दुसरा नंबर ६,३४,२०,००० टनने आला. म्हणजे जपानने ह्या क्षेत्रातही तिसरा क्रमांक मिळविला असून, त्याचे मागोमाग पश्चिम जर्मनी येत आहे. ओनोडा, निपॉन, व सुमिटोमो या सिमेंट कंपन्या उत्पादनात



**टोकिओत कॉलेज तरुण-तरुणींपुढे भाषण करताना श्री. ठाकूर**
**( दि. १।९।६८ )**

अग्रेसर आहेत. जपान सिमेंट निर्यात करीत असला तरी देशातील अंतर्गत मागणी फार मोठी असल्यामुळे परदेशांना निर्मितीपैकी ४ ते ५ टक्के सिमेंट जपान पाठवू शकतो.

हिरोशिमा वगैरे शहरातून काँक्रीटची फिरती टाकी नेणारे मोटर ट्रक पहावयास मिळाले. अशा ट्रकमधून जरूर तेथे स्लॅब वगैरे घालण्याकरता उपयुक्त ठरणारे जीवंत कॉंक्रीट रवाना केले जाते, व यंत्रसामग्री बांधकामाच्या जागी अडकून पडत नाही. जपान निर्माण करतो त्या सिमेंटचा तिसरा हिस्सा हे रेडिमिक्स कॉंक्रिट कारखानदार घेतात ही प्रवृत्ती सूचक आहे. भारतात या प्रकारचा उद्योग चालू केल्यास तो फायदेशीर ठरावा. आज तरी या उद्योगाची परिस्थिती समाधानकारक आहे.

**शीट ग्लासचे उत्पादन :** शीट ग्लास किंवा इमारतीसाठी वापरण्यात येणारे काचेचे तक्ते हा उद्योगही जपानमध्यें पुढारलेला आहे. १९६६ साली काचेचे तक्ते असलेल्या पेट्यांचे उत्पादन १,५३,५८,००० इतके झाले. एका

पेटीमध्ये दोन एम्. एम्. जाडीचे एकूण ९·२९ चौरस मीटर इतके तक्ते असतात. सोविएत रशियात अशा काचेचे उत्पादन १,९०,००,००० इतके झाले. युनायटेड स्टेट्सने १,६८,००,००० पेट्या काढल्या.

या विभागात गाजावाजा झालेले बेल्जमचें उत्पादन १,११,००,००० पेट्यांच्या वर नाही. म्हणजे शीट ग्लासच्या उत्पादनातही जपानचा तिसरा नंबर लागतो, निर्यातीमध्यें त्याचा दुसरा क्रमांक लागतो. शीट ग्लासचे उत्पादनात सिंहाचा वाटा 'असाही ग्लास' या कंपनीचा असून 'निपॉन शीट ग्लासचे' उत्पादन ३६% व 'सेंट्रल ग्लासचे' ९% भरते.

**अलोह धातू निर्मिती :** खाणीचे उत्पादन हा जपानमधील एक महत्त्वाचा उद्योग आहे. गेल्या १० वर्षांत अल्युमिनियम व तांबे या धातूंचे उत्पादन अनुक्रमे ४१० टक्के व २२० टक्के यांनी वाढले आहे. अलोह धातूंचे उत्पादन आणि खप यामध्यें सध्या जपानचा तिसरा क्रमांक लागत आहे. पहिले दोन क्रमांक साहजिकच युनायटेड स्टेट्स व सोव्हिएट युनियन यांचे लागतात.

जगातील विविध देशांच्या उत्पादनाच्या मानाने खाली दिलेल्या धातूंच्या उत्पादनात जपानचा क्रमांक पुढीलप्रमाणे येतो. जस्त २ रा, तांबे ५ वा, ॲल्युमिनियम ५ वा. शिसे ९ वा. या अलोह धातूंना खुद्द जपानी कारखानदारांकडूनच मोठ्या प्रमाणावर मागणी असते. या क्षेत्रांतही जपानच्या खाणीतून उत्पादन बेताचेच होत असल्यामूळे बाहेरून कच्ची खनिजे जपानला आणावी लागतात व त्यासाठी परदेशातून जपानला भांडवलीखर्चेही काही कमी करावा लागत नाही.

अलोह खनिजाचे उत्पादनात होनाहामा स्मेल्टिंग कंपनी, मित्सुबिशी मेटल कंपनी, डोवा मायनिंग कंपनी इत्यादी अग्रेसर आहेत.

**पेट्रोलिअमचा भरपूर वापर :** जगातील लोकशाही राष्ट्रांत युनायटेड स्टेट्स वगळल्यास पेट्रोलिअमचा वापर करणारे जपान हे दुसऱ्या क्रमांकाचे राष्ट्र ठरेल. जपानचे स्वतःचे क्रूड ऑइलचे उत्पादन बेताचेच असल्यामुळे या देशाला परदेशावर मोठया प्रमाणात तेलासाठी अवलंबून रहावे लागते. सध्याच पेट्रोलिअमचा १००० लक्ष किलो लिटर्स यावर खप ह्या देशात वाढला असून, पुढील वर्षाच्या अखेरीस १४०० लक्ष किलो लिटर इतपत तो जाईल. पेट्रोलिअम

शुद्ध करण्याच्या उद्योगातून इतर पेट्रोकेमिकल्सचे उत्पादनही वाढले आहे. नफ्याची निर्मिती वाढून एथिलिन हे पायाभूत पेट्रोकेमिकल एक कोट किलो लिटर एवढे उत्पादिले जाईल. म्हणजे आता गॅसोलिनचे उत्पादन १३० लक्ष किलो लिटर एवढे झाल्याचें आढळते. कमीत कमी किंमतीत क्रूड ऑईल मागवून त्यातून विविध शुद्ध मालांची निपज करावी असे जपानचे धोरण आहे. अजूनही जपानमध्ये हेवी ऑईलला मागणी जास्त आहे. पण उत्तरोत्तर ती प्रवृत्ती कमी होईल अशी अपेक्षा आहे. टोकोयामा ते हिरोशिमा या रस्त्यावरून रात्री प्रवास केला तर पेट्रोकेमिकल्सचे कितीतरी कारखाने झगमगताना दिसतात.

पॉलिथिलिनचे उत्पादनही मोठ्या प्रमाणावर वाढत आहे. पेट्रोकेमिकल इंडस्ट्रीकडे जपानी सरकारचे विशेष लक्ष आहे. ११,५०० लक्ष डॉलर्स एवढया किमतीची पेट्रोकेमिकल्स उत्पादित होऊ लागली आहेत. या क्षेत्रांत मित्सुबिशी, मारुझे, मित्सुई, सुमिटोमो इत्यादी पेट्रोकेमिकल कंपन्या आघाडीवर आहेत. २ वर्षांपूर्वी पॉलिथिलिनचे उत्पादन ५,५०,००० टनावर गेले होते. आणि सध्या ही वाढ चालूच आहे. पॉलिथिलिनच्या विविध उत्पादनांत भरच पडत आहे. पॉलिस्ट्रीनच्या उत्पादनाचे महत्त्व जपान्यांनी ओळखले असून ७ कारखाने त्याचे उत्पादन करतात. असाही—दो लिमिटेड, टोयो पॉलिस्टीरीन, मित्सुबिशी मोनसॅन्टो इत्यादी कारखाने प्रसिद्ध आहेत.

**कृत्रिम धाग्याचे उत्पादन :** कृत्रिम धाग्याचे उत्पादनातही जपान मागे नाही. कापसापेक्षा नायलॉन, पॉलिस्टेर इत्यादी धागे लोकप्रिय होऊ लागले असून त्यास जपान अपवाद नाही. नायलॉनसाठी मुख्यतः लागणारे द्रव्य कॅप्रोलॅक्टम हे पाच कारखान्यांतून तयार होते; व जपानला नायलॉन उत्पादनासाठी लागून उरलेले द्रव्य कम्युनिस्ट देशांना जपान निर्यात करतो.

पॉलिस्टेरसाठी लागणारे मुख्य द्रव्य पॅराक्झीलिन हे मित्सुई पेट्रोकेमिकल व मारुझेन ऑईल कंपनी तयार करतात. तेरेपथॅलिक ॲसिड हेही ५–६ कारखान्यातून तयार होते. अक्रिलोनिट्राइल ह्या द्रव्याचीही निर्मिती बऱ्या प्रमाणावर होत असून सुमारे दोन लक्ष टन द्रव्य जपान उत्पन्न करते.

**कृत्रिम रबरांत कॅनडावर ताण :** कृत्रिम रबराच्या निर्मितीतही जपानने कॅनडावर ताण करून उत्पादनात २ रा नंबर मिळविला आहे. १९६६

साली २,३२,००० टन एवढे कृत्रिम रबर जपानमध्ये तयार झाले. कृत्रिम रबराचे निरनिराळे प्रकार जपान बनवीत असून अमेरिकेच्या खालोखाल या बाबतीत त्याचे उत्पादन आहे.

**नाजूक यंत्रांची निपज :** निर्मितीसाठी बाहेरून कमी आयात पडावी पण कलाकसुरींतील नैपुण्यामुळे तयार मालाला चांगली किंमत मिळावी अशा मालाच्या उत्पादनाकडे जपानचे विशेष लक्ष आहे. कॅमेरे, शिवणयंत्रे, घड्याळे इत्यादींचा या नाजूक यंत्रात समावेश होतो. विशेषतः अंतर्गत बाजारपेठ अगोदरच व्यापली गेल्यामुळे, परदेशात निर्यात करण्यासाठी जवळ जवळ निम्मे उत्पादन तयार केले जाते. १९६६ साली याच स्वरूपाच्या निर्यात केलेल्या मालाची किंमत ३५०० लक्ष डॉलर्सपर्यंत गेली. यावरून निर्यातीतील या वस्तूंचे महत्त्व लक्षात भरते. पश्चिम जर्मनीलाही कॅमेऱ्याच्या बाबतीत जपानने मागे टाकले आहे. दोन वर्षांपासून जपानी कॅमेऱ्यांचा परदेशातील खप स्वदेशातील खपापेक्षा जास्त झाल्याचा आढळला. १९६६ साली ६६८ लक्ष डॉलर्स किंमतीचे कॅमेरे जपानने निर्यात केले. चार कुटुंबांत मिळून ३ कॅमेरे अशी जपानमधील घरगुती बाजारपेठ दिसते. आठ मिलिमीटर मूव्ही कॅमेरा, दुर्बिणी इ. क्षेत्रांतही जपानने चांगली प्रगती केली आहे. इलॅक्ट्रॉनिक तंत्रांचा अधिकाधिक उपयोग कॅमेरा उद्योगात करण्यात आला आहे. जपान-मध्ये निदान १२ तरी मोठाले कॅमेरा कारखाने कॅनन, ऑलिम्पुस, मिनोटा, याशिका, कोनिका इ. या क्षेत्रांत मशहूर आहेत. एल्मो कंपनीचे ८ मि. मि. कॅमेरे तसेच प्रोजेक्टर्स जगप्रसिद्ध आहेत

**शिवणयंत्रात वर्चस्व :** शिवण यंत्राच्या बाबतीत भारताने अलीकडे चांगली प्रगती केली आहे. जपान मध्येही अशा यंत्राचे उत्पादन समाधान-कारक आहे. ३८,२०,००० शिवण यंत्रे १९६६ साली तयार झाली त्यापैकी ७० टक्के परदेशी रवाना करण्यात आली. गेल्या दोन वर्षांत उत्पादनात ७-८ टक्के वाढ झाली असून या क्षेत्रातही जपानचें पाऊल पुढेच आहे. जपानने खुद्द अमेरिकेतच तेथील काही कारखानदारांच्या सहकार्याने शिवणयंत्रांचे उत्पादन चालू केले त्याची स्पर्धा अन्य अमेरिकन कारखानदारां-मधून जाणवू लागली आहे. अंतर्गत मागणी मात्र बहुतेक घरी यंत्रे झाल्याने थंडावत चालली आहे. ब्रदर्स इंडस्ट्रीज आणि रिक्कार सुईंग मशिन्स हे दोन कारखाने या उत्पादनात अग्रेसर आहेत.



**उद्योगपति श्री. योशिडा यांच्या टोकिओतील कचेरीत श्री. ठाकूर**

---

मनगटी घड्याळे व गजराची घड्याळे यांची निर्यातही वाढत असून उत्पादनाचा निम्मा माल परदेशांना जातो. १९६६ साली १६०,००,००० मनगटी घड्याळे व १२०,००,००० भिंतीवरची व टेबलावरची क्लॉक्स एवढे उत्पादन जपानमध्ये झाले. हातोरी, सिटिझन वॉच, रिको, या कंपन्या जगप्रसिद्ध आहेत. सिको घड्याळे किंमतीत बेताची व टिकाऊपणात दमदार आहेत. अतिपूर्वेकडील देशांतून या घड्याळांच्या जाहिराती फार मोठ्या प्रमाणावर आढळल्या.

सूक्ष्म कल्पकतेच्या यंत्रात मापन यंत्रे, गणित यंत्रे, छपाई यंत्रे, टाईपरायटर, इत्यादी यंत्रांचा समावेश होतो. बिझिनेस मशिन्सचे उत्पादन १९६६ साली १२६० लक्ष डॉलर्सपर्यंत गेले होते. बेरीज करणाऱ्या यंत्रांचे उत्पादनही २४०,००० पर्यंत १९६६ साली झाले. त्यांची किंमत सुमारे १४० लक्ष डॉलर्स एवढी भरते. नॅशनल कॅश रजिस्टर कं. जपान हिने १०० डॉलर्स किंमतीचे बेरीज यंत्र बाजारात आणून किंमती बऱ्याच खाली आणल्या. या बाबतीत आणखीही चढाओढ होऊन ७५ ते ८५ डॉलरपर्यंत बेरीज यंत्रे बाजारात मिळू शकतात. कॉपी करण्याची व छपाईची यंत्रे यांचे उत्पादनही वाढत असून त्याची किंमत ३७० लक्ष डॉलर्सपर्यंत गेली आहे. डियाझो कॉपिंग मशिन्सचा खपही वाढलेला असून त्यासाठी वापरावयाच्या सेन्सिटाइझ कागदाची किंमत कमी होत आहे. या क्षेत्रात रिकोह, कॉपीएर, आणि मेटाक्योगो हे कारखाने आघाडीवर आहेत. हातात नेण्याजोगे टाईपरायटर विशेष लोकप्रिय होत आहेत. १९६६ साली अशा ४१७,००० टाइपरायटरची निर्मिती होऊन त्यांची किंमत १३० लक्ष डॉलर्स पर्यंत गेली. लवकरच अशा टाईपरायटरचे वार्षिक उत्पादन २०० लक्ष डॉलर्सपर्यंत जावे. या उत्पादनात ब्रदर्स इंडस्ट्रीज आघाडीवर असून नागोया शहरातील त्यांच्या कारखान्यांत दरमहा ३० ते ५० हजार टाईपरायटर्स तयार होतात.

**खाद्यपेय पदार्थ :** जपानच्या खाद्य व पेये निर्मितीच्या संबंधी मागे थोडेसे लिहिले आहे. पेय उद्योगात बीयर उत्पादन डोळ्यात भरण्यासारखे दिसते. किरिन, सॅपोरो, असाही व संटोरी इ. बिअर गाळण्याचे कारखाने जगप्रसिद्ध आहेत. यापैकी संतोरी कारखाना व्हिस्की प्रामुख्याने तयार करतो. पहिल्या ३ कारखान्यांत बिअरचे उत्पादनात मोठीच स्पर्धा लागून राहिली आहे. निम्म्यापेक्षा अधिक विक्री किरिन कारखान्याची असून सॅपोरो व असाही यांची जवळजवळ सारखीच आढळते. बिअरची विक्रीची किंमत सुमारे २०० ते २५० येन साधारणतः दिसली. किरिन ही जगातील तिसऱ्या क्रमांकाची ब्रूअरी आहे.

जपान कच्ची साखर परदेशातून आयात करून शुभ्र साखर बाजारात आणतो व त्या कृतीत काही रसायनेही मिळवितो. अशी साखर बनविणारे

१७–१८ मोठे कारखाने आहेत. जपानमध्ये साखरेचे उत्पादन बेताचेच होते व चहाही साखरेशिवाय घेतला जात असल्याने एकंदर साखरेचा खप त्यामानाने नियमित आहे. बीटपासून साखर काही प्रमाणात देशातच होते. सध्या या धंद्यात तीव्र स्पर्धा असल्याने नफ्याचे प्रमाण बरेच कमी आढळते. खाद्यतेलांच्या बाबतीतही जपानला अन्य देशाकडे पहावे लागते. सोयाबीन तेलाचा वापर स्वयंपाकासाठी मुख्यत: केला जातो, आणि सोयाबीन युनायटेड स्टेट्स मधून मुख्यत: आयात केले जाते. ६ तेल कारखाने या उद्योगात प्रमुख आहेत. निश्शीन ऑईल, होहनेन, योशिहारा, आणि निकाफॅटस हे सर्वात प्रमुख कारखाने होत. रोज हजार ते दोन हजार टन गळिताची धान्ये या कारखान्यातून निकालात काढण्यात येतात. इसोको व कोबे येथे उभारण्यात आलेली तेल गाळण्याची यंत्रे युरोप आणि अमेरिका यांच्या तोडीची आहेत. या परिस्थितीतही जपान सुमारे ६० हजार टन तेल परदेशी रवाना करतो.

**गव्हावर सरकारी नियंत्रण :** अन्नधान्यातील गहूं, सरकारी नियंत्रणाखाली आहे. गव्हाचे पीठ, रवा, मैदा, इत्यादि माल करणाऱ्या चार मोठ्या गिरण्या आहेत. निश्शिन, निप्पॉन, शोवासाज्यो आणि नितो या त्या चार गिरण्या होत. सुमारे १०० टन गव्हाचा निकाल रोजी करण्याची शक्ति या कारखान्यांमध्ये आहे. गव्हाचे उत्पादनात जपान मागासलेला असून देशाला लागणाऱ्या या धान्याचा २० टक्के भाग जपान निर्माण करतो व बाकीचा परदेशातून आणावा लागतो. विशेषत: ब्रेड व मिठाई साठी परदेशी गव्हाच्या पिठाचा वापर प्रामुख्याने होतो. अन्नधान्य उद्योगासाठी परदेशातून माल मोठ्या प्रमाणावर आयात करावा लागत असल्यामुळे खाद्य पदार्थांचे कारखाने समुद्रकिनाऱ्याला लागून, विशेषत: मोठाल्या बंदरी शहरात उभारण्याची प्रवृत्ती झाली आहे. चिबा व कोबे या बंदरी शहरात खाद्य पदार्थांचे कारखाने मोठ्या प्रमाणावर आढळतात.


**कापड उद्योग :** जपानचे सरकार विविध उद्योगधंद्यात किती प्रमाणात भांडवल गुंतविणे हितावह आहे याचा अभ्यास करून आवश्यकतेनुसार भांडवल गुंतवणुकीस परवानगी देते. अलीकडच्या सूतउत्पादनाचे उद्योगात शभर टक्क्याने भांडवल वाढविण्यास तसेच कृत्रिम धाग्याच्या उद्योगात ३०% भांडवल वाढविण्यास सरकारने परवानगी दिल्यामुळे हे उद्योग भरभराटतील असे

वाटते. १९६६ साली कृत्रिम धाग्याच्या कापडाची निपज ९७६,७५६ टन इतकी झाली आणि अमेरिकेनंतर याही क्षेत्रात जपानचा क्रमांक लागला. सध्याची एकंदर परिस्थिती कृत्रिम धाग्यास अधिक अनुकूल आढळते. जपानने १९६६ साली अशा धाग्यापासून बनविलेले ९५,०० लक्ष डॉलर किंमतीचे कापड परदेशात रवाना केले. केमिकल धाग्यापेक्षाही कृत्रिम धागा अधिक लोकप्रिय ठरला आहे. कपाशीच्या कापडालाही मागणी चांगली असून धंदा तेजीत आहे. जपाननें कापड उद्योगाचें आधुनिकीकरण केले, त्यामुळें जगाची बाजारपेठ जिंकण्यास मदत झाली आहे. जपाननें १९६६ साली १६९०० लक्ष डॉलर्स किंमतीचें कापड निर्यात केले, त्यापैकीं सुमारे ४०% अमेरिकेत व त्यापेक्षा १ टक्का कमी अतिपूर्वेकडील देशांत रवाना झाले. कृत्रिम धाग्याचें उत्पादन याच वर्षांत ४६०,००० टन इतके झाले आणि त्यातीलही विभागणी पुढीलप्रमाणें आढळली. नायलॉन,–३१.७, पॉलिस्टेर;–२६.२ ॲक्रिलिक–२१.६ व्हिनिलॉन ११.८ इतर ८.७. या क्षेत्रात जपानला परदेशी तज्ज्ञांचें सहकार्य साहजिकच मिळवावे लागले. जपानची कापड निर्यात उत्तरोत्तर कमी होत जाईल असा रंग दिसू लागला आहे. अमेरिकेतही जपानी कापडाच्या आयातीविरुद्ध सत्ताधाऱ्यांचें धोरण दिसू लागले असून या सर्व प्रवृत्तीला जपानी कारखानदार कसे तोंड देतात हे पहावयाचें आहे.

इतर क्षेत्राप्रमाणें दळणवळणाच्या विभागांत जपान चांगलाच पुढे गेला आहे. जपानचे रेल्वेचे जाळे व वाहतुकीची व्यवस्था जगांत अग्रेसर समजली जाते. विमानवाहतुकीतही जपान प्रगत राष्ट्राच्या बरोबरीला आला आहे. जपान एअर लाईन्स उतारूंची जागतिक वाहतूक करत असते तर अंतर्गत वाहतुकीची व्यवस्था निपॉन एअरवेजकडे आहे. गेल्या १० वर्षांत जपान एअर लाइन्सची आंतरराष्ट्रीय वहातूक चवदापट वाढली आहे. मी स्वतः जॅपनीज एअर लाईन्सच्या विमानानें दिल्लीहून टोकिओस गेलो होतो. त्यावेळी कंपनीची एकदर व्यवस्था व उतारूंबद्दलची आपुलकी समाधानकारक वाटली. टोकिओ विमानतळ हे जगातील अव्वल दर्जाचें विमानवाहतुकीचें केंद्र असून भिन्न भिन्न विमान-कंपन्यांची विमानें या हनिडा आंतरराष्ट्रीय विमान तळावर येतात. ऑल निपॉन एअरवेजच्या विमानानें सुमारे ८०० मैलांचा प्रवास करण्याचा अनुभवही मला मिळाला. विशेषतः उन्हाळ्याच्या सुट्टींत या विमानांतून जागा मिळणें कठीणच भासले. जपानची तीन प्रमुख बेटे व त्यांची केंद्रे अंतर्गत विमानवाहतुकीनें

जोडली असून दळणवळणात शीघ्रता निर्माण झाली आहे. पॅसिफिकवरून उड्डाण करणाऱ्या विमानांना बराच फायदेशीर धंदा मिळत असल्यानें उत्तरोत्तर ही वाहतूक हस्तगत करण्याचा विमानकंपन्यांचा कल दिसतो. जाल कंपनी उतारूंच्या सोयीसाठी हवाईबेटांत एक हॉटेल बांधत असून आता पूर्वेकडील प्रमुख शहरांतून तसेच खुद्द टोकिओंतही हॉटेल बांधण्याचा कंपनीचा बेत आहे. आणखी १० वर्षांत जागतिक विमानवहातुकीत जालला ६ टक्के काम मिळेल असा अंदाज आहे. सध्या ही कंपनी जमाखर्चाची तोंडमिळवणी करून राहिली असून तिचें भवितव्य निस्संशय उज्वल आहे.

**उद्योगांचे विकेंद्रीकरण :** जपानमध्यें मोठाल्या शहरांतून कारखान्यासाठी जमिनीचा तुटवडा भासू लागल्यामुळे कित्येक उद्योग, जिल्ह्यांच्या वा तालुक्यांच्या ठिकाणीही नेण्यात आले आहेत. विशेषतः मोठ्या मशिनरीच्या कारखानदारांना सुटे भाग पुरविणारे सहयोग (ॲन्सिलरी) उद्योग लहान गावीही असलेले आढळतात. उदाहरणार्थ ताईको किकाई इंडस्ट्रीज कंपनी लिमिटेड हा गियर पंप करणारा कारखाना यामागुची जिल्ह्यातील ताबुसे सारख्या तालुक्याच्या गावी मला पहावयास मिळाला. या कंपनीचे चेअरमन श्री. सदाकी किमुरा यांची व माझी मुलाखत झाली. तेव्हां या प्रकारचे गियर पंप करणारा हा एकमेव कारखाना जपानमध्यें असल्याचें त्यांनी मला सांगि-



टेकडीवरून दिसणारे ताबुसे शहर

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.


तले. विशेषत: सागरी बोटींना लागणाऱ्या यंत्रसामग्रीत या तऱ्हेच्या पंपांचा मोठ्या प्रमाणावर उपयोग होतो. नागासाकी येथे भारताकरता बांधण्यात येत असलेल्या बोटीसाठी आपल्या कारखान्यातून गियर पंप जाणार आहेत असे त्यांनी सांगितले; या माहितीचें साहजिकच मला कौतुक वाटले. एवढया मोठया कारखान्याचें अध्यक्ष साध्या कामगाराच्या पोशाखात सर्वत्र वावरताना आढळले. साहजिकच कामगारांना या प्रवृत्तीच्या आपल्या मालकाबद्दल जिव्हाळा वाटतो.

परदेशीयांना भांडवल गुंतविण्यास जपानी उद्योगधंदे चांगलेच क्षेत्र झाले आहे. प्रमुख उद्योगांचे शेअर्स, नफा वाटणी समाधानकारक असल्यानें, सामान्यत: तेजीत आढळले. आणि भांडवलाची गुंतवणूक करणाऱ्यां जागतिक भांडवलदारांना, कित्येक जपानी कंपन्यांचें शेअर्स उत्साहवर्धक वाटतात. जपानी सरकारचें धोरणही सामान्यत: दिसते उत्तरोत्तर परदेशी भांडवलास उत्तेजन देण्याचे. साहजिकच या प्रवृत्तीमुळे जपानी उद्योग धंद्यांची वाढ झपाटयानें झाली आहे.

---



जपानी पद्धतीचे भोजन घेत असलेले लेखक (दि. १-९-६८) वाकासाकी



योकोहामा बंदरावर निरोप देण्यास आलेली मंडळी (दि. ७-९-६८)

**दुकानांतून स्वदेशीच माल :** जपानमधील अंतर्गत बाजारपेठातून सामान्यत: स्वदेशीच माल ठेवण्याचा कटाक्ष आढळला. क्वचित् देशांत न होणाऱ्या वस्तू परदेशातून येतात, परंतु त्यांचेहि प्रमाण अत्यल्प दिसले. औषधासारख्या आजारी व्यक्तींकरता आवश्यक वाटणारा परदेशी बनावटीचा मालही केमिस्टच्या दुकानातून मिळू शकत नाही. त्या ऐवजी तत्सम वस्तू पुरविण्याची केमिस्ट खटपट करतो. नाही म्हणायला आंतरराष्ट्रीय प्रवासी ज्या मोठाल्या हॉटेलांतून रहातात तेथे परदेशी औषधे वा सौंदयप्रसाधने मिळण्याची सोय आढळते. अशा मालावर साहजिकच भरपूर जकात लादलेली दिसते.

**उद्योगधंद्यांत परदेशांशी सहयोग :** उद्योग व्यापारांत परदेशाशी सहकार्य वा सहयोग करण्याची प्रवृत्ती जपानमध्ये वाढत असली तरी परदेशी मंडळींशी करारनामे करतांना कालांतरानें धंदा आपल्या हाताशी राहील याबद्दल दक्षता बाळगली जाते. जपानमध्यें अंतर्गत व परदेशाशी व्यापार करणाऱ्या अशा चाळीसावर मोठ्या कंपन्या आहेत. मध्यम व लहान पेढया ४२०० चे वर असून त्यांचा धंदाही ठीक आहे. सुमारे २७७ लक्ष डॉलर्सवर सालिना व्यापार करणाऱ्यांत वरील ४० प्रमुख कंपन्या मोडतात. विशेषत: परदेशी व्यापारांत परदेशाशी निर्यातीचा ७०% भाग व आयातीचा

८०% या कंपन्या उचलतात. मित्सुई, मित्सुबिशी, सुमियेमो, इत्यादी ११ कंपन्या या क्षेत्रांत विशेष पुढारलेल्या दिसतात. सुमारे २००० वर वस्तूंची आयात-निर्यात या कंपन्यांच्या हाती असल्यामुळें त्यांचे महत्त्व सर्वमान्य झाले आहे, २५०००० लक्ष डॉलर्स इतका संयुक्त व्यापार प्रस्तुत ११ मोठाल्या कंपन्या पहात आहेत. परंतु दुसऱ्या महायुद्धानंतर एकेकाळी सार्वभौम समजल्या जाणाऱ्या कंपन्या काहीशा मागे पडू लागल्या आहेत, ही प्रवृत्तीही लक्षांत घ्यावयास हवी. उत्तरोत्तर प्राप्त परिस्थितीकडे लक्ष देऊन मोठाल्या व्यापारी मंडळ्या आपापसात एकीकरणाची भाषा बोलू लागल्या आहेत.

**भारताशीं २०० उद्योग करार** : सध्या भारत व जपान यांच्या सहकार्यानें उद्योगवृद्धी करण्याचें सुमारे २०० करार झाले असल्यानें जपानमधील उद्योग व्यापाराचे मंत्र व तंत्र हस्तगत करणे आपणास अगत्याचे आहे. आपल्या देशाचे जपानशी आणखीही कांही बाबतीत सहकार्य होण्यासारखे आहे. आंतरराष्ट्रीय महत्त्वाची टेंडरे भरण्यासाठी तसेच आंतरराष्ट्रीय विशिष्ट मालाचे व्यापारासाठी भारत आणि जपान यांच्यामध्यें कांही समझोता झाला तर ते चांगलेच ठरेल. जपानशी चालू असलेल्या आपल्या निर्यात व्यापारात लोहयुक्त माती हा महत्त्वाचा भाग आहे १९६७–६८ या वर्षांत जपाननें



टोकिओ सोडताना निरोप– १ मि. योशिडा, २ श्री. ठाकूर




योकोहामा बंदरात बौद्ध भिक्षु

आपणाकडून ११२·६६ लक्ष टन खनिज माती खरेदी केली. तिचे आपणाला ६०.६३ कोट रुपये मिळाले. यासंबंधात आपल्याला निर्यात वाढविणे असेल तर खाणीतील उत्पादनाचा खर्च कमी करावा लागेल; तसेच बोटींची वाहातूक स्वस्त कशी होईल याची काळजी घ्यावी लागेल. खनिज द्रव्यांच्या निर्यातीसाठी बंदरामधूनही सुधारणा होणे अगत्याचे आहे.

१९६८-६९ या वर्षाच्या पहिल्या सहामाहीत जपानला भारतानें २५०० टन मॅगेनीझ पाठविले हेही लक्षांत घेतले पाहिजे. आमच्या हातमागी कापडाचा मालही परदेशांत अलीकडे विशेष निर्यात होऊ लागला आहे. १९६८ च्या जानेवारी ते ऑक्टोबर या १० महिन्यांत ४७·६९ लक्ष रुपये किंमतीचे हातमागी कापड जपानला आम्ही निर्यात केले.

**दहा टक्क्यांनी आर्थिक वाढ :** या कांहीशा विस्तृत भागांत जपानची आर्थिक प्रगती व औद्योगिक क्षेत्रांत वर्चस्व यांचे विवेचन केले. गेल्या दहा वर्षांत जपानची आर्थिक प्रगती सालिना सरासरी १० टक्क्यांनी होत आहे, असे आढळून आले. इतर प्रगत देशांची परिस्थितीही त्या मानानें मागे आहे. आर्थिक वाढीचें प्रमाण खालील देशांत किती आहे ते आकडे उद्बोधक होतील :-युनायटेड स्टेट्स-४·५, ब्रिटन-३·३, पश्चिम जर्मनी-४·८, फ्रान्स



योकोहामा बंदरास रामराम

व इटली–५'१. साहजिकच ह्या धावपळीच्या औद्योगिक झपाटयांत अधूनमधून कांहीं अपघात न घडले तरच आश्चर्य. कधी कधी जपानला तसे धक्के बसलेही व त्यावेळी कांही सिंहावलोकन व कांही नवीन नियोजन यांनी त्या अडचणी भागविण्यात आल्या. वर दिलेल्या विविध क्षेत्रांतील समालोचनावरून स्पष्ट दिसून येईल की, युनायटेड स्टेट्स व रशिया हे दोन देश सोडले तर उत्पादन, व्यापार आणि आर्थिक प्रगती यात जपानचे स्थान अनन्यसाधारण ठरते. भारतासारख्या विकासशील राष्ट्रांनी या प्रगतीच्या कारणांचा सखोल अभ्यास करून आपल्या देशाचे स्थानही औद्योगिक क्षेत्रांत बळकट केले पाहिजे.

# जपान व अतिपूर्वेकडील देश

## भाग पांचवा




**जपानचा जड अंतःकरणाने निरोप :**

उगवत्या सूर्याची भूमि जपान या देशाला दि. ७ सप्टेंबर १९६८ रोजी सायंकाळी मी रामराम ठोकला. योकोहामा बंदरावर मला निरोप देण्यास २५–३० जपानी स्त्री-पुरुष भर दुपारपासून आल्याचे पाहून मी नतमस्तकच झालो. या देशांतील माझ्या १॥। महिन्यांच्या मुक्कामात जे आतिथ्य व प्रेम मला लाभले तेच निरोप देण्याच्या वेळेला आढळून आल्याने माझे हृदय कृतज्ञतेने भरून आले.

“ मेसेंजेरीस मॅरिटाईम्स ” या फ्रेंच बोट कंपनीची ‘ लाओस ’ ही बोट तिची जोडीदारीण ‘ कांबोज ’ इजप्रमाणे मार्सेल्स पासून योकोहामापर्यंत व पुनश्च सदर बंदरातून मार्सेल्सला असा सागरी दौरा सुमारे ३ महिन्यात करते. याच कंपनीची ‘ व्हिएटनाम ’ ही बोट पूर्वी पर्यटनात होती; पण सध्या तिचा संचार चालू नाही. विभिन्न देश, तेथील लोक, रीतीरिवाज इत्यादींचा अभ्यास करायचा असेल तर विमानापेक्षा आगबोट अधिक सोयीची असे जे माझे मत होते ते प्रस्तुत सागरी सफरीने दृढ झाले. भारतातून निघतानाही बोटीने जाण्यासाठी म्हणून मी याच कंपनीच्या ‘ कांबोज ’ या बोटीवर जागा मुक्रहही केली होती, पण बोट मुंबई बंदरात दाखल होईपर्यंत माझा पी फॉर्म हाताशी न आल्याने या बोटीतील ‘ सुरक्षित ’ जागा रद्द करावी लागली.

योकोहामा बंदर सोडताना माझे प्रमाणे इतर उतारुंचेही स्नेही-सोबती प्रेक्षागृहात चिक्कार जमले होते. रंगीबेरंगी कागदी पट्ट्यांची भेंडोळी धक्क्यावरून

बोटीतील उतारूकडे व उतारूंकडून धक्क्याकडे फेकण्यात येत होती व त्या टेप्सच्या आदानप्रदानाने एक मंडपच उभारला गेला. काही बौद्ध भिक्षू याच बोटीने जपानचा निरोप घेत होते आणि त्यावेळी तासावर टोले दिल्याने वातावरण निनादित झाले.

विमान प्रवास मोठ्या प्रमाणावर सुरू झाल्याने आगबोटींची भाडी खाली येतील अशी माझी कल्पना होती; पण ती चुकीची ठरली. व्यापार धंदा करणारी मंडळी विमानाने जात येत असली तरी हौसेखातर मौजेने प्रवास करणाऱ्यांची संख्या काही कमी नाही. आणि ही मंडळी आरामात सुटी घालविण्यासाठी सागरी सफर पसंत करतात.


**एम्. एम्. लाओस :**

लाओस बोटीत पदक्षेप करताच फ्रेंच वातावरण अनुभवायला मिळते-बोटीतील अधिकारी वर्ग सामान्यतः फ्रेंच बोलताना आढळतो, व जरूर पडेल तेव्हा इंग्रजीचा आधार घेतो. लाओस ही बोट तशी जुनीच झाली आहे. कारण १९५४ मध्ये तिने प्रथम सागरात प्रवेश केला. परंतु बोटीवर असलेले सुमारे २०० सेवक तिची उत्तम देखभाल करतात यात शंका नाही. या सेवकांची वर्गवारी पुढीलप्रमाणे दिसली. अधिकारी—२२, डेक व्यवस्थेसाठी— ३१, इंजिनरुम—३९, खाद्य पेय व भोजन व्यवस्था—१०३. प्रस्तुत बोटीवर पुढीलप्रमाणे ४४१ उतारूंची सोय केली आहे. पहिला वर्ग ११७, टूरिस्ट वर्ग ११० आणि इकॉनॉमी वर्ग—२१४. माझे तिकिट टूरिस्ट क्लासचे होते आणि तो २ऱ्या वर्गाच्या तोडीचा समजला जातो. करमणुकीचे व अन्य कार्यक्रम १ला वर्ग व टूरिस्ट वर्ग यांचे साठी साधारणतः समान असतात. तसेच डेकवरील खेळ, पोहोण्याच्या तलावाचा वापर इत्यादि सुखसोयी पहिल्या दोन्ही वर्गांस समान आढळल्या. त्यामुळे पहिल्या व दुसऱ्या वर्गातील उतारूंचे एकमेकाकडे जाणे येणे मोकळेपणाने होत असे. माझी केबिन चौघांची असली तरी माझेखेरीज एकच जर्मन उतारू तीमध्ये होता आणि तोही बहुतेक वेळ बाहेर भटकत असे. त्यामुळे खोली जवळ जवळ स्वतंत्र असल्यासारखी वाटे. बाहेर उकाडा बराच असला तरी एअर कंडिशनिंगमुळे खोलींत गारवाच वाटे. केबिनमधील पोर्ट होलमधून देखावे पाहण्यात मौज येई; आणि एवढ्याशा पोर्टहोलमधून स्वातंत्र्यवीर सावरकरांनी बोटीतील अधिकाऱ्यांना कशी तुरी दिली याचा विचार अनेकदा मनात येऊन जाई.

**नानाविध नमुन्यांचे चिमुकले जग :**

फ्रेंच लोक कलेचे मोठे भोक्ते. त्यामुळे टूरिस्ट क्लासच्या डायनिंग रूममध्ये तसेच पहिल्या वर्गाच्या छतावर, कार्डरुम व अन्य प्रमुख ठिकाणी नामांकित चित्रकारांची तैलचित्रे रंगविलेली आढळली. तसेच कलावंताची नांवे प्रामुख्याने उल्लेखलेली दिसली. तिसऱ्या वर्गाच्या उतारूंशी प्रवासात फारसा संबंध येत नसला तरी दुसऱ्या व पहिल्या वर्गाच्या अशा २०० वर स्त्रीपुरुष उतारूत प्रस्तुन दोन-तीन आठवड्यांच्या प्रवासात स्नेह व आपुलकी उत्पन्न न झाल्यास आश्चर्य ! त्यातून जगातील विविध देशांतील व संस्कृतीची मंडळी ह्या चिमुकल्य जगात एकत्रित झाल्याने नानाविध नमुने जवळून पहाण्याची सहजच संधी मिळाली. साहजिकच याकोहामा सोडल्यापासून 'लाओस'च्या वातावरणात रंगून गेलो मी.

योकोहामा ते हाँगकाँग हे अंतर कापण्यास आमच्या बोटीला सुमारे ३॥ दिवस लागले. या कालांत आमच्या वर्गातील उतारूंचा तरी परस्परांचा परिचय ठीक झाला. पहिल्याच दिवशी धोक्याच्या वेळी लाईफ बेल्ट कसे वापरावेत याची तालीम सायरन वाजवून उतारूंना देण्यात आली. विमानाचे प्रवासातही धोक्याच्या वेळी काय करायचे याच्या सूचना दिल्या जातात. जपान-



सागरी सफरीचे साधन, एम्. एम्. लाओस

मध्यें बराच काळ वास्तव्य झाल्यानंतर फ्रेंच बोटीतील खाद्य पदार्थ, जेवण इत्यादि मनपसंत वाटली. आम्हा मंडळींच्या वाट्याला आलेल्या एक चिनी वेटरने तर आपल्या लाघवाने आणि आग्रहानें मंडळींना तृप्त केले. विशेषतः चिनी भाषा बोलणाऱ्यांशी त्याच्या होणाऱ्या संवादातून हास्याचे फवारे निघत. साधारणतः भोजनागारात सकाळी व दुपारचे चहाचे वेळेला कोठेही बसले तरी चाले. परंतु दुपारच्या लंचच्या वेळी व रात्री भोजनाचे प्रसंगी ठरलेल्या जागीच बसण्याची व्यवस्था होती. मी शाकाहारी असल्याने माझी सांगड एका मद्रदेशीय महिले-बरोबर लावली होती. या व्यवस्थेने भोजनागारांत ठराविक गट ठराविक टेबला-वर साधारणतः दिसत. रात्रीचे भोजनाला औपचारिक डिनर ड्रेस आवश्यक असल्याचे नमूद केल्यामुळें मी ती शिस्त पाळली. पण अलीकडे सर्वच नियम थोडेसे सैल झालेले दिसले.

सकाळी ७॥ ते ९ फ्रेंच पद्धतीची न्याहारी मिळे. त्यानंतर ११ वाजता लंच व ४ वाजता चहा. सायंकाळी ६ वाजता मुख्य जेवण असा कार्यक्रम असे. दुपारच्या व रात्रीच्या जेवणासाठी तासातासाने आणखी एक पंगत असे. फ्रेंच लोक स्वयंपाकाबद्दल प्रसिद्ध असल्याने रात्रीच्या जेवणाचा बेत समाधानकारक असे. अर्थात् शाकाहारी मंडळींची पाश्चात्य भोजनात नेहमीच काही कुचंबणा होते ती येथेही भासली. चीजचे विविध प्रकार पहावयास मिळत; तसेच



लाओस बोटीवरील स्विमिंगपूल

व्हिन्स, रुज एट ब्लांक म्हणजे लाल व पांढऱ्या रंगाच्या वाईन्स नेहमीच टेबलावर आढळत. त्या मादक नसतात द्राक्षासवाप्रमाणेच. जेवताना ४–५ कोर्सेस व शेवटी आईस्क्रीम, फलाहार वगैरे असल्याने एकंदर तृप्तता येई. वर उल्लेख केलाच आहे की फ्रेंच मंडळी चित्रकलेची प्रेमी आहेत. दुपारच्या व रात्रीच्या मेनूकार्डवरही निरनिराळ्या नामांकित चित्रकारांनी काढलेली त्या त्या देशातील स्त्रियांची चित्रे कलात्मक वाटली. ए. ब्रेनेट हा चित्रकार अशी विविध रंगांतील चित्रे काढण्यात वाकबगार वाटला.

बोटीच्या प्रवासात व्यायाम बेताचाच होत असल्यामुळे अन्नपचनाचीही अडचण भासे. डेकवरच येरझारा घालणे आणि हवा बरी असेल तर बोटीच्या स्विमिंग पूलमध्ये थोडेबहुत पोहणे हा क्रम चालू ठेविल्यामुळे प्रकृति ठीक राहिली.

## हाँगकाँग

हाँगकाँग बेटाच्या समोरील कौलूनच्या धक्क्याला आमची बोट ११ सप्टेंबरला सकाळीच येऊन पोहोचली. अधिकाऱ्याकडून त्यानंतरची नित्याची पहाणी झाल्यावर हॉंगकाँग, या क्राउन कॉलनीचे संचारास सुरवात झाली आमची. विमानाने जपानला जाताना हाँगकाँगच्या विमान तळावर २ तास मुक्काम केला होता आम्ही. परंतु तेवढ्यावरून त्या भागाची यर्थाथ कल्पना येणे अशक्य. साहजिकच बोटीने आल्यामुळे दोन दिवस हॉंगकाँगला मुक्काम झाल्याने आम्हांला आनंद वाटला.

एके काळी हाँगकाँग हे मुंबईप्रमाणेच कोळ्यांनी व्यापलेले चिमुकले बेट होते. परंतु १८४२ सालच्या ओपियम वॉरनंतर चीनने ते इंग्लंडला दिले आणि त्यानंतर त्या लगतचाच कौलून शहराचा भाग आणखी १८ वर्षांनी इंग्लंडच्या पदरात पडाला. १८९९ साली न्यूटेरिटरीज हा भाग चीनकडून ९९ वर्षांच्या कराराने ब्रिटिशांच्या ताब्यात आला. अशा प्रकारे सध्या ह्या क्राउन कॉलनीत ३९१ चौ. मैलांचा प्रदेश मोडला जात असून ह्या वसाहतीची वसती ३१ लक्ष २० हजारावर गेली आहे. पश्चिमेकडील जिब्राल्टरचे महत्त्व, पूर्वेकडील हाँगकाँगला लाभले आहे. एवढेच नव्हे तर व्यापारास खुले बंदर असल्याने हाँगकाँग मध्ये रोज जेवढी खरेदी विक्री व प्रचंड घडामोड होते, तेवढी अन्यत्र क्वचितच पहावयास मिळेल. ब्रिटिश कॉमनवेल्थ मधील नागरिकांना हाँगकाँगला उतरण्यास वेगळा व्हिसा लागत नाही आणि इतर देशांतील लोकांनाही हाँग-

कागचा पासपोर्ट असेल तर महिनाभर या बेटावर सहज काढता येतो. हाँगकाँग मधील बाजारपेठा विविध प्रकारच्या दुकानांनी इतक्या गजबजून गेलेल्या दिसतांत की कित्येकांना तर त्यात काय घेऊ आणि काय घेऊ नये असे होऊन जाते. एकेकाळी या बेटांवर खडक, मीठ, ताजे पाणी आणि चांचे लोक या खेरीज अधिक काही नाही अशी टीकाही केली गेली आणि त्यामुळेच लॉर्ड पामर्स्टन यानी १८४२ साली कॅप्टन इलियटना असे कळविले की हाँगकाँगला व्यापारी महत्त्व येणार नाही. शहाण्यांची भविष्येही अनुभवांती कशी चुकतात याचे हे एक उदाहरण. गेल्या १२५ वर्षांत हाँगकाँगची भरभराट झपाट्याने होऊन खरेदी करायची तर हाँगकाँग किंवा सिंगापूर उत्तम अशी समजूत रूढ झाली. पाश्चात्य व पौर्वात्य दोन्ही संस्कृतींचा सुरेख संगम हाँगकाँग-मध्ये आढळतो, आणि त्यामुळे प्रवाशांना या वसाहतीबद्दल खास आकर्षण वाटते. हाँगकाँग बेट व कौलून शहर यांनी बेताचेच क्षेत्र व्यापले असले तरी प्रवाशांना पाहिजेत त्या सर्व गोष्टींची येथे लयलूट असल्यामुळे हाँगकाँग सोडणे जिवावर येते. बोटीच्या धक्क्यापासून कौलून शहरातच आपण तडक निघतो आणि या विभागास चिनी भाषेत ‘ थिडशात्सुई ’ अशी संज्ञा आहे. कौलून रेल्वे स्टेशनही येथून जवळच आहे; आणि कौलून ते हाँगकाँग अशी बोटींची ये-जा एकसारखी चालू असल्याने अवघ्या १० मिनिटात कौलूनहून समोरच्या स्टार फेरी पायरला जाता येते. जपान, हाँगकाग, थायलंड इत्यादी देशातील बाजारातून प्रेक्षणीय स्थळांच्या स्लाईड्स विकत मिळतात. प्रवाशाला आपण पाहिलेल्या देखाव्यांचे रमणीय रूप पुन्हा पुन्हा पहाण्यास व स्नेह्यांना दाखविण्यास त्यामुळे मोठीच सोय होते. मीही अशा काही निवडक स्लाईड्स ठिकठिकाणी विकत घेतल्या. कौलूनला माझा पहिला कार्यक्रम न्यू टेरिटरिज-मधील एका मित्रास भेटावयाचा होता. हे स्नेही एक मिशनरी असून मी हाँगकाँगला येत असल्याचे त्याना कळविले होते. न्यू टेरिटरिज हा मुलूख ३६६ चौ. मैलांचा असून या विभागांत पुष्कळसे डोंगरही आहेत. टॅक्सी करून टेकडीच्या उंच टोकावर समुद्रसपाटीपासून ३१४० फूट उंचीवर मी गेलो. परंतु माझे स्नेही नुकतेच अमेरिकेला गेल्याचे समजल्याने निराशा झाली. या शिखरावर जाऊन येण्याला २२ डॉलर ( हाँगकाँग ) खर्ची पडले त्यामुळे पुढे टॅक्सी न करण्याचा निर्णय घेतला. इंग्लंडला मिळालेल्या या नवीन प्रदेशात डोंगराळ विभागाप्रमाणे छोटी छोटी बेटेही आहेत-त्यांची संख्या सुमारे २३५



**हाँगकाँग बंदराचे एक दृश्य**

भरते. कौलूनचा किनारा सपाट असला तरी पुढे ज्या पर्वतराजी उभ्या दिसतात, त्यांना नऊ राक्षस म्हटले जाते. आणि हाच ' कौलून ' नावाचा अर्थ. मी ज्या अत्युच्च शिखरावर गेलो त्याचे नाव पाईमोशान. हाँगकाँग बेटाची अशी लोकसंख्या १,०५,०४१ असून कौलूनमध्ये १५,८९,८२५ लोक रहातात. नवीन प्रदेशात ४,०९,९४५ वस्ती असून समुद्रातून नावात कायमची रहाणारी मंडळी १,३८, ३२० आहेत.

तात्पर्य हाँगकाँग, कौलून इत्यादी प्रदेशाची लोकसंख्या ३१, ३३, १३० भरते आणि त्यातील ४०% मंडळी १५ वर्षांच्या आतील आहेत हा एक विशेष सांगता येण्यासारखा आहे.

टॅक्सीचा प्रवास महागडा वाटल्याने दुपारचा वेळ बस, ट्राम इत्यादी मधून हिंडण्यात घालवला मी. हाँगकाँगचे एक वैशिष्ट्य म्हणून पीक ट्रॅमवेकडे बोट दाखविता येईल. १८८८ साली ही ट्रामवे सुरू झाली. हाँगकाँगच्या अत्युच्च शिखरापर्यंत ट्रॅम जात असते आणि तीमधून प्रवासाचा अनुभव विलक्षण वाटतो. शिखरावरून सर्व शहराचा देखावा मोठा कमनीय दिसतो. या पीक ट्रॅमच्या प्रवासाला ६० सेंट खर्च येतो. बसमधून हॅपी व्हॅलीचा फेरफटकाही मजेशीर झाला. लंबवर्तुळाकार रेसकोर्स हे हाँगकाँगचे एक वैशिष्ट्य समजण्यास हरकत नाही. कौलून व हाँगकाँग मधील आकर्षक दुकानांना भेटी देणे यात चांगलीच

करमणूक होते. निरनिराळ्या देशातील चलने हाँगकाँग मध्ये चालतात. त्यामुळे त्यांचे एकमेकाशी संबंध माहीत असणे उपयुक्त ठरते. बहुतेक मोठाल्या स्टोअर्स मध्ये एका चलनाचे दुसऱ्यात रूपांतर करणारे तक्ते किंवा यंत्रे आढळतात. एका भारतीय रुपयास ·५८ हाँगकाँग डॉलर असा चलनाचा दर आहे. या सफरीमध्ये ज्या देशांना मी भेटी दिल्या त्यातील चलनाशी आपल्या रुपयाचे नाते पुढीलप्रमाणे बाजारात दिसले.

१ हाँगकाँग डॉलर = १·७२ रुपये.
१ अमेरिकन डॉलर = १०·४६ रुपये.
१०० येन = २·७५ रुपये.
१ फिलिपाईन पेसो = २·४० रुपये.
थायलंड १०० बहत = ४९·१९ रुपये.
१ सिंगापूर डॉलर = ३·२४ रुपये.
सिलोन १ रु = ·७४ रुपया.

वरील कोष्टकावरून भारतीय रुपयाचा अधिकृत भाव कसाही असला तरी आंतरराष्ट्रीय नाणे बाजारात तो प्रत्यक्षात जास्त घसरलेला दिसतो. साहजिकच परदेशातून प्रवास करतांना अमेरिकन डॉलर आणि त्यानंतर ब्रिटिश पौंड यांनाच खरे महत्त्व आढळते.

**चीनची सरहद्द :**

कौलूनहून कँटनपर्यंत रेल्वे असल्यामुळे चीनच्या सरहद्दीवरील ठिकाणास भेट देऊन यावे या विचाराने मी कौलून स्टेशनात प्रवेश केला. परंतु रेल्वे अधिकाऱ्यांनी सांगितले, की लोवूला जाण्यासाठी पोलीस अधिकाऱ्याचा परवाना पाहिजे. तेव्हा मी धडपडत कौलून स्टेशनापासून अर्ध्या मैलावर दूर असलेल्या पोलीस अधिकाऱ्यांना भेटण्यासाठी गेलो. त्या मंडळींनीही सरळ परवान्यास नकार देण्याऐवजी मला सूचना दिली की लोवूच्या अगोदरचे दुसरे स्टेशन फान लिंग चे तिकिट मी काढावे आणि तेथील पोलिस अधिकाऱ्यांच्याकडून लोवूसाठी परवानगी मागावी. शेवटी या सल्ल्याप्रमाणे अस्मादिकांनी कौलूनहून लोवूला तासातासाने निघणाऱ्या गाडीत एकदाचा प्रवेश मिळविला. या गाड्या खटारगाड्यासारख्याच भासल्या; आणि जपानच्या रेलगाड्यांचे पासंगालाहि त्या पुरणार नाहीत हे लक्षात आले. हाँगकाँग पासून चिनी सीमा २२ मैलावर

आहे. कौलुन ते लोवू तिसऱ्या वर्गाचे भाडे १।। हाँगकाँग डॉलर एवढे असून उतारूंमध्ये मुख्यत: चिनी मंडळीं दिसली. मधल्या स्टेशनची नावे चिनी भाषेत येणे प्रमाणे आढळली. याउ मा तेई, शाकिंग, ताई हो काउ इत्यादि. कौलून मधील प्रसिद्ध विद्यापीठ 'युनिव्हर्सिटी स्टेशनला' लागूनच दिसते. लाइको मार्केट बुद्धिस्ट पॅगोडा सारखे भासले. १९१३ साली ते बांधण्यांत आले. कौलून ते लोवू या प्रवासाला सुमारे १ तास वेळ दिला असला तरी प्रत्यक्षात थोडा वेळ अधिकच लागतो.

**गोळीबाराच्या फैरी :**

फान लिंगला उतरल्यानंतर पोलीस अधिकाऱ्यांना भेटण्याकरता भर दुपारच्या उन्हात मैलभर चालावे लागल्याने वैतागून गेलो परंतु मुख्य पोलीस ठाण्याशीच दोघे पूर्वीचे भारतीय पण सध्या पाकिस्तानचे झालेले पोलिस अधिकारी भेटले. त्यांनी हिंदीतून विचारपूस केली, आणि मुख्य कचेरीत नेऊन चहा वगैरे देऊन आतिथ्यशीलता दाखविली. परंतु लोवूला जाण्याचा पास सामान्यत: फक्त चिनी लोकांना दिला जातो, म्हणून तो मला नाकारण्यात आला. सरहद्दीवर अधून मधून दोन्ही बाजूंनी गोळीबाराच्या फैरी झडत असल्याने तेथे जाणेही धोक्याचे आहे असे सांगून त्यांनी माझ्या सरहद्दीवर जाण्याचे बेतास खोच घातला. शेवटी मंडळींचे आभार मानून मी परत निघालो; तो सदर मंडळींनी एका हाँगकाँग येथील खाजगी डॉक्टरचे मोटार गाडीतून माझी जाण्याची सोय केल्यामुळे मी फानलिंग सोडले. लोवूला आल्यावर पुढे जाणे असल्यास एक पूल ओलांडून कँटनकडे प्रवास करावा लागतो आणि तेथून युरोपला पुढे ट्रान्स-सैबेरियन रेल्वे मार्गाने प्रवास करता येतो. असो.

हाँगकाँग मध्ये पोलीस वगैरे खात्यातून हिंदी लोकांना पूर्वी चांगल्या नोकऱ्या मिळत. मला भेटलेल्या मुसलमान पोलीस अधिकाऱ्यानी पगार हजाराच्या घरात असल्याचे तसेच राहणीखर्च बेताचा आहे असे सांगितले. चीन सरहद्दीवर जाणाऱ्या उपक्रमासाठी माझे ८-१० तास वाया गेले पण या खटाटोपासून मिळालेले अनुभव अविस्मरणीय वाटले.

आमच्या बोटीने १२ सप्टेंबरलाच हाँगकाँग सोडले. दिल्लीहून टोकीओला जाताना येथे काही तासानी घड्याळ पुढे करावे लागले, तर बोटीवर लागलेल्या नोटीसीनुसार आता घड्याळ १ तास मागे ओढावे लागले.

# फिलिपिन्स बेटे

**मॅनिलात आगमन :**

१२ सप्टेंबरला रात्री हाँगकाँगहून आमची बोट मॅनिलाकडे निघाली. १॥ दिवसांचा प्रवासानंतर सकाळी ६ चे सुमारास आम्ही फिलिपिन्सची राजधानी मॅनिला येथे पोहोचलो.

प्रस्तुत बंदरात बोटीचा मुक्काम जेमतेम १५ तासच असल्याने कंडक्टेड टूर मधूनच बेट पाहणे मला सोयीस्कर वाटले आणि त्याप्रमाणे आम्ही कार्यक्रम आखला. तगाते व मॅनिला या शहरातील प्रेक्षणीय स्थळे आठ अमेरिकन डॉलर मध्ये चांगल्या प्रकारे पहाता येतात. ऐतिहासिक मॅनिला शहराभोवतालचा जुना कोट, प्राचिन कॅथेड्रल्स, जपानी सैन्याने पाशवी अत्याचार केले तो किल्ला व फिलिपिन्सच्या अध्यक्षांचा रहाता बंगला इ. स्थळे प्रेक्षणीय वाटली.

**तगाते शहर :**

मॅनिलाच्या दक्षिणेस २६ किलोमीटरवर तगाते शहर वसले असून तेथून ताल हा ज्वालामुखी तसेच तालसरोवर यांचा देखावा संस्मरणीय वाटतो. आसमंतातील दऱ्या खोरी आणि २ हजार फूट उंचीचा तगाते कडा पाहिला



बोटीत माल उतरविताना

की चित्तवृत्ती उचंबळून येतात. निसर्गाच्या या विलक्षण देखाव्याने पुढील इंग्लिश काव्याची साहजिकच आठवण होते.

To see the world in a grain of sand
and heaven in flower
hold infinty in the palm of your hand
and eternity in an hour.

मॅनिला ते तगाते हा रस्ता निसर्गरम्य असून वाटेत लागणारी गावे पाहिली म्हणजे गोव्याची आठवण होते. कित्येक स्टोअर्सवर ' सारी सारी ' अशा पाट्या पाहिल्या तेव्हां सकृत्‌दर्शनी कल्पना झाली की ; तेथे साडया मिळत असाव्यात; परंतु अधिक चौकशी करता या शब्दाचा अर्थ स्थानिक भाषेत जनरल स्टोअर्स आहे. ठिकठिकाणी स्थानिक, ग्रामोद्योगाच्या कौशल्ययुक्त वस्तु विक्रीस आढळल्या. लासपिनास ह्या शहरी जगातले सर्वात जुने कळकाचे ऑर्गन पहावयास मिळाले. ऑर्गनचा आवाज वैशिष्ट्यपूर्ण तर वाटलाच परंतु believe it or not या मालेतील जागतिक आश्चर्य असे ते एक समजले जाते.

रस्त्याच्या दोन्ही बाजूला नारळी, आंबे, पोफळी, कळक वगैरे झाडांच्या घनदाट छाया वातावरण थंड करते. ' वॉटर बफेलो ' म्हणजे म्हशी रस्त्यातून आढळतात एवढेच नव्हे तर त्यांचा वाहन म्हणून उपयोग करतात. फांद्यांच्या हिंदोळ्यावरून वानरे, व माकडे हैदोस घालताना दिसतात.

**शहाळ्यात आईस्क्रीम कोन :**

तगाते येथील हॉटेलमध्ये आईस्क्रीमची ऑर्डर दिली, तो काही वेळाने बेअराने अर्धे कापलेले भले मोठे शहाळे माझेपुढे आणून ठेवले. आणि मधल्या कोवळ्या सायीला लागून ताजा आईस्क्रीमचा कोन बसविलेला दिसला. नारळाच्या सायीबरोबरचे ते आईस्क्रीम मोठे लज्जतदार वाटले.

तगातेहून दिसणारा ताल हा ज्वालामुखी सध्या निद्रिस्त असला तरी १९११ साली या ज्वालामुखीने उग्र स्वरूप धारण केले होते, व त्यामुळे आसपासच्या गावातील कित्येक लोक देशोधडीला लागले. अजूनही या ज्वालामुखीतून अधून मधून लाव्हा रस बाहेर पडताना दिसतो. ताल सरोवर व त्याच्या मध्यभागी बेटासारख्या दिसणाऱ्या भूभागांतील ज्वालामुखीचा क्रेटर हा सर्व देखावा हृदयावर कोरून राहतो.

तगाते शहरास भेट देणाऱ्या प्रवाशांची गर्दी लक्षात घेऊन लास वेगासच्या धर्तीवर या ठिकाणी जुगाराचे खेळ चालू करावेत अशी एक कल्पना होती परंतु कॅथॉलिक ख्रिश्चन धर्माचे या बेटातून विशेष वजन असल्यामुळे अशा धर्मविरोधी कल्पनांना पाठिंबा मिळाला नाही. या विभागात हॉटेलांची गर्दी असून चार दिवस सुटीचे घालविण्यास शेकडों लोक हॉटेलांचा मोठ्या हौसेने उपयोग करतात.

**स्पेनची सांस्कृतिक छाप :**

अमेरिकेच्या वर्चस्वाखाली कित्येक वर्षे फिलिपिन्स होते, तरीही या बेटावर सांस्कृतिक छाप स्पेनचीच मुख्यतः पडलेली दिसते. फिलिपिन्स या बेटांचे जीवन मुख्यतः शेतीवर अवलंबिलेले दिसते. उसांचे पिक मोठ्या प्रमाणावर काढण्यात येते. नारळ आणि खोबरे यांचे उत्पादन चांगले असून त्यांची निर्यातही बरी होते. मध्ये १९६२ साली भारतातील काही भागात दुष्काळी परिस्थिती जाहीर झाली होती तेव्हा फिलिपिन्सचे प्रेसिडेंट मार्कोस यांनी ५० मेट्रिक टन खोबरेल भारतास भेट म्हणून पाठविले.

फिलिपिनो लोक कॉफीच्या रंगाचे व काहीसे मागासलेले वाटत असले तरी ते तगडे, व शूर दिसतात. परदेशी पाहुण्याबद्दल काहीशी साशंक वृत्ती त्यांच्यात दिसते. आणि बाहेरच्या लोकांना असा सल्लाही दिला जातो की अंधार पडल्यानंतर एकट्या दुकट्याने वावरणे धोक्याचे आहे.

कित्येक फिलिपिनोजवळ बंदुका, शस्त्रे असतात असा निर्वाळाही काही लोक देतात.


**फिलिपिन्सचा भूगोल :**

प्रशांत महासागर आणि चिनी समुद्र या मधील ही फिलिपिन बेटे मॅगेलीनने इ. स. १५२१ मध्ये शोधली. आणि त्यानंतर ३७५ वर्षांनी स्पेनने इ. स. १८९९ साली ती अमेरिकेच्या हवाली केली. लुझॉन हे सर्वात मोठे बेट असून त्याचे क्षेत्रफळ ४०८१४ चौ. मैल भरते, व त्याचीच राजधानी मॅनिला होय. त्याच्या खालोखाल बेट त्रिंदानाओ, हे असून या बेटाचे क्षेत्रफळ ३६९०६ चौ. मैल भरते. तांदूळ हे लोकांचे नित्याचे अन्न. अंबाडी व तंबाखू यांची लागवडही चांगल्या प्रकारे होते. फिलिपिन्समधील विद्यापीठ सुप्रसिद्ध असून एकंदर शिक्षण सुसंघटित आहे. मॅनिला शहर पासिग नदीच्या मुखावर

वसले आहे. अमेरिकेच्या आधिपत्याखाली फिलिपिन्सची भरभराट चांगलीच झाली. साहाजिकच मॅनिला हेही मोठे झाले. एस्कोल्टा हा या शहरातील प्रमुख हमरस्ता असून बँका, सिनेमा, मोठाली दुकाने त्यांत विशेष आढळतात. पण ती परदेशियांच्या मालकीची मुख्यतः दिसली. लष्करातील डिसपोझल मधल्या जीप गाड्यांचा वापर वहातुकीसाठी सरसहा केला जातो, व ती दिवसावर भाड्यानेही मिळतात. मॅनिला येथील म्युझियम व अॅकेरियम, टुमदार व प्रेक्षणीय वाटते. ल्यूनेटा पार्क या मॅनिलाच्या समुद्र किनाऱ्या नजिकचें उद्यानांतून आसपासची शोभा सुंदर दिसते.

**रेझॉलची अखेरची कविता :**

फिलिपिन्सचे महान देशभक्त डॉ. ज्योस रेझाल यांचा बागेतील पुतळा त्यांच्या लोकप्रियतेची साक्ष देतो. फिलिपिनो जनता डॉ. रेझॉल यांना राष्ट्र-पिता मानते. स्पॅनिश सरकारने १८९६ साली त्यांना गोळी घालून ठार मारल्याने



रबराचा मळा

साहजिकच ते शहीद ठरले. मृत्यूच्या पूर्वी डॉ. रेझाल यांनी लिहिलेल्या हृदयस्पर्शी कवितेंतील पुढील भाग उद्धृत करण्यासारखा आहे :

" I die while dawn's rich hues are
 staining yet the sky
Heralds of the freer day still
 hidden from view
Behind the night's dark mantle. And
 should the morning night
Need crimson shed my heart's
 blood quickly, freely let it dye
The new born light with
 the glory of its ensanguined hue "

डॉ. रेझॉल यांना जाऊन आता सुमारे ७५ वर्षे लोटली तरीही जनतेच्या हृदयात त्यांचे स्थान कायम आहे. फिलिपीनचे राष्ट्रीय सरकार प्रतिवर्षी त्यांच्या पुण्यतिथिस सार्वजनिक सुटी देतेच परंतु विविध कार्यक्रमाने त्यांच्या बद्दलची स्मृती जागृत ठरते.

बागिओ हे फिलिपिन्समधले हवा खाण्याचे मस्त ठिकाण असून तेथे काही हिंदी लोक रेशमाच्या व्यापारात गुंतलेले दिसतात. या शहराच्या सभोवती बाल्टाक नावाची एक मोठी सोन्याची खाण आहे. डोंगराच्या तळातून ६००० फूट खाली सुवर्ण मिश्रित दगड काढून त्यातून नेहमीच्या पद्धतीने सोने काढले जाते.

या बेटात सर्वात जास्त लोकसंख्या ख्रिश्चनांची असून स्थानिक धर्म पाळणारे सुमारे १५ लाख लोक असावेत. उरलेले मुसलमान व अन्य धर्मांतील दिसले. ८५% लोक शेतीवर गुजराण करतात, १०% मंडळी लहानमोठ्या उद्योगांत गुंतली आहेत, व उरलेले अन्य व्यवसायात मग्न आहेत.

या प्रमाणे बारा तासांत फिलिपिन्सच्या ज्या महत्त्वाचे भागाचे दर्शन घेणे शक्य होते तो कार्यक्रम पार पाडला. १४ सप्टेंबरला रात्री १० वाजताच आमच्या बोटीने मॅनिलाचा निरोप घेतला.

# थायलंड

**बाजूची दिसणारी बेटे :**

१४ सप्टेंबरला रात्रौ बोट मॅनिलाहून निघाली. मॅनिलाची सामुद्रधुनी निमुळती असल्यामुळे बोट मध्य समुद्रात आली तरी साध्या डोळ्यांनाही दोन्ही बाजूंच्या बेटांवरचा प्रकाश दृश्यमान होतो. थायलंडची राजधानी बँकॉकच्या दिशेने बोट, निघाली. हाँगकाँगला आमचे बोटीत बरेच नवीन प्रवासी आले होते आणि योकोहामा सोडून आठवडा झाल्यामुळे बोटीतील उतारूंचा परिचयही चांगल्या प्रकारे झाला. आंतरराष्ट्रीय पार्श्वभूमीवर एक चिमुकले जगच समुद्रातून चालल्याचा भास होई. जपानी, ब्रिटिश, मलेशियन, थाई, सिलोनी, हिंदी, अमेरिकन, जर्मन, डच, फ्रेंच इत्यादी विविध राष्ट्रातील स्त्रीपुरुष व काही बालकेही ह्या नया संसारात सामील होती. आगबोट फ्रेंच कंपनीची होती तरी ती मध्ये बोटीतील सेवकवर्ग सोडल्यास फ्रेंच उतारु मोजकेच दिसले. आर्थिक



**बागेतील माकडाचे कौतुक बोटीवरील परिचित दांपत्य करीत आहे.**

क्षेत्रात फ्रान्स मागे पडू लागल्याचे हे एक चिन्ह आहे. फ्रँकचा भाव घसरत असल्याचे बोटीवरही प्रत्ययास आले. बोटीतील व्यवहार फ्रेंच चलनात होई आणि समुद्र किनाऱ्याला बोट लागण्याच्या अगोदर काही तास चलनाचा व्यवहार बंद केला जाई.

फार मोठी नाही व फार लहानही नाही अशी मध्यम स्वरूपाची आमची बोट होती. तिची लांबी ५३२ फूट होती, तर रुंदी ७२ फूट भरली. २४ शॅफ्ट हॉ. पॉ. चे पार्सन्स टर्बाईन इंजिन या बोटीला वेग आणत होते आणि तिचा सरासरी वेग २१ नॉटिकल मैल पडे.

**सर्वाधिकारी कॅप्टन :**

आगगाडी किंवा विमान यातील प्रमुखाच्या हातात काही सत्ता असली तरी त्याच्या अधिकारास पुष्कळच मर्यादा असतात. परंतु बोटीचा कप्तान हा जवळ जवळ त्या वाहनाचा सर्वाधिकारीच रहातो. आमच्या बोटीचे कप्तान कॉप्युले हे वयस्कर फ्रेंच गृहस्थ मोठे रुबाबदार दिसत, आणि रात्रौ पहिल्या वर्गातील करमणुकींच्या कार्यक्रमात पहिल्या रांगेत मोठ्या डौलानें विराजमान होत. बोटीच्या प्रवासात रात्री पहिल्या वर्गाच्या लाउंजमध्ये लुटुपुटीची घोड्याची शर्यत, बिंगो नांवाचा खेळ, व बॉल नृत्ये इत्यादी करमणुकीचे प्रकार अधून मधून घेतले जात. टूरिस्ट वर्गानाही या कार्यक्रमांना प्रवेश असल्यामुळे दोन घटका मनोरंजन होई.

दिवसभर तीनचारदा खाणे, जेवणे वगैरे कार्यक्रम व त्या मानानें व्यायाम कमी यामुळे अपचन, पोटदुखी असे विकार होत. नाही म्हणायला पहिल्या वर्गाचा डेकचे खाली जो पोहण्याचा छोटासा तलाव होता त्यात अर्धा पाऊण तास हात मारण्याने चांगली व्यायामही होई व त्याचा मी जरुर लाभ घेई.

मॅनिला ते बँकाक हा प्रवास तीन पुऱ्या दिवसाचा असून १८ सप्टेंबरला दुपारी चार वाजता बोट बँकॉकला पोहोचली. १ तास शोअर पास घेण्यात व अन्य तांत्रिक सोपस्कारात गेला तेव्हा कोठे बंदराच्या बाहेर पडता आले. किनाऱ्यापासून मुख्य बँकॉक शहर ५ मैलावर असल्यामुळे बंदरात उभ्या असलेल्या टॅक्सीज् घ्याव्या लागतात. प्रवाशांना नाडण्यात त्यांची अहमहमिका दिसते. एका अमेरिकन डॉलरला २० स्थानिक बहत ही नाणे मिळतात, आणि एकंदर महागाईही या शहरात बरीच आढळली. व्हिएटनाम युद्धामुळें बऱ्याचशा

अमेरिकन सैन्याचे तळ थायलँडमध्ये दिसून आले आणि विमान वहातूक व आगबोट वहातूक याचे बँकॉक हे केंद्र असल्याने परदेशी प्रवाशांची मोठीच ये जा या शहरात आढळली. साहजिकच सर्वच पदार्थांचे भाव वधारल्यास नवल नाही.

**पूर्वेकडील व्हेनिस :**

बँकॉकला पूर्वेकडील व्हेनिस म्हणतात. पश्चिमेकडील व्हेनिस प्रत्यक्ष न पाहिल्यामुळे ही तुलना कितपत सार्थ आहे हे सांगणे कठीण–परंतु नदी समुद्रांत शिरताना जे अनेक जलमार्ग सहज निर्माण झाले, त्यामुळे शहराला स्वरुप आगळेच आले आहे. पाण्याचे सदैव सान्निध्य व समुद्र सपाटीला लागून वस्ती यामुळे आरोग्यास हानीकारक वातावरण आढळले.

हाँगकाँग, फिलिपाईन्स इत्यादी बेटांवर इंग्रजी, साधारणतः समजले जाते. पण बँकॉक येथे थाई लोकांना इंग्रजीचा गंधही दिसत नव्हता. तसेच दुकानाच्या पाट्या, ठिकाणांची नांवे इत्यादी सर्व थाई भाषेत व लिपीत असल्यामुळे परदेशी प्रवाशाची मोठीच गैरसोय होते. या अडचणीचे एक साधेच उदाहरण देतो. पाचूचा बुद्ध ( एमेरल्ड बुद्ध ) हे बँकाक मधील प्रेक्षणीय देऊळ शोधण्यात माझे दोन तास गेले. इंग्रजीत कोणास विचारल्यास बोध होईना. स्थानिक भाषा मला येत नव्हती. शेवटी आमच्या बोटीतलेच काही उतारु या देवळाला जाऊन परत येत होते, ते आम्हास भेटल्यामुळे एकदाचा या देवळाचा पत्ता लागला. अर्थात् काही प्रवासी कंपन्या, शहर दाखविण्याची व्यवस्था करतात. परंतु कधी कधी ते जास्त खर्चाचे होते. आणि आपल्याला विशिष्ट स्थळी जास्त वेळ घालवायची इच्छा असेल तर ते या योजनेत जमत नाही.

**रामायणाची छाप :**

थायलंडवर रामायण, महाभारत, इत्यादींचा मोठा प्रभाव झालेला आढळतो. तेथील राजांची नावे राम १ ला, राम ८ वा या प्रमाणे आढळली. परंतु बुद्धिस्ट संस्कृतीच्या प्रभावापुढे हिंदु संस्कृति काही काळ फिकी पडली. बँकॉक मधील प्रेक्षणीय स्थळात जुन्या राजवाड्यास पहिले स्थान दिले पाहिजे. १८ व्या शतकात राजे चक्री यांनी हा राजवाडा बांधला. त्यात देवळे आहेतच तसेच राज्याभिषेक करण्याचा महाप्रसाद दिवाणखाना पहाण्यासारखा आहे. गुरुवारी व रविवारी राजवाडा पहाता येतो. राजवाड्याला लागूनच वट प्रा क्यू म्हणजे पाचूच्या बुद्धाचे देवालय लागते. १५ व्या शतकात पाचूच्या


बुद्धाची मूर्ति घडविण्यात येऊन ती नैर्ऋत्य आशियातील निरनिराळ्या राष्ट्रातून फिरविण्यात आली व अखेर तिची प्रतिष्ठापना १८ व्या शतकात बँकॉक येथे या देवालयात झाली. या देवळाच्या तक्तपोशीवर रामायणातील विविध देखावे कोरण्यात आले आहेत.

**वट–देवालये** : वट पो या देवालयात १५० फूट लांबीची पहुडलेल्या बुद्धाची मूर्ती भव्य वाटते. वट बेंजाम्बोपित हे संगरमरवरी देवालय सौंदर्याचा साक्षात्कार घडवते. त्याचे सोनेरी छप्पर दूर अंतरावरून लकाकताना दिसते. आणि थाई देवळात या देवळाने सौंदर्याच्या दृष्टीने पहिला क्रमांक मिळविला आहे. वट ( देवालय ) अरुण हे बँकॉक मधील सर्वात जुने देवालय. २५० फूट उंचीच्या या देवळाचे पॅगोडातून शहराचा संपूर्ण देखावा दिसतो. बँकाक मधील लुंविनी पार्क हे उद्यान नागरिकात लोकप्रिय झाले आहे. राष्ट्रीय वस्तुसंग्रहालयही पहाण्यासारखे आहे. थाई पोशाख, रथ, स्मशान यात्रेचे खास रथ व पुराणवस्तूंचे नमुने इत्यादींनी हे संग्रहालय भरले आहे.

बँकॉक येथील सर्प संग्रहालय वैशिष्टयपूर्ण आढळले. नागासकट निरनिराळ्या विषारी सर्पांचे विष काढून त्यांचे सीरम बनविले जाते. सापांना रविवारी खायला घालतात; आणि त्यांचे विष लगतच्या गुरुवारी सकाळी काढण्यात येते.

अभिजात थाई नृत्ये ही संस्कृत पुराणावर आधारित असतात आणि नोव्हेंबर ते मे या महिन्यात राष्ट्रीय वस्तु संग्रहालयाच्या आवारात या नृत्यांचे प्रयोग पहावयास मिळतात. काही नाईट क्लब्स मध्येही अभिजात नृत्ये दाखविली जातात. भारतीय संस्कृतीशी थाई संस्कृति मिळतीजुळती असली तरी हिन्दी लोकांचे बद्दल सदर देशात आपुलकी आढळून येत नाही. याचे कारण आमच्या परराष्ट्रीय खात्याने शोधून काढले पाहिजे. थाई जनतेचे उत्सव व समारंभ सामान्यतः तीन प्रकारचे आढळले. पहिला प्रकार बुद्ध धर्मीयांचे सण व जत्रा; दुसऱ्या प्रकारात हिंदु, चिनी इत्यादींचे प्राचीन परंपरागत चालत आलेले पूजाप्रकार आणि राष्ट्रीय सुटीच्या दिवशी आनंद प्रदर्शक पाळले जाणारे उत्सव. महापूजा हा पवित्र दिवस फेब्रुवारीत येतो. भगवान गौतम बुद्धांनी आपल्या १२५० शिष्यांना या दिवशी दिव्य संदेश दिला त्याची तत्वे अशी–दुष्कृत्यापासून दूर व्हा, सदाचाराने वागा आणि मन पवित्र राखा. बीजारोपणाचाही एक विधी मे महिन्यात पावसाळ्याच्या सुरुवातीला पार पाड-

ण्यात येतो. पंजाबमध्ये वैशाखीचा समारोह जसा विशिष्ट थाटात केला जातो. तसाच काहीसा प्रकार थायलंड मध्ये विशाखापूजेत आढळतो. भगवान गौतम-



चिनी स्मशान यात्रा

बुद्धाचा जन्मदिनही मे महिन्यात मोठ्या आदराने सर्व थायलंडभर साजरा होतो; आणि या धार्मिक सोहळ्यात सर्व जनता मोठया उत्साहाने भाग घेते.

**चिमुकले थायलंड :**

बँकॉक पासून २५ मिनीटांच्या रस्त्यावर एक स्वतंत्र चिमुकले थायलंडच २० एकराच्या क्षेत्रात वसविण्यास आले आहे. थायलंडमध्ये होणारी सर्व जातीची फळझाडे, तेथील नद्या व समुद्रात आढळणारे शेकडो प्रकारचे मासे, वन्य पशू ऑर्कीडचे भिन्न प्रकार एक ना दोन शेकडो गोष्टींचा संग्रह या भूमीवर करण्यांत आला आहे. तसेच काही ग्रामोद्योगाचे नमुने करणारे कारागीर प्रत्यक्ष उद्योग करत असताना या ठिकाणी पहावयास मिळतात. या खेरीज ग्रामीण नृत्ये, बॉक्सिंग इ. खेळ, कोंबड्यांची झुंज यांनीही प्रवाशांची करमणूक होते. एवढ्याने संपले नाही म्हणूनच की काय हत्ती मोठमोठे ओंडके कसे ओढतो त्याचे प्रात्यक्षिकही होते. तात्पर्य थायलंड एकसमुदायावच्छेदेकरून वानगीदाखल पहावयाचे असेल तर प्रस्तुत टी. आय. एम्. लँडला जरूर भेट द्यावी.

**खलाशांच्या करमणुकीसाठी :**

लाओस बोट बँकॉक बंदरात नांगरून पडली असताना छोट्या छोट्या मोटार बोटीतून चांदण्या रात्री कित्येक थाई मुली बोटीच्या मागचे बाजूस दोरखंडाच्या शिडीने वर चढताना आम्हास दिसल्या. वाटल बोट पहाण्याच्या कुतुहलाने या मुली हा उपक्रम करतात. पण अंदर की बात वेगळीच होती. मोठमोठ्या प्रवासी व इतर बोटी बंदराला लागताच एकलकोंड्या खलाशांची करमणूक करावी व त्यातून चार पैसे कमवावेत हा या पोरींचा हेतु. परंतु त्यासाठी जलद वेगाने चालणाऱ्या बोटीतून चोर पावलाने मागचे बाजूने इतक्या उंचावर चढणे धोक्याचे तर खरेच. आमच्या बोटीतील एका जपानी महिलेनें या प्रकाराकडे माझे लक्ष वेधलें, तेव्हा कोठे मला त्यातले गूढ समजले. असले प्रकार मोठ्या बंदरातून विशेष आढळतात; आणि कित्येकदा वेळापत्रकाकडे थोडा कानाडोळा करून ज्या बंदरातून करमणुकीची रेलचेल तेथे या बोटीही थोडा अधिक वेळ घालवतात. नाहीतरी A girl in every port असा कित्येक खलांशांचा अनुभव असतो त्याचे काहीसे प्रात्यक्षिकच आम्हास पाहावयास मिळाले.

१९ तारखेला सायंकाळी लाओसने बँकॉक सोडले. पुन्हा काही नवीन उतारू आमच्या बोटीत आले. अशी ये जा बंदरा बंदरातून चालूच असते. ‘यथा काष्ठं च लोष्ठं च समेहाताम् महादधौ। तद्वत भूत समागमः’ या सुभाषिताची प्रचीती बोटीवरील प्रवाशांच्या येण्याजाण्यावरून साक्षात् येते.

आमच्या बोटीवरील विभिन्न प्रवाशांत एक गंगा जमनी जोडपे वैशिष्ट्यपूर्ण वाटलें कैसर नावाचे एक डच वयस्कर व्यापारी व त्यांची जपानी तरुण पत्नी हा उतारूंना थोडासा कुतुहलाचा विषय वाटे.

विशेषतः भोजनगृहात श्री. कैसर त्यांच्या खांद्यावरील पोपटासह प्रवेश करीत तेव्हा ते पुष्कळांचे लक्ष वेधून घेत. माझा व त्यांचा परिचय होण्याचा अवकाश त्यांनी गप्पांचा धबधबा सुरू केला.

पत्र व्यवसायाशी माझा निकटचा संबंध आहे असे कळल्यावर हव्या त्या विषयांवर माहिती पाहिजे असेल तर ती देण्याचे आश्वासनही त्यांनी देऊन टाकले. कधी कधी एका टेबलावर कॉफी घेत असताना या भिन्न संस्कृतीतून एकत्र आलेल्या नवरा बायकोतील संघर्षाचे पडसादही ऐकू येत.

इतकेच नव्हे तर स्त्रीस्वभावाप्रमाणे आपल्या पतीच्या देखत सदर जपानी पुरंध्रीने सरळ सांगून टाकले की यजमानाकरता आपण इतका त्याग करीत असताना त्यांना त्याचे काहीच वाटत नाही. अशा तक्रारीचे वेळी त्रयस्थाने मुग्धता स्वीकारणे श्रेयस्कर !

**पत्रकार–उन्नी नायर यांची भेट :**

बोटीवर उन्नी नायर या पत्रकाराच्या परिचयाने मला आनंद वाटला. रशियामध्ये काही वर्षे पत्र प्रतिनिधी म्हणून काम करीत असलेले श्री. नायर



**बोटींत जवळ आलेली पत्रकारांची जोडी**
**— श्री. उन्नी नायर; श्री. ना. तु. ठाकूर**

यांचेकडून तेथील ताज्या वार्ता उद्‌बोधक वाटल्या. रशियाहून मायभूमीकडे ते या बोटीतून परत निघाले होते.

**बोटींतील चित्रपट :**

बोटींवरील करमणुकीत रोज दुपारीं २ ते ३॥ डायनिंगहॉलमध्ये चित्रपट दाखवीत त्याचाही उल्लेख करावयास हवा. हे चित्रपट जुनाट असले तरी त्यापैकी बहुतेक विनोद प्रचुर व सुखांत असत. तीनचार फ्रेंच भाषेतील बोलपट आम्हांस दाखविण्यांत आले. ब्रिटिश फिल्मचा भरणा जास्त होता.

एकदोन कार्यक्रम फक्त कार्टून्सचे होते. डॅनी रॉबिन्स, कोनी फ्रॅन्सिस, रॉड स्प्रिगर, सिल्व्हीआ कॉसीना, रॉड टेलर, जेन फोंडा, इ. कलावंतांनी कामे केलेले काही चित्रपट लक्षात राहिले. टूरिस्ट क्लासासाठी भोजनोत्तर दुपारची दोनची वेळ जी चित्रपटाकरिता ठेवण्यात आलेली होती, ती मात्र कित्येकांना गैरसोयीची वाटे आणि त्यामुळे हॉलमध्ये बेताचेच प्रेक्षक जमत. काउबॉय फिल्मसही विशेष दाखवत.

लायब्ररीतून पुस्तके मिळण्याची सोय असल्याचे माहितीपत्रकांत नमूद होते. पण ही ग्रंथालये (?) नावाचीच आढळली. बरीचशी पुस्तके प्रवाशांनीं पूर्वी विकत घेऊन बोटींत टाकून दिली ती संग्रहित केलेली दिसली. फ्रेंच बोट असल्याने काही उत्कृष्ट फ्रेंच साहित्य पहावयास मिळेल अशी आशा वाटली पण त्याही बाबतीत अपेक्षा भंग झाला; आणि पुस्तकातल्या कथा वाचतांना तद्रूप होण्यापेक्षा जिवंत अनुभवाला उतारू अधिक आसुसलेले दिसल्यास नवल नाही. त्यामुळे काही एकलकोंडे पुस्तकात तोंड खुपसून बसले तरी बरीचशी मंडळी डेकवर गप्पागोष्टी व थट्टाविनोद करतांना आढळत.

जपानमध्ये अलीकडे विभिन्नदेशीय वधूवरांचे विवाह बरेच होऊ लागले असून विवाह ही वैयक्तिक बाब समजण्यात येऊ लागली आहे. पुरुषाच्या बरोबरीने मर्दुमकी करणाऱ्या जोडीदारणीपेक्षा जुन्या संस्कृतीप्रमाणे पुरुषास सर्वस्व मानून त्याचे जीवनांत आत्मसमर्पण करणारी जपानी कुलवधू विशिष्ट वृत्तीच्या पुरुषांना विशेष मनपसंत पडल्यास नवल नाही. बोटीतच मला आपुलकीने पोटदुखीवर औषधाच्या गोळ्या देणाऱ्या थाई डॉक्टरची पत्नी वर लिहिलेल्या गुणांची पुतळी अशी जपानी वधू होती. जपानमध्ये सदर थाई डॉक्टर आपला विद्याभ्यास पुरा करीत असताना इस्पितळात परिचारिकेचे काम करीत असलेल्या जपानी मुलीशी त्याचे प्रेम जुळले व विवाहोत्तर थायलंडमध्ये प्रॅक्टिस चालू करण्यास तो पत्नीस घेऊन चालला होता. असो.

भारताच्या राष्ट्राध्यक्षांचे नेत्रवैद्य डॉ. दस्तुर व मिसेस दस्तुर यांचाही बोटीत चांगला परिचय झाला. डॉ. दस्तुर एका आंतरराष्ट्रीय परिषदेत भाग घेऊन मुंबईकडे निघाले होते. एक फ्रीलान्स अमेरिकन पत्रकारही या प्रवासात माझे काही प्रमाणात दोस्त झाले.

बोटीत वाचन व लेखनास तसा ठीक वाव मिळतो. त्यामुळे दीपमाले-साठी लिखाण मी बोटीवरच केले व वैमानिक टपालाने ते वेळीच

भारताकडे पाठविता आले. एकदां आपापल्या देशांत पाय ठेवल्यावर मग नित्याच्या कामाच्या चक्रात सापडले की लिहायला कोठची फुरसत ! दि. १९ सप्टेंबर रोजी आमच्या बोटीने बँकॉक सोडले. हाँगकाँगमध्ये स्थायिक झालेले व सीलोनला निघालेले माझे एक नवे जोडलेले मित्र श्री. विक्रमसूर्य बँकॉकमधील मनोरम आठवणीत इतके मश्गुल होत की आता आपण सिंगापूरजवळ येत आहोत याची त्यांना आठवण करून द्यावी लागली. ते एक चांगले खेळाडू आहेत आणि बँकॉकमध्ये त्यांनी जिंकलेल्या मॅचेसचे समाधान त्यांच्या बोलण्यातून प्रगट होई. सिंगापूरला बोट अपेक्षेपेक्षा थोडी अगोदर म्हणजे दुपारी ४ वाजतां शनिवार दि. २१ सप्टेंबर रोजी पोहोचली.

## सिंगापूर

### ब्रिटिशांचा आरमारी तळ :

सिंगापूर येथे ब्रिटिशांनी आरमारी तळ ठेवला एवढ्यावरून त्याच्या मोक्याच्या जागेची कल्पना येईल. आता इंग्रज तो तळ कमी करण्याच्या उद्योगांत आहे पण चिमुकल्या सिंगापूरला एकट्याला ही शक्ति कितपत टिकविता येईल हा प्रश्न आहे. हिंदी महासागरातून मलाक्काच्या सामुद्रधुनींत प्रवेशता येत असल्यामुळे भारताने स्वसंरक्षणाचे दृष्टीने सिंगापूरकडे लक्ष द्यावयास हवे.

मलाया द्वीपकल्पाच्या दक्षिणेचे टोकात सिंगापूर वसले असून विषुव-वृत्ताच्या उत्तरेस ८० मैलावर ते असल्याने हवा, पाऊस–पाणी या कटिबंधा-प्रमाणेच साहजीक आढळते. भारत व चीन यातील सागरी मार्गाच्या मध्यावर सिंगापूर येते. सिंगापूरमध्ये विभिन्न भाषा, संस्कृति, धर्म इत्यादींची सरमिसळ झाल्याने त्याला एक वैशिष्ट्यपूर्ण स्थान प्राप्त झाले आहे. मलेशिअन, चिनी, हिंदी, पाकिस्तानी, इंडोनेशिअन, युरोपीय, युरेशिअन्य इत्यादी विविध देशीयांना सिंगापूरने सामावून घेतले आहे.

### ' सिंहपुर ' म्हणजे सिंगापूर :

सिंगापूरचा इतिहास तसा ख्रिस्ताब्दापूर्वी ६००० वर्षांपर्यंत ओढता येतो. मूळ ऑस्ट्रेलिअन आदि वस्तीतील काही टोळ्या सिंगापूरला आल्याचा दाखला

आहे, तर हिंदु संस्कृतीचे आधिपत्य या बेटावर होते याचा विशेष बळकट पुरावा आढळतो. ‘ सिंह-पुर ’ या संस्कृत शब्दांपासून ‘ सिंगापूर ’ नांव अस्तित्वात आले हे उघड आहे. आर्यांनीं प्राचीन मुलुखगिरींत सिंगापूर, थायलंड, इंडोने-



**हॉपार व्हिलांतील कॉंक्रीटमधील रंगीत दृश्य**
**पुरुषाचा स्त्रियांकडून अधःपात**

शिया, ब्रह्मदेश इ. देश पादाक्रांत केले इतकेच नव्हे तर हिंदी संस्कृतीची बीजे तेथे रुजविली.पाश्चात्यानी ज्या विज्ञानाधिष्ठित मोहिमा या अति पूर्वेकडील देशावर केल्या त्यांचेपुढे त्या देशात स्थायिक झालेल्या भारतीयांची शक्ति कमी पडली असावी असा अंदाज आहे. तेराव्या व चवदाव्या शतकात मलाई राज्य सिंगापूरावर होते पण इ. स. १३३७ सांली जाव्हातील लोकांनी स्वारी करून स्थानिक लोकांना जवळ जवळ नामशेष केले.

त्यानंतर सुमारे पाचशे वर्षांनी म्हणजे १८१९ मध्ये सर स्टेफोर्ड रॅफाल्स बेटात उतरले. जोहोरच्या सुलतानांनी पुढे पाच वर्षांनी सन १८२४ साली

ब्रिटिशांना सिंगापूर बहाल केले व तेव्हांपासून ईस्ट इंडिया कंपनीच्या हालचालीचे सिंगापूर प्रमुख केन्द्र बनले.

**स्वतंत्र राज्याचा दर्जा :**

दुसऱ्या महायुद्धात सिंगापूर जपान्यांनी घेतले पण युद्ध संपताच सिंगापूरला पूर्वीचा दर्जा प्राप्त झाला. १९५५ मध्ये सिंगापूरला पुष्कळशी स्वायत्तता मिळाली व त्यानंतर चार वर्षांनीच स्वतंत्र घटना कार्यवाहीत येऊन सिंगापूरचे स्वतंत्र राज्य झाले इतकेच नव्हे तर त्याला संपूर्ण अंतर्गत स्वातंत्र्य मिळाले. जनतेने निवडलेल्या विधिमंडळास मुख्य मंत्रि व त्याचे मंत्रिमंडळ जबाबदार आहे. सिंगापूर बेट जेमतेम २२४ चौरस मैलांचे असल्याने जरी ते स्वायत्त असले तरी स्वातंत्र्य टिकविण्यासाठी कोणत्या तरी बलिष्ठ राष्ट्राशी त्याने संधान जोडणे आवश्यकच आहे. बेटाची लोकसंख्या सुमारे वीस लाखापर्यंत गेली असल्याने त्यास सिटीस्टेट असे संबोधण्यास हरकत नाही.


सिंगापूर व हाँगकाँग येथे जकातीचे झंझट नसल्याने विविध प्रकारच्या वस्तूंच्या किंमती किमान आढळतात. त्यामुळे खिसा गरम असलेल्या प्रवाशांना मनमुराद खरेदी करण्याची ती आगरे वाटतात. चिनी व्यापारी सिंगापुरात पुष्कळच असल्याने कम्युनिस्ट चीनचा माल मोठ्या प्रमाणावर सिंगापूरच्या बाजारपेठात आढळतो. अखेरपक्षी धंदेवाईक अन् व्यापारी चार पैसे कमविण्याच्या मागे असल्याने तो पुढाऱ्यांना त्यांचे राजकीय वाद खेळू देतो आणि आपले बँकखाते कसे फुगत जाईल इकडे त्याचे पहिले लक्ष असते. त्यासाठी सिंगापूरचे व्यापारी मग ते चिनी हिंदी किंवा मलायी असोत मोठे अनुभवी व वाकबगार दिसले. सिंगापूरला आलो त्या दिवशी सायंकाळीच रॅफल्स स्कैअरला बसमधून गेलो. मुंबईतील फोर्ट विभागाशी मिळताजुळता आहे हा भाग. इंग्रजी बोलणारे तामिळी बरेच आढळले सिंगापूरमध्ये मला. ओरिएंटल एंपोरिअम हा प्रचंड डिपार्टमेंटल स्टोअर्स बाजारपेठेचे मोठेच आकर्षण वाटले. वस्तूंच्या विक्रीवर सोडतीची कूपन्सही दिली जात होती व स्वस्तातल्या खरेदीवर आणखी बक्षीस मिळविण्याची संधी ग्राहकांना मिळत होती. सिंगापूरात चिनी बाजार म्हणून जे मार्केट आहे तेथे किंमतीची घासाघीस करण्यास भरपूर वाव पण त्यासाठी मालाची यथार्थ किंमत माहिती मात्र असायला हवी.

सिंगापूरच्या बाजारपेठांची याप्रमाणे चाचणी करून बोटीत मुक्कामाला आलो मी.

[illegible] २०३६२ [illegible]

**चिनी ' ब्राह्मण ' मि. लिन :**

ज्यांना मी जपानहून पत्र टाकले होते अशा सिंगापूरमधील हितचिंतकास म्हणजे चौ चिन लिन यांना दुसरे दिवशी भेटायला गेलो. आमचे बोटीच्या धक्क्यापासून त्यांचा बंगला फारच दूर, पण शोधून काढला मी तो निश्चयाच्या बळाने ! सिंगापूरच्या थिऑसॉफिकल सोसायटीचे मि. लिन पदाधिकारी असून त्यांचेशी झालेल्या परिचयाने चिनी व्यक्तिबद्दल जो एक अविश्वास माझ्या



सिंगापूर चौकांतील कारंजे

मनात वसत असे तो कोठल्या कोठे निवून गेला व एखादा जुना मित्र भेटावा अशी आमची दिलजमाई झाली. मी शाकाहारी आहे असे कळताच मि. लिन यांनी स्वतः शाकाहारी असल्याची ग्वाही दिली एवढेच नव्हे तर सिंगापुरात आपणांस चिनी ब्राह्मण म्हणतात असे त्यांनी सांगताच आम्ही दोघेही दिलखुलास हसलो.

**जोहोर बारू :**

दुपारी बोट कंपनीमार्फत नियोजित जोहोर बारू ( नवे जोहोर ) च्या सहलीत भाग घेतला. १५ सिंगापूर डॉलर खर्चावे लागले त्यासाठी. मलाया द्वीपकल्प व सिंगापूर यांच्यामध्ये जोहोर हे चिमुकले राज्य येते. सुलतानाचा कारभार तेथे चालू असल्याने इस्लामी संस्कृतीचा आविष्कार प्रत्ययास येतो.



सुलतानाचा जुना राजवाडा–जोहोरबारू

सिंगापूर ते जोहोर ही सफर सोळा मैलांची असून वाटेत चिनी शिल्पाची देवळे, ऑर्किड उद्यान व अन्य प्रेक्षणीय ठिकाणे पहावयास मिळाली–पुढे वाद्ये व मागे चित्रविचित्र कापडी आकृत्या अशा सरंजामातील चिनी स्मशानयात्रा नवलच म्हणायचे ! जोहोर मध्ये प्रवेश करताना कस्टम अधिकारी कागदपत्रांची कसून



जोहोर उद्यानांतील पुष्करणी


तपासणी करतात. किरकोळ तांत्रिक चुकीकरता आमच्या बरोबरच्या काही प्रवाशांना परत जावे लागले. जोहोरमधील जुन्या सुलतानाचा किल्लेवजा वाडा, उंच मनोऱ्यांनी लक्षात येणारी प्राचीन मशीद, सध्याच्या सुलतानांचा आधुनिक बंगला, आधुनिक पद्धतीची बाग व पुष्करणी इत्यादी छायाचित्रे घेण्यासारखे बरेचसे देखावे पाहिले. एकंदरीत हा प्रवास आल्हादकारक झाला. रबराचे मळेही रस्त्यातून दिसले. रबराच्या झाडाचे बीही गंमत म्हणून बरोबर आणले मी. चिनी मुलामुलींचा घोळका प्रवाशांना अधून मधून भेटे. त्यांचे फोटो घेतल्याने खूप मौज वाटली त्यांना.

हाँगकाँगमध्ये विविध तऱ्हेच्या करमणुकी प्रेक्षकांची मने रिझवत असल्या तरी ब्रिटिशांचा उच्चभ्रूपणा त्यात प्रतीत होई. सिंगापूर अठरा पगड जमातींची जत्रा असल्याने तेथील करमणुकी काहीशा उत्तान भासल्या. भिन्न रुचींच्या लोकांना त्यांच्या त्यांच्या आवडीप्रमाणे दोन घटका मनोरंजन करून देणारी ठिकाणे सिंगापूरमध्ये भरपूर आहेत.

सिंगापुरातील माझा तिसरा दिवस माझे चिनी वयस्कर मित्र मि. चौ चिन लिन यांचेबरोबर प्रेक्षणीय स्थळे पाहण्यात काढला. हाँगकाँगपेक्षांही येथील टायगर बाम टेकडी, उद्यान व काँक्रीटमधील रंगीबेरंगी चित्रे प्रेक्षणीय वाटली. बेटाच्या पश्चिम किनाऱ्यालगत ‘टायगर बाम’च्या आता दिवंगत असलेल्या




जोहार मधील ऐतिहासिक मशीद



' जीवन ऐसे नाव–' टायगर बाम टेकडी

मूळ मालकाचा–हॉ पार व्हिला–सिंगापूरचे एक आकर्षण समजले जाते. चीनहून निष्कांचन अवस्थेत सिंगापूरला येऊन स्थायिक झालेल्या व कालांतराने कोटय-धीश बनलेल्या या कारखानदाराचे जीवन रोमहर्षक आहे. टायगर बामची बाटली मी खरेदी केली ती अमृतांजन इतपतही गुणकारी वाटली नाही. टायगर ऑईल




खुलें नाटयगृह–सिंगापूर

तपासणी करतात. किरकोळ तांत्रिक चुकीकरता आमच्या बरोबरच्या काही प्रवाशांना परत जावे लागले. जोहोरमधील जुन्या सुलतानाचा किल्लेवजा वाडा, उंच मनोऱ्यांनी लक्षात येणारी प्राचीन मशीद, सध्याच्या सुलतानांचा आधुनिक बंगला, आधुनिक पद्धतीची बाग व पुष्करणी इत्यादी छायाचित्रे घेण्यासारखे बरेचसे देखावे पाहिले. एकंदरीत हा प्रवास आल्हादकारक झाला. रबराचे मळेही रस्त्यातून दिसले. रबराच्या झाडाचे बीही गंमत म्हणून बरोबर आणले मी. चिनी मुलामुलींचा घोळका प्रवाशांना अधून मधून भेटे. त्यांचे फोटो घेतल्याने खूप मौज वाटली त्यांना.

हाँगकाँगमध्ये विविध तऱ्हेच्या करमणुकी प्रेक्षकांची मने रिझवत असल्या तरी ब्रिटिशांचा उच्चभ्रूपणा त्यात प्रतीत होई. सिंगापूर अठरा पगड जमातींची जत्रा असल्याने तेथील करमणुकी काहीशा उत्तान भासल्या. भिन्न रुचींच्या लोकांना त्यांच्या त्यांच्या आवडीप्रमाणे दोन घटका मनोरंजन करून देणारी ठिकाणे सिंगापूरमध्ये भरपूर आहेत.

सिंगापुरातील माझा तिसरा दिवस माझे चिनी वयस्कर मित्र मि. चौ चिन लिन यांचेबरोबर प्रेक्षणीय स्थळे पाहण्यात काढला. हाँगकाँगपेक्षांही येथील टायगर बाम टेकडी, उद्यान व काँक्रीटमधील रंगीबेरंगी चित्रे प्रेक्षणीय वाटली. बेटाच्या पश्चिम किनाऱ्यालगत 'टायगर बाम'च्या आता दिवंगत असलेल्या



जोहार मधील ऐतिहासिक मशीद

जडीबुटीचे तेल आहे. पोटातील अनेक रोगांवर दोन तीन थेंब पाण्याबरोबर घेताच आराम पडतो अशी त्याची जाहिरात केली जाते.–' झिंदा तिलिस्मात ' च्या धर्तीवर ही दवाई आहे. पण शिकंदर नशिबाच्या जोरावर आणि बेफाम जाहिरातीवर या औषधाच्या मालकाने अमाप पैसा कमविला. येथे वास्तव्य असताना अपघाती मृत्यु आल्याने प्रचंड इस्टेट जनतेसाठी जगातील विविध संस्कृतीचे शिल्पदर्शन घडविण्याच्या कार्यार्थ आयोजिली गेली. यातील काही निवडक चित्रांचे फोटो घेण्यात माझा बराच वेळ गेला. सिंगापुरातील काही खास ग्रामीण वस्तूही येथे स्वस्तात मिळतात. दीड सिंगापूर डॉलरला घेतलेला चंदनी पंखा सिंगापूरच्या सुवासाची स्मृति जागृत ठेवतो.

मि. लिननी मला जाकार्ताचे एक उद्योगपति व होनोमाता कंपनीचे मॅनेजिंग पार्टनर मि. के. जी. लिम यांच्या कचेरीत नेले. जीवनात शांति लाभण्यास अध्यात्माचे केवढे महत्त्व आहे यांवर आम्हां तिघांत सखोल चर्चा झाली. सिंगापूर येथील ओपन एअर थिएटर, उद्यानातील रिपांचे आकडे असलेले पांढऱ्या सफेद प्रचंड काटयांचे भुइदर्शनी घड्याळ वगैरे खास दृश्ये पाहिली.


मि. लिम यांचे कचेरीत श्री. त्रिवेदी या सिंगापूरला स्थाईक झालेल्या गुजराती गृहस्थांची ओळख झाली. त्यांनी आम्हांस दक्षिण भारतीयांचे विश्रांती-गृहांत नेले. भारत सोडल्यानंतर सुमारे अडीच महिन्यांनी डोसा, चपातीसारखे भारतीय पदार्थ खावयास मिळाल्याने साहजिकच समाधान वाटले. या कार्य-क्रमानंतर नवरात्राचा पहिला दिवस असल्याने आम्ही सुब्रह्मण्यमचे देवालयात गेलो. तेथे गणपती, दुर्गा इत्यादींच्या प्रतिमाही मनोज्ञ आहेत. कीर्तन, भजन चालूच होते. हिंदी स्त्रीपुरुषांचा संमर्द पाहून क्षणभर भारतात आल्यासारखे वाटले. त्रिवेदी चांगले गवई असून रेडिओवर त्यांचे कार्यक्रम होतात. गाणे ऐकण्यासाठी थांबण्याचा आग्रहही त्यांनी केला. पण बोटीवर हजर राहण्याची वेळ झाल्यामुळे आम्ही सर्वांचा प्रेमाने निरोप घेतला.

सोमवार दि. २३ सप्टेंबरला सायंकाळी आम्ही सिंगापूर सोडले. सिंगापूर ते कोलंबो अडीच दिवसांचा प्रवास. समुद्राचे शांत स्वरूप एकदम बदलून त्याचे रौद्रात रूपांतर झाले. त्यात अधूनमधून तुफानी पावसाची भर. डेकवर दोन्ही बाजूंनी पाण्याचा धपाटा येई. त्यामुळे त्यावर फेरफटका मारणे गैरसोयीचे. पोहोण्याचे तर नावच काढायला नको–नाहीं म्हणायला ' मिनिएचर फुटबॉल ' हा लोखंडी बाहुल्या भिडू धरून हाताने पिंगपाँगच्या आकाराच्या पण कठिण चेंडूने

दोघाचौघात खेळायची गेम चांगली रंगे. प्रवाशांचा परिचयही दाट होऊ लागला होता. ऑइस्का इंटरनॅशनल तर्फे एक जपानी विद्यार्थिनी व दोघे जपानी विद्यार्थी भारतात यावयास निघाले होते. त्यांच्या परिचयामुळे तरुण रक्ताच्या आकांक्षांची कल्पना आली. मिसेस डी सिल्व्हा या प्रकृतीने गांजलेल्या वयस्कर बाई सीलोन जवळ येत चालल्यामुळे आनंदित झाल्या होत्या. साठी उलटून गेली असताना व हृदयरोगाने पछाडलेले होते तरीही या बाईंची जीवनावरील निष्ठा व आशावादी दृष्टिकोण कौतुकास्पद वाटला. दि. २७ सप्टेंबर रोजी सकाळी ६ चे सुमारास कोलंबो बंदराचे कक्षेने बोट नांगरली गेली. बंदराजवळ समुद्र उथळ असल्याने मोठ्या बोटी दूरवर उभ्या रहातात व लॉंचने कोलंबो बंदरांत यावे लागते.

**सीलोनची भारतीय संस्कृति :**

लंका हा पुराणकाळापासून भारताचा एक भाग होता, व रामायणातील लंका व सध्याचे सीलोन एकच अशी सार्वत्रिक समजूत असली तरी इतिहाससंशोधकात त्यासंबंधी मतभेद आहे. परंतु तो प्रश्न घटकाभर बाजूला सोडला तरी भारताची व सीलोनची संस्कृति आजही सामान्यतः एक वाटते. तसा सीलोनचा ज्ञात इतिहास सुमारे दोन हजार वर्षांचा असून त्यांत संशोधकांकडून वेळोवेळी भर पडते आहे आणि मधला परकीय सत्तेचा काही काळ



मौंट लेव्हिन स्टेशन–सीलोन

सोडून दिला तरी १९४८ सालापासून कॉमनवेल्थमध्यें सीलोन आहे तेव्हांही देशांत संपूर्ण स्वायत्तता नांदत आहे. १९३१ पासून दरडोई मतदानाचा हक्क सीलोनी जनतेला मिळाला, व पार्लमेंटरी पद्धतीच्याच जबाबदार शासन पद्धतीचा अनुभव त्या देशास प्राप्त झाला.

भारताच्या दक्षिण टोकानजीक दिसणारे सीलोन मोठे बेट असून २५,३३२ चौरस मैल एवढा प्रदेश या बेटाने व्यापला आहे. बेटाची लोकसंख्या सुमारे १,११ लक्ष एवढी असली तरी तीन चार वंशांचा समावेश तींत होत असल्याने एकंदर जनतेचे स्वरूप एकजिनसी असे वाटत नाही.

सीलोनची राजधानी कोलंबो हे पश्चिम आणि पूर्व यांचेमधील सागरी व हवाई वहातुकींत मोक्याच्या जागी असल्याने त्याचे महत्त्व उत्तरोत्तर वाढतच चालले. तसेच आंतरराष्ट्रीय प्रवाशांना त्याचे आकर्षण प्रतीत होऊ लागले. कोलंबोच्या खालोखाल त्रिंकोमालि व गॅली ही बंदरे पुढे येत आहेत.

मोटर बोटीने कोलंबोत पदार्पण केल्यावर पायरवर चलन बदलून घ्यावे लागले. तेव्हा सीलोनी नोटाबरोबर मनीचेंजरने भारतीय नोटाही मला दिल्या त्याचे आश्चर्य वाटले. त्याने खुलासा केला की, बाजारात त्या सरसहा चालतात तेव्हा अडचण भासणार नाही. बाजारात अडचण एकदाच भासली ती म्हणजे तेथील सरकारी ग्रामोद्योग भांडारांत. भारतीय नोटा तेथील कॅशिअर घेईना तेव्हा निवडलेल्या किरकोळ वस्तू तेथेच ठेवाव्या लागल्या. पण अन्यत्र



कोलंबो प्राणिसंग्रहातील हरणे

बाजारात वीस हिंदी रुपयांना बावीस ते पंचवीस सीलोनी रुपये मिळतात असा अनुभव आला. म्हणजे नियमांचे चाकोरीमुळे जास्त किंमत देणारे गिऱ्हाईक मात्र सरकारी भांडाराने गमावले म्हणावयाचे ! कोलंबोत बोट दहा बारा तासच थांबत असल्यामुळे आणि पूर्वी पत्रव्यवहार केलेल्या काही व्यक्तींना मला भेटावयाचे असल्याने मी स्वतःचाच गाईड बनलो व काही ठिकाणे पाहून घेतली.

**कोलंबोतील प्राणिसंग्रहालय :**

कोलंबोतील प्राणिसंग्रहालय हे आशिया खंडातील पहिल्या क्रमांकाचे समजले जाते व पायरपासून संग्रहालयास थेट बसने जाता येते, तेव्हा पहिला मोर्चा तिकडेच वळविला मी.

प्राणिसंग्रहालयात जगातील बहुतेक देशातील वन्य पशूंचा संग्रह तर केला आहेच; पण एकंदर उद्यान विस्तीर्ण व मनोवेधक असल्याने विविध रंगीबेरंगी प्राण्यांच्या निरीक्षणात दोन घटका मोठ्या मौजेत जातात. फेरफटका मोठाच असल्याने मध्यें कांही नारियेल, आईस्क्रीम, खाद्य पेये मिळूं शकतात त्यांचा आस्वाद तरतरी आणतो. दर्शनी भागाला लागून एक सुसज्ज असे हॉटेलही आहे. संग्रहालयाच्या व्यवस्थेखालील या हॉटेलात शिरताच समोरच पुढील पंक्ती एका पॅनेलवर वाचावयास मिळाल्या:—



**श्री. ठाकूर व थिऑसॉफिकल सोसायटीचे सेक्रेटरी–मि. जोसेफ**

The wild life is not our's to dispose off as we please, we hold it in trust for those who come after us.

व्याघ्र, सिंह, गेंडे, गवे, झिब्रा एक ना दोन कितीतरी वन्य श्वापदे या उद्यानात पाहिली. कांहींचे माझे कोनिका आटो कॅमेऱ्यावर फोटोही घेतले. बरोबरची रंगीत फिल्म संपून गेल्यामुळे साध्या फिल्मवरच फोटो घ्यावे लागले एवढीच गोष्ट खटकली.

**रमणीय मौंट लेव्हिन :**

कोलंबो शहरात जवळ असे निसर्गरम्य ठिकाण म्हणजे मौंट लेव्हिन. तेथे आम्ही बसनेच गेलो. मौंट लेव्हिनला रेल्वेनेही जाता येते व याच नांवाचे स्टेशन डोंगरावरच्या छोट्याशा पठारावरून खाली पहावयास मिळते. त्याचाही फोटो घेण्यास मौज वाटावी. तेथून जवळच सर्व सुखसोयींनी युक्त असे मौंट लेव्हिन नावाचे हॉटेलही आहे.

सीलोनचे पार्लमेंट त्यावेळी चालूच असल्याने तेथील एका संबंधी खासदाराची मुलाखत घेणे शक्य झाले नाही; पण थिऑसॉफिकल सोसायटीचे सेक्रेटरी मि. जोसेफ यांना त्यांच्या घरीं मी भेटू शकलो. सीलोनमधील आध्यात्मिक विचारप्रवाहासंबंधी त्यांच्याशीं मनमोकळी चर्चा झाली. सीलोनमधील सर्वांत जास्त खप असलेले इंग्रजी दैनिक 'सीलोन डेली न्यूज' या पत्राच्या न्यूज एडिटरशी मि. जोसेफ यांनी परिचय करून दिला.

**'लेकहाऊस' वृत्तपत्रे :**

सीलोनकडेही साखळी पत्रे अग्रेसर असून डेली न्यूज त्यापैकीच एक आहे. 'लेकहाऊस' या सुसज्ज इमारतींत 'असोसिएटेड न्यूजपेपर्स ऑफ सीलोन लि.' या कंपनीची विविध वृत्तपत्रे प्रकाशित होतात व त्यांचे खपही दांडगे आहेत. भारतातील ऑडिट ब्यूरो ऑफ सर्क्युलेशन्स या संस्थेची प्रस्तुत वृत्तपत्रे सदस्य असून त्यांच्या खपांचे पुढील आकडे त्यांची लोकप्रियता दर्शवितात—सीलोन डेली न्यूज, स्थापना १९१८ किंमत २० सेंटस, खप ६४४६६ सीलोन ऑब्झर्व्हर (सायं दैनिक) खप १३६०२, दिनमिना (सिंहली दैनिक) खप ९२,६७१ किं. १५ सेंट., जनता (सिंहली सायंदैनिक) खप २९७१९. थिनकरण (तमिळ दैनिक) खप ३०,८७८. सीलोन ऑब्झर्वर, रविवारची आवृत्ति ७८१२९. सिलुमिना, सिंहली साप्ताहिक १,८६.२६०. थिनकरण—

तामिळ साप्ताहिक ३३,३३८. वरील वृत्तपत्रांखेरीज काही अन्य पाक्षिके व नियतकालिके ही संस्था प्रसिद्ध करते.

या वृत्तपत्राचे कचेरीत मी सुमारे दीड तास घालविला. चीफ रिपोर्टरने माझी जपान वगैरेसंबंधी या वृत्तपत्रांकरिता मुलाखतही घेतली.

कंपनीचे जाहिरात मॅनेजर आतिथ्यशील सज्जन गृहस्थ असून मला पायरवर आपल्या मोटारीतून पोहोचवावयास ते आले होते. भारतातील कारखानदारांना सीलोनमधील बाजारपेठ चांगली आहे पण आपल्या मालाची म्हणावी तशी जाहिरात सीलोनमध्ये ते करीत नाहीत असे त्यांचे मत पडले.

सीलोनचे लोक तीन चार वांशिक गटात विभागले असल्याने व त्यांच्या भाषाही भिन्न असल्याने त्याचा राजकारण इत्यादीवरही परिणाम होतो. बेटाची सुमारे दोन-तृतीयांश लोकसंख्या सिंहली आहे. अन्य वंशांचे प्रमाण पुढीलप्रमाणे आढळले. सीलोनी तामिळ ११ टक्के, सीलोनी मूर सुमारे ५ टक्के, बर्धर्स व यूरेशिअन्स अर्धा टक्का, मलायी पाव टक्का, चहाच्या मळ्यात मुख्यत्वे मजुरी करणारे हिंदी तमिळ आणि व्यापारात गुंतलेले हिंदी मूर सुमारे १२ टक्के. सीलोनमधील तद्देशीय वाढत्या लोकसंख्येच्या योगक्षेमाची तरतूद अवघड होऊ लागल्याने अलीकडेच भारतीय लोकांची परत रवानगी करण्याचा करार झाल्याचे वाचकांना माहीत आहेच.

## भदन्त आनंद कौशल्यायन :

कोलंबोत आमचे बोटीवर चढलेल्या मंडळीत भदंत आनंद कौशल्यायन यांचा उल्लेख प्रामुख्याने करावा लागेल. भदंतजींच्या वाङ्मयाशी माझा चांगला परिचय होता; व प्रत्यक्ष भेटही पूर्वी एकदा झाली होती. पण बोटीवर त्यांचेशी निवांतपणे गप्पागोष्टी करावयास वेळ मिळाला. सिलोनमध्ये विद्यापीठातील आपले संशोधन व शिक्षा कार्य संपवून ते मायदेशी परत जात होते. बुद्धाची शिकवण व बुद्ध धर्मातून जे अन्य पंथ निघाले त्यातील बारकावे भदंतजींनी मला समजावून सांगितले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या आठवणी निघाल्या तेव्हा कौशल्यायनजींचे हृदय भरून आले. त्यांनी डॉ. आंबेडकरांचे एक नवे चरित्र लिहिले आहे, त्याची हस्तलिखित प्रत दाखविली. डॉ. आंबेडकराचे अखेरीचे दिवस, अंत्ययात्रा इ. या चरित्रातील मजकूर चित्त हेलावणारा असाच आहे.

२७ तारखेस कोलंबो सोडले आणि दि. २९ ला दुपारी ४ वाजता आमची बोट मुंबई बंदराला लागणार त्यामुळे साहजिकच बांधाबांधीला सुरुवात झाली. अडीच महिन्याच्या दीर्घ प्रवासानंतर मायदेशाला परतताना साहजिकच हृदय उचंबळून आले. पण काहींना परदेश प्रवासात जो 'होमसिकनेस' बाधतो तसा काही प्रकार माझे बाबतीत तरी घडला नाही. उलट एक नवे जग पाहावयास मिळाले याचे समाधान लाभले.

दि. २९ सप्टेंबर १९६८ रविवारी दुपारी मुंबई बंदर नजीक येऊन ठेपले. बॅलर्ड पायर दिसू लागले आणि थोड्याच वेळात बोट धक्क्याला लागली. डेकवर भ्रमंती करून कोण कोण मंडळी स्वागतास आली त्याचा शोध करू लागलो. पहिला चेहरा दिसला माझे मेहुणे श्री. बबनराव गुर्जर यांचा. आमची सलामी झाली. नंतर पाहिले आमचे जावई श्री. रामभाऊ घमंडे यांना. इतक्यात बातमी पसरली की हाँगकाँगला फ्लूची साथ असल्याने आरोग्याधिकारी उतारूंची तपासणी करून मग त्यांना बोटीबाहेर जाऊ देणार. आमची बोट हाँगकाँग-कडून आली असली, तर तिकडून कोणी ही साथ भारतात पूर्वीच आणली होती याची किंवदंतीही आम्हांस मुंबईपर्यंत येईपर्यंत नव्हती. बोटीतही कोणी आजारी पडले नव्हते, पण लाल फितीच्या आदेशाप्रमाणे वागणे आवश्यक होते. त्यातून रविवार असल्याने बोटीतून उतरण्याचे कागदपत्र वगैरे तपासणारांची संख्या बेताचीच होती. या सर्व अडचणींचा परिणाम असा झाला की खाली प्लॅटफॉर्म-वर जमलेल्या मंडळींनी तीन चार तास अकारण ताटकळत बसावे लागले.

**स्वदेशी आगमन :**

परदेश-प्रवासातून परतल्यावर होणारे सर्व सोपस्कार पुरे होण्यास सायं-काळचे ७ वाजले. माझे ज्येष्ठ स्नेही श्री. काकासाहेब तांबे तर वाट पाहून थकून गेले. हारांची फुलेही सुकायला झाली. सौ. लता, चि. चारुदत्त, चि. लीना, सौ. कुंदा सर्व मंडळींना बोटही पाहावयास मिळाली, आणि नातवंडांना कॅबिन पाहून गंमत वाटली. माझे बंगाली पत्रकार मित्र श्री. घोष यांनी श्री. गुर्जरांचे बरोबर त्यांचेकडे रात्री येण्याचा आग्रह केला. पण अगोदरच उशीर झाला असल्याने व मंडळी दमून गेली असल्याने चि. लीनाला श्री. बबनरावांचेकडे मुक्कामास पाठवून आम्ही सर्वांनी मुंबईकरांचा निरोप घेतला. सर्व सुरळीतपणे पार पडल्याबद्दल जगन्नियंत्यापुढे नतमस्तक होऊन आम्ही पुण्यास परतलो.

# जपान व अतिपूर्वेकडील देश

## भाग सहावा

## एक्स्पो ७०–जपानभाषा–इंग्रजी परिशिष्ट

**जपानमधील जागतिक प्रदर्शन :**

जपानविषयक ग्रंथात १५ मार्च १९७० ते सप्टेंबर मध्यापर्यंत एक्स्पो १९७० हे जे जागतिक प्रदर्शन भरले त्यासंबंधी न लिहिले तर हा ग्रंथ अपुरा राहील. प्रस्तुत प्रदर्शनाची तयारी १९६६ पासून चालू होती आणि तीसंबंधी माहिती या पुस्तकाच्या दुसऱ्या भागात दिलेली वाचकांनी पाहिलीच असेल. नियोजनपूर्ण उभारणीचे एक उत्कृष्ट उदाहरण म्हणून या प्रदर्शनाकडे पाहावे. पुढील जागतिक प्रदर्शन भरविणाऱ्या देशाला यापेक्षाही चांगले करून दाखविण्याची हिंमत बाळगावी लागेल.

प्रस्तुत प्रदर्शनाला जगाचे कानाकोपऱ्यातून लक्षावधी मंडळी आल्यामुळे प्रदर्शनाचा प्रमुख हेतु सिद्धीस गेला. तसे म्हटले तर याच स्वरूपाची जागतिक प्रदर्शने नियमित कालावधीत भरलेली नाहीत. यापूर्वीचे प्रदर्शन 'एक्स्पो ६७' कॅनडातील मॉन्ट्रील येथे भरले होते आणि त्याचा विषय 'मानव आणि त्याचे जग' हा होता. प्रस्तुत प्रदर्शनाने या क्षेत्रातील तंत्राचा भव्य आदर्श इतर देशापुढे ठेवला. १९६५ चे सप्टेंबरमध्ये पॅरिसमधील आंतरराष्ट्रीय प्रदर्शनाच्या संघटनेने जपानला १९७० मध्ये जागतिक प्रदर्शन भरविण्यास अधिकृत अनुमति दिली; तेव्हापासून प्रदर्शनाच्या तयारीला विशेष सुरुवात होऊन १९६६ च्या ऑक्टोबरमध्ये प्रदर्शनाचा मास्टर प्लॅन तयार झाला. तेरा आर्किटेक्ट्सनी १९६८ मध्ये प्रदर्शनाच्या अखेरच्या बांधकामाचे ब्ल्यू-प्रिंटस तयार केले. यापूर्वी सन १९४० मध्ये जपानने जागतिक प्रदर्शन भरविण्याची परवानगी घेतली होती परंतु दुसरे महायुद्ध सुरू झाल्यामुळे ती योजना साहजिकच रद्द झाली.

## जागतिक प्रदर्शनांचा इतिहास :

या निमित्ताने जागतिक प्रदर्शनांच्या इतिहासावर दृष्टिक्षेप उद्बोधक ठरावा. १९०० शतकाचे मध्यास इंग्लंड हे व्यापारात अग्रेसर असल्यामु पहिले भव्य प्रदर्शन भरविण्याचा मान सन १८५१ मध्ये लंडनने मिळविला. त्या प्रदर्शनात हाइडपार्कमध्ये २१ एकरांवर पोलाद, काच आणि लाकूड यांचा टोलेजंग 'क्रिस्टल पॅलेस' उभारण्यात आला होता. कृत्रिम दात व कोल्ट रिव्हॉल्वर या प्रदर्शनात प्रथमच लोकांना पाहावयास मिळाले. त्यानंतर दोन वर्षांनी न्यूयार्कमध्ये अशाच मोठ्या क्रिस्टल पॅलेसची पुनरावृत्ति झाली. पॅरिस-मध्ये १८५५ मध्ये 'एक्सपोझिशन युनिवर्सेल' नावाचे प्रदर्शन तिसऱ्या नेपोलिअनने भरविले होते. लंडनमधील १८६२ मध्ये भरलेल्या दुसऱ्या प्रदर्शनात 'विटवर्थ ड्रिलिंग मशीन' व नवीन प्रिंटिंग ट्रेडल लोक पाहू शकले. पुढे पाच वर्षांनी पॅरिसमध्ये जे प्रदर्शन भरले होते, त्यात क्रपचे कारखान्यात तयार झालेली ५०,००० किलो वजनाची तोफ हे महत्त्वाचे आकर्षण होते. पुढे सहा वर्षांनी व्हिएन्ना येथेही एक प्रदर्शन भरले. त्यानंतर १८७६ मध्ये फिलाडेल्फिआ येथील प्रदर्शनात टेलिफोन, टाइपरायटर इ० वस्तू प्रथमच पाहावयास मिळाल्या. पुढच्याच वर्षी पॅरिसमध्ये जे प्रदर्शन त्यामध्ये एका मोठ्या बलूनमधून ५० प्रेक्षकांना आकाशात ५०० मीटर्स उंच नेऊन परत आणण्याचे कार्यक्रम मनोवेधक ठरले. एडिसनची ग्रामोफोन रेकॉर्ड या प्रदर्शनात प्रथमच पाहावयास मिळाली. पुढे १८८९ मध्ये पॅरिस येथे जे पुन्हा प्रदर्शन भरले त्यात तीनशे मीटर उंच एफल टॉवर बांधला गेला आणि तो आजही पॅरिसचे आकर्षण ठरला आहे. त्यानंतर चार वर्षांनी शिकागो येथील प्रदर्शनात शिकागोपासून प्रदर्शनापर्यंत जाणारी पहिलीच विजेची गाडी जनतेला पाहावयास मिळाली.

## विसाव्या शतकातील प्रगति :

१९०० साली पॅरिसमध्ये पुनः जे प्रदर्शन भरले त्यात बायसिकल्स, मोटर्स, 'क्ष' किरणयंत्र, वायरलेस, टेलिग्राफी इ. वस्तू ठेवल्या होत्या. सेंटलुई येथे १९०४ मध्ये जी जागतिक जत्रा भरली तीमध्ये १६ मोटर्स दिलखेचक ठरल्या. १९१५ मधील सॅनफ्रॅन्सिस्को येथे प्रदर्शन पाहाण्यास प्रथमच विमाना-तून मंडळी आली. चित्रपटातून सुद्धा प्रदर्शनाच्या जाहिराती दिल्या गेल्या.

शिकागो येथे १९३३-३४ मध्ये जे प्रदर्शन झाले, त्याचा विषय 'प्रगतीचे शतक' असा होता. ब्रुसेल्समध्येही पुढे एक प्रदर्शन झाले आणि १९३७ मध्ये पॅरिसमध्ये जे प्रदर्शन भरले, त्यात टेलिव्हिजनची प्रगति दाखविण्यात आली होती.


आंतरराष्ट्रीय
**प्रदर्शनाचे बोधचिन्ह**

न्यूयॉर्क येथे भरलेल्या १९३९-४० या प्रदर्शनात 'नायलॉन पॅव्हिलिअन' महत्त्वाचा होता आणि टेपरेकॉर्डरनेही लोकांचे लक्ष वेधले. 'उद्याचे जग' हा या प्रदर्शनाचा विषय होता. ब्रुसेल्स येथील १९५८ मधील प्रदर्शनात सोविएत युनिअनने पहिला मानव-निर्मित उपग्रह दाखविला; सिएटल येथील १९६२ च्या प्रदर्शनाचा विषय 'अवकाश युगातील मानव' हा होता आणि त्यानंतर भरलेल्या 'मॉन्ट्रीअल प्रदर्शनाबाबत' सुरुवातीलाच उल्लेख केला आहे. जागतिक प्रदर्शनांचे या पार्श्वभूमीवर जपानमधील 'एक्स्पो ७०' चांगले खुलून दिसले.

**प्रदर्शनाचे पदाधिकारी :**

प्रस्तुत प्रदर्शनाला प्रतिष्ठितपणा यावा यासाठी वजनदार व्यक्तींचे नियामक मंडळ नेमले गेले. जपानचे युवराज हिज हायनेस अकहितो हे या प्रदर्शनाचे सन्मान्य अध्यक्ष आहेत तर महामंत्री मि. इसाकु साटो अध्यक्ष स्थानी विराजित दिसतात. जपान सरकारचे वतीने तोरु हागुइवारा यांना कमिशनवर जनरल म्हणून नेमण्यात आले. प्रदर्शना साठी नेमलेल्या जपान असोसिएशनचे कायमचे अध्यक्ष म्हणून मि. ताईझो इशिझाका यांची निवड करण्यात आली आहे. ज्या ज्या देशांनी प्रस्तुत प्रदर्शनात भाग घेतला त्यांचे त्यांचे कमिशनर्स-जनरलना मान्यता देण्यात आली आहे. भारतातर्फे श्री एच्. डी. गौरी व श्री. रघुवीर दयाळ ह्यांची अनुक्रमे कमि. जनरल व डे. कमिशन जनरल अशी नियुक्ति झाली आहे. याखेरीज आंतरराष्ट्रीय स्टिअरिंग कमिटी नेमली असून तिचे पदाधिकारी पुढील देश आहेत—चेअरमन–कॅनडा व्हा. चेअरमन–ब्रह्मदेश, रिपोर्टर–बेल्जिअम. सदस्य–यू. एस. ए., यू. एस. एस. आर., ऑस्ट्रेलिया, यु. किंगडम्, थायलँड; सौदी अरेबिया, चेकोस्लोव्हाकिया, आयवरी कोस्ट, भारत व चिली.

एक्स्पो ७० चा मुख्य विषय "मानवसमाजाची प्रगति व सुरेल सामंजस्य" ( Progress and Harmony for Mankind ) हा असल्यामुळे त्याच्या मध्यवर्ती उभारणीत व शिल्पामध्ये साहजिकच ह्या उद्दिष्टाचा आविष्कार आढळतो. माणसाच्या प्रगतीचा विचार करताना त्याचा वंश, राष्ट्रीयत्व, लिंग, भाषा किंवा त्याचा सामाजिक दर्जा या गोष्टी गैरलागू समजून त्याची मनुष्य म्हणून प्रगति कशी होईल आणि अखिल मानवजातीत मेळ कसा साधेल हे पाहावयास हवे. त्यासाठी त्याला जीवनाचा उत्तम प्रकारे उपभोग घेता आला पाहिजे; निसर्गाचा अधिकाधिक उपयोग माणसाच्या श्रेयासाठी व्हावयास हवा; आणि मानवी बुद्धीने जे शास्त्रीय शोध निघत आहेत त्यांचा उपयोग जनतेच्या कल्याणासाठी झाला पाहिजे हेही ओघाने आलेच. परंतु इतके सर्व झाले तरी जोपर्यंत जगातील विविध समाजामध्ये प्रेम व बंधुभाव नांदत नाही तोपर्यंत प्रगतीतून सुरेल संगीत निघणार नाही.



एक्स्पो ७० बोधचिन्ह

**मानवाचे निसर्गाला आव्हान :**

एक्स्पो '७०' चे मुख्य प्रवेशद्वारांतून आपण प्रवेश करताच एक हजार मीटर लांब व दीडशे मीटर रुंद असे प्रतीक विश्लेषण क्षेत्र पाहावयास मिळते. सुरुवातीला विषयांचे जे विवेचन केले त्याला अनुसरून विविध वस्तूंचे प्रदर्शन प्रेक्षकांचे मन हरपविते. या प्रतीक प्रदर्शनाचे दालनास सहा मोठाले स्तंभ असून त्यावर १०८×२९२ चौ. मीटर्स क्षेत्रफळाचे विशाल छत आहे. पोलादी तक्त्यावर पॉलिएस्टर फिल्म चढवून ते शोभिवंत करण्यात आले आहे. ह्या छतातूनच 'सूर्याचा मिनार' उभारण्यात आला असून ते मानवाने निसर्गाला दिलेले आव्हानच वाटते.

एक्स्पोचे संन्मान्य अध्यक्ष



युवराज हि.ो हा. कहितो

या वास्तूतील भाग भूतकालाशी निगडित दाखविला असून पृथ्वीची उत्पत्ति व मानवाचा जन्म कोणत्या गूढ परिस्थितीत

झाला असावा, यासंबंधी काही देखावे तेथे निर्माण करण्यात आले आहेत. वास्तूचा जमिनीबरोबरचा भाग वर्तमानकाल दर्शवितो. मानवाने केलेल्या प्रगतीचाही तो दर्शक आहे. येथून आपण ४५ मीटर्स एस्केलेटरने टॉवर चढून जातो तेव्हा विभिन्न जीवसृष्टीशी आपला परिचय घडतो; आणि भव्य छतावर आपण आलो म्हणजे सूर्यमाला तर दिसतेच पण विश्वरूपदर्शनही घडते. ह्या छताहून वर सूर्याचा मिनार सत्तर मीटर उंच आहे. या मिनाराच्या शिखरावर अकरा मीटर्स रुंदीचा सुवर्णशोभेचा सूर्य उभारण्यात आलेला असून त्याचे पंचवीस मीटर्स लांबीचे दोन हात पाहुण्यांचे स्वागत करण्यास सिद्ध असतात.

**सांस्कृतिक करमणुकींची रेलचेल :**

'फेस्टिव्हल प्लाझा' हा सौध प्रदर्शनास येणाऱ्या हजारो लोकांना भेटी घेण्यास आणि चित्ताकर्षक कार्यक्रमातून करमणूक करून घेण्यास शानदार झाला आहे. प्रेक्षकांचेसाठी जी व्यवस्था ठेवण्यात आली आहे त्या भागातून सुमारे २७००० लोकांना एकूण सहा ठिकाणी चालू असलेले करमणुकीचे कार्यक्रम पाहाता येतात. एक्सपो हॉल व फस्टिव्हल प्लाझा यांचेमध्ये फ्लोटिंग स्टेज असून नऊ रंगीबेरंगी कारंजी व जलाशयांनी तरंगत्या रंगभूमीचा देखावा निर्माण झाला आहे आणि या रंगमंचावर जगातील विविध राष्ट्रांच्या वतीने पहिल्या दर्जाचे सांस्कृतिक व करमणुकीचे कार्यक्रम आयोजिले आहेत. चित्रकलेचे शौकिनांसाठी जगातील नामवंत चित्रकारांच्या कलाकृति, एक्सपो म्युझिअममध्ये पहावयास मिळतात. प्रदर्शनाचे प्रवेश–द्वार एवढे भव्य आहे कीं त्यामधून दिवसातून सुमारे दीड लक्ष प्रेक्षक प्रदर्शनात येऊ शकतात. एकदा ८५० येन दिले म्हणजे आतील कोणताही कार्यक्रम विनामूल्य पाहाता येत असल्यामुळे प्रेक्षकांना पुन्हा तिकिटे घेण्याची डोकेदुखी राहात नाही.

प्रस्तुत प्रदर्शनाचे निमंत्रक राष्ट्र जपान असल्यामुळे साहजिकच त्यांचा पॅव्हिअलिन् सर्वात मोठा आहे. लांबून या मंडपाचे स्वरूप चेरी ब्लॉझमसारखे दिसते आणि त्यात ५८×५७ मीटर क्षेत्रफळाचे विस्तृत असे पाच हॉल्स आढळतात. जपान व जपानी लोक या विषयाचे संबंधीचे हॉलमध्ये देशाचा इतिहास व तेथील लोक यांचे यथार्थ दर्शन घडते. दुसऱ्या हॉलमध्ये जपानचे कारखानदारीचे भव्य चित्र प्रतिबिंबित होते. तीन लक्ष टनी टँकरच्या विभागाची पोलादी पार्श्वभूमि ह्या हॉलला लाभली आहे. विविध तऱ्हेच्या

उद्योगांची प्रतिकृती प्रस्तुत विभागात जपानचेऔद्योगिक श्रेष्ठत्व दर्शविते. तिसऱ्या हॉलमध्ये जपानमधील निसर्ग व त्याचा उपयोग या विषयाची उभारणी केली असून तो पाहाताना जपानचे समुद्रातून लुटुपुटीने संचार केल्याचा अनुभव मजेशीर ठरतो. चवथ्या विभागामध्ये आधुनिक शास्त्रीय संशोधनाचे प्रकल्प पाहून या क्षेत्रात जपान पुष्कळच पुढे गेल्याचे आढळते. पाचव्या हॉलमध्ये 'उद्याचा जपान' विषयक चित्रपट १५७ फूट रुंदीच्या विस्तृत पडद्यावर नव्या तऱ्हेच्या तंत्राने आकर्षक रीतीने दाखविला जातो.

जपानसरकारचे कमिशनर जनरल



मि. तोरू हागुइवारा

जपान असोसिएशचे अध्यक्ष



मि. ताईझो इशिझाका

उद्यानांचे बाबतीत जपानला आगळेच वेड आहे. पाण्याच्या विभिन्न प्रवाहांचा उपयोग करून १·०३ किलोमीटर लांब व २०० मीटर रुंद अशी बाग तयार केली असून, निसर्ग व मानव यांचेतील सामरस्य या उद्यानाने प्रकट होते.

'एक्स्पो' ७० मध्ये जगातील ८४ देशांनी भाग घेतला असून त्या सर्वांचे पॅव्हिलिअन्स आपापल्या परीने वैशिष्ट्यपूर्ण झाले आहेत. (पृष्ठ १४-१५ वरील नकाशा पहा.) परदेशाहून आलेल्या पाहुण्यांना सामान्यतः तीन-चार दिवसात प्रदर्शन पाहाण्याचा कार्यक्रम उरकावा लागत असल्यामुळे सर्व मंडपांना भेटी देणे अशक्य होते, शिवाय रात्रौ ठराविक वेळी प्रदर्शन बंद झाल्याने सर्वांना

बाहेर पडावे लागते. अग्रेसर राष्ट्रांचे महत्त्वाचे पॅव्हिलिन्सना लांबलचक रांगा असल्यामुळे मध्यंतरी वेळही पुष्कळ फुकट जातो आणि कित्येकदा शितावरून भाताची परीक्षा करण्यात येते. म्हणून काही खास वैशिष्ट्ये असलेल्या पॅव्हिलि-अन्सचे वर्णन पुढे देत आहोत.

**भारताचा पॅव्हिलिअन :**

भारतीय प्रवाशांना साहजिकच भारताच्या पॅव्हिलिअनबद्दल आकर्षण असणार ! सेंट्री पुलाच्या पूर्वेकडे हा पॅव्हिलिअन उभारला आहे. मोनो-रेलच्या 'जॅपानीज गार्डन्स' स्टेशनचे नजीकच आहे हा पॅव्हिलिअन. भारताचा इतिहास ५००० वर्षांचा जुना असल्यामुळे या प्राचीन संस्कृतीतून आजच्या आधुनिक भारताची कशी उत्क्रांती होत गेली याचे सम्यक् ज्ञान प्रस्तुत मंडप पाहताना होते. प्रथम प्रवेश करताना आपला देश ग्रामीण पद्धतीवर उभारला असल्याचे शेतकऱ्यांच्या झोपड्यांनी खेडेगावातील जीवन प्रकट होते. तदनंतर मध्य-स्तरावर या विशाल देशातील सांस्कृतिक इतिहास डोळ्यांपुढे उभा राहातो. बौद्ध व अन्य धर्मांचेही मूलस्थान भारत असल्यामुळे आध्यात्मिक वातावरणही या विभागात प्रकट होते. त्याशिवाय प्राचीन शिल्प, चित्रे, कलावस्तू, ग्रामोद्योग इत्यादींची आगळीच आकर्षकता प्रतीत होते. ताजमहालचे प्रतीकही मुद्दाम उभारण्यात आले आहे. त्याशिवाय नृत्य, गायन इ. कलांचा आविर्भावही या मंडपात दिसतो.

भारताच्या पॅव्हिलिअनबद्दल विभिन्न प्रतिक्रिया प्रकट झालेली दिसते. परदेशी पाहुण्यांना 'दिलीप' या पांढऱ्या चित्त्याचे आकर्षण विशेष दिसते आणि त्याला पाहाण्यासाठी प्रेक्षकांच्या झुंडीच्या झुंडी भारताचे पॅव्हिलिअनकडे वळतात. योगशास्त्रांतील तज्ज्ञही भारताचे मंडपात भेटू शकतात. भारतामध्ये योगी, बैरागी, वाघ, सिंह, हत्ती, इ. वन्य प्राणी यांची रेलचेल आहे, ही परदेशीयांची आमचेबद्दल दृढ झालेली भावना ! विशेषतः स्वातंत्र्योत्तर कालात देशाने औद्योगिक व अन्य शास्त्रांत जे परिवर्तन केले त्याची छाप भारताचे प्रदर्शन मंडपात पडावयास हवी. जपानचे परराष्ट्रखात्याचे उपमंत्री श्री. ओशिबा यांनी भारतीय शामियान्यास भेट दिली तेव्हा पांढरा चित्ता पाहिला; व योग्यांशी चर्चा केली. अशा प्रकारामुळे भारताची नवीन प्रतिमा विदेशीयांचेवर ठसणे अशक्य प्राय होते. भारताचा शामिआना पाहून भूतकालात जमा झालेल्या म्युझिअमचा

एक तुकडा अशी साधारण समजूत होते. त्यामुळे पॅव्हिलिअन पाहून या देशाकडे अधिकाअधिक पर्यटक कितपत खेचले जातील याची शंका वाटते. तसे म्हटले तर परदेशी शामियान्यात भव्यपणात भारताचा सातवा क्रमांक लागतो. औद्योगिक विभागात पोलादाच्या निर्मीतीचे प्रतिबिंब चांगले उमटले आहे. प्रसिद्धीचे बाबतीतही आपल्या शामियान्यासंबंधी विशेष दक्षता घेतली नसावी, कारण ‘ एक्सपो ७० ’ पाहून आलेल्यांजवळ त्याच्या स्लाईडस विशेष पाहावयास मिळाल्या नाहीत.

**कॅनडाचा शामियाना :**

सेंद्री ब्रिजच्या पूर्वेकडील विभागांत कॅनडा, फ्रान्स, जर्मनी, इंडोनेशिया, न्यूझीलंड, फिलिपिन्स, स्वीटझर्लंड, युनायटेड नेशन्स इ. चे शामियाने प्रकर्षाने आढळतात. कॅनडाच्या पॅव्हिलिअनचा विषय ‘ लोकशाही ’ हा आहे. या पॅव्हिलिअनच्या बाहेरची बाजू आरशाने वेष्टिलेली असल्याने वरचे आकाश जसे त्या आरसपानी भिंतीवर प्रतिबिंबित होते, त्याचप्रमाणे विशिष्ट तांत्रिक चमत्कृतींनी आर्क्टिक बर्फाच्छादित प्रदेश, निळसर पर्वत आणि तुषारमय पाण्याचे प्रवाह असा निसर्गसमृद्ध कॅनडा प्रेक्षकांचे लक्ष वेधतो. या तरुण देशाची वैशिष्ट्ये मोठ्या खुबीने प्रदर्शित केलेली आहेत; आणि एक्सिमोंनी कसब दाखवून तयार केलेले छताचे शिल्प अवर्णनीय भासते.

**संगीताचे उद्यान :**

‘ फेडरल रिपब्लिक ऑफ जर्मनी ’च्या शामियानाचा विद्युत् प्रकाशाने तेजाळलेला घुमट बऱ्याच दूरवरून दिसतो. ह्या पॅव्हिलिअनचे वैशिष्ट्य असे की त्यात प्रवेश करून सर्व दालने पहातांना आधुनिक जगद्विख्यात संगीत निर्मात्यांच्या कृती ऐकावयास मिळतात आणि त्यात पाहुणे नादमुग्ध होतात. ‘ संगीताचे उद्यान ’ असे जे वर्णन या शामियान्याचे केले जाते, ते सार्थ होय. घुमटाच्या टोकावरून उलट्या पेरिस्कोपने या प्रदर्शनाचे दर्शन घेता येते.

**विद्युत्दीपांचा शामियाना :**

आन्तरराष्ट्रीय प्रदर्शन संघटनेची मुख्य कचेरी फ्रान्समध्ये असल्याने त्याचेकडे ह्या क्षेत्रात ज्येष्ठपणाचा मान जातो. चार घुमटाकार वास्तूंनी या प्रदर्शनाची उभारणी केलेली असून त्यापैकी तीन एकमेकाला लागून व चौथा थोडासा बाजूला

आहे. पांढरे शुभ्र असे हे घुमट पंधराशे विद्युत्दीपांनी झगमताना दिसतात. पॅरिसला ' विले ल्युमिएर ' म्हणजे प्रकाशाचे शहर म्हणतात त्याची या प्रदर्शनात कल्पना येते.

न्यूझीलंडचा पॅव्हिलिअन अवाढव्य नसला तरी त्या देशाची यथार्थ प्रतिमा दाखवितो. न्यूझीलंडहून आणविलेल्या लाकडापासून या शामियान्याची उभारणी झाली आहे आणि माणसा-माणसांत अधिकाअधिक समजूत कशी पडत जाईल, हे या देशाचे एक उद्दिष्ट दिसते.

**झगझगत्या दीपांची दिवाळी :**

स्वीट्झर्लंडच्या शामियानाचा आकार झाडासारखा असून त्याच्या सर्व बाजू अॅल्युमिनिअम प्लेट्स्नी मढविलेल्या आहेत. दुपारी बत्तीस हजार काचेचे गोळे या शामियानासभोवती जे लखलखतात त्यांचे रूपांतर रात्री विजेच्या गोळ्यांत होऊन जो झगमगाट होतो त्यामुळे दिवाळीचा सण तर नाही ना असा भास होतो. ' एकात्मतेतील भिन्नता ' हा या स्वीस प्रदर्शनाचा विषय आहे.

**शिल्प साहित्य-कला यांचा संगम म्हणजे फिलिपिन्स :**

फिलिपिन्स च्या शामियानाचे उद्दिष्ट ' विभिन्न संस्कृतींच्या एकात्मतेतून प्रगति ' असे आहे आणि त्या दृष्टीने त्यातील वातावरणाची निर्मिति झालेली आहे. फिलिपिन्सचा इतिहास, त्यांचे शिल्प व कला आणि साहित्य, तसेच स्पॅनिश व मुस्लीम संस्थांनी देशाची केलेली प्रगति व मूळ फिलिपिनो लोकांचे आचार-विचार यांचा ठसा प्रस्तुत प्रदर्शन पाहाताना होतो. कॉफी वर्णाच्या फिलिपिनो स्वयंसेविका इंग्रजी व जपानी भाषेतून मोठ्या चुणचुणीतपणे आपल्या देशाची वैशिष्टये दाखवितात.

**प्राचीन देवालयांचे प्रतीक :**

थाई शामियान्याची उभारणी बँकॉकमधील प्राचीन देवालयांच्या थाटात केलेली आढळते. या वास्तूंचे सर्व भाग व शिल्पकाम खुद्द थायलँडमध्ये करून बोटीने ते ओसाकाला आणण्यात आले व नंतर शामियाना बांधण्यात आला. थायलंडमधील विभिन्न कलाकृती तसेच बँकॉकच्या राष्ट्रीय म्युझिअमधील वैशिष्टयपूर्ण वस्तू येथेही पाहावयास मिळतात.

## संस्कृतींचा मिलाफ अर्थात् इजिप्त :

'युनायटेड अरब रिपब्लिक' च्या शामियानास साहजिकच पिरॅमिडचा आकार देण्यात आला आहे. इजिप्तची संस्कृती आठ हजार वर्षांची जुनी असल्याची प्रचीती हा पॅव्हिलियन पाहताना येते. वैद्यक, शल्यतंत्र, ज्योतिष, भूमिती, गणित, औषधिशास्त्र इ. विषयात खिस्ताब्दापूर्वी तीन हजार वर्षे नाईल नदीच्या काठच्या या प्रदेशात महत्त्वाची प्रगती झाली होती. ग्रीक, रोमन, खिश्चन, व इस्लामी संस्कृतींनाही इजिप्तने कसे जोपासले याचीही काहीशी कल्पना या शामियान्यावरून होते.

व्हिएतनामच्या रिपब्लिकचा शामियाना नुकत्याच रक्तरंगणांतून गेलेल्या या चिमुकल्या देशाची पुष्कळशी कल्पना आणून देतो. व्हिएतनामी जनता धीराची तर खरीच ! परकीयाच्या आक्रमणाला तोंड देऊन एक प्रचंड दिव्य केल्याचे व्हिएतनामने दाखवून दिले आहे.

## २० व्या शतकाची प्रगति :

युनायटेड नेशन्सचा पॅव्हिलिअन शैक्षणिकदृष्ट्या विशेष महत्त्वाचा ! या पेल्याच्या आकाराचा पॅव्हिलिअन पृथ्वीची कल्पना देतो आणि त्याच्या सभोवती धातूचे ५२६ खांब उभारले आहेत, ते जगातील विभिन्न समाजांचे निदर्शक आहेत. शांततेसाठी या संघटनेने काय केले हे प्रदर्शनात समजते. नोबेल शांतता पारितोषिके कशासाठी दिली गेली त्याचेही दर्शन येथे घडते. वाढती लोकसंख्या दर्शविणारा एक घुमट आणि जगाचा अन्न पुरवठा व सांपत्तिक स्थिती प्रकट करणारे प्रतीक पाहिले म्हणजे कुटुंब नियोजनाची आवश्यकता साहजिकच पटते. अवकाशातील उपग्रह आणि त्यांचा टेलिव्हिजन किंवा टेलि-न्यूज पेपरसाठी उपयोग या क्षेत्रातील नवे दालन दर्शवितात. याच शामियान्यात 'एशियन डेव्हलपमेंट बँक' दालनाचाही समावेश होतो. आशिया व अतिपूर्वेकडील देश यांच्या आर्थिक प्रगतीकरिता या बँकेने चांगलीच मदत केली असून आतापर्यंत तेरा योजनांसाठी ८ कोटी ३९ लाख डॉलर्स एवढ्या रकमेची कर्जे दिली आहेत. या बँकेचे अधिकृत भांडवल ११००० लाख डॉलर असून २० देश त्या बँकेत सामील झाले आहेत.

## शास्त्रीय ज्ञानात भर टाकणारा यू. एस. एस. आर.

'सेंट्री ब्रिज' च्या पश्चिमेकडील विभागातही पुष्कळ महत्त्वाचे शामियाने आहेत. या प्रदर्शनातील सर्वात उंच मिनार सोविएत शामियानाचा असून त्यांच्या इमारतीचे सर्वोच्च टोक एकशे दहा मीटर्सपर्यंत गेलेले आहे. त्यामुळे प्रदर्शनाच्या कोठल्याही भागातून रशियन राजवटीचे प्रतीक 'कोयता व हातोडा' त्याच्यात अग्रभागाशी डौलाने मिरवताना आढळते. सोविएत राष्ट्राचा पिता लेनिन यांची जन्म-शताब्दि २२ एप्रिल ७० रोजी जगभर साजरी झाली. त्यामुळे याही प्रदर्शनात साहजिकच लेनिनच्या क्रांतिकारक जीवनाचे निदर्शन पहिल्याच दालनात मोठ्या प्रतिष्ठेने केलेले आढळते. 'साम्यवादामध्ये व्यक्तीची सुसंगत प्रगती' हा विषय प्रदर्शनाचे दुसऱ्या दालनात रेखाटला आहे. रशियातील विभिन्न समाजांची सांस्कृतिक लेणी या ठिकाणी पाहावयास मिळतात. पुढे आपणास शंभर मीटर्स उंचीच्या हॉलमध्ये अवकाश यान पाहावयास मिळते; तसेच महासागर व पृथ्वीचा अंतर्भाग यांची खोली दर्शविणारी आधुनिक शास्त्रीय उपकरणेही आपल्या ज्ञानात भर टाकतात.

## अमेरिकन जीवनाची प्रतिमा

युनायटेड स्टेट्सचा शामियाना ८३ × १४० मीटर्स क्षेत्रफळाचा आहे. ह्या पॅव्हिलियनचे विस्तीर्ण छत घुमटाकार असून खांबाच्या आधाराखेरीज उभारलेली ही कमान विलक्षण भासते. अमेरिकन जीवनाच्या प्रतिमा या प्रदर्शनात प्रामुख्याने आढळतात. अवकाश संशोधनासाठी वापरली जाणारी याने व त्यांचे विविध भाग नावीन्यपूर्ण आहेत. चंद्रावरून आणलेल्या खडकाचा तुकडा अमेरिकेच्या या क्षेत्रातील विजयाची साक्ष ठरतो.

पश्चिम गेटानजीक ब्रिटिश पॅव्हिलियन असून 'प्रगति, आश्वासन व विविधता' त्याचा मुख्य विषय ! ब्रिटनने वैद्यक, शेती, आण्विक शक्ति व सागरी शास्त्र या विषयात केलेली प्रगतीही एका दालनात दाखवितात. औद्योगिक प्रगति व ब्रिटिश जनतेची आजची राहाणी याचेही दिग्दर्शन आणखी दोन दालनात आढळते.

## हेलिकॉप्टरमधून भ्रमण :

इटलीचा पॅव्हिलिअन चमत्कृतिजन्य वाटतो. पोलाद व काच यांच्या

चार निरनिराळ्या स्तरांनी ह्या वास्तूची उभारणी केली आहे. विशेष म्हणजे इटली-तील प्रमुख शहरांमधून हेलिकॉप्टरमधून आपल्या जागेवर बसून भ्रमण करण्याची संधी प्रेक्षकांना मिळते, त्याचे मुळाशी चित्रपटदर्शनाचे एक नवीन तंत्र उप-योगिले आहे. इटलीतील शिल्प व चित्रकला यूरपमध्ये अग्रेसर समजली जाते. त्यांचे नमुनेही या पॅव्हिलिअनमध्ये पाहावयास मिळतात. पोलाद व फायबरग्लास यांची इटलीत तयार केलेल्या वास्तूत देशाच्या औद्योगिक प्रगतीची यथार्थ कल्पना मिळते.

**तरंगती भूमि हाँगकाँग :**

हाँगकाँगचे पॅव्हिलिअनसभोवती जलाशय असून मच्छिमारी करण्याच्या नावेचे चित्र दुरून उभे राहाते व हाँगकाँगचे नैसर्गिक बन्दर व तेथील ४० लक्ष लोकांचे जीवन प्रामुख्याने नजरेसमोर येते. हाँगकाँगचे सामाजिक जीवन तसेच तेथील उत्सव, रंगेल रात्री, इ. च्या दर्शनाने प्रवाशात हाँगकाँगबद्दलच हा पॅव्हिलिअन पाहून आकर्षण उत्पन्न होते.

हाँगकाँगप्रमाणे एकेकाळी क्राऊन कॉलनी समजल्या जाणाऱ्या सीलोनने बौद्ध संस्कृतीचा आविष्कार त्यांचे शामियान्यात केला आहे. या शामियानाचे कंपा-उंडमध्ये एका तळ्याचे पार्श्वभूमीवर भगवान गौतम बुद्धाने ज्या बोधिवृक्षाखाली अंतिम स्वरूपाचे ज्ञान मिळविले त्या झाडाचे पानाची ब्राँझमध्ये विशाल प्रतिकृति करून ठेवलेली दिसते. सीलोनचा उत्कृष्ट चहा किती चविष्ट असतो याची कल्पना शामियान्यातील विश्रांति-गृहात येते.

मलेशियाच्या पॅव्हिलियनमध्ये तद्देशीय मॅली घरे कशी असतात ती पाहावयास मिळतात. कापडावरील बारीक चित्राकृतींचे नमुने स्त्रियांना विशेष आवडतील.

पाकिस्तानचे पॅव्हिलिअनमध्ये मुस्लीम धर्माचे वैशिष्ट्य दर्शविलेले आढळले; तरीही प्राचीन वेगवेगळ्या संस्कृतींचा त्या देशावर पूर्वी कसा पगडा होता, याचाही मागोवा घेतला आहे. रीजनल् कॉर्पोरेशन फॉर डेव्हलपमेंट या संघटनेच्या इराण व तुर्कस्थान या सदस्यांसह एक संयुक्त शामियानाही प्रस्तुत तीन राष्ट्रांतील खास मैत्री दर्शवितो.


सिंगापूरच्या पॅव्हिलिअनमध्ये उत्कृष्ट सजावटीचे उद्यान पाहून मन हरकून जाते. एक छोटासा धबधबाही नैसर्गिक पार्श्वभूमीवर सौंदर्यात भर घालतो.

सिंगापूरमधील विविध समाजातील विभिन्न संस्कृतींचा आविष्कारही या ठिकाणी पाहावयास मिळतो

काही प्रमुख देशांच्या पॅव्हिलिअन्सचे धावते समालोचन वर केले आहे. याखेरीज जपानमधील काही नामवंत खाजगी उद्योगसमूहांचे शामियाने स्वतंत्र असले तरी त्यांची आकर्षकता कित्येक बाबतीत वैशिष्ट्यपूर्ण वाटते. सुमितोमो, तकारा, फुजी, संतोरी, फ्युरुकोटा, मित्सुई, तोशिबा, पेप्सी, हिताची, मित्सुबिशी, फुजीपॅन्, सान्यो, इत्यादी जगप्रसिद्ध कारखानदारांचे शामियाने कल्पकतेत आणि नावीन्यतेत कोणासही हार जाणार नाहीत. जपानमधील गॅस असोसिएशनचा गॅस पॅव्हिलिअन पाहताना हसून हसून मुरकुंडी वळते. कंपन्यांना लाफिंगगॅसने हा हास्यविनोदाचा कारखाना उभारण्याची कल्पना सुचली असावी. आणखी एक जपानी कल्पकतेचा गंमतीदार नमुना 'वाकोल् इन्कॉर्पोरेटेड व रिकार्स सुईंग मशीन कंपनी लिमिटेड' यांच्या संयुक्त शामियान्यात दिसते. जपान व अन्य देशांतील वधू-वरांचे विवाह या शामियान्यात आठवड्यातून दोनदा लावले जातात आणि त्यामुळे लग्नातल्या आचार-विचारांची सर्वांनाच कल्पना येते.

असे होते हे 'एक्स्पो ७० ' प्रदर्शन ! विहंगमावलोकनच या ठिकाणी आम्ही करू शकलो. प्रेक्षकांचे मनात कायमची स्मृती राहील नाही का या प्रदर्शनाची ?

# एक्स्पो ७० मध्यें भाग घेतलेले जगांतील देश



# जपानी भाषा

**मूळ स्वरूप व स्थित्यंतर :**

जपानी भाषा जुनी जपानी व चिनी या भाषापासून तयार झाली आहे. चिनी भाषेची लिपी चित्रलिपी असल्याचे वाचकांना माहीत असेल. त्यामुळे मूळ चिनी–जपानी भाषेत अक्षरांची संख्या ४१५ हजारांपर्यंत गेली होती. कालांतराने चित्रलिपी व हजारो अक्षरांचा संभार टायपिंग, मुद्रण इत्यादीसाठी अडचणीचा वाटू लागला व लिपीत पुष्कळच सुधारणा होत गेली. साधारण आठराशे अक्षरात जपानी भाषा बसविण्याचा सुधारकांनी उपक्रम केला. प्राथमिक हिरागाना लिपी सुमारे ७० अक्षराची आहे.

जपानी लेखनाची पद्धत कागदाच्या वरच्या उजव्या कोपऱ्यापासून खाली सरळ उभ्या ओळी काढीत लिहीत जाते अशी आहे. परंतु अलीकडे कित्येक जपानी पुस्तके किंबहुना पाठ्यांचे वर आडव्या ओळीत अक्षरे लिहिण्याचा प्रघातही रूढ होऊ लागला. या संबंधात निश्चित बंधन असे आढळत नाही. रोमन लिपीतही जपानी भाषा लिहिण्याचा उपक्रमही काही ठिकाणी केलेला आढळतो. आधुनिक जपानी लिपी वरवर पाहाणाऱ्याला लघुलिपीसारखीही वाटते. या लेखामध्ये इतरत्र जपानी अक्षरे व त्यांचे रोमन लिपीतील उच्चार यांचा तक्ता दिला आहे. त्यावरून अक्षरे व उच्चार यांची ओळख होण्यास मदत व्हावी.

लिपीमध्ये ब्रह्मघोटाळा असूनही जपानने वाङ्मयनिर्मितीतही मोठीच आघाडी मारली आहे, हे त्यांच्या कल्पकतेचे प्रमाण होय. लिपी जरी समजून घेण्यास आणि वाचण्यास वा स्वतः लिहिण्यास अवघड असली तरी जपानी भाषा तशी बोलायला सोपी आहे. विशेषतः या देशात ५।६ महिने वास्तव्य करण्याची संधी मिळाली तर कामचलाऊ बोलण्यास अडचण होऊ नये. भाषा शिकण्याचा उत्कृष्ट मार्ग म्हणजे त्या देशात वास्तव्य करून चुकत माकत का होईना, जसे येईल तसे त्यांच्या भाषेतून बोलण्याचा प्रयत्न करणे. आपल्या महाराष्ट्रात गुजराती, पारशी, बोहरी, मारवाडी इ. समाजातील मंडळी मराठीतून महाराष्ट्रीयांशी बोलतात. महाराष्ट्रीय माणूस या संबंधात काहीसा संकोची वाटतो. महाराष्ट्रीयांनी इतर समाजाचे अनुकरण केल्याखेरीज त्यांना त्या त्या भाषेचा सराव होणार नाही.

भाषा चांगल्या प्रकारे शिकण्याचे एक वय असते. तरुण मंडळींना जितक्या लवकर एखादी भाषा आत्मसात करता येते तितके वयस्कर मंडळींना जमत नाही. लिपीओळख साधारणतः झाली तर शहरातील मोठाल्या पाट्या हे भाषा शिक्षणाचे पहिले धडे मानावेत. नंतर वृत्तपत्रातील मथळे वा मोठ्या अक्षरातील जाहिराती भाषाज्ञान होण्यास काही प्रमाणात उपयोगी पडतात. ज्यांना शक्य असेल त्यांनी एखादा तास शिकवणीही ठेवण्याची व्यवस्था करावी. आर्थिक दृष्ट्या तसे परवडत नसेल तर आपली भाषा जिज्ञासूला शिकवावी व त्याची भाषा आपण शिकावी. वृत्तपत्रातून जाहिरात देऊन अशी परस्पर सोयीची मंडळी जुळविता येतात. असो.

जपानी भाषा म्हटले तर सोपी, म्हटले तर अवघड अशी आहे. तिची नाडी व एकंदर थाट समजून घेतला तर ती अवगत होणे कठीण नाही. परंतु केवळ चार जुजबी शब्द व वाक्ये पाहून भाषा समजली, अशी कोणी कल्पना केली तर ते चुकीचे ठरेल. ‘ दोन घटकात भाषाज्ञान ’ अशा मथळ्याची पुस्तके वाचून भाषा समजून घेण्याचा झटपट रंगारीपणा हास्यास्पदच.

जपानी व मराठी भाषेत पुष्कळसे साम्य असल्यामुळे महाराष्ट्रीयांना ती शिकणे अवघड पडू नये. प्रथमेपासून सप्तमीपर्यंत विभक्त्या संस्कृत व मराठी-प्रमाणे जपानी भाषेत आहे. विभक्तीचे प्रत्यय पुढीलप्रमाणे आढळतात.

प्रथमा—वा, गा. द्वितीया—वो,:ओ तृतीया–दे. चतुर्थी—ए. पंचमी —कारा—मोदे. षष्ठी—नो. सप्तमी—नी.

वरील विभक्ति प्रत्यय नामापुढे लावायचे असतात. उदा.—मीना या विशेषनामास विभक्ति प्रत्यय पुढीलप्रमाणे लागतील.

मीना—प्रथमा—मीनावा—मीनागा.
मीनाला—द्वितीया—मीनावो
मीनाने—तृतीया—मीनादे.
मीनाला, मीनास—चतुर्थी—मीनाए
मीनापासून—पंचमी—मीनाकारा.
मीनाची,–चा,–चे;—षष्ठी—मीनानो.
मीनात—सप्तमी—मीनानी.

जपानी भाषेत नामामध्ये लिंगामुळे फरक होत नाही,
उदा.—इनु–कुत्रा–वा कुत्री.

नामाचे बहुवचनी व एकवचनी रूप सारखेच असते.

उदा.— एम्पित्सु–पेन्सिल

एम्पित्सु–पेन्सिली.

लिंग किंवा वचनभेदाप्रमाणे क्रियापदाचे रूप बदलत नाही. वाक्य-रचनाही मराठीप्रमाणेच आहे. पहिला कर्ता, नंतर कर्म व शेवटी क्रियापद असते. इंग्रजीत कर्ता, क्रियापद व नंतर कर्म येते.

उदा.—आरती मुंबईला जाते.

आरतीवा बॉम्बेए इकिमास.

जपानी भाषेत ' सान ' हा शब्द विशेषनामापुढे शिष्टाचाराकरता प्रत्यय आहे. वरील वाक्य ' आरतीसानवा बॉम्बेए इकिमास' सुसंस्कृत समजले जाते.

नित्याची सर्वनामे पुढीलप्रमाणे—वाताशी,

मी—वाताशी ( किंवा बोली भाषेत वाताक्षी )

आम्ही—वाताशीताची. ( वाताशी दोमो. )

तू—अनाता.

तुम्ही—अनातागाता. ( अनाताताची )

तो—अनोहितो. ( कारे )

ते, त्या, ती—अनोहितोताची.

ती— कानोजो

दर्शक सर्वनाम—हा, ही, हे—कोरे ( ही वस्तु बोलणाऱ्याच्या जवळ असल्यास )

तो, ती, ते—सोरे–( ऐकणाऱ्याच्या जवळपासच्या वस्तु वा व्यक्तीसाठी ) आणि आरे—( ते बोलणाऱ्या व ऐकणाऱ्याच्या मध्यावर असलेल्या वस्तूसाठी. )

**प्रश्नार्थक सर्वनामे :**

पुढील प्रश्नार्थक सर्वनामांचा वापर खाली लिहिल्याप्रमाणे केला जातो.

कोण = दारे ? किंवा दोनाता.

उदा. तुम्ही कोण ? अनाता दोनाता, किंवा अनातावा दोनाता देसका ?

काय ? = नान्देस्का नानी ?

उदा. हे काय आहे ? कोरे नानी ! किंवा कोरे वा नान देसका ?

कोठे ? = दोको ?

| | | | | |
|---|---|---|---|---|
| あ ( a ) | い ( i ) | う ( u ) | え ( e ) | お ( o ) |
| か ( ka ) | き ( ki ) | く ( ku ) | け ( ke ) | こ ( ko ) |
| さ ( sa ) | し (shi) | す ( su ) | せ ( se ) | そ ( so ) |
| た ( ta ) | ち (chi) | つ (tsu) | て ( te ) | と ( to ) |
| な ( na ) | に ( ni ) | ぬ ( nu ) | ね ( ne ) | の ( no ) |
| は ( ha ) | ひ ( hi ) | ふ ( hu ) | へ ( he ) | ほ ( ho ) |
| ま ( ma ) | み ( mi ) | む ( mu ) | め ( me ) | も ( mo ) |
| や ( ya ) | | ゆ ( yu ) | | よ ( yo ) |
| ら ( ra ) | り ( ri ) | る ( ru ) | れ ( re ) | ろ ( ro ) |
| わ ( wa ) | | | | を ( wo ) |
| が ( ga ) | ぎ ( gi ) | ぐ ( gu ) | げ ( ge ) | ご ( go ) |
| ざ ( za ) | じ ( zi ) | ず ( zu ) | ぜ ( ze ) | ぞ ( zo ) |
| だ ( da ) | ぢ ( ji ) | づ ( zu ) | で ( de ) | ど ( do ) |
| ば ( ba ) | び ( bi ) | ぶ ( bu ) | べ ( be ) | ぼ ( bo ) |
| ぱ ( pa ) | ぴ ( pi ) | ぷ ( pu ) | ぺ ( pe ) | ぽ ( po ) |
| きゃ (kya) | | きゅ (kyu) | | きょ (kyo) |
| しゃ (sha) | | しゅ (shu) | | しょ (sho) |
| ちゃ (tha) | | ちゅ (chu) | | ちょ (cho) |
| にゃ (nya) | | にゅ (nyu) | | にょ (nyo) |
| ひゃ (hya) | | ひゅ (hyu) | | ひょ (hyo) |
| みゃ (mya) | | みゅ (myu) | | みょ (myo) |
| りゃ (rya) | | りゅ (ryu) | | りょ (ryo) |
| ぎゃ (gya) | | ぎゅ (gyu) | | ぎょ (gyo) |
| じゃ ( ja ) | | じゅ ( ju ) | | じょ ( jo ) |
| びゃ (bya) | | びゅ (byu) | | びょ (byo) |
| ぴゃ (pya) | | ぴゅ (pyu) | | ぴょ (pyo) |

रोमन लिपीत उच्चार दर्शविलेली जपानी अक्षरे ( हिरागाना )

उदा. आपण कोठे आहोत ?—कोको दोको ? किंवा कोकोवा दोको देसका ?

कोणते ? = दोरे. उदा. एक्स्पोला कोणती ट्रेन जाते.

बांपाकु यूकि देन्शा वा दोरे देस्का ?

केव्हा ? = इत्सु ? उदा. ही गाडी या स्टेशनवरून केव्हा सुटते ?

कोनो किशावा कोनो एकिकारा इत्सु देमास का ?

कोणती वेळ आहे = नान जी ?

किती बरे ? = कोरे इकुरा ? किंवा ओईकुरा.

**क्रियापद :**

जपानी भाषेत क्रियापद·कर्त्याच्या लिंगवचनाप्रमाणे बदलत नाही, याचा पूर्वी निर्देश केला आहे. नकारात्मक नाही किंवा नको असा वेगळा शब्द जपानी भाषेत नाही. मूळ धातूच नकारात्मक अर्थाने वेगळा प्रत्यय लावून चालविला जातो.

उदा. ‘पिणे’ या मराठी धातूस जपानी पर्याय ‘नोमि.’ क्रियापद वर्तमानकाळी तयार करणे असल्यास मूळ धातूला ‘मास’ हे उपपद लागते. म्हणजे त्याचे ‘नोमिमास’ असे रूप होते.

मी पाणी पितो = वाताशिवा मिझुओ नोमिमास.

मी पाणी पीत नाही = वाताशिवा मिझुओ नोमिमासेन.

कोणत्याही धातूची अपूर्ण काळची रूपे करणे असल्यास त्यातील मुख्य धातूपुढे ‘इरु’ या धातूची रूपे उपयोगात आणावी लागतात.

उदा. मी खात आहे = ‘वाताशिवा थाबेतेइमास’ असे या वाक्याचे जपानी रूपांतर होईल आणि नकारार्थी ‘थाबीनेतेईमासेन’ वापरावे लागेल.

क्रियापदाचा भूतकाळ होताना ‘माश्ता’, हा प्रत्यय लागतो. तसेच विध्यर्थासाठी ‘माश्यो’ हे पद लागते.

मी दूध प्याले = वाताशिवा मिरुकुओ नोमिमाश्ता.

मी दूध प्यावे = वाताशिवा मिरुकुओ नोमिमाश्यो.

नकारार्थी वाक्यप्रयोग पुढीलप्रमाणे—

मी दूध प्यायले नाही = वाताशिवा मिरुकुओ नोमिमासन देश्ता.

मी दूध पिणार नाही = वाताशिवा मिरुकुओ नोमिमासन

क्रियापदांचे काही महत्त्वाचे धातू पुढे देत आहोत.

असणे = अिरु. ( सजीवांसाठी )
असणे = आरु. ( निर्जीवांसाठी )
आणणे = मोत्तेकुरु
आमंत्रण देणे = मानेकु.
आनंदित होणे = योरुकुबु.
उपयोग करणे = त्सुकाउ.
ऐकणे = किकू.
करणे = सुरु.
कळणे = शिरु.
काम करणे = शिगोतो सुरु.
कापणे = किरु.
खाणे = थाबेरु.
गरज असणे = इरु.
घेणे = तोरु.
चालणे = आरुकु.
जाणे = इकु.
जळणे = याकेरु, योप्रेरु, ( अकर्मक ).
जाळणे = याकु ( सकर्मक )
झोपणे = नेरु.
ठेवणे = ओकु.
थांबणे = तोमारु.
थांबविणे = यामेरु.
दाखविणे = मिसेरु.
देणे = आगेरु-कुरेरु
बोलणे = हानासु.
नेणे = हांकोउ, मोत्तेकु.
परवानगी देणे = युरुसु.
बसणे = सुवारु.
पळणे = हाशिरु.
पहाणे = मिरु.
पाहिजे असणे = इरु.
पोहणे = ओयोगु.
बोलावणे = योबु.
भिणे = ओसोरेरु.
भूक लागणे = ओनाकासुकु
भेटणे = आउ.
मिळणे = एरु मोराउ
येणे = कुरु.
लिहिणे = खाकू.
वाचणे = योमु.
विकणे = उरु.
विकत घेणे = काउ.
विनंति करणे = तानोमू.
समजणे = वाकारु.
सुरु करणे = हाजिमेरु.
स्पर्श करणे = सावारु.
होणे = नारु.
हसणे = वाराउ.
भेट देणे = कुदासारु.

**शिष्टाचार :**

प्रवाशांना शिष्टाचारार्थी वाक्प्रयोग वारंवार करण्याचे प्रसंग येतात. त्यातील निवडक वाक्प्रचार पुढे देत आहोत.

गुडमॉर्निंग ( शुभप्रभात ) = ओहायो गोझाईमांस्.
गुड डे किंवा गुड आफ्टरनून = कोन् निचिवा.
गुड इव्हिनिंग = कोम् बहान्लावा.
गुडनाईट–स्लीपवेल = ओयासुमि नासाई.
कसं काय ? = इकागादेस्कां ?
ठीक, बरा आहे = अरिगातो गेंकि देस्.
भेटलास, आनंद झाला = दोझो योरोशिकु ?
कोण बरे आपण ? = अनातावा दोनाता देस्का ?
माझं नांव चारु = वाताकुशीनो नामाएवा चारु देस.
माझ करा = गोमेन् कुदासाई, शित्सुरे शिमास.
आभारी आहे = अरिगातो गोझाइमास.
सुस्वागतम् = इराश्शाई माशिते.
याना पुन्हा ! = माता इराश्याणी.
हे छान आहे = कोरे वा योयि देस.
वा ऽ मजा आहे = कोरे वा ओमोशिरोई देस्.
छान काम केलत = गोखुरोसामा.
अभिनंदन = ओमेदेत्तो.
भेटू पुन्हां आपण = माता आईमाश्यो.

## प्रवासातील नित्योपयोगी वाक्ये :

मी ओसाकाला जाऊ इच्छितो = वाताशिवा ओसाकाए इकिताई देस.
या गाडीत मला एक सुरक्षित तिकीट हवे आहे = कोनो रेशानो झासे कि ओ योयाकुशिताअी.
हे तिकिट रद्द करता येईल का = कोनो किप्पुओ तोरिकेशी मासुका ?
ही एक्सप्रेस गाडी ना ? = सोरेवा क्युको रेश्या देसका ?
वाटेत मला उतरता येईल ना ? = तोचुगेश्या गा देकि मासुका ?
कोणत्या प्रदेशातून आपण जात आहो = इमादोको ओ हाशिते इमासुका ?
गाडीत माझी बॅग राहिली = रेश्शानो नाकानी काबा नओ ओकिवासुरे माश्ता
ट्रेन = किशा. स्टेशन = एकि. प्लॅटफॉर्म = परातोहोमु.
कंडक्टर = शाशो. पोर्टर =आकाबो. क्लोकरुम = तेनिमोत्सुआजुकारिजो

तिकिट ऑफीस = शुत्सात्सुजो.
वेळापत्रक = जिक्को कुह्यो; विजेची गाडी = देनशा.
टॅक्सी = ताकुशी; टॅक्सी स्टॅंड कोठे आहे ? = ताकुशीनोरिबावा दोको देसका ?
कृपया टॅक्सी बोलवा = ताकुशीओ योन्दे कुदासाई.
अमक्या ठिकाणी काय भाडे पडेल = मादे इकुरादे युकीमासका ?
अमुक ठिकाणी मला न्या = मादे इत्ते कुदासाई.
थोडा वेळ येथेच थांबा = कोकोदे चोत्तो मात्ते कुदासाई
जरा घाई करा = इसोइदे कुदासाई.
हां इथच थांबा = कोकोदे तोमेते कुदासाई.
काय भाडे झाले = इकुरा देसका ?
– येथे जाण्याकरिता बसस्टॉप कोठे ? = युकिनो बासुनो तेर्युजो वा दोको देस्का ?
या ठिकाणी जायला काय भाडे पडेल ? = मादे इकुरा देस्का
या ठिकाणी जायला रस्ता दाखवा = सुमिमासेंगा ए इकु मिचिओ ओशिएते कुदासाई.
हा रस्ता कोणता ? = कोनो तोरिवा नानतोईमास्का.
**दिशाः**—पूर्व = हिगाशी, पश्चिम = निशी, दक्षिण = मनामी, उत्तर=किता,
उजवीकडे = मिगी. डावीकडे = हिदारी.
पुढे = माअे. मागे = उशीरो. ब्लॉक = बोरोकु.
रस्ता = दोरो. पूल = हाशि. पत्ता = जुशो.
पोलिस = जुनसा. पूजास्थान = जिंगू.
कॉलेज विद्यापीठ = दाइगाकु. लायब्ररी = तोशोकान.
शाळा = गाक्को. बाजार = इचिबा. नदी = कावा
टॉवर = तो. बाग = कोएन.
चित्रपटगृह = एइगाकान. सर्कस = साकासु,
पुतळा = शोझो. प्राणिसंग्रहालय = दोबुत्सुएन.
उत्सव = मात्सुरी. समुद्र = उमि. बेट = शिमा. पर्वत = यामा.
ज्वालामुखी = काझान. अरण्य = मोरी, सरोवर = मिझुमी.
उन्हाळी = ऑन्सन. धबधबा = ताकी. बीच = हामाबे.

डिपार्टमेंट्ल स्टोअर = ह्याक्कातेन. बाहुली = निंगयो.
चित्र = ए. . पादत्राणे = कुत्सु. घड्याळ = तोकि.
पुस्तक = होन. खेळणे = ओमोचा. फॉउंटनपेन = मानेहित्सु.
सोने = किन. स्टँप = युविनकित्ते.
चांदी = जिननोतो. पाकिट = फुतो.
नोटपेपर = घिनसेन. नोतो एअर लेटर = एआलेटा.
टेलिफोन = देन्वा. हॅलो, आपण श्री – आहात का ? = मोशी
मोशी – सान देस्का ? हं. मी बोलतोय = कोचिरावा–देस्.
मला श्री. – यांचेशी बोलायचे आहे = –सानओ हानाशी शिमास.
मला अर्जंट कॉल करायचा आहे = शिक्युसाई योबिदासिते कुदासाई.
टेलिफोन डिरेक्टरी = देन्वाचो.
सावकाश बोललात तर बरे = मोत्तो, युक्कुरी देनाशिते कुदासाई.
आजार = ब्योकि. डॉक्टरांना बोलवा = इश्याओ योन्दे कुदासाई.
मला बरं वाटत नाही = किबुंगा वारुई.
फार्मसी = याक्योकु. फिजीशिअन = नैकायी. सर्जन = गेवाई,
डेंटिस्ट = शिकाई. नर्स = कांगोफु. औषध = कुसुरी.
प्रिस्क्रिपश्न = शोहोसेन.

**अवयव :**

हृदय = शिंझो. यकृत = कांझो. घसा = नोदो. तोंड = कुची.
नाक = हाना. कान = मिमि. डोके = अतामा. हात = ते.
पाय = आशी. पाठ = सेनाका. मनगट = तेखुवी. छाती = मुने.

**संख्या :**

१ = इचि. २ = नि. ३ = सान. ४ = शि. ५ = गो. ६ = रोकु.
७ = शिची. ८ = हाची. ९ = कु. १० = जु. २० = निजु.
१०० = ह्याकु. १००० = सेन. १०,००० = मान. १०,०००,००
= १० लक्ष = ओकु.

**वार :**

रविवार = निचियो.  १ तास = इचिजिकान्.
सोमवार = गेत्सुयो.  ५ मिनिटे = गोफून.
मंगळवार = कायो.  ५ सेकंद = गोब्यो.
बुधवार = सुइयो.  आज = क्यो.
गुरुवार = मोकुयो.  काल = किनो.
शुक्रवार = किन्यो.  उद्या = अशिता.
शनिवार = दोयो.  परवा= मियोगोनिची.
महिने = गात्सु.

**महिने :** जानेवारी = इचिगात्सु, फेब्रुवारी = नीगात्सु, मार्च = सानगात्सु एप्रिल = शिगात्सु, मे = गोगात्सु, जून = रोकुगात्सू, जुलै = शचिगात्सु ऑगस्ट = हाचिगात्सु, सप्टेंबर = कुगात्सु, ऑक्टोबर = जूगात्सु, नोव्हेंबर = जुइचिगात्सु, डिसेंबर = जुनीगात्सु.

**ऋतू** :— वसंतऋतु = हारु.  ग्रीष्म, वर्षा = नात्सु.
हेमंत, शरद = आकि.  शिशिर = फुयु.

**रंग** :— काळा = कुरो. पांढरा = शिरो. तांबडा = आका.
निळा =आओ. पिवळा = किरो. तपकिरी = च्याइरो
करडा = हाअिरो.. हिरवा = मिदोरी. नारिंगी = दाईदाई.
गुलाबी = पिंकु जांभळा = मुरासाकी. सेपिया = सेपिया.

**कुटुंब व नाती :**

कुटुंब = कोझोकु, पुरुष = ओतोको, स्त्री = ओन्ना, मुलगा = शोनेन, मुलगी = शोजो, तान्हे मूल = आकाम्बो, मूल = कोदोमो, वडिल = चिचि, आई = हाहा, पति = ओत्तो ( शुजिन ), पत्नी = त्सुमा, भाऊ = क्योदाई. बहिणी = शिमाई, मित्र = युजिन, तोमोदाची. मोठा भाऊ = निनीसान, लहानभाऊ = ओतोतोसान.

**व्यवसाय = शोकुग्यो.**

धंदेवाईक = जित्सुग्योका, सराफ = गिंकोका, इंजिनियर = गिशी, विद्यार्थी = गाकुसेई, वकिल = होरित्सुका, व्यापारी = शोनिन,

शिक्षक = क्योशी, सरकारी नोकर = कोमुईन, पत्रकार = शिंबुनझाशीकिशा, फोटोग्राफर = शाशिंया, नट ( नटी ) = दान्यु ( जोयु ). चित्रकार = गाका, गवई = ओंगाकुका, नर्तिका = बुयोका.

शहर = शि, शाकभाजी फक्त. = यासाई बक्कारी, शून्य = रेई, सिगारेट = माकिताबोको, तेल = आबुरा, पाऊस = आमे.

नेहमी उपयोगी पडणारे इतर शब्द :—

अग्नि = ही, अंडे = तामागो, आकार = ओकीसा, आगपेटी = माश्चि, आंगठी = युवित्रा, आगबोट = फुने, आठवडा = शुकान. आयुष्य = इनोची, आले ( सुंठ ) = शोगा, व्यापारी कचेरी = मिसे, इंच = सुन, उंच = ताकाई, उत्पन्न = साईन्यु, उतारु = जोक्याकु, कंपनी = काइशा, कपाट = थाना, करमणूक = गोराकु, कस्टम ऑफिस = झेईकान, कॅटलॉग = मोकुरोक, काकडी = क्युरी, कागद = कामी, कांदा = तामानेगी, शौचकूप = बेंझो, सुती कापड = मोमेन, लोकरी कापड = राशा, रेशमी कापड = किनु, कारखाना = कोबा, कॉफी = कोही, किती = इकुरा, किल्ली = कागी, कुलुप = ज्यो, केळे = बनाना, कोको = कोकोआ, कोट = उवागी, खचित = ताशिकानी, खर्च = हियो,

खारट ( आधिक्य दर्शक ) = खाराई. तिखट = तोगाराशी काराई, गरम = अत्सुई, थंड = सामुई, खिडकी = मादो, खोली = हेया, खुर्ची = इसु, गरीब = बिंबोना, गल्ली = चोमे, गहू = मुगि, गादी = फुतोन, गाय = मेउशी, गूळ = नानकिनसातो, गोड = अमाई, घोडा = उमा, घर = उची, चमचा = साजी, चाकु = कोगाताना, चष्मा = मेगाने, चीज = चीजु, चेक ( बँकेचा ) = चेकी, जपानी छत्री = कासा, जमीन = जिमेन, जरा = च्योत्तो, झाड = की, भात = गोहान, तांदूळ = कोमे, द्विदल धान्ये = मामे, गोड हरभरा = सातोमामे, दाणे = पीनट, वांगे = नासू, बटाटा = इमो, पाव ( ब्रेड ) = पान, पावती = इकेतोरी, सफरचंद = रिंगो, संत्रे = मिकान, मीठ = शिओ, मुळा = दायकोन, बर्फ = कोरी, बाटली = बिन, सायकल = जितेंशा, वहान = कुरुमा, पेटी = हाको, मेणबत्ती = रोसोकु, रबर = गोमु, लोकवस्ती = जिंको, लोणी = बाता, वाटाड्या = अन्नाइजिन.

* * *

# 23rd Anniversary of Ogamisama's First Sermon

## Egotism – Greatest Enemy of World Peace

On July 22nd, 1968, appproximately 5,000 followers of Ogamisama from all over Japan and followers from countries across the seas gathered in the large Preaching Hall to commemorate, for the first time since Ogamisama's Ascension, the anniversary of Her first sermon. Following are excerpts from Wakagamisama's address:

" How happy Ogamisama in Heaven must be to see so many of you gathered here from many parts of Japan and from across the seas to celebrate this occasion.

On the day World War II ended, Ogamisama said, " The war between maggots has ended and a war has commenced between God and the Devil. It is now raging. God's Judgment will fall upon those who are evil and people who are serving Him will be able to experience a Heaven on earth while still in the physical body. The era in which only God's children will prosper has dawned.

To help even one human being to become a true human being is a service to God. I would consider my life well worth living even if one person says that my teachings have saved him and he is happy. " Thus said Ogamisama who dedicated Her whole life for the salvation of humanity.

Ogamisama repeatedly taught Her followers to get rid of their negative, evil thoughts and feelings and rise spiritually. This is necessary for the achievement of world peace because the crisis in the world today is caused, not by ideologies, science ro weapons, but by what is in the hearts of human beings. The

greatest enemy of world peace is egotism deeply imbedded in their hearts.

After a moving introductory address by Wakagamisama, Himegamisama thanked the followers and expressed her wish that they follow the teachings of Ogamisama. Following this, representative doshis, addressing the vacant chair high on the rostrum, paid tributes to Ogamisama and gave assurance that the inspiration given by Her would guide their lives. Messrs. K. Ogo (Japan), Jose De Alencar (Brazil), Ben. Jerome (U.S.A.), M. B. Nangeria ( India ), N. T. Thakur ( India ) and Mrs. D. Worcester ( Great Britain ) spoke on the occasion, Prayer and the singing of Hotoka ( Song of Gratitude to Ogamisama ), conclueded the ceremony. Shri Thakur's speech follows:—

**Tribute by Shri N. T. Thakur on behalf of India**

Let me extend cordial greetings to you on behalf of the Southern India on this sacred occasion of the 23rd anniversary of the first sermon of Ogamisama. My head naturally bows to



Ogamisama delevering her sermon in Poona
on 14th Nov. 1964

the Vacant Chair which reminds me of a similar chair of Ravindranath Thakur in Shantlnikentan which I had visited. On the chair is a plaque in which a poem with the title 'Vacant Chair' is printed. Incidentally, that place is also termed 'Abode of Peace' which is a strange coincidence. Ravindranath Thakur along with Mahatma Gandhi were Servants of World Peace and India, to which I have the honour to belong, thus could very much appreciate the message of Ogamisama for World Peace.

Yamaguchi Prefecture and Hiroshima have been witness to the annihilation caused by atomic bomb and if any land in the world is best suited to preach the message of peace it is this. Wars are results of politicians and people going the wrong road and Ogamisama had chastened them in cruel terms because She had the good of the whole mankind in Her heart. Naturally vested interests which Shs termed "maggots" could not digest Her advice and She was persecuted on that account. But truth ultimately prevailed.

East has given the founders of all great Faiths to the world and Ogamisama was one of them. She however believed more in action than in precept. An ounce of self-realization is worth a ton of preachings. She did not care for externals but strove hard for purification of Souls. "Polish your Souls," She thundered from the top of Her voice which reverberated in mountains and dales, city halls and village rooms and not only She had started a new era but tried Her best to bring in God's Kingdom on this earth.

India remembers with heavy heart Her visit to thc country in 1964. I was fortunate to have Her press conference in my office hall and She had expressed the wish that I would be able to visit Honbu some time. Though my hankering in the matter has been realized today, I feel a void iu my heart.


You have been fortunate to hear the Mother's sermons for times out of number. We in Poona play some of your tape

records but we are still thirsty for more. The great prophetess was never a bigot. Religions are only preached and not practised, that was her complaint. She had said—" I am not expounding a unique doctrine. Mine is the same as that which ever religion teaches. However, the Truth has been subdivided into thousands of different sects." The great Upanishads, the oldest Hindu Scriptures have said ' ईशावास्यमिदम् जगत् ' that is 'God is Universal' and Tensho–Kotai–Jingu–Kyo means Teaching of the Absolute God of the Universe.

Let us on this sacred occasion resolve to follow Her Teachings and their interpretations which Her worthy successor Himegamisama and son Wakagamisama would give and that wovld be a fitting memorial to the Prophetess of Tabuse.

**English Sammer Session**

On the morning of the 23rd of July, after the opening addresses by Himegamisama and Wakagamisama, members of the English Summer Session introduced themselves briefly.



" Temple of Peace " Tabuse, Yanaguchi Ken. Japan

Mr. Alex Langhof, who has become a citizen of the world thanks to travels through many countries, indicated on a map of the world, places he had visited and related his experiences with audio-visual talks during his tours. Mr. M. B. Nangeria from Kanpur, India, detailed the activities of the Kanpur Branch and the response of people in various places he has visited. Mr. N. T. Thakur from Poona, India, then gave a talk stressing the problem of some eighteen important languages in India and showed how the difficulties they encounter in certain quarters in the propagation of Ogamisama's teachings can be removed. Mr. T. Hada from California, Ben, Jerome from Pennsylvania, Mr. Jose de Alencar from Brazil and Mr. H. Miyamoto from Hawaii also made valuable suggestions which would help the movement of Tensho-Kotai-Jingu-Kyo.

During the summer session, Mr. Nakayama delivered lectures on Mioshie which helped the members to understand some intricate teachings of Ogamisama. Interspersed during the Session was a program of film shows and slide exhibits which informed the members of various activities of Honbu and its principals. Slides reiating to the stages in the life of Himegamisama and her association with Ogamisama, since she was an infant were much appreciated by the audience. This Second English Summer Session on Teachings of Ogamisama terminated on the 31st of July.

Among the various activities which are held at Honbu, ' Shurenkais ' ( spiritual disciplinary meetings ) have their special significance. The Children's Shurenkai and the Wakoodo ( Young People ) Shurenkai were started by Ogamisama about 12 years ago, and these disciplinary gatherings inculcate in the young minds principles of Mioshie which stand them in good stead in their future life.


Honbu was in a lively and gay state between the 4th and 7th August by the presence of hundreds of children. On the last day of the Shurenkai, the children confessed their small

records but we are still thirsty for more. The great prophetess was never a bigot. Religions are only preached and not practised, that was her complaint. She had said—" I am not expounding a unique doctrine. Mine is the same as that which ever religion teaches. However, the Truth has been subdivided into thousands of different sects." The great Upanishads, the oldest Hindu Scriptures have said ' ईशावास्यमिदम् जगत् ' that is 'God is Universal' and Tensho–Kotai–Jingu–Kyo means Teaching of the Absolute God of the Universe.

Let us on this sacred occasion resolve to follow Her Teachings and their interpretations which Her worthy successor Himegamisama and son Wakagamisama would give and that wovld be a fitting memorial to the Prophetess of Tabuse.

**English Sammer Session**

On the morning of the 23rd of July, after the opening addresses by Himegamisama and Wakagamisama, members of the English Summer Session introduced themselves briefly.



" Temple of Peace " Tabuse, Yanaguchi Ken. Japan

Mr. Alex Langhof, who has become a citizen of the world thanks to travels through many countries, indicated on a map of the world, places he had visited and related his experiences with audio-visual talks during his tours. Mr. M. B. Nangeria from Kanpur, India, detailed the activities of the Kanpur Branch and the response of people in various places he has visited. Mr. N. T. Thakur from Poona, India, then gave a talk stressing the problem of some eighteen important languages in India and showed how the difficulties they encounter in certain quarters in the propagation of Ogamisama's teachings can be removed. Mr. T. Hada from California, Ben, Jerome from Pennsylvania, Mr. Jose de Alencar from Brazil and Mr. H. Miyamoto from Hawaii also made valuable suggestions which would help the movement of Tensho-Kotai-Jingu-Kyo.

During the summer session, Mr. Nakayama delivered lectures on Mioshie which helped the members to understand some intricate teachings of Ogamisama. Interspersed during the Session was a program of film shows and slide exhibits which informed the members of various activities of Honbu and its principals. Slides reiating to the stages in the life of Himegamisama and her association with Ogamisama, since she was an infant were much appreciated by the audience. This Second English Summer Session on Teachings of Ogamisama terminated on the 31st of July.

Among the various activities which are held at Honbu, ' Shurenkais ' ( spiritual disciplinary meetings ) have their special significance. The Children's Shurenkai and the Wakoodo ( Young People ) Shurenkai were started by Ogamisama about 12 years ago, and these disciplinary gatherings inculcate in the young minds principles of Mioshie which stand them in good stead in their future life.

Honbu was in a lively and gay state between the 4th and 7th August by the presence of hundreds of children. On the last day of the Shurenkai, the children confessed their small

failings with a promise not to commit them in the future, which was educative for the elders as well. The Wakoodo Shurenkai was held from the 14th to 16th of August. Wakagamisama inaugurated both of the Shurenkais and exhorted them to pray earnestly for the redemption of evil, earthbound spirits and for world peace. During the Shurenkais, talks were given by various doshis. Among them were doshis from overseas : Messers. Ben. Jerome, Jose de Alencar, M. B. Nangeria, Alex Langhof, N. T. Thakur and Mrs. Worcester. † † †

**' Heavenly Honbu '— An appreciation by N. T. Thakur, India**

The month and a half I have passed at Tabuse will remain a life's experience to me in the spiritual realm. Ogamisama has already set up the Kingdom of God on this earth and if one wants to have a taste of it let him come to the Temple of Peace



Ogamisama Party on the World Tour
1. Mr. Jerome 2. Mr. Langhoff 3. Sakayamasan 4. Miss Midori. 5. Miss June. Sitting—Ogamisama

and his soul will receive such a polish that even an outsider would consider it a miracle.I never thought that I would be staying here for more than a fortnight. At the first meeting with worthy Wakagamisama, he told me that the coming three weeks in Honbu have a special significance, and I should cease to think about external matters and become one with " Its " life. I accepted the advice with a little hesitation. Things however proved that my spiritual life in these days has risen to a higher plane and I cannot be too thankful to Honbu for having enabled me to go through the self– chosen path of Spiritual Discipline.

All the buildings as well as the main Temple of Peace in Honbu from early morning to night reverberate by the chanting of the prayer Namyohorengekyo and our daily doings here, so to say, float on the rhythm of this wonderful prayer. When I saw small children at the dining hall on the occasion of



Kitamura Family Group

1. Mrs Kitamura 2. Ogamisama 3. Himegamisama ( Standing ) 4. Mr Yashito Kitamura

Shurenkai, praying enthusiastically Namyohorengekyo prior to taking food, I felt confidence in the future. I do believe that these young boys and girls when they grow up will strive every nerve to bring God's Kingdom on this earth. Since my arrival in Japan I have experienced courtesy and gentle behavior but in Honbu these qualities are at its peak and I felt as if I was at my home. While in the dormitory reception hall sitting on a corridor floor, I found a little difficulty in tying the laces of my shoes, a Japanese doshi from California completed the work at which I felt much overwhelmed. It is only God's people who can be so careful about ( others' ) difficulties. Ogamisama's teachings about shedding one's ego and the quality of humility have much to do with the ' milk of human kindness ' which abounds in Honbu. When starting for Japan, myself being a vegetarian, people warned me that I would experience difficulties with respect to food. Some even recommended me to take a little stock of the preserved food in my luggage, which I did not heed to. I, however, found no difficuly in the Honbu canteen to get the type of food I liked and the volunteers in charge of the dining hall have been very particular to inquire and arrange for my requirements.

Ogamisama by scores of years of Her righteous life, has set an example before mankind to follow. By Her life of penance and selflessness, God had entered Her body. Her sermons have been the preaching of God Himself and it is only in fitness of things that much of the time at Honbu is given to playing the tapes of Ogamisama. We are indeed grateful to Honbu for preserving to the posterity most of the important sermons of Ogamisama. The tapes being in Japanese need to be translated in various foreign languages. After playing the tape of the original sermon, it wonld be useful if another tape of the translation of the same in local language is provided for. Until that becomes possible, tapes in English would serve this purpose to some extent. In conclusion let me express my heartfelt thank to Himegamisama & Wakagamisama for having made my long journey to Honbu possible. ( August 1968 )

REFBK-0018125

REFBK-0018125